१९२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ७२२
REFBK-0003676
REFBK-0003676

सन १९२८ A S Gadre. Range Forest Officer, Wakhera New & Second Hand Books Nasik. २१२/-

अप्रकाशित

# राजनैतिक इतिहास

( द्वितीय खण्ड. )

३५५६

" Away with wreckages of past nations
Enslaved crowds rise at the call.
The world shall shake from its foundations
We that are nothing shall be all. "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६०१८ वि: इतिहास
क्रमांक १९२२ नों: दि: ३०|८|५८

शंकर दिनकर करंदीकर.

REFBK-0003676

१ रुपाया.]

REFBK-0003676

मुद्रक व प्रकाशक
शंकर नरहर जोशी
चित्रशाळा प्रेस
१०२६ क. सदाशिव
पुणे शहर.

द्वितीय संस्करण शके १८५१

[ या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. ]

पुस्तक प्राप्तीचें ठिकाण:—

चित्रशाळा प्रेस, पुणे शहर.

# समर्पण.

देशाचें कल्याणच ज्यांनीं जीवनाचें व्रत
केलें आहे त्यांच्या करकमलीं—
हा माझा वक्तव्य विषय विचार
करून पाहण्याकरतां—हें
पुस्तक अर्पण करीत
आहें.

विनीत
ग्रंथकार

# अभिप्राय.

**क्रां**तिकारकांचा ‘ **अप्रकाशित राजनैतिक इतिहास** ’ हें पुस्तक मीं वाचून पाहिलें. सदरहू पुस्तकाच्या प्रकाशनानें गेल्या महायुद्धाच्या काळांत हिंदुस्थानला पारख्या झालेल्या, नीतिमत्तेनें श्रेष्ठ पण इंग्रजी कायद्यानें गुन्हेगार मानलेल्या, अनेक देशभक्तांनीं आपल्या मातृभूमीसाठीं जे प्रयत्न केले ते आज महाराष्ट्रीय जनतेपुढें पहावयास मिळत आहेत. क्रांतिकारकांनीं अंगीकारलेला मार्ग प्रचालित परिस्थितीमध्यें इष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न किंचित् बाजूला ठेवून लोकमान्यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें ‘ इंडियन पिनलकोडपेक्षां जास्त उच्च अशा नैतिक व नैसर्गिक वातावरणांत ’ जाऊन विचार केला असतां, त्याच्या उदात्त हेतूबद्दल कोणासही कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांची मनोभूमिका, त्यांचें धैर्य यांविषयींचा आदर प्रस्तुत पुस्तक वाचल्यापासून दुणावेल यांत शंका नाहीं. त्यांचे दृश्य सृष्टींतील मार्ग निःशस्त्र हिंदुस्थानांत स्वीकारतां येणार नाहींत. व जोंपर्यंत निःशस्त्र प्रतिकारानें करबंदीसारख्या शिक्कामोर्तब झालेल्या सनदशीर मार्गानें अगर आर्थिक बहिष्कारासारख्या कडकडीत पण राजमान्य उपायानें हिंदुस्थानास आपलें स्वातंत्र्यध्येय गांठतां येणार नाहीं अशी खात्री होईपर्यंत व अनुभव येईपर्यंत वरील मार्गाचा अवलंब करण्याचें कारण पडणार नाहीं. तथापि, त्या मार्गाचा अनुभव हिंदुस्थानांतील लोक पुढें मागें घेण्यास कचरणार नाहींत व कचरले नाहींत ही गोष्ट सदरहू ‘ अप्रकाशित राजनैतिक इतिहास ’नें स्पष्ट होत आहे.

**क्रां**तिकारकांचा मार्ग म्हणजे सतीचें वाण. व **देशभक्त** सावरकर यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ‘ दिव्य पण दाहक ’ असाच असावयाचा. आणि अशा तऱ्हेचे हुतात्मे ही भारत–भू प्रसवूं शकते व शकेलहि. पण तशा प्रकारचा प्रसंग आणूं न देण्याचें काम सरकारचें आहे. आणि जर ब्रिटिशसाम्राज्याचे मुत्सद्दी योग्य वेळीं ‘ स्वयं–निर्णया ’ चा

हक्क हिंदुस्थानास देणार नाहींत तर हिंदुस्थानाबाहेरील राष्ट्रें हिंदुस्थानांतील लोकांना त्यांना स्वातंत्र्य मिळावें म्हणून नव्हे तर ब्रिटिशांचें साम्राज्य नष्ट व्हावें यासाठीं तरी मदत केल्यावांचून राहाणार नाहींत इतका इषारा जरी या पुस्तकानें सरकारास मिळाला तरी बरेंच कार्य झालें असें होईल.

सदरहू पुस्तक हा एक मराठी वाङ्मयांतील नवीनच उपक्रम आहे. आणि जरी त्यांतील भाषेचें वळण वंगीय असलें तरी एकंदर पुस्तक उद्बोधक असून हिंदुस्थानांतील तरुणांच्या बिकट परिस्थितींतील कार्यक्षमतेबद्दल उत्साहजनक असाच संदेश वाचकांचे कानांत सांगून त्यांच्या विचारशक्तीला चालना देतें.

रा. रा. **करंदीकर** यांनीं प्रस्तुत पुस्तक लिहून **मराठी राजनैतिक वाङ्मयांत निःसंशय भर घातली आहे.**

४१९ शनवार, पुणें.
ता. २६।२।२८

**नरहर विष्णु गाडगीळ**
बी. ए. एलएल्. बी.

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
........ नों: दि: ........

# प्रस्तावना

**आ**मचे मित्र श्री० शंकर दिनकर करंदीकर यांनीं डॉ० **भूपेंद्रनाथ दत्त** एम्० ए. पीएच. डी. यांनीं लिहिलेल्या '**अप्रकाशित राजनैतिक इतिहासा**' चें बंगालीवरून **मराठींत** भाषांतर केलें व त्या भाषांतराला प्रास्ताविक चार शब्द लिहावे अशी मला विनंती केली. वास्तविक ह्या विषयाचा सांगोपांग अभ्यास केलेले अनेक अधिकारी सद्गृहस्थ महाराष्ट्रांत असतां त्यांनीं मला ही विनंती कां करावी हेंच समजत नाहीं. तथापि अधिकार नसतां निव्वळ त्यांचा शब्द मोडूं नये एवढ्याच उद्देशानें मी हें कार्य करण्यास प्रवृत्त झालों आहे हें प्रारंभींच सांगून टाकणें जरूर आहे असें वाटतें.

प्रस्तुत पुस्तक हें वंगदेशी सुप्रसिद्ध गृहस्थ डॉ० **भूपेंद्रनाथ दत्त** यांनीं वर्षापूर्वींच बंगालमध्यें प्रसिद्ध केलें आहे. तेव्हां प्रस्तुत पुस्तकाचें नामाभिधान जरी '**अप्रकाशित राजनैतिक इतिहास**' असें असलें तरी हा इतिहास प्रसिद्ध होऊन बराच काळ लोटल्यामुळें तो अप्रकाशित राहिला नसून सुप्रकाशित झाला आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. या इतिहासांतील माहितीची, मतांची, सत्यासत्याची, भाष्याची व इतर अनेक हकीगतींची जबाबदारी अर्थातच मूळ लेखकावर पडत असल्यामुळें श्री० करंदीकर हे जसें त्यांतील चांगुलपणाबद्दल स्तुतीस पात्र नाहींत, तसेंच वाईटपणाबद्दल निंदेस पात्र आहेत असें वाटत नाहीं. श्री० करंदीकराकडे यशाचा वांटा जर जात असेल, तर बंगाली भाषेवर उत्तम प्रकारचें प्रभुत्व मिळविल्याबद्दल व त्या भाषेंत प्रसिद्ध झालेल्या **राजनैतिक इतिहासाचा** लाभ मराठी वाचकांना करून दिल्याबद्दल जात आहे असें मला वाटतें.

प्राचीन इतिहासाचें आपण किती आस्थापूर्वक संरक्षण करतों व अज्ञात इतिहासाला काळाच्या दाढेंतून ओढून काढून उजेडांत कसें आणतों हें विसाव्या शतकांत तरी कोणाला सांगावयास पाहिजे असें नाहीं. ऐतिहासिक सत्यांचें आविष्करण व उपलब्धी हीं प्रत्येक राष्ट्राच्या पुढील मार्गांत ध्रुवाच्या ताऱ्याप्रमाणें मार्गदर्शक होत असतात. आपण पूर्वीं काय केलें, कोणता मार्ग अनुसरिला, आपल्या चुका काय झाल्या, त्या चुकांमुळें आपणास कोणती स्थिति प्राप्त झाली व त्या स्थितींतून सुटण्यास काय काय गोष्टी आपण शिकल्या पाहिजेत ह्याचें ज्ञान इतिहासाचें परिशीलन व त्यापासून निघालेलीं प्रमेयें यामुळें होत असतें. भूतभूत काळांतील इतिहास चवाठ्यावर आणण्याची जर आपली इतकी धडपड

तर निकट भूतकालांतील अनायासें प्राप्त होणाऱ्या ऐतिहासिक गोष्टींचें ज्ञान करून घेण्याची आपली धडपड जास्तच असली पाहिजे हें ओघानेंच प्राप्त होतें. निकट भूतकालीन इतिवृत्तांशीं आपल्या भावी आयुष्यांतील भल्याबुऱ्या घडामोडी निगडित झाल्या असल्यामुळें त्या घडामोडींचा तात्त्विकदृष्ट्या अभ्यास करणें क्रमप्राप्तच होतें.

तेव्हां महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत हिंदुस्थानाबाहेरील स्वतंत्र राष्ट्रांनीं-स्वार्थानें असो वा निःस्वार्थानें असो-हिंदुस्थानला दास्यमुक्त करण्याचे कसकसे प्रयत्न केले व ते सर्व प्रयत्न अयशस्वी कसे झाले ह्याची 'युद्धस्य वार्ता रम्या' या उक्तीप्रमाणें आपणास माहिती असणें अत्यंत जरूर आहे. युद्धाच्या वेळीं **एमडेननें** जो हिंदुस्थानच्या किनाऱ्याभोंवतीं धुमाकूळ माजवून सोडला होता, त्या धुमाकुळावरून आंतमध्यें कांहींतरी शिजत आहे व हिंदुस्थानची शांतता भंग करण्याचे कोठेंतरी प्रयत्न सुरू आहेत, एवढीच मोडकी तोडकी वातमी हिंदुस्थानच्या कानावर येत होती. पण हिंदुस्थानच्या बंधमुक्ततेकरितां हिंदी क्रांतिकारक इतके कसोशीचें प्रयत्न करीत असतील व आपल्या प्रयत्नांना जर्मनी, तुर्कस्थान वगैरेसारख्या युद्धमान राष्ट्रांचे मनुष्याचें, पैशाचें व दारुगोळ्याचें सहाय्य विस्तृत प्रमाणावर संपादन करीत असतील अशी कल्पनाहि हें पुस्तक वांचल्याशिवाय कोणाला येणार नाहीं. त्यामुळें हा **अप्रकाशित इतिहास** वाचल्याबरोबर एक प्रकारची नवी दृष्टी येते व आपण आश्चर्यानें थक्क होऊन जातों.

स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचा मार्ग कोणता याविषयीं पुढाऱ्यांत जरी अनेक मतें असलीं, तरी युद्धाच्या वेळीं अंतःकरण पिळवटून जाऊन हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां हिंदुस्थानाबाहेरील इकडील क्रांतिकारक कसे तळमळत होते हें उत्कृष्टपणें या पुस्तकावरून निदर्शनास येतें. स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याचे जे अनेकविध मार्ग आहेत त्यांपैकीं कोणता मार्ग आपल्या राज्यकर्त्यांना कळतो व कोणत्या मार्गाला ते मान देतात हें **श्रीशैलेन्द्रनाथ घोष** यांच्या लेखांत त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. **श्रीशैलेन्द्रनाथ** लिहितात, "**मनगटाच्या जोरावर इंग्रज लोक राज्य करीत आहेत.-म्हणूनच ते मनगटाच्या सामर्थ्याला मान देतात........आपण तक्रारी करीत राहिल्यानें ते आपला अधिकच तिरस्कार करतात. त्यांच्या विरुद्ध गाइल्या जाणाऱ्या तक्रारींनीं आम्ही आपला दुर्बळपणा अधिक सिद्ध करून देत आहों.**"

मद्रासच्या काँग्रेसनें स्वातंत्र्याचा जो ठराव पास केला, त्यावर टीका करतांना ' **मॉडर्न रिव्ह्यू** ' कार म्हणतात—

" In pointing out what means are legitimate in attaining Independence, we do not mean to enter into any ethical or spiritual discussion. It is sufficient for our purpose to say that we find numerous examples in history of supject peoples gaining Independence by war. We take it then, that war is considered one of the legitimate means of winning Independence..... so far our knowledge goes, no really subjcet country has ever yet gained Independence without war." तात्त्विकदृष्ट्या युद्धाशिवाय कोणतेंही राष्ट्र स्वतंत्र होऊं शकत नाहीं व तो कायदेशीर मार्गच आहे असें मॉडर्न रिव्ह्यूकारांचें म्हणणें आहे. एका नेमस्ताग्रणींनीं चार पांच वर्षांपूर्वीं आफ्रिकेंतील अन्यायामुळें चिडून जाऊन " इंग्रज समाज एका बाँबच्या स्फोटामुळें जितका जागा होतो, तितका हजारों ठरावांनीं होत नाहीं " असें म्हटल्याचें स्मरतें. दोन तीन वर्षांपूर्वीं ब्रिटिश प्रधान मंडळांतील एका सभासदानें हिंदुस्थानला युद्धास :आव्हान दिल्याचें अद्याप वरेचजण विसरले नसतील. यावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं, **स्वातंत्र्य मिळविणारांना तलवारीशिवाय गत्यंतर नसतें व स्वातंत्र्य देणारांनाहि तलवारीशिवाय दुसरी भाषा परिचित नसते.** ही स्वातंत्र्याच्या साधनाविषयींच्या एका मार्गाची तात्त्विकदृष्ट्या चर्चा झाली. पण ' मांजराच्या गळ्यांत घाट बांधावी ' हें जरी खरें असलें तरी ती घाट कशी बांधावी हेंच आपल्याला समजत नसल्यामुळें क्रांतीच्या व युद्धाच्या गोष्टी ह्या अशक्य कोटींतील आहेत असें आज आपणांस वाटत आहे व तेंच: ह्या " **अप्रकाशित राजनैतिक इतिहासा** " वरून सिद्ध होत आहे. **श्रीभूपेन्द्रनाथ दत्त** यांनीं उपसंहारांत ' आम्हांला **धर व मार** ' एवढेंच ठाऊक आहे असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ युद्धाशिवाय स्वातंत्र्य कोणाला मिळत नाहीं हें सांगण्याचा त्यांचा उद्देश आहे असाच आहे. पण या मार्गावर विश्वास असणाऱ्या क्रांतिकारकांनाहि शेवटीं आपल्या कार्याला शेतकऱ्यांचें व खालच्या वर्गाचें पाठ-

बळ मिळल्याशिवाय यश येणार नाहीं असें नाइलाजानें कबूल करावें लागलें. **स्वातंत्र्याच्या चळवळीला लोकांचा भरपूर पाठिंबा नसल्यामुळें, त्यांच्यांत फिरून व त्यांच्या कल्याणार्थ प्रयत्न करून, त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे, आणि नंतर या युद्धाला सुरवात केली पाहिजे.** ह्या दत्तांच्या म्हणण्यांतील पूर्वोक्त भागाविषयीं कुठेंच दुमत होणें शक्य नाहीं. ग्रामसंघटनेची कै० **दासांची** योजना किंवा चरक्याची **महात्मा गांधींची** चळवळ वगैरे चळवळी याच धोरणानें आंखलेल्या आहेत. देशांतील खालच्या थरापर्यंत जागृती झाल्यावर व जातीविषयक लढे लढण्याचें हिंदुस्थाननें तहकूब केल्यावर हिंदुस्थानला हातीं शस्त्र धारण करण्याची जरूरीच पडणार नाहीं. आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या आड आपसांतील दुही व गाढ अज्ञान यांचें विशाल पटल पडलें असल्यामुळें, दास्यमुक्ततेचा शंभर नंबरी मार्ग सुद्धां अकिंचित्कर ठरला आहे. " **मी सशस्त्र बंड देखील सनदशीर समजतों; आज तें शक्य नाहीं इतकेंच; सशस्त्र बंडाला यश येईल, अशी कोणी आठ आणे जरी खात्री दिली, तर बाकीच्या आठ आण्याबद्दल परमेश्वरावर विश्वास ठेऊन मी बंड पुकारीन " ( टि० सू० सं०** पृ. २९२ ) असें जें कै० टिळक बोलले होते त्यांतील माथितार्थ हाच आहे. **लोकांची तयारी झाल्यावर अमुक मार्ग चांगला व अमुक वाईट असा नसता वादविवाद करण्याची पाळीच येत नसते.** सध्याचे प्रयत्न मग ते अत्याचाराचे असोत–व अनत्याचाराचे असोत–जनतेच्या पाठिंब्याविना पोरके अतएव निरुपयोगी ठरले आहेत.

तथापि क्रांतिकारकांनीं जर्मनीचें सहाय्य घेऊन हिंदुस्थानांत बंड उभारण्याचे प्रयत्न कसे केले हें आपल्याला या पुस्तकावरून दिसून येत आहे. त्या वेळच्या क्रांतिकारकांनीं आपल्या कारस्थानांचीं जाळीं जगभर कशीं पसरविलीं व त्या जाळ्यांत दोस्त राष्ट्रांच्या विरुद्ध असलेल्या राष्ट्रांना कसें गुरफटून घेतलें ह्याची साग्र हकीकत आतां उपलब्ध झाली आहे. कारस्थानी क्रांतिकारकांचे प्रयत्न अयशस्वी कां झाले याचा आपण विचार करूं लागलों म्हणजे दोन गोष्टी ठळकपणें दृष्टीस येतात. एक तर त्यांनीं क्रांतीकरितां शस्त्रास्त्रांची ज्या राष्ट्रांजवळ याचना केली तीं राष्ट्रें क्रांतिकारकांइतकीं उत्सुक नव्हतीं. त्यांना दोस्त राष्ट्रांना जेरीस आणावयाचें होतें व त्यांचें कंबरडें मोडून टाकावयाचें होतें. हें कंबरडें जर

विशेष दगदग न करतां मोडतां आलें असतें तर त्यांना पाहिजेच होतें, पण त्याकरितां अट्टाहास करण्याची त्यांची तयारी नव्हती. क्रांतिकारकांनीं कदाचित् त्यांना हिंदुस्थानचे लोक बंडाकरितां तयार आहेत, तुमच्याच मदतीची ते वाट पहात आहेत, असें सांगितलें असेल व तेहि एवढ्या युद्धाच्या फाफट पसाऱ्यांत त्यांना शस्त्रास्त्रें पुरविण्यास तयार झाले असतील. क्रांतिकारकांना हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबद्दल जितकी कळकळ, जितका जिव्हाळा वाटत होता, तितका जिव्हाळा अर्थातच जर्मनीला वाटत नव्हता. संकटग्रस्त माणूस काडीचाही आधार जसा शोधीत असतो, तसाच आधार क्रांतिकारकांनीं आपल्या ध्येयाच्या सिध्यर्थ शोधला. अशा प्रकारच्या परावलंबनापासून कोणत्याहि राष्ट्राचा फायदा झाला नाहीं. फिलिपिनोजनीं बंडाच्या उभारणीकरितां शस्त्रास्त्रांची याचना अशीच जपान व अमेरिकेजवळ केली होती. त्यापैकीं, जपाननें शस्त्रास्त्रें न देऊन व अमेरिकेनें शस्त्रास्त्रें पुरवून त्यांचा विश्वासघात केला. आपल्या शत्रूचा निःपात करण्याकरितां माणसाचें साहाय्य घेणाऱ्या घोड्यांच्या तोंडांत जसा कायमचा लगाम पडला. तशीच स्थिति अमेरिकेनें फिलिपिनोजची केली. परक्यावर अवलंबून रहाणाऱ्या राष्ट्रांची शस्त्रास्त्रांच्या बाबतींत फसवणूक होत असेल तर त्यांत नवल नाहीं; पण साध्या सनदशीर गोष्टींतहि आपल्या विश्वासाचे म्हणून आपण कवटाळणारे परकीय लोक किती घातकी असतात याची चांगलीच अद्दल मजूरपक्षानें आपणांस नुक्तीच घडवून दिली आहे.

क्रांतिकारकांच्या प्रयत्नांना यश न येण्यास परावलंबन हें जसें एक कारण झालें, तसेंच क्रांतिकारकांनींहि आपल्या गोटांत कोणतीं व कोणत्या दर्जाचीं माणसें आहेत याविषयीं योग्य ती काळजी घेतली नाहीं हें दुसरें कारण होय. त्यांच्यांतील कांहींजण प्रच्छन्नपणें शत्रूच्या हेराचें काम करीत होते, तर कांहींजण निव्वळ स्वार्थासाठीं या चळवळींत पडले होते. ब्रिटिशांनीं क्रांतिकारकांमध्यें गुप्त हेरांचा गराडा अत्यंत व्यवस्थितपणें घातला असल्यामुळें, क्रांतिकारकांपेक्षां फितुरच जास्त अशी चमत्कारिक परिस्थिति उत्पन्न झाली होती. **राजकारण व स्वार्थ यांची मूलतःच फारकत असल्यामुळें, स्वार्थसाधु लोक स्वार्थाला बळी पडले आणि आपले गुप्त बेत पटापटा ओकून टाकूं लागले म्हणजे राजकारणाचें वाटोळें झालें म्हणून समजावें.** अशा-प्रकारें उभय प्रकारचें वैगुण्य क्रांतिकारकांच्या प्रयत्नांत ठळकपणें असल्यामुळें त्यांच्या मसलतीचें व कारस्थानाचे बारा वाजले.

पण बंडाच्या उभारणीला असले अपशकुन झाले असले तरी बंड करणारांमध्यें उज्वलप्रतीचे देशभक्त होते म्हणूनच या कारस्थानाला थोडेंफार स्वरूप तरी आलें होतें. कांहीं क्रांतिकारकांची या पुस्तकांत वर्णिलेलीं कृत्यें इतकीं धाडसाचीं व देशप्रीतिच्या उमाळ्याचीं द्योतक आहेत कीं तीं हिंदुस्थानलाच काय पण कोणत्याहि देशाला भूषणभूत झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

या पुस्तकांतील पहिला भाग **श्री. दत्तांचा** असून दुसरा **महेंद्र प्रताप** यांचा, व तिसरा **श्रीशैलेंद्रनाथ घोष** यांचा आहे. महेंद्रप्रतापाचा लेख नुसत्या प्रदेश वर्णनाच्या दृष्टीनें वाचला तरी मनोरंजक वाटतो. **श्रीशैलेंद्रनाथ घोष** यांच्या लेखांत ज्या चार पांच गोष्टी दिल्या आहेत, त्या उज्ज्वल व अंतःकरण उचंबळून सोडणाऱ्या आहेत. अशा प्रकारें हें पुस्तक इतिहासाच्या, मनोरंजकतेच्या, व वर्णनाच्या दृष्टीनें अत्यंत वाचनीय झालें आहे यांत संशय नाहीं.

वर म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानचें दुर्भाग्य कोणत्या मार्गानें नष्ट होईल याविषयीं निरनिराळीं मतें असलीं तरी कोणतें मत ग्राह्य व कोणतें अग्राह्य हें भविष्यकाळच ठरविणार आहे. पण क्रांतिकारकांना हा जो बंडाच्या बाबतींत कटु अनुभव आला व लोकाराधनेशिवाय कांहीं होणें शक्य नाहीं हें जें कळून चुकलें तें खरोखर सद्भाग्याचा मार्ग दर्शविण्यास समर्थ होईल अशी खात्री वाटते. खेड्यापाड्यांतील लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावण्याचा, त्यांना सुखी करण्याचा व त्यांच्यांत मिळूनमिसळून काम करून त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न जर म० गांधी, के० दास यांच्याप्रमाणें क्रांतिकारकांनीं केला, तर त्यांना आपोआपच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला सशस्त्र बंडाचीच आवश्यकता आहे असें नाहीं हें थाडक्या अवधींत कळून येईल. मागील अनुभवापासून शहाणपणा हाच शिकावयाचा असतो व हा शहाणपणा क्रांतिकारक शिकून ग्रामसंघटनेच्या चळवळीला लागतील तर गेल्या अनेक वर्षांच्या अंधकारानंतर सोन्याचा दिवस उगवला असें म्हणतां येईल. परमेश्वर त्यांना सद्बुद्धि देवो व ग्रामसंघटनेच्या मार्गानें स्वराज्य मिळविण्यास त्यांना समर्थ करो अशी प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

'दास-नवमी'
माघ वद्य ९ शके १८४९
**चित्रमयजगत् ऑफिस.**

त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर.

# सीमान्त-पूजन.

परराष्ट्रांचे इतिहास आमच्या देशांत अनेक लिहिले गेले आहेत; व आजही लिहिले जात आहेत. परराष्ट्रांचे इतिहास आमच्या देशाच्या काल-वर्तमान-परिस्थितीचे आदर्शग्रंथ नव्हेत. परराष्ट्रांचे इतिहास आमच्या देशाचे आदर्श ग्रंथ होऊं शकत नाहींत. परकीयांचे ग्रंथ हे आमचे ध्येयरूप ग्रंथ नाहींत; ते आमच्या देशाला साधनस्वरूप आहेत. परक्यांच्या इतिहासांत जें जें कांहीं आहे, तें तें आमच्याहि देशाच्या इतिहासांत आहे. परंतु जें जें आमच्या देशाच्या इतिहासांत आहे तें परकीयांच्या इतिहासांत नाहीं. चौदा वर्षांच्या बालकांनीं आमच्या देशांत इतिहासाचें एकेक नवीन युग निर्माण केलें आहे. आमच्या देशाचा इतिहास त्यांनीं नवीन बनविला आहे. सतरा वर्षांच्या **सुधीर**सारख्या बालकांनीं सेनापतीचा पराक्रम जगाच्या निदर्शनास आणून दिला आहे, यौवनांत पदार्पण करणाऱ्या बालिकांनीं आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरतां आत्मोत्सर्ग केला आहे. आणि **यतिंद्रा**सारख्या चाळीस वर्षें वयाच्या वृद्धांनींही आपल्या शत्रूला तरवारीचें पाणी दाखविलें आहे. गुलामजातीला परक्यांचा इतिहास डोळ्यापुढें ठेवून भागत नाहीं. गुलामांना आपल्या बंधमुक्ततेकरतां आपला नवीन इतिहास बनवावा लागतो. परक्यांच्या इतिहासांत नसणारीं व आमच्या देशाच्या इतिहासांत असणारी शेकडों उदाहरणें आम्ही देऊं शकतों. पण आमची थोरवी गात बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आमच्या देशाच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांचा इतिहास असा हा पहिलाच इतिहास होय. आमच्या स्वदेशबांधवांनीं आपल्या देशाच्या मुक्ततेकरतां जे प्रयत्न केले, जें बलिदान केलें, हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य-मंदिराच्या पायांत ज्यांनीं स्वतांस चिरंतन गाडून घेतलें, त्यांची किंमत जगाच्या कोणत्या इतिहासांत आहे ? या अप्रकाशित इतिहासानें आम्हा अंधळ्यांना नवीन दृष्टि दिली आहे. या इतिहासानें राष्ट्राच्या स्वातंत्र्यप्रयत्नांवर एक झगझगीत प्रकाश पाडला आहे.

**कुमार महेन्द्रप्रताप** आणि **श्रीशैलेंद्रनाथ घोष** यांचीं जीं दोन परिशिष्टें जोडलीं आहेत त्यांनीं श्रीभूपेंद्रबाबूंच्या अप्रकाशित इतिहासावर वाचकांना अधिक प्रकाश पडेल. प्रस्तुत दोन्हीं परिशिष्टें प्रामुख्यानें अमेरिकेच्या " **एशिया** मासिकाच्या आधारें जोडलेलीं आहेत. दोन्हीं परिशिष्टें कुमार महेंद्रप्रताप आणि श्रीशैलेंद्रनाथ घोष यांच्याच लेखणींतून उतरलेलीं आहेत. ' **एशिया** मासिकाचें जें आम्हास सहाय्य झालें त्याबद्दल त्या मासिकाचा मी अत्यंत आभारी आहें.

## सीमान्त-पूजन

वंगसाहित्यांत श्रीभूपेंद्रबाबूंची योग्यता फार मोठी आहे. **श्रीभूपेंद्रबाबू** गेलीं सोळा वर्षें हद्दपार होते. जगाच्या बहुतेक देशांतून त्यांनीं भ्रमण केलें आहे. वंग-साहित्यांत जीं राजनीतिक पुस्तकें आहेत त्यांमध्यें श्रीभूपेंद्रबाबूंचें हें पुस्तक अत्युच्च श्रेणींमध्यें गणलें जातें. ज्यांना क्रांतिकार्याविषयीं बोलण्याचा खरा अधिकार आहे त्यांत श्रीभूपेंद्रबाबू हे प्रमुख होत. श्रीभूपेंद्रबाबूंनीं राजनैतिक अनेक ग्रंथ लिहिले आहेत. श्रीभूपेंद्रबाबूंच्याविषयीं अधिक परिचय **अप्रकाशित इतिहासाच्या प्रथम खंडांत** लौकरच आम्ही करून देणार आहों.

प्रस्तावनेसंबंधीं या ठिकाणीं थोडेंसें लिहिणें आम्हाला प्राप्त आहे. प्रस्तुत पुस्तकास महाराष्ट्रांतून प्रस्तावना मिळूं शकली नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं अभिवचन दिलें होतें ते ते आपल्या वचनाला जागले नाहींत. आम्ही तर एक सामान्य मनुष्य, आमची काय किंमत ? क्रांतिकारकांच्या कार्याची जेथें देशाकडून वंचना आणि उपेक्षा केली गेली तेथें माझ्यासारख्याची उपेक्षा आणि निराशा झाली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. प्रस्तावना लिहिण्यासंबंधानें आम्ही **श्री. देवगिरीकर** यांना विनंति केली तेव्हां त्यांनीं आपल्या मनाचा जो थोरपणा दाखविला, तो आम्ही कधीं विसरणार नाहीं. माझ्यासारख्या सामान्य मनुष्याची विनंति मान्य करून त्यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

त्याचप्रमाणें चित्रशाळेचे चालक दे० भ० **वासुकाका जोशी** आणि **शंकरराव जोशी** यांचाही मी ऋणी आहें. दे०भ० **काकां**च्याकडून बहुमोल पुस्तकांची मला मदत झाली आहे. श्री० **शंकररावांनीं** आपलें मन या पुस्तकांत घालून त्यास सर्वांगसुंदर करण्याचे प्रयत्न केले, याबद्दल मी त्यांचाहि अत्यंत आभारी आहें.

मी वंगसाहित्याचा एक विद्यार्थी. माझ्या प्रयत्नांत दोष असणें साहजिक आहे. जनतेनें मला क्षमा करावी. जनतेनें या पुस्तकाचा आदर केल्यास क्रांतिकारकांचें उपलब्ध राजनैतिक वाङ्मय खंडशः प्रसिद्ध करण्याचा माझा संकल्प आहे.

क्रांतिकारकांच्या बद्दलचे सरकारी रिपोर्ट लोकांच्या पुढें आहेतच. तसाच स्वकियांनीं-प्रत्यक्ष भाग घेतलेल्या स्वकीयांनीं लिहिलेल्या इतिहासाचें रूपांतर करून हा दुसरा भाग, मराठींत ठेवण्याचा हा एक अल्प प्रयत्न आहे.

'स्वातंत्र्य देवते'चे येथेंच आम्ही सीमान्त-पूजन करीत आहों.

राजनीतीचा एक विद्यार्थी,

**शं. दि. करंदीकर.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ग्रंथालय.
अनुक्रम २५८९१ दि. ३/१२/६१.
क्रमांक ८०२२ नों. दि. ३५१५१५८

अप्रकाशित

# राजनैतिक इतिहास

## विषय-सूची।

**प्रथम परिच्छेद** .... .... .... ....१-१०

**युद्धाच्या वेळीं हिंदुस्थानच्या बाहेरचें कार्य**—रौलेट कामिटीचा रिपोर्ट व क्रांतिकारकांचें कार्य; ऐतिहासिक सत्य; प्रास्ताविक भाग; (पृ० १-२). जर्मनी क्रांतिकारकांचा 'शीर्षदेश' कसा झाला; 'रंगीत वर्णाच्या सैन्याचा उपयोग आणि क्रांतिकारकांचें राजनैतिक धोरण'; (पृ० ३-४). कोमागाटा मारू. क्रांतिकारकांनीं जर्मनीशीं केलेल्या शर्ती; (पृ० ५). 'इंडियन इंडिपेन्डन्स कमिटी'ची स्थापना: हिंदी क्रांतिकारक, कम्युनिस्ट, बोल्शेव्हिक; हिंदुस्थानांत वालेसरला शस्त्रांची आयात;— 'युनिव्हर्सल एम्पोरिअम कंपनी' ची स्थापना; (पृ० ६-१०).

**द्वितीय परिच्छेद** .... .... .... १०-२५

**दूर पूर्वेकडील कार्य**—क्रॅफ्टची जावाकडे रवानगी; क्रॅफ्टची योजना; राजबंदी आणि अंदमानमधील परिस्थिति; **एमडेन**, Admiral von Hintze; तत्पूर्वी; **बाबू रासबिहारी**; (१०-१२) **अवनीनाथ** पकडला गेला; क्रांतिकारकांच्या कार्यास सुरवात,- " International Volunteer Corps "ची उभारणी; (पृ० १३). स्वेटो, बँकॉक, भामो—क्रांतिकारकांची एक तात्विक (Theoretical) योजना; (पृ० १४). सिंगापूरचें बंड; मूलचांद आणि गदरपार्टीचें कार्य; (पृ०१४-१५). एका वकिलाची फितुरी (पृ० १६). योधसिंह, चिंचिया, आणि सुकुमार चटोपाध्याय (पृ. १६-१७). **पाइन** आणि अवनि (पृ० १८). डॉ० दाऊस देक्करची विश्वासघातकता (पृ० १९-२२). जर्मन प्रतिनिधींचा जर्मनीस एक रिपोर्ट (पृ० २२-२४). इंग्रजांचा एक गुप्त विनतारी संदेश; 'क्रांतिकारकांनीं मला भंडावून सोडलें आहे!' जर्मन कैद्यांनीं सांगितलेल्या कांहीं गुप्त गोष्टी; (पृ० २५).

**तृतीय परिच्छेद** .... .... .... २५-२९

**पश्चिम-येशियाचें कार्य**—पश्चिम-एशिया हा हिंदुस्थानचा एक दिंडीदरवाजा आहे; परशियांतील फ्रवार; दोन असीम साहसिक तरुण; (पृ० २५-२७). बालक **केदारनाथ**; केदारनाथाचा विश्वासघात; केदारनाथला इंग्रजाकडून कसें ठार करण्यांत आलें; आणखी कांहीं क्रांतिकारक; (पृ० २७-२८).

**चतुर्थ परिच्छेद** .... .... .... २९-४४

**तुर्कस्थानमधील कार्य**—एनव्हरपाशाकडे क्रांतिकारकांचें डेप्युटेशन (पृ०२९). इस्तंबूलमध्यें; कुतल अमारा; हिंदी कैदी शिपाई; क्रांतिकारकांनीं हिंदी शिपायांच्या सुखासाठीं केलेले प्रयत्न; (पृ० २९-४४).

**पंचम परिच्छेद** .... .... .... ४५-४९

**स्वीडनमध्यें कार्य**—स्टॉकहोममध्यें आंतरराष्ट्रीय सोशालिस्ट कॉन्फरन्स, व क्रांतिकारक; ट्रॉजनास्कि आणि ट्रॉटास्कि; क्रांतिकारकांचे व्यापक प्रयत्न; इंग्रजांनीं पाठविलेले युसफअलि; (पृ० ४५-४७). **हरदयाळचें** एक पुस्तक "Four years in Germany"; हरदयाळची कृतघ्नता; (पृ० ४८-४९).

**षष्ठ परिच्छेद** .... .... .... ४९-५५

**अमेरिकेचें कार्य**—'गदर पार्टी'; 'Hindu conspiracy case'; (पृ. ४९-५२). पंडित **रामचंद्रजी**चा शोकजनक मृत्यु (पृ० ५३). **श्रीशैलेंद्रनाथ घोष** आणि **तारकनाथ दास** ॲफ्टचें एशियाच्या कारागृहांतून पलायन (पृ० ५४-५५).

**सप्तम परिच्छेद** .... .... ... ५५-५६

**पश्चिमेचें कार्य**—श्रीहरदयाळ आणि **कुमार महेंद्रप्रताप**; **श्रीवीरेंद्र नाथ चटोपाध्याय** यांच्या खुनाचा प्रयत्न,—एका इंग्लिश गुंडाचें कारस्थान; (पृ० ५५-५६)

**अष्टम परिच्छेद** .... .... .... ५७-६५

**"इण्डो-जर्मन मिशन"** **कुमार महेंद्रप्रताप**चे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यार्थ प्रयत्न; अफगाणच्या अमिराकडे राजकीय शिष्टमंडळ; मिशनच्या कार्यांतील अडथळे; इंग्लिश पत्राची कारवाई; महेंद्रप्रतापचा सत्कार; (पृ० ५७-६१);

रशियाला वश करून घेत असतां इंग्रजांच्या हातीं सांपडून डॉ० **मथुरासिंहाचा** मृत्यू (पृ० ६२). अफगाणिस्थानाशीं महेंद्रप्रतापचीं काय खलबतें झालीं; **अमीर हबिबुल्लाखां**; (पृ० ६२–६५)

**नवम परिच्छेद** .... .... .... ६५–६७

**कमिटीचें शेष कार्य**–कुमार महेंद्रप्रतापचें राहिलेलें कार्य; सोशालिस्टांची आंतरराष्ट्रीय परिषद, आणि कमिटीनें केलेले प्रयत्न; कमिटीचा मेमोरेन्डम; इंग्रजांच्या सामर्थ्याचा अद्भुत प्रभाव!

**दशम परिच्छेद** .... .... .... ६७–६९

**प्रचार-पद्धति**–हिंदुस्थानांत बंदी केलेली क्रांतिकारकांचीं कांहीं पुस्तकें; इंग्रजांनीं लाविलेला एक '**अश्व-डिंबर शोध**'; **श्री चम्पकराम पिले.**

**एकादश परिच्छेद** .... .... .... ६९–७९

**स्वित्झर्लंडमध्यें गुप्तहेरांचें आगमन**–इंग्रजांनीं तयार केलेले महेंद्रप्रतापचें एक प्रायव्हेट सेक्रेटरी; **हिंदुस्थानांतील एक राजेसाहेब**; हळदीघाटाच्या लढाईंत मिळालेली एक पराक्रमी तलवार (पृ० ७४); बर्लिन कमिटीस फसविण्याचे गुप्तहेरांचे प्रयत्न; हिंदुस्थानच्या राजांची कैसर विषयींची उत्कंठा; राजेसाहेब सांपडले!–एक विश्वासघातक तरुण.

**द्वादश परिच्छेद** .... .... .... ७९–८२

**शिपायांमधील कार्य**—हिंदी शिपायांना काय वाटलें (पृ० ८०) सुभेदार जमादार आणि हवालदार (पृ० ८१); कैदी हिंदी शिपायांतील प्रचार.

**त्रयोदश परिच्छेद** .... .... .... ८२–१०५

**उपसंहार**—१८५७ आणि १९१५; अभिजात्य वर्ग, आणि प्रतिष्ठित वर्ग; हिंदुस्थानांतील एक वटवट-दल; क्रांतिकारकांना काय वाटलें (८४–९०); अभिजात्य आणि प्रतिष्ठित वर्गाचा स्वार्थ; क्रांतिकारकांची उपेक्षा कोणी केली? समाजाच्या मनाचें पृथक्करण; "आतां तूं असें कर, आतां तूं रशियांत जाऊन ये." (पृ ९६); खुर्चीवरचें राजकारण; हिंदुस्थानांतील राजनीतीचा क्रमविकास; **महेंद्रप्रताप** आणि **लेनिन** (पृ० १०३); आपणांस काय शिकतां येईल.

**परिशिष्ट १.** .... .... .... १०६–१३४

**राजा महेंद्रप्रताप**–१९१४ सालीं, कुमार महेंद्रप्रताप ( पृ० १०७-१०८ ); कुमार महेंद्र आणि कैसर ( पृ० ११० ); महेंद्रप्रतापची अफगाणिस्थानाकडे रवानगी; जर्मन चॅन्सलर **व्हान बेथमन** यांनीं अफगाणच्या अमिरास लिहिलेलें पत्र ( ११४ ); इजिप्तचें पदच्युत खेदीव ( ११५–११६ ); सेनाध्यक्ष एनव्हर-पाशा, सुल्तान, आणि कुमार महेंद्रप्रताप ( ११७–११८ ); शिष्टमंडळाचा प्रवास; इस्पाहान (१२३–१२४); वालुकारण्यांतील प्रवास; शत्रूंशीं शर्यत; डॉक्टर बेकर आणि एक रशियन तुकडी ( १३० ); **पराह**ला आणि **हिरात**ला महेंद्रप्रतापचें अपूर्व स्वागत (१३०–१३१ ); अमिरानें महेंद्र प्रतापचा केलेला सन्मान (१३२); अफगाणिस्थान युद्धांत का पडलें नाहीं; रशिया आणि अफगाणिस्थान ( १३३–१३४ )मिशनची निराशा; महेंद्रप्रतापचा अज्ञातवास.

**परिशिष्ट २.** .... .... .... १३४–१५६

**श्रीशैलेंद्रनाथ घोष**—१९०५ सालीं; युनिव्हर्सिटीच्या क्षेत्रांत क्रांतितत्त्वांचा प्रवेश; नाइट स्कूल्सचा एक डायरेक्टर–श्रीशैलेंद्रांचा एक सन्मान्य स्नेही ( पृ० १३५–१३७ ). **श्रीयतिन मुकर्जी**; यतिन मुकर्जींचे विचार ( पृ० १३८–१४० ). माझे प्रिन्सिपाल ( पृ० १४१ ), कांहीं क्रांतिकारक तरुण ( पृ० १४२ ). **यतिन** मुकर्जींचा शोचनीय मृत्यू ( पृ० १४४ ) **सर तारकनाथ पलित** आणि सायन्स कॉलेजची योजना ( पृ० १४५ ) **सर अशुतोष मुकर्जी** आणि मी ( पृ० १४६–१४७ ). **एक साहसी तरुण स्त्री** ( पृ० १४९–१५० ). क्रांतिकारकांची एक गुप्त सभा (पृ० १५१). मला पकडण्यासाठीं २५ हजारांचें बक्षीस (पृ० १५३ ). वेषांतर आणि पलायन ( पृ १५५–१५६ ).

**परिशिष्ट ३.** .... .... ....

आणखी कांहीं क्रांतिकारक ... ... ... १५७

२५४७८
६०.२२

# वंग-ग्रंथकार.



श्रीभूपेन्द्रनाथ दत्त; एम्. ए.; पी एच्. डी.
( बर्लिनला असतां घेतलेल्या फोटोवरून ).

अप्रकाशित

# राजनैतिक इतिहास

( द्वितीय खंड ).

श्रीभूपेन्द्रनाथ दत्त.
कुमार महेन्द्रप्रताप.
श्रीशैलेन्द्रनाथ घोष.

ग्रंथालय
मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ................
क्रमांक ............ नों: दि: ............

# अप्रकाशित

# राजनैतिक इतिहास.

## प्रथम परिच्छेद.

### युद्धाच्या वेळीं हिंदुस्थानच्या बाहेरचें कार्य.

भारतीय क्रांतिकार्याचें स्वरूप सर्वसामान्यतः गुप्त, अतएव, तें सामान्य जनतेला अज्ञातच असणार. परंतु रौलेट कमिशननें क्रांतिकारकांचीं कांहीं कारस्थानें उघडकीस आणून तीं रौलेट कमिशन-रिपोर्टाच्या द्वारें जनतेपुढें प्रकाशित केलेलीं असल्यामुळें, जनतेला त्याचें स्वरूप थोडेंसें ज्ञात झालेलें आहे. एवढेंच नव्हे, तर हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांनीं हिंदुस्थानांत आणि परदेशांतून, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जीं जीं राजनैतिक कारस्थानें केलीं, तीं सर्व रौलेट रिपोर्टांतून प्रसिद्धच झालेलीं आहेत, असाच जनतेचाही पण सर्वसाधारण विश्वास आहे. परंतु हा रिपोर्ट म्हणजे केवळ विस्कळितपणें केलेलें एक कामच नसून, त्यांत, वडाची साल पिंपळाला लावून गोम्याची टोपी सोम्याच्या डोकीला घालण्यांत आलेली आहे. हा रिपोर्ट वाचून असें वाटतें कीं, इंग्रजांच्या गुप्त हेरांना मिळावी तितकी सर्व माहिती मिळालीच नाहीं; आणि जेवढी म्हणून मिळाली, तीही असंपूर्ण, असंबद्ध अशी आहे. अनेकदां खोट्या बातम्या मिळाल्या आहेत, व त्या तशाच्या तशाच देण्यांत आलेल्या आहेत. या रिपोर्टांत कोणाकोणाचें 'महान् क्रांतिकारक' 'महान राष्ट्रीय पुढारी' 'महान् पॅन इस्लामिक नेते' म्हणून पानेंच्या पानें वर्णन करण्यांत आलेलें आहे! पण त्या मोठ्या नेत्यांच्याविषयीं परराष्ट्रांतील गुप्त पोलिसांना अजून मोठें गूढ आहे! ते परराष्ट्रांतील गुप्त पोलीस, या मोठ्या 'नेतेलोकां' ना चुकीनें

'इंग्रजांचेच हेर' म्हणून अद्याप समजत आहेत ! ! ह्याशिवाय त्यांतील अनेक कथनांतून इतका सावळागोंधळ करून टाकण्यांत आलेला आहे, कीं त्यास ऐतिहासिक सत्य म्हणून म्हणतांच यावयाचें नाहीं; 'ऐतिहासिक सत्य' त्याहून अगदीं विपरीत वाटत आहे. विगत महायुद्धाच्या वेळीं जे जे क्रांतिकार्यांत लिप्त झालेले होते, त्यांच्यापैकीं अनेकजण आजही हयात आहेत. त्यांच्यापासून खरेंखोटें ज्ञात करून घेऊन प्रसिद्ध केल्यास, ऐतिहासिक सत्य वस्तुतः काय होतें, तें नीट समजून येणारें असून, त्यामुळें इतिहासाच्या मर्यादेचें रक्षणच केल्यासारखें होणार आहे.

विगत महायुद्धाच्या वेळीं, विदेशांतून हिंदुस्थानांतील 'क्रांतियुद्धा'साठीं कसकसे प्रयत्न करण्यांत आले, कोणकोणतीं राजनैतिक कारस्थानें रचण्यांत आलीं, विप्लवकार्याचा आरंभ कसा झाला, या सर्वांचा संपूर्ण इतिहास, नाना कारणांमुळें जनतेपुढें प्रकाशित करण्याचा सुयोग, अद्यून या क्षणीं आलेला नाहीं. तरी पण, हिंदुस्थानच्या बाहेरच्या कार्याविषयीं जेवढें कांहीं आम्हाला सांगतां येण्यासारखें आहे, तेवढेंच, या स्थळीं विवृत करण्याचा आमचा हेतू आहे.

हिंदुस्थानांतून ज्या ज्या क्रांतिकारकांना त्यांचें स्वातंत्र्य हिसकून घेऊन हद्दपार करण्यांत आलें होतें, आणि जे अन्य कारणांनीं युरोपांतच होते, त्यांच्यापैकीं कित्येकजणांना असें वाटत होतें कीं, इंग्लंड आणि फ्रान्सचें जर एकदां युद्ध जुंपेल तर हिंदुस्थानाला फार बरें होणारें आहे; हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें तें इष्ट असेंच आहे. इंग्लंडवर कोणी तरी उठल्यावांचून हिंदुस्थानला कधीं चांगले दिवस यावयाचे नाहींत. परंतु, अनेक दिवस वाट पाहूनहि ती त्यांची आशा फलवती झाली नाहीं.

पण, लौकरच म्हणजे १९१४ सालीं, पश्चिम क्षितिजावर एक आशेची रेखा उमटलेली क्रांतिकारकांनीं पाहिली, आणि त्यांच्या आनंदास पारावार उरला नाहीं. १९१४सालीं, जर्मनीला दोस्तराष्ट्रांनीं युद्धास आह्वान दिलें. अशी असंभवित घटना एकाएकीं घडून येतांच यावेळीं हिंदुस्थाननें काय केलें पाहिजे याची क्रांतिकारकांच्यामध्यें अत्यंत जोरजोरानें चर्चा सुरू झाली; हिंदुस्थानांतील क्रांतिकारक यावेळीं काय करीत आहेत, हें जाणण्याची त्यांना अत्यंत उत्सुकता लागून राहिली. सर्वांआधीं हिंदुस्थानांतील वर्तमानपत्र उचलून घ्यावें, वरपासून खालपर्यंत उत्सुकतेनें दृष्टि टाकावी, कीं हिंदुस्थानांतून इंग्रजांविरुद्ध कांहीं बातमी येईल ! ! इंग्रजांविरुद्ध कांहीं वृत्त समजून येईल ! अशा मानसिक चांचल्यावस्थेंत क्रांतिकारक असतांना,

अमेरिकेंत असलेल्या उत्तरहिंदुस्थानांतील एका सन्मान्य व्यक्तीनें कुठेंसें म्हटलें, कीं "देशांत सर्व कांहीं ठीक आहे; देशांत लोकही आहेत; हें सर्व कांहीं समजलें असेल; पण अझून, इंग्रजांच्याविरुद्ध कुठल्याच कार्याला आरंभ होत नाहीं, समजूं शकत नाहीं." तदनंतर, अमेरिकेंत असलेल्या कित्येक क्रांतिकारकांनीं जर्मन साम्राज्याच्या अमेरिकेंतील प्रतिनिधीची तावडतोब गांठ घेतली; आणि प्रस्तावना करून त्यास म्हटलें, "आम्ही, हिंदी लोकांचें असें उभारलेलें एक स्वयंसेवकदल, हिंदुस्थानाला इंग्रजांविषयीं वाटत असलेला विद्वेष व जर्मनीविषयीं वाटत असलेली सहानुभूति हीं प्रकट करण्याकरतां जर्मनीला पाठवूं इच्छित आहों; क्रांतिकारक हे, सैन्य डॉक्टर आणि परिचारक आपलेच देतील; बाकीचा सर्व भार जर्मनीनें घ्यावा." ज्यांनीं हें बोलणें केलें होतें, त्यांच्यामध्यें एकजण बंगालीही होता. त्यानें क्रांतिकारकांस असें समजावून दिलें कीं, "गोऱ्या राष्ट्रांमध्यें आणि आपल्यामध्यें जे नियम आहेत, कीं कोणत्याहि श्वेतकाय राष्ट्रानें श्वेतकाय राष्ट्राच्या विरुद्ध काळ्या 'रंगीत' वर्णाच्या सैन्याचा उपयोग करावयाचा नाहीं, त्या रणनीतीचा या ठिकाणीं इंग्रजांकडून निःसंशय भंग होणार आहे. या विषम युद्धांत, जर्मनीच्या विरुद्ध लढण्याकरतां, इंग्रज सरकार खात्रीनें हिंदुस्थानचें काळें सैन्य युरोपांत आणणार, आणि सर्व जगभर हिंदुस्थानच्या इंग्लंडवरील अत्युत्कट राजनिष्ठेचें प्रदर्शन करून दाखविणार. त्याच्या पूर्वींच, आपण, तशी एक हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांची काळी पल्टन उभारून, इंग्रजांविषयीं हिंदुस्थानाला वाटत असलेली अप्रीति, इंग्रजांविषयीं हिंदुस्थानाला वाटत असलेला तीव्र अनादर, तीव्र तिरस्कार जगजाहीर करण्याकरतां जर्मनीला जाऊन मिळाल्यास, सर्व जग आपण होऊनच म्हणूं लागेल, कीं, अहाहा ! हिंदुस्थानची केवढी ही राजनिष्ठा ! ! हिंदुस्थानची इंग्रजांवरील केवढी ही प्रभुभक्ति ! ! इंग्रजांबद्दल हिंदुस्थानाला केवढें हें प्रेम ! साम्राज्याची किती ही काळजी ! ! हिंदुस्थानला इंग्रजांची केवढी ही माया ! !" ही युक्ति मनांत आणून, ती त्याप्रमाणें प्रतिनिधीला सांगण्यांत आली. क्रांतिकारकांची ती मसलत ऐकून जर्मनीच्या प्रतिनिधीला फारच समाधान वाटलें. आणि त्यानें, क्रांतिकारकांचें पुढील बोलणें मोठ्या आदरपूर्वक ऐकून घेऊन तें तसेंच्या तसेंच तावडतोब बर्लिनला कळविलें; व नंतर, तो म्हणाला, "युद्धोपयोगी द्रव्यसामग्रीच्या सरबराईची, आणि सैन्य जर्मनीला येऊन पोचल्यानंतरची सर्व जबाबदारी, जर्मनी आपल्या अंगावर

घेण्यास तयार आहे. इतकें निश्चित ठरतांच, बोलणारांनीं कॅलिफोर्नियाच्या '**गदर पार्टी**,'च्या पुढाऱ्यास लिहिलें;--"...नें गदरपार्टीच्या शिखांमधून स्वयंसेवकांचें एक पलटण उभारावें; डॉक्टर्स आणि परिचारक विद्यार्थ्यांमधून मिळूं शकतील. त्यांशिवाय आणखी कोण कोण राजी आहेत, तें कळवावें. परंतु, गदरपार्टीच्या पुढाऱ्यानें दुर्भाग्यवशात् जें उत्तर पाठविलें, तें अत्यंत निराशाजनक होतें; क्रांतिकारकांचा दूरदर्शीपणा आणि प्रयोजकपणा, त्याच्या ध्यानीं येऊं शकला नाहीं. त्यानें जें उत्तर दिलें, तें थोडक्यांत असें होतें;--" यूरोपांत स्वेच्छासैनिक पाठवून काय लाभ? साध्या शिपायांबरोबर साधे शिपाई लढाई करतील; काळ्या शिपायांबरोबर काळे शिपाई लढतील, सर्व देशांतून, हाच नियम आहे. कुठेंहि फिरून पाहिलें तरी, हें असेंच असणार." पुढें थोड्याच दिवसांनीं जर्मनींतल्या हिंदी क्रांतिकारकांनीं "जपान-एशियाचा शत्रू" या नांवाचें एक पुस्तक प्रकाशित केलें. ज्यांनीं हें पुस्तक प्रकाशित केलें होतें ते सर्व बेंगालीच होते. या पुस्तकानें जर्मनगव्हर्मेंटचें लक्ष्य तात्काळ आपल्याकडे वेधून घेतलें; आणि क्रांतिकारकांना, तावडतोब "फॉरेन ऑफीस"मध्यें बोलावून घेण्यांत आलें. ज्या अधिकाऱ्याकडे पूर्वेकडील देशांशीं संबंध ठेवण्याचें खातें होतें, त्याचें मन, ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं लिहिलेलीं हिंदुस्थानविषयक पुस्तकें वाचून अत्यंत प्रतिकूल झालेलें होतें. परंतु, राजकीय धोरण लक्ष्यांत घेऊन, क्रांतिकारकांच्या इच्छेप्रमाणें क्रांतिकारकांना साहाय्य करण्यास अखेरीस तो राजी झाला. या वेळीं, आणखी असेंहि समजून आलें कीं, जर्मनगव्हर्मेंट हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांची आधींपासूनच माहिती मिळवीत आहे, आणि हद्दपार होऊन यूरोपांत आलेले कोण कोण कुठें आहेत, याची बारकाईनें चौकशी करून त्यांच्याशीं गुप्त संबंधहि जोडीत आहे. असा योगायोग अकस्मात् जुळून आल्यानें, हिंदुस्थानांतील 'क्रांति-युद्धा'स सर्वतोपरीं सहाय्य करणारा जर्मनी, क्रांतिकारकांचें मुख्य केंद्र-क्रांतिकारकांचा शीर्षदेश-होऊन बसला.

याच ठिकाणीं आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य वाटतें. रौलेट रिपोर्टांत, **कोमागाटामारू** जहाजाचा कारभार जर्मनीच्या सहाय्यानें घडला, असें एके ठिकाणीं लिहिण्यांत आलेलें आहे. त्याचप्रमाणें, युद्धाच्या वेळीं अनेक इंग्रजी पत्रांतून, जर्मन सेनापती Bernherdi हा अमेरिकेंतील गदरपार्टीच्या पुढाऱ्यास भेटून, भावी युद्धाविषयीं त्यानें त्यास आगाऊ इषारा दिला होता,

असें जें प्रसिद्ध करण्यांत आलें, तेंहि सर्व मिथ्या आहे. इतकेंच नव्हे, तर "बर्लिन कमिटी" संस्थापित होण्याच्या पूर्वी, हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांशीं जर्मन गव्हर्मेंटचा कांहींही संबंध नव्हता. कोमागाटामारू अमेरिकेंत घेऊन जाण्याचा उद्देश–कॅनडाच्या Immigration Law चीं केवळ परीक्षा पहावी एवढाच होता.

वर सांगितल्याप्रमाणें जर्मनीकडून सहाय्य मिळतांच, क्रांतिकारकांना फार मोठी आशा प्राप्त झाली. आणि ते पुढील कांहीं शर्ती जर्मनीस लिहून देऊन प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत अवतीर्ण झाले. क्रांतिकारकांनीं जर्मनीशीं केलेल्या शर्ती याप्रमाणें होत्या:—( १ ) क्रांतिकारकांनीं जर्मनीकडून एक राष्ट्रीय ऋण ( National loan ) घ्यावें; क्रांतिकारक क्रांतियुद्धांत यशस्वी झाल्यावर स्वतंत्र हिंदुस्थानच्या गव्हर्मेंटनें त्या कर्जाची पुनः जर्मनीला फेड करावी; आणि त्याबद्दल क्रांतिकारकांनीं लेखी पुरावा म्हणून, आपल्या सह्यांनिशीं एक दस्ताऐवज जर्मन गव्हर्मेंटला करून द्यावा; ( २ ) जर्मनी हिंदुस्थानला युद्धोपयोगी अशा सर्व अस्त्राशस्त्रांचा भरपूर पुरवठा करील; त्याचप्रमाणें जर्मनीचे हिंदुस्थानांत व परदेशांतून जितके जितके म्हणून प्रतिनिधी आहेत, ते ते सर्व, क्रांतिकारकांना त्यांचें कार्य यशस्वी होण्यासाठीं सर्वतोपरी सहाय्य करतील; ( ३ ) तुर्की साम्राज्य–जें नुकतेंच तरुण तुर्कांच्याकडून प्रस्थापित झालेलें आहे, व जें, या क्षणीं तटस्थ म्हणून आहे, तें जर्मनीच्या पक्षाला येऊन मिळून, दोस्तराष्ट्रांच्या विरुद्ध युद्धघोषणा करील. तसेंच, सुल्तान, दोस्तराष्ट्रांच्या विरुद्ध 'जेहाद' पुकारील; आणि त्या धर्मयुद्धाच्या घोषणेमुळें हिंदुस्थानांतील मुसलमान इंग्रजांच्या विरुद्ध तावडतोब शस्त्र धारण करतील; आणि त्यामुळें हिंदुस्थानांत क्रांतियुद्धाचे प्रयत्न यशस्वी करण्यास पुष्कळच सोपें जाईल.

निरपेक्षभावानें विचार करून पाहिल्यास असेंच दिसून येईल कीं, क्रांतियुद्धाला, तो काल सर्व प्रकारें अनुकूल असाच होता. क्रांतियुद्धासाठीं लागणारीं सर्व शस्त्रास्त्रें-युद्धोपयोगी सर्व साधनसामग्री जर्मनी पुरविण्यास तयार होता; त्याशिवाय, जरूर तीं साधनें देशांतहि होतीं; क्रांतिकारक दलाच्या हातीं शस्त्रें पडल्यानें, त्यांनीं, युद्धाचा अग्नि प्रज्वलित केला असता; जेहादच्या आवाहनानें मुसलमान लोक इंग्रजांच्या विरुद्ध दंड थोपटून उभे राहिले असते; स्वतंत्र होण्याच्या आशेनें राजे-रजवाड्यांनींही इंग्रजांविरुद्ध उठावणी केली असती; आणि शेवटीं, अन्योन्य

प्रकारें परस्परांची परस्परांना मदत होऊन, अनेक गोष्टी जमून आल्या असत्या. त्यावेळीं प्रत्येक क्रांतिकारकाच्या मनांत हाच एक भाव उत्पन्न झाला असता–कीं, काय होईल तें होईल, एकदां प्रयत्न तरी करून पाहूं. देशाचें पाऊल, पडलें तर थोडें तरी पुढेंच पडेल. आणि त्या वेळींही, क्रांतिकारकांच्या मनांत हाच भाव वागत होता. याच उद्देशानें, याच मोहमयी स्वातंत्र्येच्छेनें, क्रांतिकारकांनीं आपल्या कार्यास आरंभ केला. आणि अखेरीस, १९१४ च्या उत्तरार्धांत इंग्रजांच्या विरुद्ध क्रांतियुद्धाचें निशाण उभें करण्यांत आलें.बर्लिनला '**भारतीय स्वातंत्र्यसमिती** ' ( सरकारी नांव Indian Independence Committee ) क्रांतिकारकांच्याकडून स्थापन करण्यांत आली.

हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांनीं जर्मनांचें सहाय्य घेणें हें योग्य होतें कीं अयोग्य होतें, असा एक प्रश्न आतां उद्भवूं शकतो. पण क्रांतिकारकांनीं जगांतलि सर्व इतिहास चाळून असें पाहिलें कीं, यांत कांहींही अयोग्य नाहीं; ज्या ज्या जाती जुलमांनीं गांजल्या जातात. व जेव्हां, त्यांच्याजवळ त्यांच्या उद्धाराचें असें स्वतांचें कांहींहि साधन उरत नाहीं, त्यावेळीं–होय त्यावेळीं–त्या आपल्या शासनकर्त्यांच्या शासनार्थ, परक्यांचाच आश्रय घेत असतात; तसें करण्यांतच त्यांचें राजकारण आहे, असें त्या समजत असतात. त्यांच्या मतानें तसें करण्यांत कांहींही निंद्य नाहीं. आणि, जो जो कोणी, तशी परम मंगल वेळा प्राप्त झाली असतांना आपल्या आळसामुळें, आपल्या भोगवृत्तीमुळें, क्षुद्र स्वार्थाकडे लक्ष्य देऊन ती दवडीत असतो, त्या, परमेश्वरानें आणून दिलेल्या संधीचा दुरुपयोग करीत असतो, तो तो जगाच्या उपहासाला स्वतांला पात्र करून घेतो. आणि परमेश्वराच्या घरींही पण, तो महान् अपराधी ठरतो. जीं जीं राष्ट्रें मित्रराष्ट्रांच्या जुलमांनीं गांजलीं होतीं, तीं तीं, जर्मनीच्या दाराशीं सहाय्यार्थ उभीं राहिलीं. तशींच जीं राष्ट्रें मध्यशक्ति ( Central powers ) समूहाच्या वर्चस्वानें पीडिलीं होतीं, तीं तीं दोस्तराष्ट्रांच्या आश्रयाला गेलीं.

"जर्मन साम्राज्याचें सहाय्य घेण्यांत मोठी चूक झाली, क्रांतिकारक राष्ट्रच्युत झाले" इ. इ. कांहीं आक्षेप आजकाल घेण्यांत येत असतात. पण, आम्हाला जेवढें म्हणून माहीत आहे, त्यावरून आम्ही असें खात्रीपूर्वक सांगूं शकतों, कीं, जर्मनांचें सहाय्य घेतलें गेलें त्यावेळीं,–यांतील एकहि आक्षेप कुणाकडूनहि पुढें आला नाहीं. इतकेंच नव्हे तर स्वदेशांतील आणि विदेशांतील

प्रत्येक क्रांतिकारकानें, तें सहाय्य ग्रहण करण्यास मनःपूर्वक संमतीच दिली. उलट पक्षीं, 'हिंदुस्थानवर विजय मिळविण्याची जर्मनीची इच्छा होती काय?' पण जर्मनीनें तशी इच्छा आपल्या हृदयांत बाळगलेली आम्हांला कधींही आढळून आली नाहीं. एवढेंच काय, पण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला, जर्मनीची सक्रीय सहानुभूतिच होती. आणि वेळोवेळीं जर्मन गव्हर्मेंटनें या गोष्टीचा अगदीं उघड उघड-पणें स्वीकारही केलेला आहे. उपरिनिर्दिष्ट दोष सांगून यूरोपांतील कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट, क्रांतिकारकांच्याकडे अंगुलिनिर्देश करीत असतात. पण हिंदुस्थानांतील क्रांतिकारक हे कम्युनिस्ट नाहींत किंवा सोशालिस्टहि नाहींत; हिंदुस्थानांतील क्रांतिकारक, हे नॅशनॅलिस्ट आहेत. कांट्यानें कांटा काढावा, हा राजनीतिचा महामंत्र त्यांना ठाऊक नव्हता असें नाहीं. शुभ्रपताकाधारी बोल्शेव्हिकांप्रमाणें "मापाला माप देणें" त्यांना शक्य नव्हतें; कारण, कृतकार्य होऊन चुकल्यावर आणखी कृतकार्यता ती काय उरत असते?

हिंदुस्थानचें राजकारण म्हणजे, लंडनमधील इंडिया-हाऊसच्या दरवाजांतून द्वारपालाचे धक्के खाऊन येण्यांत; किंवा, प्रवेशच झाल्यास कारकुनापर्यंत हेलपाटे घालण्यांत; नाहीं तर, अर्जावर अर्ज आणि विनंत्यांवर विनंत्या करून निर्लज्जपणें हात पसरण्यांत; अथवा, हरि हरि म्हणून होमरूलची माळ फिरविण्यांत, या देशचें राजकारण आहे. ह्याशिवाय हिंदुस्थानचें राजकारण दुसऱ्या कशांत आहे? पण, तरुण क्रांतिकारकांनीं देशाला असें दाखवून दिलें कीं, हिंदुस्थानचे लोक, परकीय साम्राज्यांतून समानभावानें वागूं शकतात; समान दर्जाला पोहोचूं शक-तात; समान हक्क प्राप्त करून घेऊं शकतात; परक्या सरकारशीं राजकारण करूं शकतात; राजकयि संबंध जोडूं शकतात. आणि, ज्या ज्या वेळीं, देशांतील पुढारी कूपमंडूकन्यायानें राजनीतिला कॉंग्रेसच्या वर्तुळांतच आवद्ध करून ठेवि-तात, त्या त्या वेळीं, ते अज्ञात तरुण-तीं नवीन विश्वाचीं संतानें-'भारतीय राजनीति' ला बाहेर सन्मुख आणून, जगाच्या सिंहासनावर नेऊन बसवितात.

या कमिटीचें सर्वांत पहिलें काम जें होतें, तें, स्वदेशांतील आणि विदेशांतील आपल्या देशबांधवांना क्रांतियुद्धाचें हें वृत्त कळवून प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत अवतीर्ण होण्याविषयीं आमंत्रण द्यावयाचें. खरोखर, हें आवाहन हिंदुस्थानच्या इतिहा-

सांत चिरस्मरणीयच होऊन राहलि. क्रांतिकारकांचें तें आवाहन देवादिकांच्या–ऋषिमुनींच्या आवाहनाप्रमाणें प्राचीन आर्यपरंपरेला शोभणारें असेंच होतें. या स्थळीं हेंही सांगून ठेवलें पाहिजे, कीं, " बर्लिन–भारतीय स्वातंत्र्य–समिति " संस्थापित होतांना, तर, १९१५।१६ सालीं हिंदुस्थानांत क्रांतिकारकांचे जे जे प्रयत्न झाले, ते कधींच झाले नसते.

बर्लिन कमेटीचें तें आवाहन मिळतांच, ज्यांचा ज्यांचा म्हणून क्रांतितत्त्वावर विश्वास होता, ते ते सर्व जण, आपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्य–कार्यासाठीं स्वदेशांत चालते झाले. त्यांच्यापैकीं कांहीं जण बर्लिनलाही येऊन गेले. आणि त्यांच्याबरोबरच, हिंदुस्थानांत, चारी दिशांना, वृद्धांपासून तरुणांपर्यंत–जे जे नॅशनॅलिस्ट होते, जे जे क्रांतिकारकांचे पुढारी होते, त्या त्या सर्वांना, हा संदेश पोहोंचवून भावी भारतीय क्रांतियुद्धासाठीं शस्त्रास्त्रांची व्यवस्था करण्याकरतां सुचविण्यांत आलें. ज्या ज्या ठिकाणीं कार्यकर्ती माणसें होतीं पण पैसा नव्हता, त्या त्या ठिकाणीं हत्यारांची व अन्य गोष्टींची व्यवस्था करण्याकरतां द्रव्यही पाठवून देण्यांत आलें. कमेटीच्या स्थापनेपासूनच हिंदुस्थानांतलि क्रांतिकारकांच्या गुप्त मंडळ्या एकत्रित करून कार्योन्मुख करण्याविषयींचे प्रयत्न चालू होते. बाहेरील अमेरिकेची ' गदर पार्टी ' कमेटीस येऊन मिळून कार्य करूं लागल्यानें, कमेटीचें लोकबल अधिकच वाढलें. त्या वेळीं, हजार हजार शीख स्वदेशाच्या कार्यासाठीं हिंदुस्थानांत निघून गेले. आणि अनेक तरुणांना द्रव्यसहाय्य देऊन दूरदूरच्या देशांतून विप्लव-कार्याच्या प्रचारासाठीं प्रेरित करण्यांत आलें.

तो एक समय गेला ! त्या वेळीं, क्रांतिकारकांच्या हृदयाकाशांत आशेचे अरुण किरण उदयमान झाले होते. किती कल्पना ! किती मनोराज्यें–सीमा नाहीं ! त्यांच्या हृदयांत, त्या वेळीं केवढा उत्साह, किती साहस होतें ! त्यांच्या साडेतीन हात देहांत, जणुं कांहीं लक्ष लक्ष प्राण सांठवून ठेवले होते ! खरोखर, यांत कांहींही अतिशयोक्ति नाहीं; कांहींही असत्य नाहीं. छद्मविषानें ते हजारों ठिकाणीं जाऊन आले; जिब्राल्टरच्या मार्गानें ते युरोपांत शिरले; पुढें, तो मार्ग बंद झाला तेव्हां, ग्रेटब्रिटनच्या डोक्याभोंवतीं त्यांनीं घिरट्या घातल्या; आणि ते पुनः बर्लिनला येऊन पोचले ! व पुनःहि पूर्ववत् ते तसेच परत गेले. त्यांनीं कुणाची पर्वा बाळगली नाहीं, त्यांना कशाचें भय वाटलें नाहीं. कमिटी ज्या ज्या ठिकाणीं त्यांना पाठवील, त्या त्या ठिकाणीं, निःशंक

मनानें त्यांनीं गमन केलें. मनांत कशाची शंका असेल तर भीति, नाहीं तर भीति कशाची आली आहे ? मग मृत्यूचें भय तरी त्यांना कोठून असणार ? सुवेज कॅनाल रात्रीच्या रात्रीं पोहून जाऊन मिसरमध्यें हिंदी शिपायांत फितुरी करावयाची होती, व त्यांना क्रांतियुद्धास प्रवृत्त करावयाचें होतें;—तत्क्षणीं, एक बंगाली आणि एक मद्रासी दोघेजण तरुण, उडी घेण्यास उद्युक्त झाले. मदिनेच्या हाजींच्यामध्यें क्रांतिप्रचार करावयाचा होता;—तत्क्षणींच एक बंगाली हिंदु तरुण युवक तेथें जाण्यास प्रस्तुत झाला;कुठें दूर पूर्वेकडील प्रशांत महासागराच्या उपकूलास्थित देशसमूहांत जाऊन हत्यारांच्या अयातीची व्यवस्था करावयाची होती;—तत्काळ, एक तरुण बंगाली आणि एक तरुण पंजाबी त्या कामाला लागले ! इराण आणि बलुचिस्थानच्या डोंगराळ रूक्ष प्रदेशांतून, पहाड उतरून जाऊन हिंदुस्थानांत शस्त्रें पोंचवावयाचीं होतीं;-तर एक तरुणदल उड्या मारीत गेलें ! जणुं कांहीं सीताशोधासाठीं हनुमान, नल-नलि हेच निघाले होते ! "आधीं काम झालें पाहिजे; भविष्य पुढें बघूं ! काय होईल नी काय नाहीं, मरूं कीं वाचूं, तें सगळें मग पहातां येईल ! " क्रांतिकारकांच्या मनाची अवस्था त्यावेळीं अशीच झालेली होती.

ती मानासिक शक्ति मिळवून घेऊन क्रांतिकारकांचें तरुण दल, कर्मक्षेत्रांत अवतीर्ण झालें होतें. आम्हीं पूर्वींच सांगितलें आहे, कीं हिंदुस्थानांत चारी दिशांना विशिष्ट लोकांच्याकडे, लोक प्रेरित करण्यांत आले होते. परंतु, कोणत्याही कारणांमुळें असो, पंजाब आणि बंगाल या दोन देशांशिवाय क्रांतिकारकांची हाक अन्यत्र कुठेंही ऐकूं गेली नाहीं. दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं क्रांतिकारकांचा संकेत मिळाला नाहीं. बर्लिन कमिटीच्या संस्थापनेची, आणि जर्मनीच्या सहाय्याची वार्ता, बंगालमध्यें, युरोपांतून व अमेरिकेहूनच पाठविण्यांत आली. द्रव्यही लोकांच्याद्वारेंच पोंचतें करण्यांत आल व तेंहि, त्या त्या ठिकाणीं व्यवस्थितपणें पोंचतें केलें गेलें होतें. क्रांतिकारकांना शस्त्रसामग्री बाल्ेश्वराला आयात होईल अशी बर्लिनहून योजना करण्यांत आली होती. आणि तेवढ्यासाठींच क्रांतिकारकांनीं Harry & Sons यांनीं स्थापित केलेली Universal Emporium नामक एक प्रतिष्ठित व्यापारी कंपनी उघडली.

पंजाबच्या कार्याचा सर्व भार 'गदरपार्टी' वर पडला होता. हिंदुस्थानांतील सर्व प्रदेशांतील व सर्व धर्मांतील लोक, त्या दलाचे सभासद होते. त्यांचें साहस

त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचा आत्मत्याग, जगांत अतुलनीय. गदरपार्टीच्या शिखांनीं हिंदुस्थानांत परत येऊन जो प्रचंड विप्लवोद्यम केला, त्याचा अंतर्भाव, हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासांत होतो. या ठिकाणीं, हिंदुस्थानच्या बाहेरील कार्याविषयींच लिहावयाचें आहे.

---

# द्वितीय परिच्छेद.

## दूर पूर्वेकडील कार्य.

१९१५ सालीं मे महिन्यांत, 'बर्लिन कमिटीकडून' क्रॅफ्ट ( Kraft ) नामक एका जर्मन अधिकाऱ्याला जावाद्वीपाची राजधानी व्हॅटेव्हिआ येथें पाठवून देण्यांत आलें. व्हाटेव्हियास पाठवून देण्याचा उद्देश, तेथून त्यानें अंदमान द्वीपावर आक्रमण करून राजकीय कैद्यांना बंदमुक्त करावें; आणि त्यांना जवळपासच्या एकाद्या स्वतंत्र देशांत सुरक्षित स्थळीं पोहोचवून त्यांच्या शस्त्रास्त्रांची नीट व्यवस्था लावून द्यावी. क्रॅफ्ट यथाकालीं तेथें जाऊन पोचतांच त्यानें बर्लिनला कळविलें कीं, " व्हॅटेव्हियाहून एक लढाऊ जहाज घेऊन अंदमानवर आक्रमण करून जाणें, अधिक सोईचें आहे; व, त्याप्रमाणें मी प्रयत्नही करीत आहे. " शिवाय, त्यानें आणखी असेंही कळविलें कीं, " एका हॉटेलमध्यें कांहीं हिंदी क्रांतिकारकांची व आपली गांठ पडली असून, त्यांच्याशीं आपलें पुष्कळच बोलणेंचालणें झालें आहे. या मंडळींत **यतींद्रनाथ** मुखोपाध्याय प्रमुख आहे." परंतु, सुमारें महिन्याभरांतच, एके दिवशीं बर्लिनला एक बातमी येऊन पोहोचली;–" क्रॅफ्ट, सिंगापूरला इंग्रजांकडून धरला गेला. " आणि तेथेंच अंदमानवर आक्रमण करण्याचे प्रयत्नहि ध्वंस पावले.

क्रॅफ्ट जावाबेट सोडत असतांच, इंग्रजांचे गुप्त हेर त्याच्या पाठीमागें लागलेले होते. अंदमानवर हल्ला होणार, ही बातमी आधींच इंग्रजांना मिळाली असावी. कारण, श्रीयुत **उपेंद्रनाथ** बन्द्योपाध्याय यांनीं आपली ' कहाणी ' सांगतांना

C-3-2 ११ ३०/८ ९५८

'राजनैतिक कारस्थान'मध्यें त्या संबधींचा थोडासा उल्लेख केलेला आहे: "जर्मनीचें एमडेन जहाज अंदमानवर नक्की हल्ला करणार, आणि, सर्व कैद्यांना आतां सोडवून घेऊन जाणार, अशी एक बातमी जेव्हां कैद्यांमध्यें पसरली, तेव्हां तर अंदमान-मधील इंग्रज अधिकाऱ्यांचें धाबें दणाणून गेलें; व अंदमानच्या संरक्षणासाठीं, तोफा, बंदुका, सैन्य मारे एकच गर्दी उडून गेली ! " तसेंच, अमेरिकेंतील एका वर्तमानपत्राच्या कलकत्ता येथील बातमीदारानेंहि त्या पत्राला पुढील ' महत्त्वाची बातमी ' म्हणून कळविली होती;-" येथें ( कलकत्त्यास ) अशी एक दाट वदंता उठली आहे, कीं " क्रांतिकारक लौकरच अंदमानवर हल्ला करून सर्व राजकीय कैद्यांना एकदम सोडवून घेऊन जाणार ! " ह्या लोकवार्ता खरोखरीच खऱ्या होत्या काय ? कीं केवळ खोट्या कंड्या पिकविण्यांत आल्या होत्या ? पण, अमे-रिकेंतील कोणा एका व्यक्तीचें म्हणणें असें कीं, " जर्मनला जेव्हां हिंदुस्थानांतील क्रांतिदलाचें सहाय्य मिळाल्याचें समजलें, तेव्हां जर्मन वकिलातीकडून, **एमडेन**च्या कप्तानाला अंदमानवर हल्ला चढविण्याविषयीं, ताबडतोब बिनतारी संदेश देण्यांत आला. " परंतु, या त्याच्या सांगण्याला कांहीं आधार नाहीं. पुढें लौकरच, ज्या वेळीं एका क्रांतिकारकाची व एमडेनच्या कप्तानाची सुमात्रा बेटांत अवचित गांठ पडली, तेव्हां त्यानें, तसा कांहीं संदेश आपणास मिळाला नसल्याचें खात्री-पूर्वक सांगितलें.

बर्लिन कमिटीचें एक महत्त्वाचें कार्य म्हणजे हिंदुस्थानांत हत्यारें पुरविण्याचें होतें. या कार्याला स्वाभाविकपणें उपयोगीं पडणारीं स्थळ प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावरील लहान लहान शहरें, आणि लहान लहान बेटें होत. त्यासंबंधीं बोलणें करण्याकरतां, जर्मन गव्हर्मेंटनें आपला एक अधिकारी Admiral von Hintze यास राजप्रतिनिधी म्हणून पेकिंगला आगाऊ रवाना करून दिलें. तसेंच, अमेरिकेच्या युक्तसाम्राज्याच्या राजप्रतिनिधीसहि, हत्यारें खरेदी करण्या-करतां अनुज्ञा देण्याविषयीं, ताबडतोब लिहिण्यांत आलें. त्यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न, अमेरिकेकडून खरेदी केलेलीं हत्यारें हिंदुस्थानांत गुप्तपणें निर्गत करण्यासाठीं, जवळचे पण निरनिराळे मार्ग शोधून काढण्याचा होता. व त्याकरतां, चीन सयाम प्रभृति देशांतून अनेक तरुणांना पाठवून देण्यांत आलें.

तत्पूर्वी, अमेरिकेहून जे लोक हिंदुस्थानांत परत गेले होते त्यांनीं तेथें जाऊन रासबिहारींची गांठ घेतली. त्या वेळीं रासबिहारी परदेशांत जाण्यासाठीं निघा-

लेला होता. परदेशगमनाचा उद्देश, जर्मनीचें सहाय्य मिळविण्याचाच होता. रासबिहारी हिंदुस्थानांतून जपानला जाऊन पोंचतांच त्यानें चंद्रनगरच्या एका मनुष्याला कांहीं निरोप पाठविला. परंतु, निरोपाप्रमाणें गिरिजाबाबूच्या नेतृत्वा खालीं असलेली अनुशीलन समिती, यतींद्रनाथ मुखोपाध्याय याच्या दलाशीं सहकार्य करण्यास तयार होईना. यतींद्र धाडशी व कारस्थानी होता, तरी त्याचें मन क्षुद्र होतें. रासबिहारीनें त्यास पुष्कळ वेळां सांभाळून घेतलें होतें. रासबिहारीचा जपानला जाण्याचा हेतू यतींद्राला अज्ञात नव्हता; तरी, त्यानें रासबिहारीची कांहींच वार्ता समजत नाहीं म्हणून त्यास भेटून येण्यासाठीं, अवनीनाथ मुखोपाध्याय यास जपानला जाण्यास सांगितलें. तेवढ्या अवधींत यतींद्रावर वारंट बाहेर पडलें. व त्यास उघडपणें फिरणें अशक्य झालें. शेवटीं, हत्यारें मिळविण्यासाठीं तो बालेश्वराला गेला असतां, संकेतस्थळीं व संकेत वेळीं हत्यारें पोहोचूं शकलीं नाहींत. पोलीस पाठीशीं लागल्यामुळें तो आपल्या लोकांनिशीं वारिपद्च्या जंगलांत शिरला. आणि पळत असतांच गोळी लागून तेथेंच पोलिसांच्या समोर अकालीं मृत्युमुखीं पडला.

तिकडे, १९१५ सालीं अवनीनाथ जपानला जाऊन पोहोचला. व तेथें त्यानें रासबिहारीची भेटही घेतली. अवनीनाथानें, रासबिहारी व आणखी कांहीं मंडळी यांच्या समवेत थोडे दिवस कामहि केलें. नंतर रासबिहारीचा सल्ला घेऊन, पुढें काय करावयाचें तें निश्चित ठरवून, रासबिहारीबरोबरच तो शांघायला आला. याचवेळीं स्वदेशांतून रासबिहारीस एक पत्र मिळालें होतें. पत्रांत महत्त्वाचा असा पुढील मजकूर होता;—

" ' दरोडेखोरी ' चा धंदा आतां पूर्वीप्रमाणें चालेनासा झाला आहे; काय वाटेल तें करून पैसे पाठवा. "

रासबिहारीनें तें पत्र अवनीस दाखवून म्हटलें, " अवनी ! तूं स्वदेशांत परत जाऊन यतींद्राला सांग, कीं **यतीन तूं अति क्षुद्र; तरी पण, रासबिहारी तुला आपल्या बरोबरीचा नेता म्हणून मानण्यास राजी आहे.** परंतु, अशा रीतीनें एकट्यानें पैसे घेऊन बसून अन्य दलांना सहाय्य करण्यास विन्मुख होणें हें ठीक नाहीं. अशानें रक्तपाताखेरीज कांहींही साध्य होऊं शकणार नाहीं." कसाही प्रसंग आला तरी, शेवटीं, क्रांतिकारक-पुढारी कोणतेंही कार्य सहयोगानेंच कसें करीत, हें यावरून समजून येणारें आहे.

अवनीला स्वदेशीं परत पाठवितेवेळीं रासबिहारीनें अवनच्या नोटबुकांत हिंदुस्थानांतलि ७५ जणांचीं नांवें ठावठिकाणांसह लिहून दिलीं. परंतु, अवनी स्वदेशीं परत येत असतां आक्टोबर महिन्यांत, आपल्या नोटबुकासह सिंगापुरास इंग्रजांकडून धरला गेला. पण पुढें लौकरच त्यानें तुरुंगांतून पलायन केलें.

या सुमारास प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावरील गुप्त ठिकाणीं, शस्त्रासाठीं हिंदुस्थानांतील क्रांतिकारक जाऊं येऊं लागले होते. पूर्व एशियांत हिंदुस्थानांतील क्रांतियुद्धाची धूमधडाक्यानें तयारी चालू होती. चीन, जपान, सयाम, फिलिपिन बेटें, सयाम, जावा वगैरे देशांतून क्रांतिकारकांच्या कार्याची घडी नीटपणें बसत चालली होती. जपानमध्यें क्रांतिकारकांनीं काऊंट कूम[1] प्रभृति लोकांचें सहाय्य मिळविलें होतें. त्यांनीं क्रांतिकारकांना दृढतापूर्वक असें आश्वासन दिलें होतें, कीं, " हिंदुस्थानांत जेव्हां क्रांतियुद्धाच्या ज्वाला उठतील, त्यावेळीं त्यांच्या दमनार्थ, एकहि जपानी येथून धावून जाणार नाहीं; उलट प्रज्वलित करण्यासच सहाय्य करील. " चीनमधील क्रांतिकारकांचा पुढारी सन्यतसेन यांचाहि क्रांतिकारकांना पूर्ण पाठिंबा होता. अशी बहुतेक सगळीकडून अनुकूल परिस्थिति निर्माण करून घेतल्यावर, क्रांतिकारकांनीं क्रांतियुद्धासाठीं International Volunteer Corps उभारलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-युद्धाकरितां उभारलेल्या या राष्ट्रीय सैन्यांत, जपानांतील उच्च उच्च वंशांतील अनेक जपानी तरुण या वेळीं दाखल झाले होते.

पूर्वेकडील कार्यासाठीं श्री. भगवानसिंह हे अमेरिकेहून फिलिपिन बेटांत याचवेळीं जाऊन पोहोंचले होते. तेथील कार्याची योजना करून ते जपानला आले. फिलिपिन बेटांतील क्रांतिकार्याची सर्व जबाबदारी दोस्त महंमद याजवर होती. भगवानसिंह जपानहून चीनमध्यें रासबिहारी याजकडे गेले. व तेथील केंद्राची व्यवस्था त्या दोघांनीं प्रत्यक्ष आपल्याच हातीं घेतली. दुसरीकडे, आत्माराम व कपूर हे दोघेजण प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर असलेल्या Swato शहराहून बँकॉक ( Bangkok ) ला पायीं चालत गेले. सयाममध्यें जाऊन, त्यांनीं तेथें एंजिनियर अमरसिंह यांच्या नेतृत्वाखालीं गुप्त समिति स्थापन केली; आणि सयाम हें पूर्वेकडील कार्याचें एक महत्त्वाचें असें केंद्र करून ठेवलें. इतकी व्यवस्था सुसूत्रपणें होतांच, पुढील प्लान आखण्यांत आला;-सयामस्थित जर्मनांनीं भारतीय सैन्याला येऊन मिळून मोलमेनच्या मार्गानें ब्रह्मदेश आक्रमण करावा; आणि चीनस्थित जर्मनसैन्यानें दुभाग विभक्त होऊन एका तुकडीनें सयाममधील सैन्यास

जाऊन मिळावें; आणि दुसऱ्या तुकडीनें ब्रह्मदेशच्या निर्वासित राजवंशाच्या उत्तराधिकारी पुरुषाच्या पुढारीपणाखालीं, भामो ( Bhamo ) च्या मार्गानें उत्तर-ब्रह्मदेश आक्रमण करावा. इतकें होत आहे तोंपर्यंत, शस्त्रास्त्रांनीं भरलेलीं तीन लढाऊ जहाजें–ज्यांपैकीं एका जहाजांत, ५०० जर्मन आफिसर्स असतील व १००० सैन्य असेल, तें जहाज अंदमानाहून राजकीय कैद्यांना मुक्त करून घेऊन थेट कलकत्त्यास येईल; आणि दुसऱ्या दोन जहाजांपैकीं एक जहाज बंगालच्या अन्यत्र राहील व तिसरें, पश्चिम हिंदुस्थानच्या बाजूला खंबायतजवळ राहून क्रांतिकारकांच्याकडून त्याविषयीं पुढें निश्चित होईल. शेवटी ब्रह्मदेश आक्रमण होत असतां असतांच पंजाबमध्यें व बंगालमध्यें क्रांतियुद्धाचें निशाण उभारण्यांत येईल; तसेंच अफगाणिस्थानांतून आणि बलुचिस्थानांतून त्याचवेळीं हिंदुस्थानावर आक्रमण होईल. ही तात्त्विक ( Theoretical ) योजना क्रांतिकारकांनीं आणि युद्ध कुशल जर्मन सेनापतींनीं एकविचारें निरनिराळ्या स्थळीं, निरनिराळ्या रूपांत घडविली होती. परंतु, शेवट ती कार्यकारी झाली नाहीं. क्रांतिकारक क्रमाक्रमानें अनेकजण धरले गेले व जर्मनांनी 'चाचा आपन बांचा' ( काका मेला आपण वांचलों ! ) करून य.पलायन केलें ! कोणी कोणी क्रांतिकारक असें म्हणतात कीं, यावेळीं अनेक जर्मनांचे जन्माचें दारिद्र्य नाहींसें झालें ! इतके एकेकजण गबर होऊन बसले ! अशा रीतीनें भारतीय क्रांतिकार्याचा हळूं हळूं विध्वंस होत गेला.

अगदीं पहिल्यानें सिंगापूरच्या काळ्या शिपायांनीं इंग्रजांविरुद्ध क्रांतियुद्धाचें निशाण उभारलें. बर्लिनला या विद्रोहाचा जो रिपोर्ट आला, त्यांत, पुढलि हकीकत आहे. " शिपायांनीं क्रांतियुद्धाचें निशाण उभारून सात दिवसपर्यंत शहर दखल करून ठेविलें. त्याचवेळीं आंतील सर्व बांदिवान जर्मन ऑफिसर्सना खुलें करून सोडून देण्यांत आलें. त्यांना खुलें केल्यावर ते सर्व शिपाई त्यांच्या पुढें नम्रतापूर्वक उभे राहून दीनपणें म्हणाले, " आम्ही युद्धाला तयार आहों; आम्हांला प्राणाची पर्वा नाहीं. पण, आम्हांला कुणी तरी नेता पाहिजे आहे; आम्ही नेतृविहीन झालों आहों; आमचें सेनापत्य तुम्ही घ्या, तुम्ही आमचें नेतृत्व ग्रहण करा. तुम्ही आमचे पुढारी होणार नाहीं, तर यापुढें आमचा तरणोपाय नाहीं. कशा रीतीनें तोफा डागावयाच्या तें आम्हांला एकदांच दाखवून द्या." पण, नेतृविहीन झालेल्या त्या शिपायांना, ते जर्मन ऑफिसर बोलले, "आम्ही

वचनबद्ध आहों; इंग्रजांच्या विरुद्ध आम्हांला शस्त्र धारण करतां येत नाहीं." शेवटीं, त्या काळ्या शिपायांनीं त्यांची पुष्कळ मनधरणी केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. कुणी नेता नसल्यानें सात दिवसांच्या वर ते टिकाव धरूं शकले नाहींत. एवढया अवधींत, इंग्रजांचें एक जहाज येऊन पोंचलें. त्या जहाजावर युरोपियन व जपानी सैनिक होते. त्यांनीं शिपायांचें दमन केलें. त्याच रिपोर्टांत पुढें असें म्हटलें आहे कीं, " नऊ जपानी सैनिकांनीं काळ्या शिपायांवर गोळ्या घालण्याचें साफ नाकारलें; व गोऱ्या सैन्याच्या सहाय्यानेंच बंडाचा बीमोड करण्यांत आला. " पण कित्येकजण असें म्हणतात कीं, " जपानी सैनिकांनींही गोळ्या झाडल्या. " अन्यपक्षीं हिंदी क्रांतिकारकांचा रिपोर्ट असा, कीं सिंगापूरची फितुरी हें ' गदरपार्टी 'चें कार्य होय. मूलचंद यास ह्या कार्यासाठीं सिंगापुरास पाठविण्यांत आलें होतें. सिंगापुरास वास्तव्य करून त्यानें गुप्तपणें जर्मन लोकांशीं संबंध जोडले व त्यांच्याबरोबर कांहीं शर्तीही ठरविल्या. त्यांतील मुख्य अशा शर्ती, या होत्या;-( १ ) फितुरीचें निशाण उभारून हिंदी सैन्यानें जर्मन ऑफिसरांची मुक्तता करावी; नंतर, ( २ ) उभयतांनीं मिळून मलाया द्वीप ( Malaya Peninsula ) ताब्यांत घेऊन Thingtau German war marine सिंगापुरास स्थापित करावें. तदनंतर ( ३ ) पूर्व एशियांतून इंग्रजांना काढून लावून हिंदुस्थानांतलि क्रांतियुद्धास उभयतांनीं सहाय्य करण्यास जावें. या अटीमुळेंच शिपायांनीं फितुरीचें निशाण उभें केलें. सिंगापुरास त्यावेळीं इंग्रेजी सैन्य नव्हतें. जपानी सैनिकांच्या सहाय्यानें गव्हर्मेंटनें युद्ध चालविलें होतें. जर्मन मुक्त होतांच सुमात्रामध्यें पळून गेले. स्वतः मूलचंदहि चीनांत पळाला, आणि बिचारे शिपाई मात्र मधल्यामधें मारले गेले.

त्यानंतरच, ब्हॊटेव्हियाहून अंदमानवर आक्रमण करण्याच्या प्रयत्नांत क्रॅफ्ट धरला गेला, व त्या प्रयत्नांचा तेथेंच कसा विनाश झाला, तें पूर्वीं सांगितलेंच आहे. ब्हॊटेव्हियास क्रांतिकारकांचें एक मोठें केंद्र होतें. आणि त्या केंद्रांतील लोकांची व क्रॅफ्टची गांठ पडलेली होती. यतींद्राचें आणि रासबिहारीचें न जमल्यामुळें यतींद्रानें कोणा एका वकिलास पैसे देऊन ब्हॊटेव्हियास पाठविलें होतें. यतींद्रनाथाचा मृत शिष्य भोलानाथ चक्रवर्ति जेव्हां बर्माला असे, तेव्हां, तो या वकिलाच्या घरीं रहात असे. हा वकील बर्मालाच वकिली करीत होता. एवढया संबंधानेंच त्या वकिलास क्रांतिकारक म्हटलें जात होतें. यतींद्रनाथाचा व रास-

बिहारीचा विघाड होतांच वकीलमहाशयांनीं सिंगापुरास जाऊन गव्हर्मेंटला सर्व निवेदन केले. आरंभापासून शेवटपर्यंत सर्व प्लान त्या वकिलास माहीत होता. शस्त्रें घेऊन जें जहाज बंगालच्या उपसागरांत आलें होतें, त्याचीहि त्यास माहिती होती; तसेंच, ज्या जहाजांतून सयामचे जर्मन वकील चालले होते, तेंहि तो जाणत होता. असा सर्व प्लान इंग्रजांना समजूं शकल्यामुळें, शस्त्रास्त्रांनीं भरलेलें जहाज अंदमानद्वीपाच्या जवळ येतांच, इंग्रजांच्या H. M. S. Cornwall या लढाऊ जहाजानें, तिथेंच तें समुद्रांत बुडवून टाकलें. आणि जर्मन वकीलांसही पण कैद केलें.

अशा प्रकारें पूर्व एशियांत भारतयिकार्य चालूं असतांना, तत्पूर्वीं जे अमेरिकेहून प्रशांत महासागराच्या किनाऱ्यास आलेले होते, ते, पुष्कळ दिवस वाट पाहून, आणि लोक कांहीं करूं शकत नाहींत असें समजून, परत अमेरिकेस गेले. परंतु ते अमेरिकेस जाऊन पोचण्याच्या आधींच, अमेरिकेहून योधसिंह, चिंचिया, व सुकुमार, असे तिघेजण बँकॉकला येऊन पोहोचले होते. आणि तेथें त्यांनीं जर्मन कॉन्सलची भेटही घेतली होती. जर्मन कॉन्सलनें आपल्या रिपोर्टांत— जो रिपोर्ट पुढें १९१७ सालीं अनेक गांवें फिरून बर्लिनला येऊन पोहोंचला, त्यांत असें लिहिलें होतें कीं, “ हे लोक येण्याच्या पूर्वीं, आपण एका गरीब शीख मनुष्याला, क्रांतिकारकांच्याकडून बातमी आणण्यासाठीं बँकॉकहून हिंदुस्थानांत पाठवून दिलें होतें. तो हिंदुस्थानांत जाऊन क्रांतिकारकांना भेटून बँकॉकला परत येण्याच्या अवधींत, तीन इसम आमच्या भेटीसाठीं येऊन गेले. भेटीच्या प्रसंगीं, त्यांचें तें निरुत्साहाचें बोलणें ऐकून, कॉन्सलला त्यांच्याविषयीं प्रेम वाटलें नाहीं. ” याच रिपोर्टांत पुढें असें म्हटलें आहे कीं, “ त्यांचा तो अमेरिकन थाटमाट पाहून आणि त्यांचें तें अमेरिकन पद्धतिचें लांबचलांब कंटाळवाणें बोलणें ऐकून, कॉन्सलला त्यांच्याविषयीं पहिल्यानें जो कांहीं थोडाबहुत आदर वाटला होता, तोही त्यांच्या नंतरच्या बोलण्यानें पार नाहींसा झाला. चिंचिया आम्हाला म्हणाला,— ‘ We have come to kick a system into the matter. ’ पुढें एके दिवशीं अकस्मात्, पूर्वींचा तो शीख मजूर घाबऱ्या घाबऱ्या आमच्याकडे आला आणि म्हणाला, ‘ वांचवा ! पोलीसांनीं धरपकड चालविली आहे !!’ त्यांस, आम्ही एका सुरक्षित स्थळीं पाठवून दिलें. तदनंतर आमच्या कानावर असें आलें कीं, ज्या तीन व्यक्ती अमेरिकेहून बँकॉकला आल्या आहेत, त्या तिघां-

नाहीं सयामच्या पोलीसांनीं पकडून इंग्रजांच्या हातीं समर्पण केलें !! वास्तविक ही गोष्ट अंतर्राष्ट्रीय कायद्याच्या विरुद्ध होती. परंतु ,दुर्बळ सयाम, इंग्रजांची अवहेलना करूं शकला नाहीं. धरलें जातांच, त्यांनीं इंग्रजांच्या पुढें सर्व गोष्टी एकदम कबूल केल्या. " कॉन्सल आपल्या रिपोर्टांत त्यांजवर टीका करून, शेवटीं म्हणतो, " हे हिंदी क्रांतिकारक तोंडानें लांब लांब गोष्टी सांगतील, पण गळ्यावर सुरी पडण्याची वेळ आली, कीं एकाद्या पोपटाप्रमाणें, काय पढविलें असेल नसेल तें सारें बोलून टाकतील. " त्या तिघांजणामध्यें, योधसिंह हा पंजाबचा रहिवासी; व दुसरा एकजण, जुना क्रांतिकारक. हिंदुस्थानांत, पाठीशीं पोलिसांचा ससेमिरा लागल्यामुळें, त्यांच्या भयानें हे सर्वजण युरोपांत पळून येऊन ब्राझिलमध्यें कार्य करीत होते. त्या वेळीं, कांहीं कार्य-प्रसंगानें श्रीमती कामाबाईंच्या मार्फत त्यांची आम्हाला ओळख झाली होती. तेव्हां कामाबाईंना, योधसिंहानें मोठ्या गर्वानें लिहिलें होतें;—" I will show the England how to make an egg stand ! " " अंडें कसें उभें करावयाचें, तें मी इंग्लंडला दाखवून देणार आहें ! " ज्या वेळीं, विदेशस्थित सर्व क्रांतिकारकांना कार्यासाठीं आहूत करण्यांत आलें, त्या वेळीं ब्राझिलहून अजिलसिंहानें आपला प्रतिनिधि म्हणून योधसिंहास बर्लिनला पाठवून दिलें होतें. त्याचवेळीं कित्येकांनीं, ' योधसिंह हा भीरु प्रकृतीचा मनुष्य आहे ', असें स्पष्ट बोलूनहि दाखविलें होतें. पण हरदयाळनें म्हटलें, ' योधसिंह हा मातब्बर; एकजण जुना–फार मोठा क्रांतिकारक ! ' आणि म्हणूनच, त्यास कॅलिफोर्नियास कार्यासाठीं पाठवून देण्यांत आलें होतें. पकडलें गेल्याबरोबर तो approver झाला. व त्यास सिंगापुरास नेण्यांत आलें. तसेंच, नंतर, लाहोरच्या Conspiracy case मध्यें साक्ष देण्यासाठीं सरकारतर्फे त्यास उभेंहि करण्यांत आलें होतें. लाहोरच्या खटल्यांत, योधसिंहानें, बर्लिनपासून बँकॉकपर्यंतची इत्यंभूत हकीकत कोर्टास निवेदन केली. १९१५ च्या शरदऋतूंत, तीही बातमी बर्लिनला येऊन पोचली. योधसिंह approver झाला, ही गोष्ट खरोखरच मोठी आश्चर्याची होती. कारण, जो एकवेळ इतक्या लांब लांब गोष्टी सांगत असे, केवळ धर्म आणि नीति यांशिवाय दुसरें कांहीं बोलत नसे, आणि, दुसऱ्याचे दोष काढून जो दुसऱ्यांना नांवें ठेवीत असे, तोच, सर्वांआधीं पहिल्यानें approver झाला हें पाहून कोणाला आश्चर्य आणि क्षोभ वाटणार नाहीं ? नंतर असेंहि समजलें कीं, सुकुमार चटोपाध्यायही approver

२

झाला आहे. पण मद्रासस्थ चिंचियाच्या मुखांतून मात्र, एकहि गोष्ट बाहेर पडली नाहीं. सुकुमार चटोपाध्याय, हा अमेरिकेंतील एक विद्यार्थी होता. तो क्रांतिमतवादी असल्याचें कोणीच कधीं ऐकलें नव्हतें. ज्यावेळीं जर्मनीच्या सहाय्याची वार्ता अमेरिकेंत पसरली, त्यावेळीं अनेक भावनाशील विद्यार्थ्यांच्या बरोबर, तोही आलेला होता. छद्मवेषानें, दुसऱ्याच्या खर्चानें, या निमित्यानें कां होईना चोहोंकडे एकदां फिरून घेतां येईल म्हणून, जी कांहीं मंडळी क्रांतिकारकांच्या कार्यांत सामील झाली होती, त्यांतीलच सुकुमारहि एक होता. हृदयांत त्यागाची शक्ति नसतां, अशा प्रकारचे लोक धरले गेल्याबरोबर सर्व कांहीं चटदिशीं सांगून टाकत असतील, आणि प्राण वांचविण्याचे प्रयत्न करीत असतील, यांत आश्चर्याचें असें कांहींच नाहीं. ज्यानें सुकुमारला जोडून दिलें होतें, त्यानें, शेवटीं या गोष्टीचा स्वीकार करून, सुकुमारला पाठविण्यांत आपण मोठी चूक केली, असें कबूल केलें. पण, मागाहून काय उपयोग होता ?

दक्षिण एशियांत या प्रकारें धरपकडीला आरंभ होतांच, बंगाल्यांतून तिकडे आधींच गेलेले क्रांतिकारक चीनमध्यें पळून गेले. फणींद्र चक्रवर्ति ऊर्फ पाइन, शांघायला धरला गेला. शांघाय हें, हिंदुस्थानांत शस्त्रास्त्रांच्या निर्यातीचें एक मुख्य केंद्र होतें. १९१५ च्या शेवटीं, जर्मन गव्हर्मेंटचा एक अधिकारी बर्लिनमध्यें परत आला. त्यानें असें सांगितलें कीं, पाइन नामक एका हिंदी क्रांतिकारकाची व आपली दक्षिण-एशियांत ओळख झाली. तो आपण जर्मन वकिलामार्फत येथें आहों, असें सांगत असे. पण कोणामार्फत, तें त्यानें कधींच सांगितलें नाहीं. हे लोक म्हणजे एक प्रकारचे स्वप्नाविष्ट ( dreamy ) लोक होत. नंतर, पाइन व तो जर्मन, दोघेहि मिळून शांघायला गेले. पुनः पुनः निषेध होत असतांहि, पाइन शांघायाच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या वसाहतींत गेला; व तेथेंच, त्यास पकडण्यांत आलें. तदनंतर तो जर्मन अधिकारी परत युरोपांत येण्यासाठीं कोलंबोस बोटींत चढत असतां, त्यास, एकदम एक फोटो दाखवून इंग्रजांकडून अटक करण्यांत आलें. पोलिसांनीं तो फोटो त्यास दाखवून म्हटलें, "तूं याला ओळखतोस कीं नाहीं ? पाइनला गोळी घालून ठार मारण्यांत आलेलें आहे ! "

परंतु, अवनी मुखोपाध्याय, जो त्या वेळीं सिंगापुरासच तुरुंगांत होता, त्याच सिंगापूरच्या तुरुंगांत पाइनलाही ठेवण्यांत आलें होतें. तसेंच, त्यानें सर्व गुप्त गोष्टी सांगाव्या म्हणून, त्याजवर अनेक भयंकर जुलूम करण्यांत येत होते. अवनी

म्हणतो, " जेव्हां, एक वर्षभर अशा प्रकारें यमयातना सोसून, पाइन शेवटीं रक्त ओकूं लागला, तेव्हां, तो होऊनच म्हणाला, ' मला आतां या यातना सहन होत नाहींत, मी सर्व सांगेन.' त्याचवेळीं, पाइनला सोडून देण्यांत आलें." इतकें झाल्यावर, या धरपकडींतून जे जे अजून बाकी राहिले होते, ते ते सर्वजण जपानमध्यें निघून गेले.

१९१५ सालीं, बर्लिनला, अमेरिकेहून एक बातमी आली,-' रासबिहारी बसु हिंदुस्थानांतून जपानांत पळून गेला आहे.' याच सुमारास हरंबलाल गुप्तहि, शस्त्रें आणण्यासाठीं जपानला गेलेला होता. तेथें त्या दोघांना पकडून आपल्या हवालीं करण्याकरितां इंग्रजांकडून जपान-गव्हर्मेंटच्या द्वारें प्रयत्न करण्यांत आले. परंतु, कांहीं जपानी लोकांनीं त्या दोघां क्रांतिकारकांना आपल्या घरीं लपवून ठेविलें. रासबिहारी आणि हेरंबलाल गुप्त, या दोघांनाही, तदनंतर, टोकिओच्या एका लहानशा घरांत कित्येक दिवस आणखी काढावे लागले. पण, हेरंब गुप्त तशा रीतीनें जीवित कंठण्यास नाखुष होता. त्यानें एक दिवस सुंदर जपानी वेष घेऊन टोकिओंत प्रवेश केला. आणि तेथून अमेरिकेंत पलायन केलें.

हेरंब गुप्त जपानांत येण्याच्या पूर्वी, लाला लजपतरायही जपानमध्यें गेलेले होते. हेरंब व रासबिहारी यांस जपान सरकारनें पकडलेलें पाहून, लजपतराय जपान सोडण्यास तयार झाले. परंतु, मुख्य मंत्री काउंट ओकूमा यानें त्यांची क्षमा मागून असें कळविलें कीं, ' झालेली धरपकड ही कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या गैरसमजुतीच्या घोटाळ्यामुळें झालेली आहे; आपण जपान सोडण्याचें मुळींच कारण नाहीं.' ' याच वेळीं, युरोपच्या पत्रांतून पुढील बातमी प्रसिद्ध झालेली होती;—" सातजण भारतवासी, एका जपानी जहाजांतून अमेरिकेस चाललें असतां, इंग्रजांच्या एका लढाऊ जहाजानें समुद्रामध्यें तें जहाज धरून त्या सातही जणांना कैद करून नेलें ! "

हिंदुस्थानांतील क्रांति-युद्धासाठीं पूर्व-एशियांत असे अनेकविध प्रयत्न चालू असतां, तेथील कार्यास आणखी विशेष सहाय्य व्हावें म्हणून, बर्लिनकमिटीनें, जावाद्वीपांतील प्रसिद्ध नॅशनॅलिस्ट पुढारी डॉ० दाउस देक्कर ( Dr. Daus Dekker ) यास १९१५ च्या जुलई महिन्यांत, तिकडे पाठवून दिलें. दाउस देक्कर हा युरेशियन वंशी असल्यामुळें जावामधील गौरकाय समाज त्यास आपल्यांत मिसळून घेत नसे. आणि त्यामुळें तो स्वदेशीय लोकांचा पक्ष घेऊन

नेहमीं लढत असे. दाउस देक्करचें स्वदेशप्रेम, एकवेळ अत्यंत वाखाणण्यासारखें होतें. त्याचा स्वदेशाभिमान अत्यंत ज्वलत् होता. राष्ट्रीयत्वाच्या-प्रचारकार्यामुळेंच डच गव्हर्मेंटनें त्यास कांहीं काळ जावाबेटांतून हद्दपार केलें होतें. युरोपांत गेल्यावर शामजी कृष्णवर्मा तसेच अन्य कांहीं क्रांतिकारक, यांच्याशीं दाउस देक्करची ओळख झाली. तदनंतर कांहीं काल स्वित्झर्लंडच्या Zurich विश्वविद्यालयांत अभ्यास केल्यावर, हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांच्या क्रांतिकार्यास सहाय्य करण्याची आपली इच्छा असल्याचें त्यानें बर्लिन कमिटीस कळविलें. जावा द्वीपांतील क्रांतिकारकांचें व हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांचें ऐक्य घडून आल्यास ' क्रांतिसमरा 'स पुष्कळच सहाय्य होईल, अशा अपेक्षेनें बर्लिनकमिटीनें डॉ० दाउस देक्करची विनंती मान्य केली. विनंती मान्य होतांच डॉ० दाउस देक्कर एका प्रिन्स नामक आपल्या जावा-मित्रासह कमिटीस येऊन मिळाला. प्रिन्स हा मुसलमान असून शेराकत-उल-इसलाम (Sherakat-Ul-Islam) या जावामधील एका मोठ्या मुस्लीम राष्ट्रीय समितीचा सभासद होता. त्या दोघांनाही भारतीय कार्यासाठीं नियोजित करावें, अशी कमिटीची उत्कट इच्छा होती. आणि त्या उद्देशानें कामिटीनें एक योजना तयार करून देऊन डॉ० दाउस देक्करला जावा बेटांत पाठविण्याचें ठरविलें. जावामध्यें हिंदी क्रांतिकारकांनीं जे प्रयत्न चालविले होते, त्यांस त्या दोघांनीं मदत करावी, विशेषतः, जावा बेटांत जीं हत्यारें पाठवून देण्यांत येतील तीं तेथें घेऊन क्रांतिकारकांच्या सहाय्यानें हिंदुस्थानांत पोहोंचतीं होतील असा बंदोबस्त करावा; आणि हिंदुस्थानांत आपले लोक पाठवून देऊन क्रांतिकारकांची एकमेकाला खबर द्यावी. इतकें सर्व जावामधील क्रांतिकारकांच्या विचारें निश्चित करण्यांत आल्यावर, डॉ० दाउस देक्करला तिकडे जाण्याची परवानगी देण्यांत आली. वाटेंत, कॅलिफोर्नियास उतरून, त्यानें गदरपार्टीच्या पुढाऱ्याची भेट घेतली व तेथून तो चीनमध्यें गेला, परंतु चीनमध्यें जातांच इंग्रजांकडून त्यास पकडण्यांत आलें आणि कैद करून आस्ट्रेलियांत पाठवून देण्यांत आलें. कामिटीस हें कळतांच जेथें तो इंग्रजांच्या हस्तगत झाला होता, तेथून त्यास सोडून देण्याविषयीं डच गव्हर्मेंटद्वारें कमिटीनें प्रयत्न आरंभिले. पण दाउस देक्करनें आपल्या हॉलण्डमधील बहिणीस असें लिहून कळविलें कीं, ' आपल्याशीं इंग्रज लोकांचें वर्तन फारच चांगलें आहे; आणि त्यांना यापुढें राग येईल अशी कोणतीही गोष्ट, कोणीही करूं नये. ' हें

अनपेक्षित वृत्त, कमिटीस कळतांच कमिटीनें त्याच्या मुक्ततेविषयीं चालविलेले सर्व प्रयत्न तावडतोब तहकूब ठेवले. व त्याच्या बहिर्णीस १९१७ अखेरपर्यंत कमिटी-कडून कांहीं मासिकवृत्ति देण्यांत आली.

१९१७ च्या सॅन्फ्रान्सिस्कोच्या खटल्यांत डॉ० दाउसला इंग्रजांकडून तिकडे नेण्यांत आलें. तेथें गेल्यावर, हा विख्यात क्रांतिकारक Approver झाला. त्यानें कमिटीची सर्व योजना भरकोर्टांत सांगून टाकली. आणि म्हटलें, " माझें सर्व लक्ष्य पैशाकडे; पाहिलें, तों सगळे क्रांतिकारक एकजात लबाड, आणि बेवकूब ! ! मी त्यांच्यावर विश्वास ठेवला; पण, त्यांनींच माझा विश्वास-घात केला ! ! त्यांनीं मला पैसे देतो म्हणून सांगितलें, म्हणून झालें तरी, मी त्यांच्यांत डोकावून पाहिलें ! हे लुच्चे आणि लबाड लोक आहेत असें मला जर आधींच कळतें, तर मी त्यांच्यांत कशाला डोकावून बघितलें असतें ? त्यांच्या कामांत मला हात घालण्याची कांहींही जरूर नव्हती. मला एक पैसा पाहिजे होता !!" अशा रीतीनें अखेरीस त्यानें विश्वासघात केला. दाउस देकरची विश्वास-घातकता पाहून हॉलंडचे लोकही आश्चर्यचकित झाले. एक मोठा पुढारी–क्रांति-कारकांचा नेता–स्वतांच आपल्या पक्षाच्या विरुद्ध उभा राहतो, आणि क्रांति-तत्त्वाला पायांखालीं तुडवतो, क्रांतिकारकांच्या नियमांचा भंग करतो, हें पाहून हॉलंडच्या लोकांनीं लज्जेनें मान खालीं घातली. त्या सर्वांनीं दाउस देकरचा उघड उघड धिःकार करून त्यास पुढें विश्वासास अपात्र ठरविलें.

युद्धाच्या वेळीं, अमेरिकेंतील क्रांतिकार्य बहुतांशीं गदरपार्टीच्या द्वारेंच चालत असे. गदरपार्टी ही बर्लिनकमिटी आणि अमेरिकेंतील त्या कमिटीचा प्रतिनिधि, यांच्या सल्ल्यानेंच वागत असे; व कमिटीचा प्रतिनिधीहि गदरपार्टीचे पुढारी रामचंद्र यांच्या विचाराशिवाय कोणतीही गोष्ट करीत नसे. अशा रीतीनें यावेळीं त्या कमिटीचें काम फारच समाधानकारक चाललेलें होतें. शस्त्रसामग्रीच्या बाबतींत जर्मन ऑफिसरांची मदत घेतली जात असे. १९१५ च्या उन्हाळ्यांत बर्लिनला पुढील बातमी आली; " हिंदुस्थानांत हत्यारें रवाना होत आहेत; तीन जहाजें प्रशांत महासागरांतून हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्याच्या रोखानें जात आहेत; आणि दोन, सुवेज चॅनलच्या मार्गानें जात आहेत; या जहाजांचें गम्यस्थल, कराची हें आहे. तसेंच, दोन शीख क्रांतिकारकहि त्याच जहाजांतून चढून जात आहेत. याशिवाय, आणखी म्हणजे, एक अमेरिकन, हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांना

आर्थिक सहाय्य करण्यासाठीं, ‘ हिंदुस्थानांतील पुरातन वस्तु खरेदी करण्याच्या मिषानें ’ हिंदुस्थानांत जात आहे. ” परंतु, दुर्दैवानें, शस्त्रें असलेल्या ज्या जहाजांतून तो थोर मनुष्य जात होता, तें जहाज Celebes द्वीपांत शिरतें न शिरतें, तोंच, त्यास डच गव्हर्मेंटकडून अटक करण्यांत आली. तदनंतर, युद्धसमाप्ति झाल्यावर, त्या जहाजासंबंधानें डच पार्लमेंटमध्यें, प्रसिद्ध डच सोशालिस्ट नेता Troelstra यानें प्रश्नही उपस्थित केला होता. दुसरें जहाज-ज्याचें नांव Larsen असें होतें, तें कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळच, अमेरिकन सरकारकडून धरण्यांत आलें. कोणी कोणी असें सांगतात कीं, त्या जहाजांत मुळीं शस्त्रेंच नव्हतीं ! कारण, ज्या जर्मन अधिकाऱ्यानें ( Starhunt ) हिंदुस्थानासाठीं शस्त्रें खरेदी केलीं होतीं, त्यानेंच तीं हिंदुस्थानच्या लोकांनीं वेळेवर येऊन नेलीं नाहींत म्हणून मेक्सिकोच्या क्रांतिकारक मंडळीस विकून टाकलीं ! दुसरीं जीं दोन जहाजें सुवेज चॅनलमधून हिंदुस्थानांत जात होतीं, तीं, नंतर कुठें गेलीं वगैरे कांहींच पत्ता, अजूनपर्यंत लागत नाहीं. त्यानंतर हिंदुस्थानांत, शांघायहून हत्यारें निर्गत होऊं लागलीं. तींही हिंदुस्थानांत पोंचलीं किंवा नाहीं, किंवा, त्यांचं पुढें काय झालें, तेंही अजून कांहींच समजत नाहीं. परंतु एवढी गोष्ट खरी, कीं शस्त्रास्त्रांची जे निर्गत करीत होते ते धरले गेले. आणि यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें. त्यांच्यामध्यें एक युरोपियनही होता.

उपरिनिर्दिष्ट कार्याविषयीं पेकिंगच्या व बँकॉकच्या जर्मन प्रतिनिधींनीं जर्मनीकडे जो एक महत्त्वाचा रिपोर्ट पाठविला, व जो १९१७ सालीं बर्लिनला येऊन मिळाला, त्यांत, येणेंप्रमाणें लिहिलेलें आहे.– “ हिंदी लोकांच्या दोषामुळेंच, हत्यारें पाठविण्याचा उद्योग यशस्वी झाला नाहीं. हा उद्योग सहज सफल होणारा होता. परंतु, निर्दिष्ट समयीं येऊन त्यांच्याकडून हत्यारें नेण्यांत आलीं नाहींत. शिवाय, हिंदी लोक हे युरोपियनांच्या सहाय्याखेरीज, कोणतेंही कार्य करण्यास अक्षम आहेत. पूर्व एशियाच्या मार्गानें यापुढें हत्यारें पोंचतीं होणें संभवनीय नाहीं. आतां तो प्रयत्न, अफगाणिस्थानच्या मार्गानेंच केला पाहिजे. ” याच रिपोर्टात, शस्त्रनिर्यातीच्या उद्योगाशीं ज्या एका बंगाली माणसाचा निकट संबंध होता, त्याच्यासंबंधींही असेंच लिहिण्यांत आलेलें आहे कीं, “ कोणी एक बंगालीबाबू केवळ स्वतांसाठींच पैसे मागत होता; हे हिंदी लोक, तोंडानें लंब्या लंब्या गोष्टी सांगतात, पण मग, हळूच पैशाची गोष्ट काढतात. आणि पकडले गेले कीं, गर्भगळीत होऊन जाऊन, इत्थंभूत सर्व पाढा वाचून दाखवितात. ”

व्यक्तिशः आर्थिक दृष्टीसंबंधीं कुणा क्रांतिकारकाच्या विरुद्ध, जर्मन प्रतिनिधींनीं जर्मन गव्हर्मेंटला कळविलेलें असें हें पहिलेंच उदाहरण होय. आजपर्यंत, जर्मन गव्हर्मेंट, क्रांतिकारक हे साहसी, कर्मकुशल आणि त्यागी म्हणूनच समजत होतें. आणि जर्मन गव्हर्मेंटची ती भावना दिवसेंदिवस तशीच दृढहि पण होत चालली होती. इतके दिवस जर्मन गव्हर्मेंट, क्रांतिकारकांच्याकडे त्याच एका विशेष दृष्टीनें पहात आलेलें होतें. त्याच दृष्टीनें तें क्रांतिकारकांना सहाय्य करीत आलें होतें. परंतु, तो विरुद्ध रिपोर्ट पहातांच, कमिटीस आपली मान लज्जेनें खालीं घालावी लागली. कमिटीच्या आजवरच्या उज्ज्वल कीर्तीला ती एक काळोखीच लागली. कमिटीस, त्यामुळें फारच दुःख झालें. कमिटीनें तदनंतर जर्मन गव्हर्मेंटला असें लिहून पाठविलें कीं, " युद्धाच्या पूर्वी अनेक जुने कार्यनिष्ठ, विश्वासुक क्रांतिकारक, कार्यासाठीं स्वदेशांत निघून गेलेले आहेत. आणि प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावरील योजनेसाठीं जे कित्येक अज्ञात-चरित लोक चुकीनें लाविले गेले आहेत त्यांच्यामुळेंच, कमिटीवर ही आज विडंबनाची पाळी आलेली आहे. त्याबद्दल कमिटीस अत्यंत दुःख होत आहे. "

परंतु, हिंदी क्रांतिकारकांचें म्हणणें असें कीं, " सर्वस्वीं जर्मनांच्या दोषामुळेंच, शस्त्रास्त्रांच्या उद्योगांत आम्ही अकृतकार्य झालों. जर्मनांचें मन मुळीं इकडें नव्हतेंच; त्यांचें मन सगळें त्यांच्या पूर्व आफ्रिकेंतिल कॉलनीकडे लागलेलें. आणि तिकडेच, शस्त्रें पाठवून देण्याचा त्यांच्या मनांतील मूळ हेतु! " क्रांतिकारकांचें आणखी असेंही म्हणणें होतें कीं, अनेक जर्मन लोकांनीं भारतीय ' क्रांतिकार्याच्या नांवानें हजारों रुपये गडप केले! " १९१६-१७ सालीं पेकिंगहून बर्लिनला एक वेळ असेंही कळविण्यांत आलें होतें";-Boxer Endemnity Fund चा जर्मनीचा हिशेब होऊन तो सर्व पैसा भारतीय कार्यासाठीं नियोजित करण्यांत आलेला आहे. आणि त्या हिशेबाबद्दल बर्लिन-कमिटीसही येथून कळविलें गेलें आहे. कारण, तो सर्व पैसा बर्लिन कमिटीच्या नांवेंच खर्चीं घालण्यांत आलेला आहे. अर्थात्, जर्मनीस, बर्लिन-कमिटीकडून तो वसूल करून घेतां येईल. " परंतु, युद्धानंतर, पूर्वी ज्या ज्या ठिकाणीं जे जे लोक कार्यलिप्त झालेले होते, त्यांच्याजवळ, यासंबंधीं खुलासा विचारतां, त्यानीं असें स्पष्टपणें सांगितलें कीं, "Boxer Endemnity Fund च्या सर्व पैशाचा, व खर्च झालेल्या पैशाचा ताळमेळ पाहिल्यास, त्या हिशेबांत कसा गोंधळ उडवून देण्यांत आलेला आहे, तें नीट सम

जून येणार आहे. तसेंच, आमच्याबद्दल, विरुद्ध जो रिपोर्ट करण्यांत आला आहे तोही आम्हांस मान्य नाहीं. आपले दोष झांकून टाकण्यासाठींच जर्मनांची ही कारवाई आहे. " पुढें, याच कार्यांत पूर्वीं लिप्त असलेल्या शांघायमधील एका जर्मनास विचारतां, त्यानें आपल्या कानावर हात ठेवले. आणि म्हटलें, " God knows it, somebody has made money out of it ! " परंतु खरोखरी कुणाचा दोष होता, तें जरा खोदून खोदून विचारतां, त्यानें असें स्पष्टपणें सांगितलें कीं, " निःसंशय जर्मनांचाच दोष. "

शेवटीं, शस्त्रें पाठविण्याचे प्रयत्न पूर्व एशियांतूनच चालू असतां, पेकिंगहून जर्मन वकिलातीकडून बर्लिनला एकदम कळविण्यांत आलें कीं, " हिंदुस्थानचे सर्व राष्ट्रीय पुढारी तुरुंगांत जाऊन पडले आहेत. यावेळीं, तिकडून बाहेरूनच लोक पाठवावे. " परंतु, बाहेरून लोक पाठवून देणें, तेव्हां, मुळींच शक्य नव्हतें.

१९१४ साल, हिंदुस्थानांत, इंग्रज गव्हर्मेंटला अत्यंत वाईट गेलें ! त्या वर्षाच्या मध्यकालीं, जर्मनीच्या बिनतारी संदेशखात्यानें इंग्रजांचा एक बिनतारी संदेश मधल्यामधें पकडला. त्यांतून असें सांगण्यांत येत होतें कीं, " **हिंदुस्थानची अंतर्गत परिस्थिति अत्यंत नाजुक होऊन बसली आहे. काळ मोठा कठिण आला आहे. हिंदुस्थानांत गडबड उडण्याचा संभव दिसत असल्यानें, एशियांतील सर्व इंग्रजांनीं आतां, सतर्क सावधान आणि सुसज्जित असावें !** "

याच वेळीं, जर्मनीच्या एका गुप्त हेरानें कलकत्त्याहून बर्लिनला एक गुप्त बातमी कळविली. त्यानें असें कळविलें कीं, " कलकत्त्याच्या क्रांतिकारकांनीं मला अगदीं भंडावून सोडलें आहे ! शस्त्रें, आज पाठवितों उद्यां पाठवितों, म्हणून आज कित्येक दिवस जर्मनीकडून बातम्या येत आहेत, निरोपहि येत आहेत. पण अजून, तीं कां येत नाहींत ? अजूनपर्यंत थोडीं सुद्धां तुम्ही कशीं पाठविलीं नाहींत ? तुमचीं शस्त्रें येणार आहेत तरी कधीं ? "

याच सुमारास, हिंदुस्थानांतून बाहेर घालवून दिलेले ४०० जर्मन ख्रिश्चन मिशनरी, बर्लिनला येऊन पोंचले. त्यांच्या जवळून तरी हिंदुस्थानची अंतर्गत परिस्थिति काय आहे ती समजून घ्यावी म्हणून, क्रांतिकारकांच्याकडून अनेक प्रयत्न करण्यांत आले. परंतु त्यांनीं आपल्या तोंडाला अगदीं कुलूप घालून टाकलें होतें. ते म्हणाले, " आम्ही हिंदुस्थान-सरकारजवळ अशी प्रतिज्ञा केलेली आहे ( ! ) कीं, आंतील

कोणतीही गोष्ट कुणासही आम्ही सांगणार नाहीं, प्रतिज्ञा-भंग झाल्यास, परत हिंदुस्थानांत जाण्याची आम्हांला आशा नाहीं; मग आम्ही तुम्हांला कसें सांगावें ? सर्वांनीं अगदीं एकजात मौनव्रत धरलें होतें ! पण शेवटीं, एकजण बोललाच;— " हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांच्या हातीं, शस्त्रें जाऊन पडलीं आहेत. आम्ही जेव्हां हावरा स्टेशनवर गार्डीत बसण्यासाठीं डब्यांत चढलों, तेव्हां एकजण क्रांतिकारक, भिकाऱ्याच्या वेषानें आमच्या अगदीं डब्यासंनिध आला, आणि आमच्यापुढें मान खालीं करून, पण आम्हांला ऐकूं येईल असें हळूच म्हणाला, "तुम्ही **देशांत चालला, फार चांगली गोष्ट आहे ! आम्ही तुम्हां जर्मन लोकांना आपले भाऊ समजतों. पण जेव्हां क्रांतिकारकांचे यज्ञ सुरू होतील, आणि सगळ्या हिंदुस्थानांत क्रांतियुद्धाचा वणवा पेटेल, तेव्हां, इंग्रजांपासून तुम्हां लोकांना आम्हाला पृथक्पणें ओळखतां येणार नाहीं ! आणि त्यामुळें, कदाचित् तुमचें एकादे वेळीं अनिष्ट व्हावयाचें ! ! म्हणून, तुमचें स्वदेशीं परत जाणें मंगलकारक-शुभ ठरो** !!" त्याच मिशनऱ्यानें आणखी असेंही सांगितलें कीं, "अहमदाबादेस तंबूच्या आंत हिंदी लोक चोरून छपून प्रवेश करून घेऊन, कित्येक वेळां आम्हांला खाद्यपदार्थहि आणून देत. आणि, आमच्याकडे बघून, फारच सहानुभूति दर्शवीत.

---

# तृतीय परिच्छेद.

## पश्चिम-एशियाचें कार्य.

बर्लिनला, क्रांतिकारकांनीं ' भारतीय स्वातंत्र्यसमिति ' स्थापन केल्यावर असें पाहिलें कीं, भारतीय क्रांतिकार्याचें क्षेत्र अजूनही विस्तृत केलें पाहिजे. आणि तें, पश्चिम-एशियापर्यंत विस्तृत केलें पाहिजे. कारण, **पश्चिम एशिया हा हिंदुस्थानचा एक मागील दिंडी-दरवाजा आहे.** त्याकरतां, त्यांनीं परिचित इराणी क्रांतिकारकांबरोबर एक होऊन कार्य करण्यासाठीं जर्मन गव्हर्मेंटमार्फत त्यांना बोलावणें केलें. शेवटीं बर्लिन-भारतीय स्वातंत्र्यसमितीप्रमाणें, पर्शियाचीही पण, एक गुप्त समिती स्थापित करण्यांत आली. ही कमिटी स्थापन

करण्याचा आणखी एक विशेष उद्देश असा होता की, पर्शियावर असलेलें इंग्रजांचें आणि रशियाचें आधिपत्य जर्मनीच्या साह्यानें बंड पुकारून नष्ट करावयाचें; रशियनांना आणि इंग्रजांना, पर्शियांतून हांकलून लावावयाचें. असें ठरल्यावर, क्रांतिकार्यासाठीं अनेक तरुणांना, पार्शियन पुढाऱ्यांनीं स्वदेशांत पाठवून दिलें. त्या पर्शियन तरुणांच्याबरोबरच, बर्लिन-कमिटीनें कित्येक हिंदी तरुणांनाहि पर्शियांत रवाना केलें. कमिटीचा मुख्य उद्देश, इराणांतून हिंदुस्थानांत मार्ग मिळवावयाचा होता. १९१७ च्या फेब्रुवारी–मार्चमध्यें, ते तुर्कस्थानांत जाऊन पोंचले आणि तेथून, त्यांच्यापैकीं कांहींजण इराणच्या मार्गानें बगदादला, व कांहींजण सुवेजच्या मार्गानें दमास्कसला गेले.

दमास्कसला जाण्यासाठीं जे तरुण सीरियांत गेले होते, त्यांनीं तेथील ‘ हाजींच्या अतिथिशाले’च्या अधिकाऱ्याची भेट घेतली. हा अधिकारी मुसलमान असून, हिंदुस्थानचा रहिवासी होता. त्याला बरोबर घेऊन, ते तरुण क्रांतिकारक मरुभूमीच्या दिशेनें गेले. तेथून आणखी पुढें जातां येणें, त्यांना शक्य नव्हतें. कारण, सुवेजच्या भागांत इंग्रजांचे गुप्त चर हिंडत होते; सुवेजच्या किनाऱ्यास, इंग्रजांचे शिपाई पहारा देत होते, मधून मधून गोळीबारहि चालू होता. क्रांतिकारक त्या स्थळीं जाऊन पोहोंचण्याच्यापूर्वी बाराजण मुसलमान शिपाई, ‘ जेहाद ’ च्या घोषणेनें इंग्रजांवर चिडून जाऊन तुर्की-छावणींत दाखल झालेले होते. तुर्कांनीं त्या शिपयांचें अत्यंत आदरानें स्वागत केलें होतें आणि त्यांना सुलतानचे शरीर-संरक्षक म्हणून नियुक्त करण्यांत आलें होतें. क्रांतिकारकांनीं कांताराला जाऊन शिपायांना फितुर करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. कित्येक बेडाविन आरबांच्या साह्यानें किनाऱ्यापलीकडील शिपायांशीं बोलणें केलें. शेवटीं, असें निश्चित करण्यांत आलें कीं, पलीकडे- अर्थात् मिसरमध्यें जाऊन, हिंदी शिपायांत स्वदेशभक्तीच्या भावनेनें आणि मुसलमानांत जेहादच्या घोषणेनें, विद्रोह-प्रचार करावा. परंतु, ज्या ठिकाणीं एकसारख्या बंदुका सोडण्यांत येत होत्या, त्या ठिकाणीं-त्या शत्रुपुरींत–त्या अग्नीच्या वर्षावांत-साहसकर्म करावयास कोण जाणार ? एकजण बंगाली तरुण, तत्क्षणीं, त्या साहसकर्मासाठीं पुढें झाला. रात्रीच्यारात्रीं, सुवेज कॅनाल पोहून जाऊन मिसरमध्यें पोहोचून त्या ठिकाणीं हिंदी सैन्यांत फितुरी करण्याचें कार्य अंगावर घेण्यास तो उद्यत झाला. त्याच्या पाठोपाठ, त्याच संकटांत उडी घालण्यासाठीं दुसरा एक तामील तरुण प्रस्तुत झाला. पण, त्या उद्योगांत मृत्यु हा निश्चितच होता.

त्या दोन असीम साहसिक तरुणांना, मृत्यूच्या कराल मुखांत लोटून देण्यास त्या वेळीं कोणते देशप्रेमी हात पुढें होणार होते ? त्यांच्या धाडसास, कोणींही संमति दिली नाहीं. व त्या तरुणांची अत्यंत निराशा झाली. अखेरीस, आणखी कांहीं निराळे उपाय योजून, तें कार्य सिद्धीस नेण्याचें ठरलें.

शिपाई म्हणूं लागले, " तुमचा सर्व उद्योग आम्हीं जाणतों; पण आमचा निरुपाय आहे. " हिंदु शिपाई मुसलमानधर्मीय देशांचा आश्रय घेण्यास तयार नव्हते. तसेंच मुसलमानही पण निरुत्साही दिसत होते. हिंदी शिपाई पुढें झाल्यास त्यांच्या पाठोपाठ आम्ही हें कार्य शिरावर घेण्यास तयार आहों, असें ते म्हणूं लागले. पण, पहिल्यानें पुढें कोणी व्हावें ? १९१५ च्या आरंभीं, त्या तरुणांना कांताराहून बगदादला पाठविण्यांत आलें. कुतलअमारास इंग्रजांबरोबर आत्म-समर्पण करण्यासाठीं आलेल्या हिंदी सैन्यांत, नंतर फितुरी करण्यांत आली.

जे पार्शियांत गेले होते, त्यांचें कार्य अति विपदसंकूल होतें. पदोपदीं इंग्रजी शिपायांशीं त्यांना लढावें लागत होतें. कांहीं कांहीं ठिकाणीं, शत्रूचे लोक त्यांजवर हल्ला करीत; तर कुठें कुठें, शत्रूवर आक्रमण केलें जाई. असें खंडयुद्ध प्रायः चालू होतें. बर्लिनहून पाठविलेले तरुण इराणांत प्रवेश करण्याच्या पूर्वी, अमेरिकेच्या गदरपार्टीनेंहि आपले दोन तरुण तिकडेच प्रेरित केले होते. ते केरमानांत राहून छद्मवेषानें बलुचिस्थानांत जाऊन, तेथून, हिंदुस्थानांत हत्यारें रवाना करण्याचें कार्य करीत होते. त्यांच्याशिवाय युद्धाच्या पूर्वी जे जे क्रांतिकारक त्या देशांतच होते, तेही, त्या क्रांतिकारकांच्या बरोबर काम करीत होते. त्या सर्वांचा उद्देश, इराणांतून हिंदुस्थानशीं संबंध जोडून योग्य संधी प्राप्त होतांच भारतीय सैनि-कांचे एक दल घेऊन हिंदुस्थानांत प्रवेश करावयाचा. परंतु, त्यांचें जीवन स्थिर नव्हतें. क्षणोक्षणीं संकटांना झेलून शत्रूपासून प्राण बचावण्यासाठीं, त्यांना एका जागेहून दुसऱ्या जागीं, सारखें पलायन करावें लागत होतें. क्षणोक्षणीं, त्यांच्या हातांतून त्यांचे प्राण हिसकून घेण्यासाठीं, कोणा दुष्टांचे हात त्यांच्या पाठीमागें लागलेले होते. पार्शियांतच या वेळीं दुसरीकडे काय चाललेलें होतें ? सिराजचे इंग्रज कन्सालेटचे हिंदी शिपाई,–ज्यांनीं आपल्या शरीराबरोबर आपला आत्माही इंग्रजांना विकला होता ते हिंदी शिपाई, आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना खूष करण्याकरतां क्रांतिकारकांना विश्वासघातानें पकडून अधिकाऱ्यांच्या हातांत नेऊन देत होते. त्यांतच २२ वर्षांचा **केदारनाथ**, शत्रूच्या हातीं सांपडला. तो

ज्या ठिकाणीं रहात होता, त्या ठिकाणीं इराणी दरोडेखोरांचा हल्ला झाल्यामुळें, आत्मसंरक्षणासाठीं, केदारनाथ मरुभूमींतून पळत होता. मार्गांत, हिंदी शिपयांची गांठ पडली. हिंदी शिपायांनीं त्याला आपला देशबांधव म्हणून पाहुणचार घेण्यासाठीं अत्यंत आग्रह केला; बालक केदारनाथाला, 'अतिथि' म्हणून त्यांनीं त्याला छावणींत नेलें. आणि सरळ, इंग्रज अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलें. केदारनाथ त्या शिपायांना बोलला, –" **अरेरे ! तुम्ही माझेच देशबांधव !–तुम्ही माझ्याच देशचे रहिवासी !–म्हणून तुमच्या शब्दावर मी विश्वास ठेवला. आणि तुम्ही, मला आतां शत्रूच्या हातीं समर्पण करीत आहां ! ! तुम्हाला पैसाच पाहिजे होता, तर तो मी तुम्हाला देऊं शकलों नसतों काय !** "

केदारनाथाला मेसिदला आणण्यांत आलें. आणि तेथून, **केरमानला** पायीं चालवत नेलें. व तेथेंच, अन्य क्रांतिकारकांच्याबरोबर गोळी घालून, ठार मारण्यांत आलें. चेतसिंह म्हणून दुसरा एक युवक, ज्याला बर्लिनहून बगदादला पाठविण्यांत आलें होतें, आणि नंतर जो इराणांत होता, तोही, याच समयीं इंग्रजांकडून धरला गेला. चेतसिंह, युद्धाच्या पूर्वी अर्थोपार्जन करण्यासाठीं जर्मनीस आलेला होता. कमिटीनें, तेथून त्याला तुर्कस्थानांत पाठवून दिलें होतें. त्यानें मेसापोटेमियांत इंग्रजांच्या खंदकापाशीं जाऊन, सैन्यांत, इंग्रजांविरुद्ध छापलेलीं पुस्तकें आणि पत्रकें वांटलीं होतीं; म्यानिफेस्टोंचा प्रसार केला होता. त्यावेळचें त्याचें तें अचाट साहसकर्म पाहून, इंग्रजही मुग्ध होऊन गेले होते. परंतु, Lahore च्या केसमध्यें, अखेरीस तो इंग्रजांतर्फे साक्षीदार झाला !

याच समयीं **वसंतसिंह** आणि **केरसास्प** ( Kersasp ) नांवाचे दुसरे दोघे क्रांतिकारक, केरमान-अफगाणिस्थानच्या सीमेवर इंग्रजांकडून धरले गेले. त्यांना काबूलमध्यें 'भारतीय मिशन' च्या कार्यासाठीं अफगाणिस्थानांत पाठवून देण्यांत आलें होतें. त्यांनाही वरीलप्रमाणेंच मृत्युदंड देण्यांत आला ! केदारनाथचे डोळे न बांधतां त्यास नुसतें उभें करून त्याच्या छातीवर गोळ्या मारण्यांत आल्या होत्या; पण, या उभयतांनीं आपले डोळे कापडाच्या पट्टीनें बांधून घेतल्यावर, त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या. केदारनाथ आणि वसंतसिंह, दोघेही पंजाबमधील तरुण-युवक. ते अमेरिकेहून बर्लिनला क्रांतिकार्यासाठीं आलेले होते. केदारनाथ एक विद्यार्थी. वसंतसिंह जरी शिक्षित नव्हता, तरी त्याचें स्वदेशप्रेम

असीम, अतुलनीय होतें. केरसास्पही एक उत्साही भारतप्रेमी तरुण होता; आणि त्यांतून तो **पहिलाच पारशी**, -जो हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी पहिलाच 'शहीद' झाला! तदनंतर, १९१७ सालीं, **अम्बाप्रसाद** यासही पर्शियन गव्हर्मेंटनें सिराजहून इंग्रजांना अर्पण केलें! त्यासही शेवटीं इंग्रजांकडून फाशीं देण्यांत आलें. **अम्बाप्रसाद**, एक अत्यंत जुना क्रांतिकारक. पंजाब आणि पर्शियामध्यें तो एक प्रतिपत्तिशाली पुरुष होता.

तदनंतर जे आणखी कांहीं बाकी राहिलेले होते, ते, ज्या वेळीं उत्तरेकडून रूसच्या सैन्यानें, आणि दक्षिणेकडून इंग्रजी सैन्यानें आक्रमण केलें, त्या वेळीं पळून जाऊन, पहाडांतून व पहाडी जातींतून लपून राहिले. तशा त्या अज्ञात स्थितींत, ते, १९१६ पासून २० पर्यंत होते.

---

# चतुर्थ परिच्छेद.

## तुर्कस्थानमधील कार्य.

१९१५च्या आरंभीं, भारतीय क्रांतिकारक इस्तंबूलमध्यें गेले. तेथें त्यांच्या एका Deputaiton ची एनव्हरपाशाकडून भेट घेण्यांत आली. डेप्युटेशनमधील मंडळीशीं हस्तांदोलन करण्याच्या वेळीं, प्रत्येकाचें मुसलमानीच नांव ऐकून, एनव्हरपाशा आश्चर्यचकित झाला. त्यानें जिज्ञासेनें म्हटलें, "तुमच्यामध्यें कुणीच हिंदू नाहीं ?" ज्या वेळीं, त्याला उत्तर मिळालें, कीं, "आमच्यामध्यें एकजणाशिवाय सर्वही हिंदू;पण,आपल्या भेटीसाठींच आम्ही सर्वांनीं मुसलमानी नांवें घेतलीं आहेत," तेव्हां, तो अगदीं खूष होऊन गेला. आणि तो क्रांतिकारकांना म्हणाला, "हें ऐकून मी अगदीं खूष झालों आहे; **मी, धर्म आणि राजकारण नेहमीं निरनिराळ्या खिशांत ठेवीत असतों!**" नंतर कांहीं थोडेसें पुनः बोलणें झाल्यावर तो उद्गारला, "बंगालमध्यें, जे सगळे लोक बॉम्बगोळे सोडीत आहेत तसेंच कांहीं तरी केलें पाहिजे." नंतर, क्रांतिकारकांचें तुर्कस्थानमधील कार्य सुलभ व्हावें म्हणून, त्यांना

लागेल तें सहाय्य करण्यासाठीं, पूर्वेशीं संबंध ठेवणाऱ्या खात्यांतील एका उच्च दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून देण्यांत आली. हिंदी क्रांतिकारकांपैकीं दोघेजण इस्तंबूललाच राहिले. आणि बाकीचे सर्वजण, तेथून सीरिया व बगदादकडे निघून गेले. जे सीरियांत गेले होते, त्यांच्याविषयीं मागें लिहिण्यांत आलेलेंच आहे. बगदादला जे गेले होते, त्यांनीं तेथें जाऊन मेसापोटेमियावर आक्रमण करणाऱ्या हिंदी सैन्यांत प्रवेश करून घेण्याचे प्रयत्न चालविले. पुस्तकें, पत्रकें, म्यानिफेस्टो, युद्धविषयक वार्ता मुद्रित करून, त्यांचा शिपायांत प्रसार करण्यांत आला. चेतसिंह, वसंतसिंह, व आणखी कांहीं क्रांतिकारक, निरनिराळे वेष घेऊन लपत छपत इंग्रजी सैन्याच्या खंदकांपाशीं जात, आणि तेथून, पत्रकें, पुस्तकें, ट्रेंचमध्यें फेकून देत. हळूहळू त्या कार्याचा योग्य तो परिणाम घडून आला; पलटणींतून अनेक शिपाई फरारी झाले. असे फरारी झालेले १०० जण गोळा करून, क्रांतिकारकांनीं त्यांचें एक लहानसें सैन्य उभारलें. परंतु, त्या सैन्यास त्या देशांतील लोकांची फारशी मदत झाली नाहीं. फरारी झालेले हिंदी शिपाई, वाटेंत आरब दिसतांच, ' काफर' म्हणून ठार मारीत ! पुढें कांहीं दिवसांनीं, अनेक कारणांमुळें हें सैन्य मोडून टाकण्यांत आलें.

१९१६ सालीं कुतलअमाराचें पतन झालें. ब्रिटिशांच्या हिंदी सैन्याचा कोंडमारा झाल्याची बातमी बर्लिनला कळतांच, त्या सैन्यामध्यें फितुरीचा व राजद्रोहाचा प्रचार करून जे सैनिक क्रांतिकारकांस येऊन मिळतील त्यांचें क्रांतियुद्धासाठीं एक एक सैन्य उभारावें, अशी योजना करण्यांत आली. मेसापोटेमियांत जे अनेक हिंदुवासी मुसलमान होते, हाजी होते, तसेच जे अन्यजातीय होते, ते कित्येक क्रांतिकारकांस येऊन मिळाले. सरहद्दीवरील पठाणही तुर्कस्थानांत आले. आणि हिंदी सैन्यांतील अनेक सैनिक व ऑफिसर्स, क्रांतिकारकांना फितुर होऊन क्रांतियुद्धास सहाय्य करण्यास तयार झाले. यापुढें युद्धसामग्रीची जमवाजमव करून एक मोठें क्रांतिकारक सैन्य उभें करावें, आणि इराणांतून हिंदुस्थानांत आक्रमण करण्याचा प्रयत्न करावा, असा प्लान आखण्यांत आला. शिपाई क्रांतियुद्धासाठीं अगदीं उत्सुक झालेले होते. त्यांच्यातील कित्येक ऑफिसर्स उतावीळ होऊन म्हणत;—“ **बाबूजी, आम्हांला आतां फक्त ५००० लोक मिळवून द्या; आम्ही केट्याच्या मार्गानें कलकत्यापर्यंत कूच करून जाऊं. वाटेंत, आम्ही ५००० चे ५०,००० मिळवून घेऊं. इतके**

**दिवस ते इंग्रजसरकारच्या बाजूनें लढले असतील, पण आम्ही असल्यावर ते आमच्याच बाजूनें लढतील!** " निःसंशय, ती गोष्ट सत्य होती. हिंदुस्थानांत एकादा ' नवीन ' मार्ग शोधून काढला, एकादा ' नवीन पंथ ' स्थापित केला, आणि निशाण घेऊन रस्त्यांतून चालूं लागलें, म्हणजे त्या निशाणाखालीं हजारों लोक गोळा होऊं शकतात! पण, क्रांतिकारकांना, तसे लोक नको होते. क्रांतिकारकांनीं शिपायांना म्हटलें, " या कार्यासाठीं आम्हांला साहसी लोक पाहिजेत; मग, ते थोडे असले तरी चालतील. " त्या वेळीं आणखी सर्व कांहीं अनुकूल होतें. त्या लोकांनीं आंखलेला तो प्लान पाहून, जर्मन गव्हर्मेंटला अत्यंत संतोष झाल्यावांचून राहिला नाहीं. जर्मन गव्हर्मेंटनें त्या कल्पनेची फारच प्रशंसा केली.

कुतलअमाराचें पतन होण्यापूर्वीपासूनच उपरोक्त कार्यास आरंभ करण्यांत आला होता. इस्तंबूलमध्यें कमिटीच्या ज्या शाखा होत्या, त्यांच्यांतील कित्येक सभासदांना त्या कार्यासाठीं नियुक्त केलें गेलें होतें. या समयीं, अनेक रणनीतिज्ञांनीं कुतलअमाराच्या पार्श्वभागीं भ्रमण करून अवलोकन केलें होतें. त्या लोकांत जर्जियाचे क्रांतिकारक पुढारी Prince Machavelli, बर्लिन विश्वविद्याल याचे अध्यापक Von Luschan हेहि होते. त्यांनीं निरीक्षण करून येऊन कमिटीस असें सांगितलें कीं, " कुतल-अमाच्या आसमंतात्भागीं केवळ गवत उगवत आहे; धान्य कांहींच उत्पन्न होत नाहीं; सैनिकांस लागणारे खाद्यपदार्थ तिथें मिळणार नाहींत; तुम्ही तुर्की लोकांच्या मागून गेल्यावर काय खाणार? रसदचा बंदोबस्त कसा करणार? " हा प्रश्न उद्भवतांच, कमिटीचें मन उद्विग्न झालें. आणि त्याप्रमाणें, जर्मनीस, फॉरेन-ऑफिसला कळविण्यांतहि आलें. फॉरेन ऑफिसकडून तावडतोब जबाव देण्यांत आला. " तुम्हांस उद्विग्न होऊन बसण्याचें कांहींच कारण नाहीं; तुर्की गव्हर्मेंट, त्या ठिकाणीं सैन्याच्या खाद्यसामग्रीची भरपूर व्यवस्था करीत आहे; इंग्रजी सैन्य, आतां शरण येतांच, रसदचा तावडतोब–तत्क्षणींच सारा बंदोबस्त होईल."

१९१५ सालींच, भारतीय क्रांतिकार्याचें इस्तंबूलमधील स्वरूप, निश्चित करण्यांत आलें होतें. तुर्की गव्हर्मेंट बहुतांशीं अनुकूल असेंच होतें. शिक्षित तुर्क धर्मविषयांत उदारपणा दाखवीत असले, तरी त्यांनीं Imperialist Policy चें एक नवीन आवरण आपल्या अंगावर घेतलेलें होतें; आणि Pan-islami-

sm च्या नांवाखालीं पूर्वीचीच बंडखोरी अजूनही चालूच ठेविली होती. युद्धाच्या वेळीं Pan-Islamism ला अत्यंत जोर चढला होता. अनेकांनीं राजरोसपणें त्यास धंद्याचें स्वरूप दिलें होतें. हिंदुस्थानांतील कित्येक मुसलमान, तेव्हा इस्तंबूलमध्यें येऊन राहिलेले होते. त्यांत कोणी हाजी, कोणी तुर्क गुप्त पोलिसांचें हस्तक, तर कोणी इंग्रजांचेच 'गुप्तहेर' म्हणून बदलौकिक मिळवून बसलेले! तर कोणी, केवळ गुंडगिरी करणारे-( Vagabonds ), कोणी तुर्कांचेच भाट! तर कोणी कट्टे पॅन इस्लामिस्ट!!

बर्लिन कमिटीच्या लोकांनीं इस्तंबूलमध्यें प्रवेश केला आहे, आणि त्यांच्या पाठीमागें जर्मन गव्हर्मेंट आहे, तसेंच, त्यांच्याजवळ मुबलक पैसाहि आहे, एवढें कळतांच वरील लोकांपैकीं अनेकजण, 'क्रांतिकारक' होण्यासाठीं कमिटीकडे धांवून आले. परंतु, त्यांच्यापैकीं जे कित्येकजण सुशिक्षित होते, त्यांनीं, हिंदू लोकांच्या इस्तंबूलमधील आगमनाविषयीं, कडक टीका करण्यास सुरवात केली. हिंदूंनीं तुर्कस्थानांत यावें, बरें ते आले तरी तुर्की गव्हर्मेंटकडून त्यांचें आदर-आतिथ्यही व्हावें, त्यांचा सन्मानही व्हावा, ही गोष्ट त्या लोकांना मुळींच सहन झाली नाहीं. त्यांची ती द्वेष-भावना त्यांच्या प्रत्येक कार्यांत स्पष्टपणें प्रतिबिंबित होत असलेली दिसूं लागली. परंतु कांहीं असलें तरी, शेवटीं, अनेक शिक्षित आणि अशिक्षित मुसलमान, तेथें क्रांतिकारांना येऊन मिळाले. इतकेंच नव्हे तर, क्रांतिकारकांचें कार्य ते अत्यंत मनोभावें करूं लागले. त्यांच्यापैकीं दोनच व्यक्ती कायत्या क्रांतिकारकांकडून पैसे उकळण्याच्या हेतूनें, व हिंदुस्थानाला तुर्कांच्या हातीं 'स्वाधीन' करण्याचा उद्देश मनांत धरून, कमेटींत सामील झालेल्या होत्या. त्या दोन सभ्य गृहस्थांपैकीं एक सभ्य गृहस्थ, तेवढ्या हेतूनें बर्लिनलाही जाऊन आले होते! बर्लिनला जाऊन 'फॉरेन-ऑफीस' मधील अधिकाऱ्यांची त्यानें गांठ घेतली. आणि हिंदूलोकांना चार शिव्या हांसडून तो त्यांना म्हणाला, "हिंदू म्हणजे अगदीं क्षुद्र लोक आहेत! त्यांच्या हातून कांहींही व्हावयाचें नाहीं!" आतां पुनः, मुसलमानच हिंदुस्थानावर राज्य करूं शकतील. आम्ही केवळ टर्कीसाठींच काम करूं. हिंदुस्थानशीं, आमचा कांहींही संबंध नाहीं!" त्याच्या सांगण्याचा मथितार्थ इतकाच होता, कीं ज्या अर्थी जर्मनी तुर्कस्थानशीं बंधुभावानें वागत आहे, आणि क्रांतिकारकांनीं ज्या अर्थी जर्मनीचेंच सहाय्य घेतलेलें आहे, त्या अर्थी Pan-islamism ची आणि तुर्कांची ध्वजा नाचव-

अनुक्रमांक २५४९८ / दिनांक ८२२ / ३०१८८

प्याकरतां, क्रांतिकारकांच्या पैशांतून कांहीं भाग हा आपणांस मिळालाच पाहिजे. क्रांतिकारकांच्या पैशावर साहजिकच आपला हक्क जाऊन पोहचत आहे. परंतु, पुढें जर्मन अधिकाऱ्यांनीं त्याची समजूत घालून, त्यास अगदीं स्पष्ट शब्दांत सांगितलें, 'तुमच्या हिंदु-मुसलमानांच्या झगड्यांत आम्हांला कांहींही स्वार्थ साधावयाचा नाहा. जगांत आजवर कुठेंही Pan-Islamic साम्राज्य स्थापन झाल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. आणि भविष्यत्कालींही तें कधीं स्थापन होण्याची आशा नाहीं. हिंदुस्थानांत मुसलमानांनीं हिंदूंशीं, व हिंदूंनीं मुसल्मानाशीं, एक होऊनच कार्य करणें जरूर आहे. तसें एक होण्याशिवाय,तुम्हाला गत्यंतरच नाहीं. तुम्ही जा; आणि त्यांच्यांत मिसळून, काम करा. " जर्मनीकडून अशी थप्पड खाऊन ते सद्गृहस्थ कमिटीकडे आले. आणि कमिटीस, मोठ्या आवेशानें बोलते झाले, " यावेळीं, मी तुम्हा हिंदूंच्याबरोबर मिसळून इंग्रजांचा विनाश करीन; पण नंतर, लागलीच तुम्हां हिंदूंना ' कबरस्थ ' करून टाकीन ! " क्रांतिकारकांनीं, त्यास ' तथाऽस्तु ' म्हटलें. पण एकंदरींत, त्या लोकांची नजर, केवळ पैशावरच होती; कार्याकडे नव्ह-तीच. जर्मनीच्या पैशावर ' निम्मा हक्क ' सांगून, त्या पैशावर तुर्कस्थानांत राहून मौज करतां येत नाहीं, तसेंच, अन्यही कांहीं साधत नाहीं, असें पाहिल्यावर त्यानें पॅन-इस्लामिझमच्या नांवानें एक नवीनच पक्ष स्थापन केला. हा नवीन पक्ष स्थापन करण्याचा मुख्य उद्देश, जे जे कोणी मुसलमान नसतील, त्यांना त्यांना आपल्या पत्रांतून शिव्या देऊन, त्यांच्या नांवानें रात्रंदिवस खडे फोडीत बसाव-याचें. व कमिटीच्या कार्यास जितके म्हणून अडथळे आणतां येतील तितके ते आणावयाचे. अखेरीस, त्या सद्गृहस्थांच्या विद्वेशककार्याची जेव्हां अगदीं परमा-वधि झाली, तेव्हां अनेक सुशिक्षित मुसल्मानसदस्यांच्या आग्रहावरून, त्याचें नांव कमिटीच्या यादींतून रदबातल करण्यांत आलें, इस्तंबूलमधील क्रांतिकारकांचें कार्य, ज्या तुर्की अधिकाऱ्याच्या नजरेखालीं चालत होतें, त्यानें त्या मनुष्या-विषयीं अत्यंत तिरस्कार व्यक्त करून म्हटलें, " या माणसांना राजनीति म्हणजे काय, हें आधीं ठाऊकच नसतें; यांची सर्व दृष्टी, केवळ स्वार्थावर; तो एक अर्थ-लोभी मनुष्य आहे (He is a greedy fellow )." त्या व्यक्तीच्या स्वार्थ-परतेमुळें, इस्तंबूलमधील भारतीयविप्लवकार्याची बरीच हानी झाली. **अनेक ठिकाणीं हेंच दिसून आलें, कीं, ' व्यक्तिगत स्वार्थ ' च हिंदु-मुस-लमानांच्या समस्येचें मूळ कारण आहे.** ह्या सर्व Pan-Islamists चें

कार्य एकच होतें, कीं, तुर्कांच्याकडून पैसे खावयाचे, आणि त्यांचें, आपल्या पत्रांतून अहर्निश गुणगान करीत असावयाचें ! ! दुसऱ्या बाजूनें पहातां, असें कांहीं थोडे लोक, तुर्की गव्हर्मेंटला ठेवणेंच भाग होतें. कारण, त्यांच्याकडूनहि पुष्कळसें कार्य केव्हां केव्हां साधून घेतां येत असे. जेहादच्या घोषणेच्या कामी असल्या हस्तकांचा फार उपयोग होणार होता. वर सांगितलेले सभ्य गृहस्थ, जेव्हां अर्थ-सहाय्य मागण्यासाठीं ॲनव्हरपाशाकडे गेले, आणि डोळ्यांत आंसवें आणून, व हात जोडून, जेव्हां ॲनव्हरपाशास म्हणाले, कीं, " हिंदु लोक चारी दिशांना काम करीत आहेत; त्यांच्यासारखाच आम्हांलाही पैसा देण्यांत यावा; आम्हीही त्यांच्यासारखेंच काम करून दाखवूं; " त्या वेळीं, ॲनव्हरपाशानें त्यास जें उत्तर दिलें, तें फारच महत्त्वाचें आहे. ॲनव्हरपाशा त्या सद्गृहस्थास बोलला, " हिंदु स्वतांसाठीं काम करीत नाहींत; सगळ्या एशियासाठीं ते कार्य करीत आहेत; त्यांत आक्षेप घेण्यासारखें कांहिंच नाहीं. जा, तूंहि इस्लामसाठीं काम कर. दोघांच्याही कार्याचें ध्येय एकच आहे. दोघांचेंही ध्रुवस्थान एकच. "

ॲनव्हर, तालात, सूखरि, जामिद वगैरे तुर्की सरदारांनीं, Pan Islam-ismच्या नांवाखालीं, आपण कधींकाळीं हिंदुस्थानावर राज्य करूं, असें त्यांना स्वप्नांतहि आणल्याचें आम्हांस स्मरत नाहीं. हां! जमालपाशाला मात्र, तसें एखादें स्वप्न कधीं कधीं पडत असे, असें म्हणतात. " स्पेनपासून चीनच्या सीमेपर्यंत, एकजात पॅन-इस्लामिक तुर्की साम्राज्य प्रस्थापित झालेलें आहे, आणि त्या महान् विशाल साम्राज्याची राजधानी, आपलें आवडतें इस्तंबूल शहर आहे, " असें तो कधीं कधीं आपल्या स्वप्नांत पहात असे ! पण तोही, शेवटीं, तुर्कांना असेंच प्रतिपादन करीत असे, कीं " हिंदुस्थानांत, हिंदूंनीं व मुसलमानांनीं एका दिलानेंच वागलें पाहिजे. " " हिंदी क्रांतिकारक सिरियांत असतांना, त्यांच्याबरोबर कार्य करीत असलेल्या एका मिसरी तरुणानें, जमालपाशाचें वर उल्लेखित स्वप्न निवेदन करून आणखी असेंहि सांगितलें कीं, आपण जमालपाशाजवळ असतां जमालपाशा एक दिवस आपणांस म्हणाला, —" मक्केचा वडा शेरीफ एकादिवस माझ्याजवळ बोलून गेला आहे; कीं, हिंदुस्थानांतील मुसलमान लोक,–जे हल्लीं मक्केमध्यें ' कावादलाचे लोक ' म्हणून प्रतिष्ठितपणें मिरवत आहेत, ते सारे इंग्रजांचेच गुप्त हेर ! "

तें कांहीं असलें तरी, धर्मांध आणि स्वार्थपरायण लोकांच्यामुळें, इस्तंबूलमध्यें क्रांतिकार्याची पुष्कळच क्षति झाली, यांत कांहींच शंका नाहीं. आपला स्वार्थ

साधण्यासाठीं, वरील लोकांनीं धर्माचा केवळ बुरखा घेतलेला होता. अशा धर्मांधतेचीं आणखी एक दोन उदाहरणें, येथें सांगण्यासारखीं आहेत. इस्तंबूलमध्यें कमिटीच्या ऑफिसांत, अनेक शस्त्रें असत. एका सभ्य मुसलमानानें, त्याचें नांव कमिटीच्या सभासदांतून कमी केल्यामुळें चिडून जाऊन, त्या शस्त्रांची बातमी पोलीसांना दिली. आणि स्वतांही जाऊन असें सांगितलें कीं, " अमुक अमुक हिंदू लोकांनीं, बिगर परवाना आपल्याजवळ हत्यारें बाळगलीं आहेत. " ती गुप्त बातमी पोलीसांस कळतांच, पोलीस लोक, मोठ्या तयारीनें झडती घेण्यासाठीं कमिटीच्या ऑफिसांत आले. परंतु, क्रांतिकारकांचें कार्य हें ' **तस्किलात्-माकसुसार** 'च्या अधीनतेखालीं चालत असल्यामुळें, त्या ऑफिसकडून पोलीसांना झडती घेण्यास मना करण्यांत आली. पण, कमेटीस, त्या नंतर तस्किलात्-कडूनच तावडतोब एक टेलिफोन देण्यांत आला; कीं " तुमचेच लोक, असलीं हीं कामें करीत असतात; आतां, या क्षणीं, आमच्या ऑफिसामार्फत हत्यारांची एक यादी पोलीसांकडे पाठवून द्या ! " या स्थळां एक गोष्ट विशेष ध्यानांत ठेवणें जरूर आहे, कीं, हिंदुस्थानच्या बाहेर, मुसलमानी राष्ट्रें, हिंदु आणि मुसलमान असा प्रभेद करीत नाहींत. त्यांच्यापुढें, हिंदु-मुसलमान उभयही एकच. हिंदुस्थानांतील कित्येक मुसल्मानांचें म्हणणें असें असतें कीं, " आम्ही ज्या ज्या मुसल्मानी देशांत जाऊं, तेथें तेथें, आम्हांला आमच्या जातीमुळें नागरिकत्वाचे विशिष्ट हक्क प्राप्त होत असतात; विशिष्ट दर्जा मिळवितां येतो; आणि, तेथें आम्ही चाहे तें करूं शकतों ! " परंतु तें मिथ्या आहे. आम्हीच असें सांगतों असें नसून, जे जे मुसलमान, तिकडून आलेले असतील, तेही, आमच्याच म्हणण्याची साक्ष देतील. **हिंदुस्थानच्या बाहेर मुसलमानी जगांत, ' हिंद-वासी ' म्हणजे ' हिंदू ' च मग तो मुसमान असो वा हिंदू असो; किंवा, अन्यधर्मीय असो.** जातीनें मुसलमान असल्यानें, मुसलमानी जगांत, तो हिंदूंपेक्षां कांहीं विशिष्ट अधिकार-अधिक मान-मान्यता भोगूं शकतो, असें मुळींच नाहीं. दुसरें उदाहरण,—बर्लिनहून तिघेजण शीख व आणखी एक हिंदी शिपाई, विप्लव-प्रचारासाठीं तुर्कस्थानांत गेलेले होते; तेथें, शहरांतील हिंदी शिपायांच्या बरोबर त्या लोकांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करून देण्यांत आली होती. वर ज्या सभ्य गृहस्थांचा उल्लेख केलेला आहे, त्या सभ्य गृहस्थांना, शिपायांच्या बराकींत जाऊन असें सांगितलें कीं " अहो, हे हिंदू ! !

यांना तुम्ही आपल्या बरोबरीनें कसें वागवितां ? यांना शिळी आणि कोरडी भाकर खावयास दिली पाहिजे; आणि तुमच्या कोणत्याही सवलतींचा फायदा, तुम्ही यांना मिळूं देतां कामा नये ! " खिलाफतीच्या कार्यांत हिंदूंनीं भाग घेतल्याचें ऐकतांच, त्या गृहस्थाच्या तळपायाची आग मस्तकास गेली. खिलाफतीसाठीं जे हिंदू प्राण देण्यास सुद्धां तयार झाले होते, त्यांचा त्यानें अतिशय छळ केला. कांहीं दिवसांनीं ते चौघेजण अगदीं हताश होऊन गेले. त्यांच्याविषयीं चौकशी केल्यावर असें समजलें कीं, पोलिसांनीं, त्या चौघांसही अटकेंत ठेवलें आहे ! **तस्किलात** इ-कडे विचारल्यावर तिकडून असें उत्तर देण्यांत आलें, "**ते इंग्रजांचे शिपाई,** अर्थात् **तुर्कांचे शत्रु !** तुर्की गव्हर्मेंट त्यांच्या पोटाला काय म्हणून घालील ? " वास्तविक, हें सर्व कारस्थान, त्या सभ्य गृहस्थाचेंच होतें. त्या सभ्य गृहस्थांनीं तुर्की गव्हर्मेंटला एक लांबलचक अर्ज पाठवून असें कळविलें कीं, " हे चौघेजणहि हिंदू; त्यांतून, ते **चौघेही इंग्रजांचे शिपाई !** तुर्की शिपायांच्या बराकींत राहून, तुर्की शिपायांना दिल्या जाणाऱ्या सवलती तेही उपभोगीत आहेत ! त्या ताबडतोब काढून घेण्यांत याव्या; " अशा आशयाचा अर्ज मिळतांच, ते चौघेही जण एकदम कैद झाले ! इंग्रजांच्या छावणींतून पळून येणाऱ्या हिंदी शिपायांस मात्र, तुर्की गव्हर्मेंट मोठ्या आदरानें आणि आतिथ्यानें वागवीत असतां, हे बर्लिनहून आलेले हिंदू-इंग्रजांच्या विरुद्ध लढावयास तयार झालेले ते हिंदू-पण, त्यांच्या पोटासहि घालण्यास, तुर्की अधिकारी तयार नव्हते ! परंतु तुर्कांच्यामध्यें जेथें ' हबाचंद्र राजा आणि गबाचंद्र मंत्री ' तेथें नुसतें ओरडून काय उपयोग ? त्या चौघांच्या मुक्ततेविषयीं तस्किलातला विच्यारल्यावर, तस्किलातनें असें कळविलें कीं, जर,कमिटी त्यांच्या भरण-पोषणाचा भार घेत असेल, तर त्यांची मुक्तता करण्यास कमिटीची कांहींच हरकत नाहीं. " कमिटीनें त्या गोष्टीचा स्वीकार करतांच, चौघांही जणांची मुक्तता झाली. खिलाफतसाठीं लढण्याची चौघांची हौस पूर्ण झालेली पाहून, त्यांना बर्लिनला परत पाठवून देण्यांत आलें.

१९१६ च्या पूर्वार्धांत, **कुतल-अमाराचें** पतन झालें. बर्लिनला ती वार्ता पोंचतांच, ' फॉरेन-ऑफिस ' कडून टेलिफोनद्वारां ताबडतोब, ती तशीच सहर्ष कमिटीस कळविण्यांत आली. त्याच दिवशीं संध्याकाळीं, कमिटीस जो टेलिफोन आला, तो असा होता;-' Kutelamara ist gefallen ! "' कुतल-अमा-

राचें पतन झालें !—कुतल-अमारा पडला ! ' त्या वार्तेनें, कमिटीची आशा द्विगुणित झाली; कमिटीच्या आनंदास पारावार राहिला नाहीं. भविष्यत्कालच्या साध्याविषयीं, कमेटीनें त्या वेळीं कितीतरी मनोराज्य केलें ! त्या वेळीं, आयरिश क्रांतिकारक Sir Roger Cosement नें आयरिश सैन्यांत फितुरी करून बंड करण्यासाठीं, एक सैन्य उभारलें होतें;'आस्ट्रियाच्या अधीनस्थ Bohemia आणि Croatian राष्ट्रांचें कैदी-सैन्य घेऊन, रशिया, आपलेंहि एक प्रचंड सैन्य उभारून शत्रूला आव्हान देण्याच्या तयारींत होता. आणि, हिंदी सैन्याला मात्र, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याकरतां, त्या वेळीं, कोणीच प्रवृत्त केलें नसेल काय? हिंदी सैन्याला फितुर करणें, हा तर त्या वेळीं क्रांतिकारकांना आपला मुख्य हेतू साधावयाचा होता. हिंदी कैदी-शिपायांतून एका दलाची उभारणी करुन, तें दळ हिंदुस्थानांत न्यावयाचें, अशी कमिटीची योजना १९१५ सालापासूनच चालू होती. कुतल अमारानें ती संधी आणून देतांच, कमिटीनें, ती योजना प्रत्यक्ष अंमलांत आणण्याचें ठरविलें. अशा सैन्याचा, हिंदुस्थानांत जर कां एकदां प्रवेश झाला, तर हिंदुस्थानांत विप्लव-वन्हि पेटविण्यास कितीसा उशीर लागणार आहे, असें कमिटीस वाटत होतें. म्हणून ताबडतोब, दोघांजणांस त्या कार्यासाठीं इस्तंबूलला रवाना करण्यांत आलें.

इस्तंबूलला येऊन पोहोंचतांच, त्यांना असें समजलें कीं, कुतल-अमाराच्या कैदी-सैन्याला Anatolias आणण्यांत येत आहे; तसेंच, मुसलमान ऑफिसरांना Eski-Schehar शहरीं, आणि हिंदू ऑफिसरांना कोनिया ( Konia ) स आणण्यांत येत आहे. त्या सर्वांची भेट घेण्यासाठीं, तिघेजण बंगाली, इस्तंबूलहून निघाले. प्रथम ते Aski-Schehar ला गेले. तेथें त्यांनीं ४० ऑफिसरांची गांठ घेतली. ऑफिसरांची राहण्याची अत्यंत गैरसोय होती. क्रांतिकारकांनीं ती गोष्ट तुर्की अधिकाऱ्यांच्या कानावर घालतांच ते बोलले, " **आम्हीं तर, त्यांची अतिशय बडदास्त ठेवली आहे ! एका लक्ष्मीपुत्राला जमनींत हुसकून लावून, त्यांची भव्य जागा, खास, यांच्याकरतां दिली आहे ! हे ऑफिसर सगळे मुसलमान म्हणून तरी यांची आम्हीं इतकी काळजी घेत आहों ! पण, मुसलमान असले म्हणून काय झालें ? ते इंग्रजांचेच लोक कीं नाहीं ? हे आम्हां तुर्कांचे शत्रु; आमच्याच विरुद्ध लढावयास उभें राहतांना यांना कांहीं लज्जा**

**वाटली नाहीं ? इंग्रज, ज्या प्रकारें आमच्या लोकांशीं व्यवहार करतात, अगदीं तसाच व्यवहार, आम्हीही पण, या इंग्रजांच्या लोकांशीं करीत आहों; यांत कोठें चुकतें आहे ?** " क्रांतिकारकांनीं तुर्की ऑफिसरांचें म्हणणें काय होतें, तें, कैदी-ऑफिसरांना नीट समजावून सांगितलें. शेवटीं, कैदी-ऑफिसरांनीं क्रांतिकारकांच्याजवळ अशी विनंती केली कीं, ' इस्तंबूलमध्यें जाऊन ' **बाबा** ' ( **खलिफा** ) **चें** दर्शन घेऊन येण्याची तरी आम्हांला परवानगी देण्यांत यावी. ' क्रांतिकारकांनीं त्यांची योग्य व्यवस्था लावून दिल्यावर, ते कोनियास गेले. त्या ठिकाणीं शीख, गुरखे व महाराष्ट्रीय ऑफिसरांना ठेवण्यांत आलें होतें. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं, क्रांतिकारकांची अत्यंत आदरानें भेट घेतली. आणि त्यांच्याशीं फारच खुल्या दिल्यानें बोलणें केलें. एका वरिष्ठ अधिकाऱ्यानें तर क्रांतिकारकांना म्हटलें कीं, "जसे आम्ही हिंदुस्थानचे लोक आहोंत, तसेच तुम्हीही पण हिंदुस्थानचे आहांत. आम्हाला करतां येईल तेवढें सहाय्य करण्यांस आम्ही केव्हांही तयार आहों. " तेथील कैद्यांमध्यें, एक हिंदी I. M. S. डॉक्टर होता; तो एक काळासाहेब ! त्यास पुरातन जुनाट अशा कोनिया शहरीं राहून चैन पडेनासें झालें होतें. आपणास इस्तंबूलला पाठविण्यांत यावें, अशी त्याची इच्छा होती. परंतु, तुर्की ऑफिसरांचें त्याच्यावर अतिशय प्रेम ! त्यांच्या मनांतून तर, या डॉक्टरनें, आतां येथेंच कायम रहावें ! कारण, तुर्कांत डॉक्टरांची फारच वाण. जे दुसरे हिंदी डॉक्टर्स कैद झालले होते, त्या सर्वांना, सैनिकांच्या मदतीसाटीं ठेवलें होतें. अखेरीस, तुर्की Colonel नें आणि क्रांतिकारकांनीं दे साहेबांची अनेक तऱ्हेनें समजूत घातल्यावर, तो मोठ्या कष्टानें तेथें राहण्यास राजी झाला. कोनियाचे हिंदी कैदी, तुर्कस्थानमधील हिंदी लोकांस भेटण्यास फारसे उत्सुक दिसत नसत ! **फेज-टोपीवाले** हिंदु कसे, याचेंच त्यांना मोठें गूढ पडलें होतें. एका इंग्रजी शिकलेल्या शीख ऑफिसराची ओळख झाल्यावर त्यास जेव्हां ' आपण अजितसिंहाचे जवळचे नातलग आहों ' असें समजून आलें, तेव्हां, तो फारच ओशाळून गेला; आणि मग क्षमा मागून बोलला, ' पहिल्यानें मी आपणांस ओळखलेंच नाहीं ! '

कुतल-अमारास वेढा पडल्यानंतर, आंतील परिस्थिति किती हृदयद्रावक झाली होती, तें निरनिराळ्या लोकांच्याकडून निरनिराळ्या तऱ्हेनें सांगण्यांत येत होतें. मेसापोटेमियांत ज्या शिपायांनीं फितुरी केली, त्यांच्या पुढाऱ्यांना

कोर्टमार्शल करून, भयंकर मृत्युदंड देण्यांत आला. व बाकीच्या लोकांना, बसऱ्यास पाठविलें. वेढ्याच्या वेळीं जेव्हां इंग्रजांतर्फे एरोप्लेनमधून खाद्यादि पदार्थ खालीं टाकले जात, तेव्हां ते घेऊन, गोऱ्या व काळ्या सैन्यांशीं पृथक् व्यवहार करण्यांत येत असे. सर्व सैन्य उपाशी मृत्युमुखांत पडत असतां आणि बाहेरून शत्रूचे गोळे, व आंतून जठराग्नी प्रदीप्त झालेला असतांहि, ' काळा आणि गोरा ' असा फरक करण्यांत आला. त्याचप्रमाणें हिंदी शिपायांना, खाण्यास सुद्धां कमीच प्रमाणांत देण्यांत येत असे.

तदनंतर इंग्रेजी सैन्य शरण आल्यावर, त्यांस **अनातोलियास** आणण्यांत आलें. यावेळीं भारतीय-मुसलमान शिपाई, आपण मुसलमानांच्या मुलखांत पाऊल ठेवीत आहोंत, तस्मात् ' मनांत आणूं तें करूं शकूं ' असें समजून, हिंदु शिपायांना चीड येण्यासारखें बोलत. हिंदू शिपयांना ते म्हणत, " आज आम्हांला गोमांस मिळालें; परंतु, बरोबर शिजलेंच नव्हतें ! त्यामुळें, नुसता आस्वाद घेऊनच तें टाकून दिलें ! " तें ऐकतांच, हिंदु रागानें लाल होऊन जात; व चिडून म्हणत, " असल्या गोष्टी काढून तुम्ही आमचीं डोकीं फिरवाल, तर खबरदार ! आमच्या पुढें असल्या गोष्टी तुम्ही बोलत जाऊं नका. " हिंदु ऑफिसर म्हणत, कीं 'तुर्कांनीं' आमच्याशीं फारच सद्व्यवहार केला. परंतु आमच्याच लोकांनीं आमच्याशीं अतिशयच वाईट वर्तन केलें. इकडे येत असतां, अरबलोकांनीं आमचे कपडे, आमचे शर्ट, आणि पाटलोणी चोरल्या. " शिखांची तुर्कांच्या विषयीं अशी तक्रार होती कीं **मोसल**मध्यें त्यांच्यापैकीं बाराजणांचें जबरदस्तीनें केशकर्तन करण्यांत येऊन त्यांच्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्या, ही फार निंद्य गोष्ट झाली. परंतु, चौकशीअंतीं खरें असें समजलें कीं, त्यांच्यापैकीं कित्येकजण टाइफाइडनें बेभान झाल्यावर तुर्की डॉक्टरांच्या सल्ल्यानें चत्यांचें केशकर्तन करण्यांत आलें होतें. शिपायांची आणखीही एक तक्रार अशी होती, " आमच्या अपरोक्ष पशु मारून जें मांस आम्हांला देण्यांत येतें तें तसें न देतां, जिवंत पशूच आमच्या स्वाधीन करावे; म्हणजे, आम्ही त्यांचा स्वतांच ' झटका ' करूं. " तेंही तुर्की कार्लोनलच्या कानावर घालण्यांत आलें. हिंदूंच्या धार्मिक भावना दुखविल्या गेल्या, तर त्याचा फार विपरीत परिणाम होईल, असें कार्लोनला सांगण्यांत आलें. परंतु, तुर्कांनीं आधींपासूनच त्याविषयीं फार काळजी घेतलेली दिसून येत होती. हिंदू ऑफिसरांच्या तोंडून असें ऐकण्यांत आलें, कीं इंग्रजांच्या चढेल वर्तनानेंच, शिपाई

फार मगरूर होऊन बसले आहेत; गुरखे देखील बिघडून गेले आहेत. त्या शिपायांत इंग्रजांचें लांगूलचालन करणारेही कित्येक वीर सैनिक होतेच! यावेळीं क्रांतिकारकांची अशी इच्छा होती, कीं बंगाल ॲम्ब्युलन्सकोरच्या लोकांची एकवेळ भेट घ्यावी; आणि त्यांच्याशींही आपल्या कार्यासंबंधानें बोलणें करावें. परंतु त्या लोकांना इकडे आणण्यांत आलें नव्हतें. व क्रांतिकारकांनाही अधिक वेळ नव्हता. तेथूनच त्यांना परत फिरावें लागलें. पूर्वीच्या I. M. S. डॉक्टरकडून असें कळलें कीं, सैन्याची फाटाफूट होतांच, त्या कोरचीही दाणादाण उडाली. त्यांच्यापैकीं जे जे लोक तुर्कांच्या हातीं लागले होते, ते ते 'शिपाईच' असें समजून, त्या सर्वांना रसा-सा- लाईनमध्यें वेठीस धरण्यांत आलें! परंतु, डॉक्टरसाहेबांनीं, ते 'ॲम्ब्युलन्स कोरचे लोक आहेत' असें तुर्की ऑफिसरांना समजावून सांगितल्यावर, त्या कामापासून त्यांची मुक्तता करण्यांत आली. या ॲम्ब्युलन्स कोरविषयीं हिंदी सैन्यांकडून तसेंच सरदार-कैद्यांकडून, फारच प्रशंसापर उद्गार निघत होते. देशी ऑफिसरांच्या जवळ क्रांतिकार्यांच्या गोष्टी काढतांच त्यांच्यापैकीं कोणी कोणी अनुमति देत; त्यांत एक महाराष्ट्रीय प्रमुख होता. त्यास जेव्हां क्रांतिकारकांनीं आपली योजना सांगितली, आणि त्या कामीं सहाय्य करण्यास कोण तयार आहेत असें विचारलें, तेव्हां, तो क्रांतिकारकांना म्हणाला, "पलटणींतून मी असें ऐकलें आहे, कीं, या क्रांतियुद्धाच्या वेळीं कोणीही पठाण वा पंजाबी, क्रांतिकारकांना सहाय्य करण्यास तयार नाहीं; परंतु, क्रांतिकारकांच्या विरुद्ध कोणी गोळीही सोडणार नाहींत."

शिपायांचा योग्य बंदोबस्त करण्यांत आल्यावर, तुर्की कालोनल म्हणाला, "जोपर्यंत, तुम्ही या ठिकाणीं आहांत, तोंपर्यंत, तुमची आणि गव्हर्नरची तसेंच कमांडंटची ओळख करून देणें, माझें कर्तव्य आहे." कमांडंटजवळ जातांच त्यानें उत्सुकतेनें विचारलें, "आपण कोण आहांत?" "आम्ही हिंदी क्रांतिकारक", असें त्यास उत्तर मिळतांच, तो कुतूहलतेनें उद्गारला, "मग तर, तुम्ही मोठीं भयानक माणसें!" नंतर एक दीर्घ निश्वास टाकून तो बोलला, 'राज्यक्रांति आणि 'बंड' या दोन्हीही गोष्टी, आतां आम्ही अगदीं विसरून गेलों आहों!" तदनंतर, क्रांतिकारक. गव्हर्नरच्या दरबारांत हजर झाले. तेथेंही विचारल्या गेलेल्या प्रश्नांना योग्य तीं उत्तरें देण्यांत आलीं. परंतु गव्हर्नरनें अधिक जिज्ञासा दाखवून म्हटलें, तुमच्याजवळ कांहीं कागदपत्र आहेत?"

क्रांतिकारकांनीं तत्क्षणीं उत्तर दिलें, " होय; तास्किलातचीं पत्रें आम्ही आमच्याबरोबर आणलेलीं आहेत. "

" तस्किलात म्हणजे काय ? तसेंच त्याचा मुख्य कोण ? मला वाटतें, कोणी तरी आरबच असावा; " गव्हर्नरनें थोडासा संदेह प्रगट करून म्हटलें.

' **तस्किलात्** ' म्हणजे समरविभागांपैकीं एक ' अंतर्गत गुप्तविभाग, ' असें त्यास समजावून दिल्यावर तो उद्गारला, " तर तुम्हीं आतां इथेंच रहा; समर-विभागाला ( ' हार्बिआर 'ला ) तुमच्याविषयीं मी लिहितों. " एकंदरींत गव्हर्नर-साहेबांच्या सांगण्याचा उद्देश एवढाच होता, कीं " **तुम्ही येथें खुशाल रहा! मी माझी जनरलगिरी कांहीं दिवस भोगून घेतों !** " इस्तंबूलहून हजारों शिफारसपत्रें आणा, किंवा, शेंकडों लेखी हुकूम आणा, येथें जनरलसाहे-बांच्या सांगण्याप्रमाणेंच पाऊल पडलें पाहिजे; त्यांत कांहीं कमी ज्यास्ती फरक होतां कामा नये ! Colonel च्या कानावर ही गोष्ट घातल्यावर जनरलसाहेब बोलले, " तुम्हांला इथें भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं ! मी, या ठिकाणीं Garrison चा कमांडंट आहे; सगळ्या गोष्टी, माझ्याच हातांत आहेत; तुम्ही अगदीं निर्भयपणें विप्लवप्रचार करा. "

कुतल-अमाराच्या कैद्यांकडून असें समजलें कीं. ८००० हिंदु शिपायांना, बग-दादला रेल्वे तयार करण्याकरतां, मरुभूमींत रसा-सा लाईन नामक एका स्थळीं नेण्यांत आलें असून, दोन हजार मुसलमानी शिपायांना Taurus पर्वतावर थंड हवेंत ठेवण्यांत आलें आहे. हिंदू शिपायांची अशी तक्रार होती कीं, एकाद्या दिवशीं त्यांची रसद पोचते, नाहीं तर, एकाद्या दिवशीं ती पोहोंचतही नाहीं. तदनंतर, शेवटीं, प्रचारकार्याची योग्य ती व्यवस्था करण्याकरितां, क्रांतिकारक इस्तंबूलला परत आले, आणि त्यांनीं तस्किलातला आपल्या कामाचा रिपोर्ट पाठवून दिला. तो रिपोर्ट पाहतांच, युद्धमंत्री ॲनव्हरपाशानें ताबडतोब हिंदू शिपायांकडील आपल्या अधिकाऱ्यांस टेलिग्राम पाठवून देऊन असें फर्माविलें कीं " हिंदू शिपायांच्या धार्मिक भावना, कोणीही दुखवितां कामा नयेत. " तसेंच, हिंदू शिपायांचा योग्य परामर्श घेण्याविषयीं तस्किलातीलाही पण कळविण्यांत आलें. सैन्य उभारण्यास क्रांतिकारकांस मदत करण्याकरतां ॲनव्हरपाशानें असें कळविलें कीं, " जर हिंदी क्रांतिकारक त्या कार्यांत कृतार्थता मिळवूं शकणार

असतील, आणि त्यांचें कार्य त्यामुळें तत्काळ योग्य रीतीनें जमण्यासारखें असेल, तर त्यांना अवश्य तेवढें सैन्य उभारून द्यावें; आणि सर्वतोपरी त्यांस सहाय्य करावें. ” परंतु, जर्मनींत जाऊन जेव्हां त्या योजनेचा पुनः खल करण्यांत आला, तेव्हां क्रांतिकारकांचे डोळे त्या बाबतींत एकदाचे कायमचे निवले! जर्मन ऑफिसरांनीं असें उत्तर दिलें कीं, “ असें एकादें सैन्य उभारून हिंदुस्थानांत पाठविण्याची युक्ति, ‘ प्रत्यक्ष राजनीतीच्या ’ क्षेत्रांत अंतर्भूत होऊं शकत नाहीं; तसें करणें, एकप्रकारें फार दूरदृष्टीचें असलें, तरी ती योजना प्रत्यक्ष कार्यकारी होणारी नाहीं. याच समयीं, लहान लहान तुकड्या जर्मनीकडून इराणमध्यें, युद्धार्थ पाठविण्यांत येत होत्या. या तुकड्यांतील हिंदी लोक, बगदादकडून मिळविण्यांत आले होते; कुतल अमारा पडल्यानंतर तुर्की-सैन्य इराणकडे चालल्याचें वृत्त, त्या वेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेलें होतें, तुर्कांची अशी इच्छा होती कीं, भारतीय क्रांतिकारकांचें सैन्य, आपल्या सैन्याच्या चालीनेंच सर्वत्र चालावें, परंतु, बर्लिनकमिटीस तें सम्मत नव्हतें. बर्लिनकमिटीचा हेतु, क्रांतिकारकांचें सैन्य हिंदुस्थानांतच पाठवून द्यावें. कमिटीस असा दृढ विश्वास वाटत होता, कीं, मार्गांत, त्या क्रांतिकारकांच्या सैन्यास अनेक युद्धोत्सुक लोक येऊन मिळतील. तसेंच, आपलें सैन्य जर्मन ऑफिसरांच्याकडून शिक्षण घेऊन तयार झालेलें असल्यामुळें, इंग्रजांस हार जाणार नाहीं. परंतु, जर्मन ऑफिसरांनीं पहिल्यानें अशी सबब सांगितली, कीं, रसदच्या सोयीसाठीं क्रांतिकारक सैन्यानें तुर्की सैन्याबरोबरच चालणें अवश्य आहे. आणि मागाहून, ‘ ती योजनाच मुळीं अव्यवहार्य ’ असें स्पष्ट उत्तर देण्यांत आलें. जर्मनीची इच्छा, असें सैन्य उभारून त्याचा स्वतांस उपयोग करून घ्यावा; व तुर्की अधिकारी तर कैदी–शिपायांना मरुभूमीच्या तप्त वालुकामय प्रदेशांत नेऊन उन्हांत भाजून मारूं लागले. हें पाहतांच, कमिटीचा सर्वच उत्साहभंग झाला. कमिटीनें, त्या कामीं निराश होऊन क्रांतिकारक सैन्य हिंदुस्थानांत पाठवून देण्याची आपली योजना, मोठ्या कष्टानें मग सोडून दिली. कुतल–अमारा पडण्याच्या पूर्वींच, इस्तंबूलहून कांहीं सदस्यांना, वरील योजनेस प्रत्यक्ष आरंभ करण्याकरतां, बगदादला पाठवून देण्यांत आलें होतें. तेथें, त्या दलाच्या नेत्यांविरुद्ध अनेक तक्रारी होऊं लागल्यामुळें, तसेंच, कमिटीसही आपला पूर्वसंकल्प सोडून द्यावा लागल्यामुळें, त्या लोकांना ताबडतोब परत बोलावण्यांत आलें.

कोणत्या गव्हर्मेंटच्या विचारें वरील योजनेचा संकल्प व्यर्थ गेला, हें आज निश्चितपणें सांगतां येत नाहीं. प्रथमतः, ती योजना पाहून जर्मन गव्हर्मेंटनें आपलें त्यांत फारच लक्ष्य घातलें होतें. आणि क्रांतिकारकांनाही त्या कामीं उत्तेजन दिलें होतें. कुतल–अमारा पडण्यापूर्वी, दक्षिण अमेरिकेंतील एक युद्धनीतिज्ञ मनुष्य, कुतल–अमारास इंग्रजांचा झालेला कोंडमारा स्वतः पाहून, परत बर्लिनला गेलेला होता; तो मनुष्य अमेरिकेंतील हिंदी क्रांतिकारकांना युद्धकलेचें शिक्षण देत असे; त्याचें म्हणणें, " युद्धाचा इतिहास वाचून आपलें असें निश्चित मत बनलें आहे, कीं शिकलेल्या अधिकाऱ्यांच्या अभावीं आणि आधुनिक युद्धकलेचें ज्ञान नसल्यामुळेंच, हिंदी लोकांना आजपर्यंत पराजित व्हावें लागलें आहे. म्हणून, क्रांतिकारकांनीं गोऱ्या लोकांच्या हाताखालींच लष्करी शिक्षण घेऊन, यापुढें आपली तयारी केली पाहिजे. "

त्याची अशी इच्छा होती कीं, तसें संकल्पित सैन्य उभारून, आपण त्या सैन्याचें नेतृत्व पत्करून , हिंदुस्थानांत प्रवेश करावा. जर्मन–फॉरेन–ऑफीसनेंही त्या गोष्टीस प्रथम मान्यताच दिली होती. इतकेंच नव्हे तर, कुतल–अमारास इंग्रजी सैन्य शरण येतांच, वरील योजना सिद्धीस नेण्यासाठीं, त्यास तिकडे पाठवूनही देण्यांत आलें होतें. यावेळीं जर्मनीनें, उपरोक्त योजनेविषयीं अतिशयच उत्कटता दाखविली होती. परंतु, शेवटीं, तुर्कांनीं जेव्हां रसा–सा लाईनमध्यें त्या कैदी हिंदी शिपायांची ' कूली ' म्हणून योजना केली, तेव्हां सर्वांचाच उत्साहभंग आणि आशाभंग झाला. कोणत्या राजकारणी पुरुषाच्या मुत्सद्देगिरीमुळें ती योजना पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें पळांत जन्मास आली, आणि पळांत नाहींशी झाली, तें अजूनहि समजून येत नाहीं ! अखेरीस, तुर्कस्थानांत, तशा स्थितींत कार्य करणें व्यर्थ आहे, असें पाहून, कमिटीनें, आपल्या लोकांस तिकडून परत येण्याविषयीं लिहिलें.

नंतर, असें समजलें कीं, " जे हिंदी शिपाई त्या मरुभूमींत काम करीत होते, त्यांचीं स्थिति फारच भयानक झालेली आहे. " कमिटीनें जर्मन गव्हर्मेंटजवळ त्यांस सहाय्य करण्याविषयीं विचारलें असतां, " त्या कामीं आपणास आतां कांहींच करतां येत नाहीं, व तुर्की गव्हर्मेंटला त्याबाबत लिहिण्यास आपणांस आतां अधिकार पोंचत नाहीं," असें उत्तर देण्यांत आलें. हिंदीसैनिकांचे कष्ट कांहीं थोडे तरी कमी करतां यावे, म्हणून, कमिटीनें होते नव्हते तेवढे सर्व

उपाय, योजून पाहिले. पण कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण, आतां कमिटीस कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. अदृष्टावर हवाला देऊनच त्या कामीं कमिटीस निराश व्हावें लागलें.

पुढें कांहीं दिवसांनंतर कमिटीचे दोघेजण सदस्य, इराणांतून बर्लिनला येतेवेळीं, रसा-सा-लाईनमध्यें जाऊन आले. त्यांनीं असें सांगितलें कीं, तेथें एका हिंदी डॉक्टरची व त्यांची भेट झाली; कुतल अमाराच्या वेळ्यांत जे डॉक्टर कैद झालेले होते, त्या सर्वांना, कैदी शिपायांसाठीं निरनिराळ्या ठिकाणीं ठेवण्यांत आलेलें होतें. हा डॉक्टरही तेथेंच होता. तो त्यांना म्हणाला, "तुमची बर्लिनकमिटी काय आहे, तें मी पूर्ण जाणतों; ती एक बदमाष लोकांची टोळी आहे, हे सगळे शिपाई मरून चालले आहेत, तरी, त्या तुमच्या कमिटीस त्यांची अजून दाद नाहीं. त्यांचे प्राण वांचविण्याची कांहीं तजवीज, तुमची कमिटी करीत आहे काय ?" परंतु खरी गोष्ट, हिंदी सैनिकांचें दुःख दूर करण्याचा कोणताच उपाय, त्यानंतर कमिटीजवळ शिल्लक राहिलेला नव्हता.

१९१६ च्या अखेरीस, कमिटीनें, तुर्कस्थानामधील आपलें कार्य बंद केलें. तुर्कस्थानांतील कार्य बंद करण्याचें एक मुख्य कारण, जे खरे तुर्की लोक, आपण क्रांतिकारकांना अनुकूल आहोंत असें दाखवीत होते, ते, मनापासून लक्ष घालीतनासे झाले. शिवाय, अधिकाऱ्यांत, जे जे आरबी-मिसरी भरती झालेले होते, त्यांची दृष्टी, पॅन-इस्लामिझमच्या नांवाखालीं स्वतांचा स्वार्थ आधीं भरपूर साधून घेण्याकडेच प्रामुख्यानें होती. लहानमोठ्या बहुतेक सर्व अधिकारांवर, तेच लोक अभिषिक्त झाले होते. त्यामुळें, पूर्वेकडील कार्याची उत्तरोत्तर अनास्था आणि मुस्कटदाबीच होऊं लागली. त्यांचा अज्ञानपणा, त्यांची स्वार्थपरता व धर्मांधता, या सर्वांमुळें कार्याचें फारच नुकसान झालें. जे हिंदुस्थानांतील मुसलमान, त्या वेळीं तेथें तुर्कांचा जयजयकार करीत होते, ते, १९१८ च्या शेवटीं तुर्कस्थान पडतांच, तेथून पळून गेले ! आणि दुसरीकडे जाऊन, तुर्कांना शिव्या देऊं लागले. कांहीं कांहीं भारतीय-मुसलमान, तुर्कस्थान पडतांच, पॅन-इस्लामिझम सोडून देऊन, रशियांत जाऊन, कम्युनिस्ट ( communist ) होऊन बसले ! उद्देश एकच,- कीं कुठल्या तरी नवीन उपायानें पैसा मिळविणें !

---

# पंचम परिच्छेद

## स्वीडनमध्यें कार्य.

१९१७ सालीं **स्टॉकहोम** ( Stockholm ) मध्यें हॉलण्ड आणि सुइश सोशालिस्ट पार्टीची एक अंतरराष्ट्रीय सोशालिस्ट कॉन्फरन्स बोलावण्यांत आली. युध्यमान राष्ट्रांत सख्य स्थापन करावयाचें, आणि जगांत शांतता स्थापित करावयाची, असा त्या कॉन्फरन्सचा हेतू होता. त्या परिषदेंत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित करण्यासाठीं, कमिटीनें दोघा सभासदांस स्टॉकहोमला पाठवून दिलें. तेथें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस असें आलें कीं, ही परिषद् म्हणजे केवळ एक फार्स आहे; दोस्तराष्ट्रांच्या विरुद्ध व मुद्दां काढण्याची तेथें परवानगी नाहीं. असें पाहतांच, कमिटीनें एक पुस्तक प्रसिद्ध करून, परिषदेस कांहीं प्रश्न विचारिले. जर्मनीच्या बाहेर कार्य करण्यास अजूनही योग्य संधी होतीच. तावडतोब कमिटीनें स्टॉकहोमला आपली एक शाखा स्थापन केली. या प्रसंगीं स्टॉकहोमला युरोपांतील अनेक क्रांतिकारकांच्या गांठीभेटी झाल्या; परस्परांशीं अत्यंत मनमोकळेपणानें चर्चाही झाली. क्रांतिकारकांच्या या मीलनानें प्रचारकार्य करण्यास कमिटीस पुढें फारच सोईचें गेलें. याच प्रसंगीं **ट्रॉजनस्कि** ( Trojanowsky) नामक एक व्यक्ति स्टॉकहोममध्यें प्रकट झाली. ट्रॉजनस्कि हा सोव्हिएट ( Soviet ) पक्षाचा एक प्रतिनिधि व सदस्य होता. प्रथम असें उठविण्यांत आलें कीं, जर्मनीबरोबर गुप्त तह करण्याविषयीं बोलणें करण्याकरतांच त्यास अग्रदूत म्हणून रशियन क्रांतिकारकांनीं पाठविलेलें आहे. परंतु मागाहून, तो स्वतांच्याच कामासाठीं आला असल्याचें कळलें. त्याजबरोबर हिंदुस्थानविषयीं फारच जिव्हाळ्याचा संबंध स्थापन करण्यांत आला. या सुमारासच, बोल्शेव्हिकांनीं रशियांत बंड केलें. या रशियन क्रांतिकारकानें परत रशियांत जाऊन एक RussoIndian Society स्थापन करून हिंदुस्थानसंबंधीं Russian bluebook प्रकाशित केलें. व नंतर, तो **ट्रॉटस्की** ( Trotski ) च्या बरोबर काम करूं लागला. ट्रॉटस्कीस हिंदुस्थानसंबंधीची माहिती त्याच रशियन मनुष्यानें करून दिली. ब्रेस्टलिटोस्क ( Brest Litowsk ) ला जर्मनीबरोबर

तह करण्याविषयीं ट्रॉटस्कीची जेव्हां वाटाघाट चालू होती, तेव्हां, त्या परिषदेस स्टॉकहोम कमिटीमार्फत, ट्रॉटस्कीस एक टेलिग्राम पाठविण्यांत आला. त्यांत, " हिंदुस्थानाला स्वयंनिर्णयाचे हक्क देण्यांत यावे " असा ठराव परिषदेंत मांडण्याविषयीं, ट्रॉटस्कीस विनंति करण्यांत आली होती. ट्रॉटस्कीनें त्या वेळीं " हिंदुस्थान, आयर्लंड आणि इजिप्त, या देशांना स्वयंनिर्णयाचे हक्क देण्यासंबंधींचा प्रश्न " अत्यंत कळकळीनें आणि मुत्सद्देगिरीनें परिषदेपुढें मांडला होता. हिंदुस्थानविषयीं ट्रॉटस्कीनें, त्या वेळीं जी कळकळ दाखविली, आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जे प्रयत्न केले, त्याबद्दल हिंदुस्थानाला ट्रॉटस्कीचें सदैव ऋणीच रहावें लागेल.

ह्या वर्षींच इंग्लंडमध्येंही, सोशालिस्टांची एक परिषद् झाली. त्या परिषदेंत हिंदुस्थानविषयीं प्रश्न काढण्यारितां स्टॉकहोम-कमिटीकडून Philip Snowden स एक टेलिग्राम पाठवून विनंति करण्यांत आली होती. तसेंच, रशियांत भरलेल्या तशाच दुसऱ्या एका परिषदेंत, हिंदुस्थानचा प्रश्न पुढें मांडून, सहानुभूति मिळविण्याचे, कमिटीनें अनेक प्रयत्न केले. त्याच सुमारास अमेरिकेचे प्रेसिडेंट वुइल्सन, यांची चौदा कलमें जगापुढें आलीं होतीं. त्या चौदा कलमान्वयें हिंदुस्थानासही तावडतोब स्वातंत्र्याचे हक्क देण्यांत यावे, म्हणून कमिटीकडून जोराचे प्रयत्न करण्यांत आले. सान्फ्रान्सिस्कोहून सुरेंद्रनाथ यांच्याकरवीं वुइल्सन साहेबांस त्या वेळीं एक टेलिग्राम पाठवून देण्यांत आला होता. " चौदा कलमें हिंदुस्थानच्या बाबतींतही लागू करावीं " अशाविषयीं सुरेंद्रनाथांनीं त्यांत आग्रहपूर्वक विनंति केली होती. परंतु, त्या तारेचा परिणाम एवढाच झाला कीं, सुरेंद्रनाथांना अमेरिकन पोलिसांनीं सळो का पळो करून सोडलें.

त्यावेळीं जीं जीं राष्ट्रें तटस्थ म्हणून होतीं, त्या त्या राष्ट्रांतून हिंदुस्थानविषयीं जोराची चळवळ सुरू करण्यांत आली. हिंदुस्थानला स्वातंत्र्याचे हक्क देणें अत्यावश्यक आहे, व हिंदुस्थानला जोंपर्यंत स्वातंत्र्य दिलें जाणार नाहीं, तोंपर्यंत, जगांत शांतता नांदत आहे असें म्हणतांच येणार नाहीं, अशासंबंधीं कमिटीनें निरनिराळ्या मार्गांनीं प्रचाराचे प्रयत्न केले. १९१७ च्या प्रारंभापासूनच हिंदुस्थानांतील क्रांतियुद्धाची आशा मावळत चालली होती. निदान तहाच्या वेळीं तरी हिंदुस्थानचा प्रश्न विचारांत घेण्यांत यावा अशा दिशेनें क्रांतिकारकांनीं आपल्या प्रयत्नांस पुनः सुरुवात केली.

पेट्रोगाडमध्यें कमिटीचे दोन सभासद असावे अशा हेतूनें, ट्रॉजनस्कीनें ट्रॉटस्कीच्या विचारें चळवळ चालविली होती.व स्टॉकहोमच्या रशियन अधिकाऱ्या-कडून हिंदी-क्रांतिकारकांना पेट्रोगाडमध्यें प्रवेश करण्यास परवानगी मिळण्याविषयीं पत्रव्यवहारही सुरू केला होता. परंतु स्टॉकहोमच्या कार्याचा पसारा तसाच टाकून देऊन रशियांत जाणें त्या वेळीं क्रांतिकारकांच्या सोयीचें नव्हतें. १९१८ सालीं जून महिन्यांत, ट्रॉजनस्कीनें ' सोव्हिएट सरकारचे पूर्वेकडील देशांशीं संबंध ठेवणारे अधिकारी म्हणून' बर्लिनकमिटीस असें कळविलें कीं, " जितके लोक या वेळीं तुम्हांला इकडे पाठवून देतां येतील, तितके ताबडतोब पाठवून द्यावे. सोव्हिएट-सरकार त्यांची भेट घेण्यास व त्यांना शक्य तें सहाय्य करण्यास तयार आहे, " परंतु पासपोर्टच्या अभावीं जर्मनीच्या बाहेर पडणें क्रांतिकारकांना तेव्हां शक्य झालें नाहीं. स्वीडनमध्यें तेव्हां ब्रान्टिंग ( Branting ) गव्हर्मेंट होतें. तें तर इंग्रजसरकारच्या गळ्यांत गळा घालणारें ! कोणाही क्रांतिकारकाला, स्वीड-नमधून बाहेर जाण्यास आणि एकदां बाहेर पडल्यावर पुनः परत येण्यास, तें पर-वानगी देत नव्हतें. यावेळीं क्रांतिकारकांची त्या ठिकाणीं फारच कुचंबणा झाली. अखेरीस स्टॉकहोममध्यें विप्लवकार्याचा जेव्हां जोरानें प्रचार होऊं लागला, तेव्हां इंग्रज सरकार अत्यंत उद्विग्न होऊन गेलें; आणि प्रच्छन्नपणें, त्या कार्यास विरोध करण्यासाठीं आपल्या बगलेंतील युसफअल्लीस तेथें ताबडतोब पाठवून दिलें. युसफ-अल्लींनीं स्टॉकहोमला जाऊन क्रांतिकारकांच्या विरुद्ध व्याख्यानांची नुसती झोड उठवून दिली. व त्यांच्याविरुद्ध वर्तमानपत्रांतून लेखहि लिहण्याचा सपाटा चाल-विला. क्रांतिकारकांनीं युसफअल्लीच्या प्रश्नास ताबडतोब योग्य तीं उत्तरें देतांच, **युसफअल्ली** आपण होऊनच, अकस्मात् एक दिवस स्वीडनमधून अदृश्य झाले !

१९१८ मध्यें कमिटीनें **हरदयाळ** यास स्वीडनमध्यें पाठवून दिलें. उद्देश, तेथें जाऊन कमिटीच्या कामास त्यानें सहाय्य करावें. तत्पूर्वी १९१७ च्या शेवटीं, कमिटीनें तिच्या मदतीसाठीं हरदयाळ यास निमंत्रित केलें होतें. या वेळीं कमि-टीस असें वाटत होतें कीं, हरदयाळ यापुढे तरी कमिटीच्या विरुद्ध कांहीं करणार नाहीं. तेव्हां हरदयाळ, Parthen kirchen Sanatorium मध्यें होता. स्वीडन गव्हर्मेंटनें त्या वेळीं, आपल्या देशांत येण्यास हिंदी क्रांतिकारकांना बंदी केलेली होती. त्यामुळें हरदयाळाला तेथें जातां येईना. दुसऱ्या कोणत्या तरी उपा-यानें परवानगी मिळविण्यासाठीं, नंतर, त्यास व्हिएन्नास पाठविण्यांत आलें. त्या

ठिकाणीं हरदयाळ बरेच दिवस होता. नंतर परवानगी मिळतांच तेथून स्वीडनला गेला. परंतु, स्वीडनला जाऊन, हरदयाळानें आपला पूर्वावतार धारण केला! आपलीं मतें आतां बदललीं असल्याबद्दल, तसेंच जर्मनीनें आपणांशीं कसा गैरव्यवहार केला म्हणून, अनेक खोट्या नाट्या गोष्टी अमेरिकन पत्रांतून लिहिण्यास त्यानें सुरवात केली. जर्मन गव्हर्मेंटच्या नजरेस ती गोष्ट आणून देतांच, जर्मन गव्हर्मेंट आश्चर्यानें थक्क झालें. एकीकडे वर्तमानपत्रांतून हरदयाळ जर्मन-गव्हर्मेंटच्या विरुद्ध लिहीत असतां, दुसरीकडे, तोच हरदयाळ, आपल्या भावी योजनाविषयीं आणि 'जर्मन गव्हर्मेंटनें Liquidation चा कांहीं अंश घ्यावा म्हणून,' जर्मनीशीं पत्रव्यवहार करीत होता! हा प्रकार पाहतांच, सर्वच जण विस्मित होऊन गेले.

हरदयाळाचें "Four years in Germany" हें पुस्तक वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें आणि खोट्यानाट्या गोष्टींनीं अथपासून भरलेलें आहे. ज्या दिवशीं, क्रांतिकारकांनीं एक अत्यंत सन्मान्य क्रांतिकारक म्हणून हरदयाळाची जर्मन-गव्हर्मेंटला ओळख करून दिली, त्या दिवसापासून अगदीं अखेरच्या दिवसापर्यंत, जर्मन-गव्हर्मेंटनें, हरदयाळाला अत्यंत सन्मानानें वागविलें होतें. परंतु, हरदयाळानें, कमिटींत प्रवेश करून काय केलें? कमिटीच्या विरुद्ध कारस्थानें रचलीं, लोकांचीं लोकांच्या बरोबर भांडणें लावलीं; कमिटी नामशेष करण्याचे प्रयत्न केले; आणि हें सर्व कशासाठीं? तर, जर्मन गव्हर्मेंटजवळ आपणास पहिली खुर्ची मिळावी म्हणून. –'हिंदुस्थानचे आपण एकटेच प्रतिनिधि' म्हटलें जावें म्हणून. हरदयाळानें जर्मनीचें जे इतके दिवस लांगूलचालन केलें, तें केवळ एवढ्याचसाठीं! त्याचीं निरनिराळी नीच कृत्यें कमिटीच्या नजरेस येऊं लागतांच, सदस्यांच्या यादींतून त्याचें नांव काढून टाकण्यांत आलें. असें झालें तरी, कमिटीनें, त्याच्या उदरनिर्वाहाची उत्तम व्यवस्था लावून दिली होती. व पुढें तर, तो जर्मनींतही सर्वत्र भटकत असे. १९१५–१६ सालीं जर्मन अधिकाऱ्यांच्या साह्यानेंच छद्मवेषानें तो हॉलण्डमध्यें गेला; १९१७–१८ सालीं, जर्मन-गव्हर्मेंटच्या मदतीनेंच, हरदयाळानें आस्ट्रियांत–व्हिएन्नांत प्रवेश केला; आणि १९१८ सालीं, जर्मनीच्या साहाय्यानेंच तो स्वीडनमध्येंही पण जाऊन आला. परंतु, हरदयाळानें, आपल्या पुस्तकांत, "जर्मनीनें आपणास एकाद्या नजरकैद्याप्रमाणें ठेवलें होतें, कुठेंही जाऊं दिलें नाहीं;" असें धादांत असत्य विधान केलें आहे.

**मनुष्य हा स्वतःच्या स्वार्थासाठींच आपलें मत बदलत असतो;** जगताच्या इतिहासांत आजपर्यंत असेंच आढळून आलेलें आहे, कीं, **अनेक महान् महान् क्रांतिकारकांनीं आणि राजनीतिज्ञ पुरुषांनीं आपलीं मतें आपल्या स्वतांच्या स्वार्थासाठींच बदलेलीं आहेत;** 'महान् क्रांतिकारक' 'अनार्किस्ट हरदयाळ,' एकाएकीं इंग्रजांचा एवढा भक्त कसा झाला, तें यावरून समजून येण्यासारखें आहे. हरदयाळनें, आपल्या पुस्तकांतून पानापानांतून ज्या असत्य गोष्टी कथन केल्या आहेत, त्या त्याच्या कृतज्ञतेच्या दर्शक नसून, कृतघ्नतेच्याच दर्शक आहेत.

---

# षष्ठ परिच्छेद

## अमेरिकेचें कार्य.

पूर्वींच सांगण्यांत आलें आहे कीं, 'गदरपार्टी' आणि बर्लिन-कमिटीचा अमेरिकेंतील प्रतिनिधि, यांच्या एकमतानेंच अमेरिकेंतील कार्य चालत असे. परंतु, गदरपार्टीचे जे अनेक तरुण बाहेर होते, व जे दुसरे, विप्लव-कार्यांत गढून गेलेले होते, त्यांची योग्य तऱ्हेनें व्यवस्था लावून त्यांना चालना देण्यासाठीं, एका स्वतंत्र कमिटीची आवश्यकता होती. तसेंच, अमेरिकेंतील क्रांतिकार्याची शक्ति एककेंद्रीभूत करणेंहि तितकेंच जरूरीचें होतें. पण, बर्लिन-कमिटीकडून प्रथमतः अमेरिकेंत गेलेल्या प्रतिनिधीचें म्हणणें असें कीं, "अशा प्रकारच्या एकाद्या कमिटीची योजना करण्यास, अमेरिकेंत तेव्हां लोकच नव्हते; जें कार्य त्यास करावें लागे तें सर्व, गदरपार्टीचे पुढारी **राम**चंद्र यांच्याच विचारें करावें लागत असें." अन्य लोकांचें म्हणणें असें कीं, "तशी कमिटी तयार करण्यास, अमेरिकेंत, वाटेल तितके लोक होते; परंतु, बर्लिन कमिटीच्या प्रतिनिधीची इच्छा, सर्व सूत्रें आपल्याच हातांत असावीं; आणि म्हणूनच, तशी कमिटी संघटित झाली नाहीं." उलट, गदरपार्टीमध्यें, शिखांचीच संख्या अधिक प्रमाणांत असल्यामुळें, शीख आणि पंजाबी यांच्यांत पक्षभेद उत्पन्न झाल्यास, त्यांच्यावर कोणाचाच दाब राहणार नाहीं अशी भीति कमिटीच्या सभासदांसहि

वाटत होती. परिणामीं, गदरदलानें गडबड करण्यास प्रारंभ केला. गदरपार्टीचें धोरण रोजच्यारोज बदलूं लागलें; त्यांचें धोरण म्हणजे, " One thrill per day ! " खरें असो वा खोटें असो, तसें, ते वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करीत असत. या सर्व कारणांमुळें, सगळें कार्य शृंखलाबद्ध करणें–सगळ्या कामांची एक साखळी करणें, आणि त्यांना नियमांचें बंधन घालणें, विशेष जरूरीचें होतें. इतक्यांत १९१५ च्या अखेरीस, स्विश्विनियाहून अकस्मात एक बातमी आली;–कीं, 'अमुक तेथें येऊन पोचलेला आहे.' 'अमुका'संबंधीं विशेष बातमी आणविल्यावर असें समजलें, 'हरदयाळनें कमिटीची सल्लामसलत न घेतां कमिटीस अज्ञात ठेवून, त्या व्यक्तीस बर्लिनला बोलाविलें होतें.' त्यावेळीं हरदयाळ यास, सर्व सदस्यांनीं आपल्यांतून बहिष्कृत केलेलें होतें. शेवटीं, त्या 'अमुकास' बर्लिनला आणण्यांत आलें. कमिटीही अशा एकाद्या माणसाच्या शोधांतच होती. कोणी एकादा योग्य माणूस मिळाल्यास, त्यास अमेरिकेंत पाठवून तेथील कार्य त्याच्यावर सोंपवून देण्याचा कमिटीचा विचार होता. व तशी एक योजनाही कमिटीकडून तयार करण्यांत आलेली होती. अमुक बर्लिनला येतांच त्यास ती योजना देऊन परत अमेरिकेंत पाठविण्यांत आलें. तेथें त्यानें " रामचंद्र व अन्य क्रांतिकारक यांच्या विचारानें सर्व कार्यकारी एकत्र जमवून त्यांची एक जबाबदार कमिटी तयार करावी " असा योजनेंतील मुख्य हेतू होता. एवढी मोठी जबाबदारी त्याजवर टाकत असतां अनेक सभासदांनीं आपली संमति दिली नाहीं. परंतु अन्य कार्यकर्त्या माणसाच्या अभावीं, शेवटीं, त्यासच रवाना करण्यांत आलें. त्यानें अमेरिकेंस जाऊन थोड्याच दिवसांत बर्लिनला कळविलें, कीं " योजनेनुसार येथें एक कमिटी स्थापित केली असून, पांचजण प्रमुख सभासद आहेत; रामचंद्र, या कमिटीचा सदस्य होऊं इच्छित आहे."

परंतु, गदरपार्टी व अन्यान्य सभासद 'गदरदला'चें स्वतंत्र अस्तित्व नष्ट करण्यास तयार नव्हते. अर्थात्, त्यांपैकीं कोणीच त्या कमिटींत सामील झालें नाहीं. असें असलें तरीसुद्धां, ते सर्वजण एकविचारेंच कार्य करीत होते. गदरपार्टी आपला मासिकखर्च याच कमिटीकडून घेत असे. कारण, बर्लिनकमिटीनें असा ठराव केलेला होता, कीं, " अमेरिकेंतील संकल्पित कमिटी ही बर्लिन कमिटीची एक शाखा म्हणूनच राहील; आणि अमेरिकेंतील सर्व वैप्लविक कार्य व त्यास लागणारा सर्व खर्च, या नवप्रतिष्ठित कमिटीकडूनच चालेल." हिंदुस्थानाबाहेरील सर्व कार्य

३६७६

एककेंद्रीभूत करण्याचे प्रयत्न त्या वेळीं कमिटीनें चालविलेले होते. तुर्कस्थानांतील शाखाही त्याच योजनेनुसार स्थापन करण्यांत आली होती. अमेरिकेंतही, तेच प्रयत्न चालू होते. अमेरिकेंतील 'अमुका'च्या द्वारें संस्थापित झालेल्या कमिटीवर तेथील सर्व कार्यांची आणि पैशाची जवाबदारी टाकण्यांत आली. तदनंतर, अमेरिकेंतील जर्मन वकिलांकडून थोडेच दिवसांत कमिटीस असें कळलें कीं, 'अमुक' अत्यंत जोरानें कार्य चालवीत आहे; सर्व पैसा खर्च होऊन गेला आहे; व आणखी रकमेची अत्यंत जरूर आहे. बर्लिनकमिटीनें पुनः अमेरिकेच्या कार्यासाठीं एक मोठी थोरली रक्कम मंजूर केली. पुढें, १९१६ सालीं, फिरून एक गुप्त बातमी आली;–कीं, " West Indies च्या कुठल्याशा एका बेटांतील एक 'भारतीय' विप्लव करण्यास तयार आहे; त्यास शस्त्रें आणि ऑफीसर पाहिजे आहेत. परंतु त्या-विषयीं जर्मन गव्हर्मेंटचें काय मत ? " जर्मन गव्हर्मेंटबरोबर तेव्हां अमेरिकेची मित्रता होती.त्याच बेटांत धामधूम जाहल्यास, अमेरिकन-गव्हर्मेंटबरोबर जर्मन-गव्हर्मेंटचा लढा उपस्थित होणार होता. त्या भयानें, जर्मन गव्हर्मेंटनें, तात्काळ,ते प्रयत्न बंद करून टाकण्याचा हुकूम दिला.

याचवेळीं, अमेरिकेच्या कार्यास स्थायीस्वरूप देण्याचे प्रयत्न अमेरिकेंतील क्रांति-कारकांनीं चालविलेले होते. अमेरिकेच्या कमिटीमार्फत कित्येक पुस्तकें प्रकाशित करून त्यांचा सर्वसामान्य लोकांतून प्रसार करण्यांत आला. परिणाम असा घडून आला कीं, कमिटीच्या पुस्तकांस प्रत्युत्तर देण्यासाठीं इंग्लिश गव्हर्मेंटलाहि एक पुस्तक छापून प्रसिद्ध करावें लागलें. कमिटीनें त्या पुस्तकासहि प्रत्युत्तर देण्यासाठीं आणखी एक पुस्तक प्रकाशित केलें. त्या वेळीं अमेरिकेंतील क्रांतिकारकांचे आयरिश आणि चिनी क्रांतिकारकांशीं बरेच संबंध निगडित झालेले होते. तसेंच, एका चिनी तरुणाला भारतीय कार्यासाठीं मुद्दाम चीनमध्यें प्रेरित केलें गेलें होतें. अशाप्रकारें अमेरिकेंत कार्य चालू असतां, त्याच वेळीं, अर्थात् १९१५च्या ग्रीष्म-काळीं, बर्लिन-कमिटीनें, दूर चीनमधील कार्याचा पाया दृढ करण्याकरितां श्रीयुत... दास यांना पेकिंगला पाठवून दिलें. दास अमेरिकेहून चीनला गेले. तसेंच, चीन आणि जपानमध्येंहि त्याच कार्यासाठीं भ्रमण केलें. परंतु, ज्या कार्याच्या उद्देशानें ते त्या त्या ठिकाणीं गेलेले होते. त्या कार्याचें कांहींच झालें नाहीं. इतक्या अवधींत, अमेरिकेच्या युक्तसाम्राज्यानें, जर्मनीच्या विरुद्ध युद्धघोषणा केली; आणि हिंदी क्रांतिकारकांची तेथें धरपकड सुरू झाली. त्या वेळीं कित्येक क्रांतिकारक

मेक्सिको शहरीं पळून गेले. परंतु, बऱ्याच जणांस-सुमारें चाळीस पन्नास जणांस-अमेरिकन पोलीसांनीं ताबडतोब अटक केली. 'अमेरिकेच्या तटस्थवृत्तीचा भंग करणें,' आणि 'एका मित्रराष्ट्राच्या विरुद्ध कट करणें,' अशा दोन अपराधांबद्दल त्यांच्यावर 'चार्ज' ठेवण्यांत झाला, त्या खटल्यांत इंग्रजांची बाजू सिद्ध करून देण्यासाठीं, हिंदुस्थानांतील C. I. D पोलीसांच्या एका अधिकाऱ्यास (Denham) इंग्रजांतर्फे त्या ठिकाणीं पाठवून देण्यांत आलें होतें. हा खटला 'Hindu-conspiracy case' या नांवानें विख्यात आहे. त्यांतच हिंदी क्रांतिकारकांशीं संबंध असलेल्या अनेक जर्मन अधिकाऱ्यांसही कैद करण्यांत आलें. अमेरिकन पोलीसांनीं, त्या खटल्यांत, हिंदी क्रांतिकारकांच्या स्वातंत्र्य-युद्धाच्या प्रयत्नांचें यथार्थ स्वरूप प्रकाशित न करतां, त्यास कुत्सितपणाचें विकृत स्वरूप दिलें.

खटल्यास आरंभ होण्याच्यापूर्वीं, आणि धरपकड झाल्यावर लागलीच, युरोपांतील वर्तमानपत्रांतून असें प्रसिद्ध करण्यांत आलें कीं, "कोणी एका बंगाली बंडखोरानें सर्व कबूल ('Confess') केलेलें आहे; व आणखी मागाहून असेंहि समजतें कीं, यानें क्रांतिकारकांच्या सर्व गुप्त गोष्टी-बर्लिनकमिटीची पत्र-व्यवहारांतील संकेतलिपि, आणि त्या कमिटीचीं कित्येक गुप्तपत्रें तशींच चिनी क्रांतिकारक पुढाऱ्यांचीं नांवेंसुद्धां-सगळें सगळें कांहीं, पोलिसांना सांगून टाकलें आहे. त्यानें पुराव्यानिशीं सर्व कांहीं पोलीसांच्या स्वाधीन केलेलें आहे!"

सॅन्फ्रान्सिस्को (sanfrancisco) स या खटल्याचा विचार झाला. बँकॉक येथें धरलेला, आणि 'लाहोर कॉन्स्पिरॅसि केस' मधील सरकारतर्फेंच साक्षीदार (approver) योधसिंह यासहि त्या खटल्यांत साक्ष देण्यासाठीं, सॅन्फ्रान्सिस्कोस नेण्यांत आलें होतें. तसेंच, दक्षिण-एशियाच्या कामांतील approver कुमुद मुखोपाध्याय याच्या कबुली-जबाबाचाही त्या खटल्यांत उपयोग करण्यांत आला. योधसिंहानें भरकोर्टात सांगितलें कीं, "पोलिसांच्या जुलमामुळेंच हिंदुस्थानांत मी माझ्या देशबांधवांच्या विरुद्ध, साक्ष देण्यास तयार झालों; परंतु, आतां मला, या कोर्टाचा आश्रय मिळालेला असल्यामुळें, मी माझ्या देशबांधवांच्या विरुद्ध साक्ष देण्यास मुळींच तयार नाहीं." योधसिंहानें साक्ष देण्याचें नाकारतांच, अमेरिकन पोलिसांनीं, त्यास उन्माद होईपर्यंत

त्याचा अमानुष छळ केला. आणि शेवटीं, त्याला वेड्याच्या इस्पितळांत पाठवून देण्यांत आलें.

अशा रीतीनें खटल्याचें स्वरूप दिवसेंदिवस भयंकर होत चाललें असतां, त्याच वेळीं सॅन्फ्रान्सिस्कोच्या भरकोर्टांत, पंडित रामचंद्रजीस एका शिखानें गोळी घालून ठार केलें. व त्याच क्षणीं, एका अमेरिकन बेलिफानें त्या शिखा-सही, तिथल्यातिथेंच ठार केलं. रामचंद्रजींच्या हत्येचा उद्देश काय होता, व त्या खुनी मनुष्याचें पुढें काय झालें, तें आजपर्यंत एक मोठें रहस्यच राहून गेलें आहे. त्यासंबंधीं दोन मतें आहेत. कांहींचें म्हणणें असें कीं, " इंग्रजांच्या गुप्त पोलीसांनीं, त्या शिखाच्या मार्फत, पंडितजीस, इहलोकांतून दूर केलें. पंडित रामचंद्रजी हे एक थोर, कर्मकुशल, क्रांतिकारक होते. अमेरिकेंत असलेल्या पठा-णांवर आणि पंजाब्यांवर त्यांचें फारच वजन असे. ' गदरपार्टी ' चे ते मेरुदंडस्वरूप होते. या जगांतून त्यांना दूर केल्यास त्यांचें कार्य बंद पडेल, असें पोलिसांना वाटत होतें. " दुसरें मत असें कीं, " पंडितजींच्या बरोबर, कित्येक दिवसांपासून, गदरदलांतील शिखांचें पैशाच्या हिशेबासंबंधानें भांडण चालू होतें; पंडितजी, सर्वांनाच कांहीं पैशाचा किंवा कामाचा हिशेब खुल्या दिल्यानें सांगत नसत. प्रत्येकानें कामाची जबाबदारी ओळखून काम करावें, अशी त्याची इच्छा असे. अशा रीतीनें नाना कारणांमुळें, शिखांच्या एका दलानें, त्यांचें उघड उघडपणें शत्रुत्वच पत्करलें होतें. अशिक्षित किंवा थोडेसे शिक्षित, माथेफिरू, दुराग्रही, अशा तापट शिखांच्या बरोबर ज्यानें काम केलेलें असेल, तोच एक जाणूं शकेल, कीं असल्या लोकांच्याबरोबर गुप्त राजकीय कारस्थानें करणें खरोखरी किती कठिण कार्य आहे. ज्यांना ज्यांना म्हणून पंडितजींची माहिती होती, ते ते, त्यांना एक त्यागी पुरुष-साधुपुरुष असेंच मानीत. पठाणांची व पंजाब्यांची त्यांच्यावर अनुपम श्रद्धा होती. त्यांच्यासारख्या राष्ट्रीय संन्याशावर, कोणतेही आरोप करणें निःसंशय कापुरुषाचें काम आहे, असेंच लोक समजत. " परंतु, दुसऱ्या पक्षांचें म्हणणें असें, कीं, जें शीखदल त्यांचे शत्रू बनलें होतें, त्यानेंच त्यांना ठार मारून, उसनें फेडून घेतलें; सूड उगवून घेतला. " त्या वेळीं अमे-रिकन पोलीस, हिंदी क्रांतिकारकांना ठेचण्यांत आणि त्यांचे अमानुष हाल करण्यांत गुंतले असल्यामुळें, पंडितजींच्या खुनाची कोणी फारशी चौकशी केली नाहीं. पंडित रामचंद्रजींच्या मृत्यूनें, क्रांतिकारकांचें, कधींही भरून न येणारें नुकसान

झालें. 'गदरदला' चे तेच पुढारी होते. आणि १९१५ तील पंजाबमधील क्रांतिकारकांचे प्रयत्नहि, त्यांच्याच द्वारां अनुप्राणित झालेले होते.

या खटल्याचा निकाल लागून अनेक हिंदी क्रांतिकारकांना, चार चार वर्षें-पर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा देण्यांत आली. या खटल्याबरोबरच आणखीही एक दुसरा खटला उभा करण्यांत आला. **तारकनाथ दास** आणि **शैलेंद्रनाथ घोष** यांनीं एक Indian provisional Government' केलें होतें; व अमेरिका देशांतलि निरनिराळ्या देशच्या गव्हर्मेंटना, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-कार्यास सहाय्य करण्याविषयीं लिहिलें होतें. खटल्यास जेव्हां आरंभ झाला, तेव्हां तारकनाथ जपानांत होते, परंतु, लौकरच ते अमेरिकेंत परत आल्यामुळें एकदम त्यास कैद करून पुढें चार वर्षेंपर्यंत तुरुंगांत टाकण्यांत आलें.

शैलेंद्रनाथ घोष १९१७ सालीं कलकत्याहून adsconder, होऊन, गुप्त-वेषानें युरोपांत जाऊन, अमेरिकेस प्रगट झाला. **नरेंद्र भट्टाचार्य** यांना कांहीं गुप्त बातमी पोहोंचविण्यासाठीं, कलकत्याच्या समितीनें शैलेंदास अमेरिकेस पाठविलें होतें. अमेरिकेंत जेव्हां हिन्दी क्रांतिकारकांची धरपकड सुरू झाली, तेव्हां शैलेंद्रनाथ **मेक्सिकोंत** पळून गेला. आणि नंतर एक दिवस रात्रीं, Rio de Grande नदी पोहून पार होऊन, युनायटेड स्टेट्समध्यें गुप्तरीतीनें प्रवेश करीत असतां, न्यूयार्कच्या पोलीसाच्या हातीं लागला.

अशा प्रकारें युनायटेड स्टेट्समधील कार्याचा विध्वंस झाला. परंतु तदनंतर, १९१७ सालीं, बर्लिनला एक गुप्त बातमी आली कीं –" कॅप्ट, एशियाच्या कारागृहांतून पलायन करून आपल्या मेक्सिको शहरीं येऊन बसलेला आहे; आणि तेथून तो असें विचारीत आहे कीं, आपण चौघेजण–हेरंबलाल गुप्त, जेन मार्टिन ऊर्फ मानवेंद्रनाथ राय, आणि मी व 'क्ष' येथील 'सिफारतखान्या'च्या आश्रयानें राहिलों आहोंत; तरी, आमच्याविषयीं बर्लिनचा काय अभिप्राय?" हें आकस्मिक वृत्त समजतांच बर्लिन कमिटीनें त्यांस पुढच्या प्लानविषयीं लिहिलें. आणि अमेरिकेच्या कार्याचें केंद्र, बर्लिन कमिटीमार्फत मेक्सिकोंतच स्थिर करण्यांत आलें. तसेंच, चीन व जपानमध्येंहि भारतीय कार्याचा पुनरारंभ करण्याकरितां, एका थोर जपानी मनुष्यास (हा मनुष्य पहिल्यानें जपानच्या 'Diplomatic Service' मध्यें एक उच्च दर्जाचा अधिकारी होता.) अमेरिकेस पाठवून

देण्यांत आलें. तो मेक्सिकोहून पूर्वएशियांत गेला असतां, इंग्रजांच्या पोलिसांनीं त्यास कैद केलें, आणि सिंगापूरला नेलें. परंतु, जपान-गव्हर्मेंटच्या वादविवादानंतर इंग्रजसरकारास त्यास मुकाट्यानें सोडून द्यावें लागलें. त्यास तिकडे पाठविण्याचा कमिटीचा मुख्य उद्देश असा होता कीं, त्यानें चीनमध्यें जाऊन, दासला मिळून कार्य करावें; आणि जपानी 'milltarist' दळाबरोबर हिंदी क्रांतिकारकांचा संबंध स्थापित करावा; परंतु, तो स्वतःच पकडला गेल्यामुळें, तोहि प्रयत्न व्यर्थ गेला.

---

# सप्तम परिच्छेद.

## पश्चिमेचें कार्य.

जेव्हां बर्लिनमध्यें कमिटीची स्थापना करण्यांत आली, आणि त्या ठिकाणीं चारी दिशांहून क्रांतिकारक येऊन मिळूं लागले, तेव्हां, स्वित्झर्लंडमध्यें असलेले **हरदयाळ** यांना 'त्यांनीं कमिटीस येऊन मिळून काम करावें' म्हणून वारंवार विनंती करण्यांत आली. हरदयाळ १९१४ सालीं जेव्हां अमेरिकन गव्हर्मेंटकडून 'anarchist' म्हणून अपराधी ठरले गेले, तेव्हां ते जामीन बुडवून स्वित्झर्लंडला पळून गेलेले होते. नंतर १९१५ च्या फेब्रुवारी महिन्यांत, त्यांनीं इस्तंबूलला गमन केलें, त्या ठिकाणीं जर्मन अधिकाऱ्याबरोबर हिंदुस्थानच्या कार्याविषयीं हरदयाळ यांनीं बरीच वाटाघाट केली; परंतु अनेक कारणांमुळें, जर्मन अधिकाऱ्यांनीं त्यांच्या मुलाखतीस फारसें महत्त्व दिलें नाहीं व त्यांची उपेक्षाच केली. त्या कारणामुळेंच कमिटीचें आमंत्रण हरदयाळ यांनीं पूर्वी नाकारलेलें होतें. पण, १९१५ च्या आरंभीं, **कुमार महेंद्रप्रताप** यांची हरदयाळाशीं गांठ पडून, तेथून ते दोघेही बर्लिनला आले.

त्याच वर्षाच्या आरंभीं, इंग्लिश सोशालिस्ट पुढारी **हिंडमन**, यानें कमिटीकडे आपल्या एका परिचित मित्राच्या द्वारां कांहीं गुप्त बातमी पाठविली; आणि, असें विचारलें कीं, " हिंदुस्थानांत अजून विप्लवकार्यास आरंभ कां होत नाहीं ? हिंदु

स्थान अद्याप कांहींच चळवळ करीत नाहीं, हें पाहून आपणास अतिशय दुःख होत आहे ( ' He is sorry that India has not moved! ) " त्याच वर्षाच्या शेवटीं कमिटीचे एक सभासद श्री **वीरेंद्रनाथ चटोपाध्याय** यांना ठार मारण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु, पोलिसांना त्या गोष्टींची आधींच खबर मिळाल्यामुळें, खुनाचा प्रयत्न करणारा एक इंग्लिशमन, आणि वीरें द्रनाथ चटोपाध्याय, या दोघांसही पकडण्यांत आलें. Berne च्या कोर्टांत त्या इंग्लिश मनुष्यानें स्वमुखानें कबूलीजबाब दिला. लंडनहून एका इंग्लिश गुंडानें चटोपाध्याय यांच्या तेथील एका परिचित मित्राचें नांव धारण करून त्यास एका महत्वाच्या कामासाठीं तावडतोब स्वित्झर्लंडला येऊन जाण्याविषयीं पत्र लिहिलें; पत्रांत असें म्हटलें होतें कीं, " आपणास आपल्या आईबापास कांहीं महत्त्वाचा निरोप सांगावयाचा आहे; व त्यासाठीं, एका...इंग्लिश मनुष्यास आपण स्वित्झर्लंडला पाठवीत आहों; तरी तावडतोब तेथें जाऊन त्यास भेटावें; मनुष्याविषयीं मला पूर्ण विश्वास आहे." परंतु, तो इंग्लिशमन स्वित्झर्लंडला जाऊन पोंचतांच, त्याच्या पासपोर्टचा घोटाळा उडालेला पाहून, पोलिसांची नजर त्याच्यावर पडली. पोलिसांनीं, बर्लिनला तारावर तारा करून ते चटोपाध्याय यांच्या आगमनाचीच वाट पहात बसले. चटोपाध्याय यांनीं तेथें जाऊन त्या व्यक्तीची गांठ घेतांच, आपण कोणाच्या तरी जाळ्यांत सांपडलो आहोंत अशी त्यांची खात्री होऊन चुकली. शेवटीं, तो इंग्लिश गुंड, चटोपाध्याय यांना एका दुकानांत घेऊन गेला; परंतु, तेथें त्या गुंडाच्या तोंडून एकाएकीं रिव्हाल्व्हरचें नांव ऐकतांच, चटोपाध्याय यांनीं दुकानांत प्रवेश करण्याचें साफ नाकारलें. व इतक्यांत, पोलीसांनीं येऊन दोघांसही कैद केलें! चटोपाध्याय यास त्या वेळीं पोलीस बोलले, "या माणसावर आज आमचा कित्येक दिवसांपासूनचा डोळा आहे; परंतु,आपल्या आगमनाचीच आम्ही वाट पहात होतों. " सुदैवानें पोलीसांनींच चटोपाध्यायांचे प्राण त्या वेळीं वांचवून दिले. त्या इंग्लिश गुंडाविषयीं अनेकजण अनेक कथा सांगतात; त्याच्यावर सर्व अपराधांची शाबिती झाली असतांही, इंग्रजांच्या पुण्याईच्या बळानें युद्धकालापुरतेंच स्वित्झर्लंडहून त्यास हद्दपार व्हावें लागलें; आणि बिचाऱ्या चटोपाध्यायांनाही पण, तीच शिक्षा सुनावण्यांत आली!

# अष्टम परिच्छेद.

## " इण्डो—जर्मन मिशन. "

महेंद्रप्रताप जेव्हां स्वित्झर्लंडमध्यें होता, तेव्हां त्यानें हरदयाळला, जर्मनीचा विचार विचारला. कारण, महेंद्रप्रतापचेंहि एक राजनैतिक ' mission ' होतें. परंतु, हरदयाळनें महेंद्रप्रतापला जर्मनीच्या हिंदुस्थानविषयक भावनेबद्दल अत्यंत निराशपूर्ण ( 'pessimist' ).उत्तर दिलें; आणि त्यास जर्मनींत जाण्यास मना केलें; पण महेंद्रप्रतापच्या आगमनाची बातमी तावडतोब बर्लिनला येऊन पोहोचल्यामुळें, कमिटीनें त्यांच्याशीं आपला संबंध जोडला; आणि वीरेंद्रनाथ चटोपाध्याय त्यांना बर्लिनला घेऊन आले. त्या वेळीं कमिटीनें, अफगाणच्या अमिराकडे एक राजकीय मिशन पाठवून देण्यासंबंधींचा विचार चालविला होता; कुमार महेंद्रप्रतापचेंहि तेंच धोरण होतें. उभयतांचेंहि एकच मत जमून येतांच, महेंद्रप्रतापला जर्मन-गव्हर्मेंटकडून अत्यंत आदरपूर्वक निमंत्रित करण्यांत आलें. बर्लिनला असतांना त्यांच्या सेवेस उच्चपदस्थ अधिकारी देण्यांत आले होते; तसेंच कैसरशीं त्यांची भेटही करून देण्यांत आली. महेंद्रप्रतापबरोबर **प्रोफेसर बरकतुल्ला,** आणि जर्मनीकडून धरले गेलेले इंग्रज-पल्टणींतील कित्येकजण पठाण शिपाई, तसेंच अमेरिकेहून आलेले दोघेजण आफ्रिडी, हेहि त्यांच्याचबरोबर पाठविण्यांत आले होते. खुद्द जर्मनगव्हर्मेंटनेंहि आपले एक प्रतिनिधि म्हणून डॉ० हेंटिग ( Dr. Hentig ) व दुसरे एक डॉक्टर यांना त्यांच्याबरोबर रवाना केलें होतें. या शिष्टमंडळास " Indo German mission" असें नांव देण्यांत आलें. उद्देश असा होता कीं, अफगाणच्या अमिरास जर्मनीच्या व तुर्कांच्या बाजूस वळवून घेऊन इंग्रज-गव्हर्मेंटच्या विरुद्ध युद्ध पुकारावयाचें. महेंद्र प्रतापला उत्तर-हिंदुस्थानांतील कोणी कोणी राजांनीं असें निश्चितपणें सांगितलेलें होतें, कीं " अफगाणिस्थानच्या बाजूनें योग्य बंदोबस्त होईल, तर आपण इंग्रजांच्या विरुद्ध शस्त्र उपसण्याचें साहस अवश्य करूं ; " आणि त्याच विचारामुळें असें स्थिर करण्यांत आलेलें होतें, कीं, या मिशननें अफगाणिस्थानचा अमीर जर्मनीस व तुर्कस्थानला सामील होईल. आणि जर तसा तो एकदां सामील झाला,

तर हिंदुस्थानांतील इंग्रजांचें सैन्य सरहद्दिवरील प्रदेशांत गुंतून राहील व त्या कारणानें आंत हिंदुस्थानांत, क्रांतिकारकांना आपली उठावणी करण्यास योग्य संधी लाभेल; तसेंच, अफगाणिस्थानच्या मार्गानें हिंदुस्थानांत शस्त्रास्त्रें आणतां येणें शक्य होईल. अफगाणच्या अमिरास इंग्रजांच्या विरुद्ध उठविण्यांत, मुख्यतः तीन हेतु होते; ( १ ) **अमीर हबिबुल्लाखां** एक नैष्ठिक सुन्नि मुसलमान; आणि तुर्कस्थानचा सुलतान सुन्नि–पंथियांचा खलिफा. ज्याअर्थी सुल्तानानें इंग्रजांच्या विरुद्ध जेहादची घोषणा केलेली आहे, त्याअर्थी अमिरालाहि पण 'इंग्रजांविरुद्ध युद्धघोषणा करणें' अवश्य कर्तव्य ठरेल; ( २ ) अमीर जर्मनीस व तुर्कस्थानास येऊन मिळाल्यानें जर्मन–साम्राज्य अफगाणिस्थानाला 'स्वतंत्र देश' म्हणून समजेल; आणि अमिरास, सुल्तानाप्रमाणेंच बंधुत्वाच्या नात्यानें वागवून 'स्वतंत्र राजे' म्हणून जर्मनी मान्यता देईल.* व ( ३ ) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य–युद्धास अर्थसहाय्य आणि शस्त्रसहाय्य करण्यास अफगाणिस्थानचा अमीर राजी होईल.

अमिराबरोबर वाटाघाट करण्याकरितां डॉ० हेंटिगबरोबर जर्मनीच्या प्रधानमंत्र्यानें ( Bethmann-Hollweg ) कित्येक राजकीय पत्रेंहि दिलेलीं होतीं. तसेंच कैसरनें, अमीरास देण्यासाठीं स्वहस्तानें लिहिलेलीं आणखीही कांहीं पत्रें महेंद्रप्रतापच्या स्वाधीन केलीं होतीं. हिंदुस्थानांतील स्वतंत्र, अर्ध स्वतंत्र व मांडलिक राजांना, तसेंच नेपाळच्या महाराजांच्या नांवें, अनेक राजकीय पत्रें महेंद्रप्रतापबरोबर दिलीं होतीं. हे सर्व राजे इंग्रज गव्हर्मेंटशीं मित्रत्वाच्या नात्यानें ( defensive and offensive ) बांधले गेलेले असल्यामुळें, त्यांनीं तो संबंध उडवून टाकून आपण स्वतंत्र असल्याचें जाहिर करावें अशासाठीं, त्या पत्रांतून त्यांना आदरपूर्वक लिहिण्यांत आलें होतें. त्यांनीं इंग्रजांशीं असलेले आपले संबंध तोडून टाकल्यास, जर्मन–गव्हर्मेंट त्यांच्याशीं मित्रत्वाच्या सूत्रानें स्वतांस बांधून घेण्यास तयार आहे, असेंहि आश्वासन त्या पत्रांतून त्यांना देण्यांत आलें होतें. नेपाळच्या महाराजांस लिहिलेल्या पत्रांत, त्यांना 'स्वाधीन नरपति' म्हणूनच जर्मन गव्हर्मेंटनें संबोधिलें होतें.

अशा प्रकारें राजकीय अस्त्र–शस्त्रांनिशीं सुसज्जित होऊन, महेंद्रप्रतापच्या नेतृत्वाखालीं **इंडो–जर्मन मिशन** अफगाणिस्थानकडे निघालें. आणि १९१५च्या

*या वेळीं अफगाणिस्थान बाह्य राजकीय गोष्टींत स्वतंत्र नव्हतें.

एप्रिल–अखेरीस तें इस्तंबूलला जाऊन पोंचलें. त्या ठिकाणीं महेंद्रप्रतापची 'ॲनव्हरपाशाकडून अत्यंत आदरपूर्वक भेट घेण्यांत आली. तसेंच, सुलतानानें,' अमिराला देण्यासाठीं अमिराच्या नांवानें लिहिलेलें स्वहस्ताक्षराचें एक पत्र महेंद्रप्रतापजवळ दिलें. तुर्की गव्हर्मेंटनें तत्पूर्वी अफगाणिस्थानाला कित्येक राजकीय शिष्टमंडळें पाठवून दिलेलीं होतीं; परंतु कोणतेंहि शिष्टमंडळ इराणच्या पुढें फारसें जाऊं शकलें नाहीं. ॲनव्हरपाशानें अशी आशा प्रकट केली कीं, हें "इंडो–जर्मन मिशन" यशस्वी झाल्यावांचून राहणार नाहीं; तें निःसंदेह कृतकार्य होईल. मौलवी बरकतुल्ला यास सेख–उल्–इस्लामकडून, हिंदु–मुसल्मानांनीं एक होऊन कार्य करण्याकरतां एक फतवा सन्मानपूर्वक देण्यांत आला. मौलवी बरकतुल्ला यांनीं **आयासोफिया** मशिदींमध्यें त्या फतव्याचा जाहीर रीतीनें स्वीकार केला होता. नंतर, मिशन, तुर्कस्थानच्या पूर्वसीमेवर येऊन ठेवलें. त्या ठिकाणीं **रूफ बे** ( Rouf Bey) हा सीमाधिकारी होता. त्याच्याबरोबर महेंद्रप्रतापची भेट होतांच त्यानें इराणच्या मार्गांतील दुर्गमता आणि इंग्रजांच्या हल्ल्याच्या भीतीची आशंका, त्यांजवळ प्रकट केली. नाना कारणांमुळें मिशनला सीमान्तस्थानीं एक महिनापर्यंत अडकून पडावें लागलें. शेवटीं, जून–जुलाई महिन्यांत, बर्लिनला हेंटिगकडून एक तार येऊन पोंचली:–"महेंद्रप्रतापनें रूफबेची भेट घेतल्यानंतर, आतां तो, पुढेंच जाऊं इच्छित नाहीं" असें त्यांत कळविलें होतें. ' महेंद्रप्रतापनें रूफबेची आधीं गांठच कशाकरतां घेतली ? ' ' रूफ बे इंग्रजांचा दोस्त ' असें फॉरेन ऑफीसनें कमिटीस रागानें कळविलें. खरी गोष्ट, रुफबेनें, " तुर्कांच्याबरोबर आपण सामील न होतां तटस्थच राहणार, " असें जाहीर केलें होतें. म्हणूनच रूफबेवर जर्मनीचा एवढा राग ! युद्धानंतर त्या उशीराचें कारण कळून आलें. तुर्कस्थान व इराण यांच्या सीमेवरील प्रदेशांचा आधिकारी ' सेनापति ' रूफ बे ! त्याच्याजवळ कोणी " क्ष " पेशावरी हिन्दी मनुष्य, अधिकारी म्हणून असे. तोच मिशनची ' गाडी ' आडवून धरून बसलेला होता; रूफ बेनें त्यांस असें लिहून कळविलें होतें कीं, " आपण, महेंद्रप्रतापची समक्ष मुलाखत घेतली असून त्यास जें कांहीं सांगावयाचें होतें तें सांगितलें; तुर्की गव्हर्मेंटनें यापूर्वी आपणांस ' राजकीय मिशन ' म्हणून अफगाणिस्थानास पाठविलेलें होतें. तेव्हांचें आणि आतांचें ध्येय एकच. व ज्याअर्थी टर्की म्हणजे एशियाची " Paramount power, " त्याअर्थी 'इंडो–जर्मन मिशन '

आपल्याच नेतृत्वाखालीं जाणें उचित होतें; परंतु महेंद्रप्रताप आणि बरकतुल्ला यांना ती गोष्ट मान्य नाहीं. माझ्या बोलण्याकडे त्यांनीं लक्ष्यच दिलें नाहीं, कानाडोळा केला ! तस्मात्, आपण त्यांस ‘ समजावून’ द्यावें. ” आणि नंतरच त्या अधिकाऱ्यानें तें त्यांना ‘ समजावून ’ देण्याकरितां, मिशनला एक महिना-पर्यंत अडकून ठेविलें; पुढें जाऊंच दिलें नाहीं. इस्तंबूलहून असा हुकूम होता कीं, ‘ मिशनशीं कोणतीही वाटाघाट करीत न बसतां, आणि त्याची अन्य कोणत्याही प्रकारें खोटी न करतां, त्यास पुढें जाऊं द्यावें. ’ परंतु राजधानींतले हुकूम राजधानींत ! बाहेर, त्यांचा अमल बाहेरच्या अधिकाऱ्यांच्या मर्जीनुरूप ! रूफबेनें त्या हुकमाची अंमलबजावणीच केली नाहीं. रूफबेचें असंभावितपणाचें बोलणें अर्थातच मिशननेंहि पण मान्य केलें नाहीं. सर्व राजकीय गोष्टींचा बंदोबस्त करून दोन्ही गव्हर्मेंटनीं मिळून या मिशनला पाठविलेलें होतें; तसेंच, अॅनव्हर-पाशानें, काजिमबग यास तुर्की-गव्हर्मेंटचा प्रतिनिधि म्हणून त्याजबरोबर रवाना केलें होतें; परंतु, रस्त्यांत, त्यांच्याबरोबर आपणालाही जोडून घेऊन ‘ सरदारकी’ करण्याची, रूफबेची प्रामाणिक इच्छा होती !

एक महिन्याच्या उशिरानंतर मिशन इराणला निघालें. परंतु, मार्गांत हजारों संकटें दबा धरून बसलेलीं होतीं. इंग्रजांच्या गुप्त हेरांनीं आणि इंग्रजी सैन्यानें, रस्त्यांत, त्या मिशनला पकडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. इराणी-वर्तमान पत्रांतून त्या वेळीं प्रसिद्ध झालेलें होतें;-“ **कोणी एक हिंदुस्थानांतील राजा आणि कोणी एक प्रोफेसर, इराणांतून काबूलला जात आहेत; आणि त्यांना पकडण्यासाठीं इंग्रजांचे अविश्रांत श्रम चालू आहेत. पण अजून ते सांपडत नाहींत.** ” १९१५ सालीं पर्शियांत घोर अराजकता माजली. तुर्कांनीं आणि जर्मनीनें, पर्शियानें आपणास येऊन मिळावें म्हणून, आटोकाट प्रयत्न चालविले होते. व त्यासाठीं लहान लहान फौजा इराणांतून फिरत होत्या. मधून मधून त्यांचीं इंग्रजांच्या सैन्यांशीं खंडयुद्धें सुरू होतीं. उभयतांनींही इराणांतील डोंगरी जातींना पैसा देऊन त्यांचा आपल्या कामीं उपयोग करून घेण्याविषयीं खटपट आरंभिली होती. रस्त्यांत मिशनला इराणी दरवडेखोरांकडून खूप चोप बसला. जो कांहीं बरोबर माल होता-हिंदी राजांच्या नांवांनीं चिठ्ठयाचपाट्या होत्या-तें तें सर्व दरवडेखोरांनीं लुटून नेलें ! **मिशनजवळच्या द्रव्यापेक्षां मिशनजवळच्या कागदपत्रांवरच, दरवडेखोरांची विशेष नजर**

होती ! मिशनजवळचे गुप्त खलिते उपटण्यासाठीं, फार दिवसांपासून दरवडेखोरांचे दीर्घ प्रयत्न चालू होते.

परंतु, विशेष खबरदारी घेतली गेलेली असल्यामुळें, तसेंच, महत्त्वाचीं पत्रें वगैरे महेंद्रप्रतापजवळच असल्यामुळें, मिशनचें नुकसान असें फारच थोडें झालें. आणि अखेरीस, मिशन, काबूलला अगदीं सुरक्षितपणें जाऊन पोचलें. तदनंतर एक वर्षपर्यंत मात्र, मिशनचा पत्ता लागलेला नाहीं. या मिशनचा प्रश्न घेऊन, ब्रिटिश पार्लमेंटमध्यें मोठी कडाक्याची चर्चा करण्यांत आली. त्या वेळीं त्या समयींच्या मंत्र्यानें असें उत्तर दिलें कीं, " महेंद्रप्रताप म्हणजे, अयोध्येचा एक सामान्य जमीनदार ! त्यास बर्लिनच्या 'बंडखोरांनीं' प्रिन्स ( राजा ) बनवून कैसरपुढें उभें केलेलें आहे ! " त्यानंतर १९१६ सालीं, हेंटिग, चिनांतून आणि अमेरिकेंतून बर्लिनला येऊन पोचला ! मिशन काबुलमध्यें असतांना, इंग्रज गव्हर्मेंटनें त्याचा पिच्छा पुरविला होता. मिशनला अफगाणिस्थानांतून बाहेर काढण्याविषयीं, अमीराला अत्यंत आग्रह करण्यांत येत होता. परंतु, अफगाण–गव्हर्मेंटनें, सयाम आणि रूस गव्हर्मेंटपेक्षां आपल्या मनाचा फारच स्थिरपणा दाखविला. इतकेंच नव्हे तर, त्या मिशनचा मोठा सत्कारहि केला. इंग्रेजी वर्तमानपत्रांतून त्या वेळीं असें प्रसिद्ध करण्यांत आलेलें होतें, कीं, " अमिरानें मिशनच्या सभासदांना काबूलला कोंडून ठेविलें आहे; आणि लौकरच अफगाणिस्थानांतून हद्दपार करण्याच्या विचारांत अमीर आहे; " हें निःसंशय खोटें आहे. १९१६ सालीं, डॉक्टर मथुरासिंह आणि आणखी एक मुसलमान गृहस्थ, यांचीं स्वहस्ताक्षरानें लिहलेलीं दोन पत्रें, बर्लिनला येऊन पोचलीं; त्यांत, त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, " महेंद्रप्रताप आणि अन्यान्य सभासद, यांचें अमीरानें फारच थाटामाटानें स्वागत केलें. आणि अत्यंत आदरपूर्वक भेट घेतली. मिशनला उतरण्यासाठीं एक भव्य आणि सुंदर इमारतहि अमीरानें दिलेली आहे. त्या दोघां हिंदी गृहस्थांना, महेंद्रप्रतापनें, नंतर रशियाच्या झारकडे पाठवून दिलें. रशियन गव्हर्मेंटला आपण एक खलिता लिहून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यकार्यास रशियानें सहाय्य करावें यासाठीं महेंद्रप्रतापनें त्यांत विनंति केली होती.

परंतु, ज्या कार्याकरतां मथुरासिंहास तुर्कस्थानांतून रशियाकडे पाठवून देण्यांत आलें होतें, त्या कार्यास रशियानें सहाय्य करण्याचें तर दूरच राहिलें, पण, मथुरासिंह पत्रासह आपल्या हातांत सांपडतांच, रूस-गव्हर्मेंटनें त्यास इंग्लिशांच्या स्वाधीन

केलें. मथुरासिंह पुनः शांघायहून काबूलकडे, व तेथून लाहोरास गेला. आणि पुढें थोड्याच दिवसांत, वर्तमानपत्रांतून असें प्रसिद्ध झालें कीं, "डॉ. मथुरासिंहास तेथेंच फांशीं देण्यांत आलें." तदनंतर महेंद्रप्रतापनें रशियांतून जर्मनांत जाण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला; पण, कांहीं उपयोग झाला नाहीं. चिनांतूनही प्रयत्न केले; पण, तेंही विफल झाले. अखेर, रूसमध्यें बोल्शेव्हिकांचें बंड झाल्यावर, महेंद्रप्रतापाला परवानगी मिळाली. तेथें Trotsky, Joff प्रभृतिबरोबर महेंद्रप्रतापची मुलाखतही झाली. आणि १९१८ मध्यें महेंद्रप्रताप बर्लिनला येऊन पोहोंचला.

काबूलास मिशनबरोबर अफगाणिस्थानच्या अमीराच्या काय काय गुप्त मसलती झाल्या, तें आजपर्यंत अजूनहि बाहेर आलेलें नाहीं. अमीर हबिबुल्लाखानें महेंद्रप्रतापास–तो शिष्टमंडळांतील प्रमुख, कैसर आणि सुलतानचा 'संवादवह' म्हणून अत्यंत आदरानें वागविलें, व त्याची मुलाखतही घेतली. ही गोष्ट कितीही खरी असली तरी, येथें एक अशी शंका उद्भवते, कीं "अमीरानें युद्धामध्यें कोणताच भाग कसा घेतला नाहीं? व तो कां?" याविषयीं बराच मतभेद आहे. हेन्टिग म्हणतो, "अमिराजवळ ६०००० सैन्य होतें; परंतु, सैन्यांतलि सर्व ऑफीसर साठी उलटलेले. तसेंच, युद्धोपयोगी सरंजामही त्याच्याजवळ नव्हता. त्यांतून अमीराचें सैन्य युद्धकलेंत अक्षम असें होतें. आणखी एक गोष्ट म्हणजे, अमिराला इंग्रजांविरुद्ध उठण्याचें साहसच नव्हतें." महेंद्रप्रतापचें म्हणणें असें कीं, "अमीरानें आपणास स्वहस्ताक्षरानें लिहिलेलें एक पत्र दिलें होतें. आणि त्यांत त्यानें असें म्हटलें होतें कीं, "कांहीं मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य, ऑफिसर्स व शस्त्रास्त्रें आपणास मिळतील, तर आपण युद्ध-क्षेत्रांत उतरण्यास तयार आहों;" पण, हेंटिगनेंच सर्व कार्यनाश केला." कॅप्टन Niedermeyer चें म्हणणें, "अमीर कांहीं केल्या युद्धास तयारच होईना; तो तटस्थ राहूं इच्छित होता. कोणाही व्यक्तीच्या दोषामुळें कार्यनाश मुळींच झालेला नाहीं." कॅप्टन पुनः म्हणतो, "अमीरानें युद्धांत भाग घ्यावा म्हणून, त्याच्याशीं मिशनचें तीन तासपर्यंत खलबत झालें. पण, अमीरानें असें स्पष्ट सांगितलें कीं, "**हिंदुस्थानची परिस्थिति काय आहे, तें आपण पूर्ण जाणत आहों; हिंदुस्थानांत, सर्वत्र आपले लोकही आहेत; परंतु, हिंदी लोक इंग्रजांबरोबर 'स्वातंत्र्य-युद्ध' करूं शकणार**

**नाहींत; इंग्रजांविरुद्ध लढून, मी माझें स्वतांचें रक्षण करून घेण्यास पूर्ण समर्थ आहे; हिंदुस्थानांतील लोकांना, हिंदुस्थानांतील राजेच जोंपर्यंत अनुकूल नाहींत तोंपर्यंत मी एकटाच स्वतां इंग्रजांविरुद्ध उठून, आपलें तख्त गमावून बसण्यास मुळींच तयार नाहीं. मी होऊन इंग्रजांवर आक्रमण करून, स्वतांचें सिंहासन कशासाठीं गमावून बसूं ?"** शिष्टमंडळांतील कांहींचें मत असें कीं, "अमीर हा पूर्णपणें तुर्कांच्या विरुद्धच. अमिराचें म्हणणें, 'तुर्कांचा पॅनइस्लामिझमचा उद्देश,-सर्व मुसलमानी जगावर तुर्कांचेंच आधिपत्य असावें; तुर्कांचाच तेव्हढा वरचष्मा असावा.' मी, माझ्या देशचा स्वतःच खलिफा ! तुर्कांना आपण मुळींच जाणत नाहीं."

**सरदार नजरूल्लाखांचें** मत, कांहीं वेगळेंच होतें; त्याचें म्हणणें असें कीं, "आज सोळा वर्षांपासून, आपला आणि हिंदी मुसलमानांचा निकट संबंध आहे; **अफगाणिस्थानाबरोबर इंग्रज युद्धाला उभे राहतील, तर अवघ्या सहा महिन्यांत, आपण 'भारतविजय' करूं; आणि इंग्रजांना चित करून टाकूं ! असली गोष्ट म्हणजे हिंदुस्थानांतल्या सहज एका फेरीसरशी झाली पाहिजे**-(Easy walk over) **असें आपलें प्रामाणिक मत आहे. इंग्रजांचें आणि अफगाणिस्थानचें एकदां लौकर युद्ध जुंपावें, अशासाठीं आपण अहोरात्र प्रार्थना करीत असतों !**"

परंतु अमीर बोले "इंग्रजाचे पाय हिंदुस्थानांत इतके खोलवर रुपले आहेत कीं त्यांना उपसून वर काढून, पुनः इंग्लंडला हांकलून देणें फार कठिण गोष्ट आहे."

अमिरानें युद्धांत भाग घेतला नाहीं तरी त्यानें, कैसरला व सुलतानला देण्यासाठीं म्हणून स्वहस्ताक्षरानें लिहिलेलीं दोन पत्रें, महेंद्रप्रतापच्या स्वाधीन केलेलीं होतीं. सुलतानच्या नांवें लिहिलेलें पत्र, महेंद्रप्रतापच्या हातीं देत असतां अमीर महेंद्रप्रतापजवळ उद्गारला, "अफगाणिस्थानच्या नरपतीकडून हें पहिलेंच पत्र, तुर्की-सुलतानाकडे जात आहे !"

१९१६ सालीं, मथुरासिंहाचें पत्र बर्लिनला मिळाल्यानंतर, पर्शियांतून परत आलेल्या मिशनच्या लोकांबरोबर, अमिरानें असा एक निरोप पाठविला कीं,-

" आपण, युद्धक्षेत्रांत उतरण्यास उत्सुक आहों; आणि जर्मनशीं, तहही पण करूं इच्छित आहों; अशीं दोन परस्परविरुद्ध उत्तरें मिळाल्यामुळें, बर्लिनपुढें मोठा प्रश्न येऊन पडला. त्याच सुमारस, कुतल-अमाराचें पतन झालेलें होतें. तसेंच, तुर्की-सैन्य इराणांत घुसत होतें; जनरल **स्टाप** यानें अशी योजना केली होती कीं, " पर्शिया व अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर असलेल्या **येट्स** शहरीं, शस्त्रसामग्री पोचविण्यांत येईल; आणि तेथून आमिरानें ती घेऊन जावी." अमीर तहास कबूल आहे असें समजून, जर्मनीनें, अमीराकडे तहासंबंधींचा एक मसुदाही पण रवाना केला होता. **प्रोफेसर बरकतुल्ला** यास त्या कामीं प्रतिनिधी म्हणून जर्मनीनें तेव्हां नियुक्त केलें होतें. पण, मसुदा अमीराच्या हातांत जाऊनही, अमीरानें, त्यावर आपली सही केली नाहीं. आणि हळु हळु असें दिसून येऊं लागलें कीं, जर्मनी व तुर्कस्थानबद्दलचें अमीराचें पूर्वीचें धोरण, प्रतिक्षणीं बदलत चाललें आहे. अशा रीतीनें तो उद्योग सर्व व्यर्थ ठरला.

" **इंडो-जर्मन मिशन** " काबूलला जाऊन पोचण्याच्या पूर्वीं नुकतेंच, **मौलवी ओबायदुल्ला** आणि अंजुमान इस्लामियाचे कांहीं तरुण विद्यार्थी, काबूलला आलेले होते. त्या ४० । ५० हिंदी-मुसलमानांचा उद्देश, तुर्कस्थानांत जाऊन जेहादमध्यें प्रत्यक्ष भाग घ्यावा; म्हणूनच ते सर्वजण, काबूलला आले होते. त्यांची अशी समजूत होती कीं, तुर्कस्थानमध्यें जाण्यास अफगाण गव्हर्मेंटकडून आपणांस सहज परवानगी मिळू शकेल; परंतु, आमिरानें त्यांना तुर्कस्थानांत जाण्यास मनाई केली; इतकेंच नव्हे तर, त्या सर्वांना नजरकैदेंतहि ठेविलें.

अमीर जर जर्मनीस व तुर्कस्थानास मिळून इंग्रजांच्या विरुद्ध युद्धघोषणा करतां, तर, त्या युद्धाचा परिणाम काय झाला असतां, त्याची आज कल्पनाच करणें बरें. परंतु, एवढी गोष्ट निश्चित होती, कीं त्या वेळीं उत्तर हिंदुस्थान कुरुक्षेत्र बनलें असतें; लाहोरच्या खटल्यासारखे खटले उपस्थित करून, क्रांतिकारकांचे स्वातंत्र्याचे प्रयत्न चिरडून टाकण्याचे, आणि त्यांचे हातपाय तोडण्याचे इंग्रजांचे प्रयत्न, खास निष्फळ ठरले असते; सर्व उत्तर-हिंदुस्थानांत, विप्लव-वन्हि पेटला असता; आणि हिंदुस्थानच्या राष्ट्रीय चळवळीनें त्यावेळीं ज्वालामुखीचें रूप धारण केलें असतें. परंतु अमीर हबिबुल्लाखानें, कोणत्याही

कारणानें असो, अखेरपर्यंत तटस्थ वृत्तिच ठेविली; निरपेक्ष वृत्तीचाच त्यानें अवलंब केला. आणि त्याबद्दल, १९१९ सालीं, स्वतांचें जीवन देऊन, त्यानें त्याचें प्रायश्चित्तहि पण घेतलें. अफगाण जनतेनें, त्याच्यावर '**देशघातक**' **स्वदेशद्रोही**' म्हणून कायमचा शिक्का मारला !

---

# नवम परिच्छेद

## कमिटीचें शेष कार्य.

१९१८ साल म्हणजे जगाच्या 'अदृष्ट परीक्षे' चें शेवटचें वर्ष ! त्याबरोबरच कमिटीचाही पण शेष काल संपत आला ! त्या वर्षाच्या आरंभीं, महेंद्रप्रताप हे अफगाणिस्थानहून रशियांतून बर्लिनमध्यें परत येऊन पोहोंचले. रशियांत तेथील बोल्शेव्हिकांनीं त्यांचें अत्यंत आदरानें स्वागत केलें. पूर्वी अफगाणिस्थानला जातांना, अमीरास व तुर्कस्थानच्या सुलतानास कैसरनें स्वतः लिहून दिलेलीं जीं पत्रें महेंद्रप्रताप घेऊन गेलेले होते, त्या पत्रांस उत्तर म्हणून अमीर हबिबुल्लाखानें, कैसरला आणि सुलतानच्या नांवें, आपण स्वतः लिहिलेलीं दोन पत्रें महेंद्रप्रतापजवळ दिलेलीं होतीं. तीं दोन्हीं पत्रें महेंद्रप्रतापनें त्या दोघांजवळ नेऊन सादर केलीं. कायसरच्या नांवें जें पत्र होतें, तें फारशी भाषेंत लिहिलेलें होतें. आणि त्यांत, अफगाणिस्थानच्या अमिरानें, कैसरबरोबर मित्रत्व जोडण्याची आपली उत्कट इच्छा, प्रदर्शित केलेली होती. कायसरला भेटल्यानंतर सुलतानचें पत्र सुलतानास सादर करण्याकरतां, महेंद्रप्रताप बर्लिनहून इस्तंबूलला गेले.

१९१८ सालीं, तह घडून येण्याचा काल जवळ येत चालला; आतां 'आपण आपला सर्व हिशेब एकदां पडताळून पाहिला पाहिजे,' अशा तऱ्हेची कांहींशी वृत्ति जर्मनींत सर्वत्र दिसून येऊं लागली. तहानंतरही कमिटीस दृढ स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून, क्रांतिकारकांच्याकडून अनेक प्रयत्न करण्यांत आले. त्या वेळीं प्रथम असें समजलें कीं, 'तहाची वाटाघाट पॅरिस येथेंच होणार.' कमिटीचे सभासद, हिंदु-

स्थानविषयक प्रश्न तेथें उपस्थित करण्याविषयीं विचार करूं लागले. जर्मनफॉरिन-ऑफिसनें कमिटीस त्या बाबतींत ताबडतोब असें कळविलें कीं, " फ्रान्स जर कमिटीस परवानगी देत असेल, तर जर्मनीची, त्यास कांहींच हरकत नाहीं. "

परंतु भविष्यत्कालापुढें कोणाचें काय चालणार आहे! जर महायुद्धानें विपरीत स्वरूप धारण केलें असतें, आणि त्याचा परिणाम, कांहीं निराळाच घडून येता व व्हर्सेलिसचा तह अन्य प्रकारेंच होता, तर तहाच्या वेळीं, इंग्लिश गव्हर्नमेंटनें पॅरिसला आपल्या बरोबर हिंदुस्थानांतून जो 'शिकारखाना' आणला होता,–वरपक्षाकडचे म्हणून जे मेहुणे–जांवई–नातजांवई यांचा परिवार जमा केला होता, त्या 'भारतीय प्रतिनिधीं' च्या ऐवजीं, बर्लिन कमिटीच्याच लोकांनीं स्वातंत्र्याचा लढा अखेरपर्यंत लढविल्यावांचून सोडला नसता. व मध्ययुरोपांतील 'सेंट्रल पावर,' चीं सहानुभूतिही पण, क्रांतिकारकांनीं मिळवून दाखविली असती.

त्या वेळीं कमिटीनें, स्वित्झर्लंडमध्यें आपली एक शाखा स्थापून तेथें तिचें ऑफिस उघडण्याचे, तसेंच क्रांतिकारकांचें एक वर्तमानपत्र सुरू करण्याचे प्रयत्न केले. परंतु दुर्दैवानें, तितक्यांतच जर्मनींतच गडबड उडाली. आणि त्या धामधुमींत, हिंदी कार्याचा ध्वंस झाला; जर्मनींतील धामधुमीनें जर्मनसरकार सोशालिस्टांच्या हातीं गेलें. सोशालिस्टांनीं पॅरिसच्या तह-परिषदेंत हिंदुस्थानच्या हक्कांविषयींचा प्रश्न उपस्थित करण्याचें कमिटीस आश्वासन दिलें होतें. जर्मन सोशालिस्टांची अशी समजूत होती कीं, पॅरिसलाच Understanding Peace होईल. सर्वांना तशीच आशा वाटत होती. सोशालिस्टांच्या मुख्यानें, पूर्वेकडील देशांविषयींचा प्रश्न तहाच्या वेळीं आपण काढणार असल्याबद्दलचें वृत्तपत्रांच्या बातमीदाराच्याजवळ तेव्हा बोलूनहि दाखविलें होतें. फॉरेन-ऑफिसनेंहि, हिंदुस्थानची तात्कालीन राजकीय परिस्थिति अवगत व्हावी म्हणून, कमिटीस रिपोर्ट लिहून देण्याविषयीं आग्रह केला होता. जर्मनींतील राजकारणी मुत्सद्यांचाही पण तसाच आग्रह होता. त्या रिपोर्टमुळें परिषदेपुढें हिंदुस्थानविषयींचा प्रश्न मांडणें अधिक सुलभ, अधिक सोईचें होणारें होतें. कमिटीनें फॉरेन-ऑफिसला त्या बाबतींत एक मेमोरॅन्डम् पाठवून दिला. हा मेमोरॅन्डम् म्हणजेच कमिटीचें ६ वें पुस्तक, " India's demand for freedom. " तें पुस्तक इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन या तीन भाषांतून प्रसिद्ध करण्यांत आलें होतें.

तदनंतर १९१९ सालीं, स्वित्झर्लंडमध्यें सोशालिस्टांची एक आंतरराष्ट्रीय परि-

षद् भरली. कमिटीनें त्या ठिकाणींही हिंदुस्थानचा प्रश्न उपस्थित करण्यासाठीं, दोघां प्रतिनिधींस पाठवून दिलें. शिवाय, परिषदेस एक मेमोरॅन्डमही पाठवून देण्यांत आला. परंतु, इंग्रजांच्या सामर्थ्याचा प्रभाव काय वर्णन करावा! मनुष्य-जातीला स्वतंत्र करण्यासाठीं-प्रपीडित राष्ट्रसमूहांचीं दुःखें वेशीवर बांधून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं भरलेल्या त्या सोशालिस्टांच्या परिषदेंत,-कमिटीचा तो मेमोरॅन्डम, शेवटपर्यंत आपण होऊनच कोठें दडी मारून बसला! परिषद होईपर्यंत, कमिटीचा तो मेमोरॅंडम, सोशालिस्टांच्याकडून तसाच्या तसा दडपून ठेवण्यांत आला.

## दशम परिच्छेद

### " प्रचार-पद्धति. "

बर्लिनची ' **इंडियन-इंडिपेन्डन्स कमिटी** ', प्रथमतः एक गुप्त समिति होती. १९१५ च्या अखेरपासून, तिनें युरोपच्या सर्वसाधारण लोकांपुढें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रचार करण्यास सुरवात केली. त्या कार्यासाठीं, कमिटीनें नानाविध पुस्तकें, अनेक तऱ्हेचे मॅनिफेस्टो निरनिराळ्या भाषांत लिहून त्यांचा प्रसार आरंभिला. तदनंतर, हिंदुस्थान-विद्वेशक जे जे लेख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत, त्यांना त्यांना कमिटीनें समर्पक उत्तरें देण्यास सुरवात केली. अशा रीतीनें अनेक पत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं;—(१) " Is India Loyal " (२) " British rule in India condemned by the British themselves " (३) " True Verdict of India " (४) " A History of ten years fight for Indian freedom " (५) " How England acquired India " (६) " India's demand for freedom " (७) " Socialist conferences on British rule in India." या पुस्तकांशिवाय आणखीही कित्येक प्रसिद्ध करण्यांत आलीं.

या सर्व पुस्तकांना, इंग्लिश गव्हर्मेंटकडून हिंदुस्थानांत बंदी करण्यांत आली आहे. या पुस्तकांपैकीं दोन पुस्तकांतून फारच गंमतीचा इतिहास आहे. पहिल्या

पुस्तकावर, छापण्यांत आलें होतें कीं– " Published by the Indian Nationalist Party " **आणि लंडनहून, ' मुद्रित '** ! १९१९ सालीं, सुइश गव्हर्मेंटनें **' बंडखोरांचें कारस्थान '** म्हणून एक खटला उपस्थित केला. या खटल्यांत अनेक हिंदी क्रांतिकारकांना गोंवण्यांत आलें होतें. डॉ० Brcis नांवाच्या एका आस्ट्रियन यहुदी माणसाची त्या खटल्यांत साक्ष झाली. हा यहुदी मनुष्य एक सुसंस्कृतज्ञ व्यक्ति. Brcisनें कोर्टापुढें असें सांगितलें कीं, युद्धापूर्वी फार दिवस, आपण ' इंग्रजांचे गुप्त हेर ' म्हणून पॅरिसला होतों. तेथून हिंदी क्रांतिकारकांच्यामध्यें मिसळून, त्यांच्याच कामासाठीं म्हणून आपण स्वित्झर्लंडला गेलों; त्या ठिकाणीं एका क्रांतिकारकाच्या मार्फत, आपली आणि अन्य कित्येक क्रांतिकारकांची ओळख झाली. त्या खटल्यांत त्यानें कोर्टापुढें अनेक विलक्षण गोष्टी सांगितल्या. १९१६ सालीं जेव्हां ती व्यक्ति **' गुप्त हेर '** असल्याचें समजून आलें, तेव्हांपासूनच त्या व्यक्तीचा संबंध तोडला गेला होता; व क्रांतिकारक सावधान झाले होते. रौलेट-रिपोर्टांत बर्लिनकमिटीच्या उत्पत्तीविषयीं जें एक खोटें विधान करण्यांत आलेलें आहे, आणि अमुकजण स्वित्झर्लंडहून बर्लिनला जाऊन त्यांनीं तेथें Nationalist Partyची संस्थापना केली, त्या दोन्ही खोट्या बातम्या वरील व्यक्तीनेंच ब्रिटिश-गव्हर्मेंटला पुरविल्या. तसेंच, नॅशनल पार्टीचा शोधही उपरोक्त पुस्तकावरूनच लावण्यांत आलेला असला पाहिजे. ज्या मनुष्यास **' कमिटीचा उत्पादक '** म्हणून रौलेट-रिपोर्टांत म्हणण्यांत येत आहे, तो मनुष्य, कार्यारंभानंतर पुष्कळच उशिरां, बर्लिनला आला. आणि हा इंग्रजांचा गुप्त हेर मात्र त्यांस फार पूर्वीपासूनच ओळखत होता ! त्या पुस्तकावरील प्रकाशकाचें नांव, आणि त्या गुप्त हेराची बातमी, यांचा एकमेकांशीं मेळ जमत आहे असें पाहूनच बर्लिन-कमिटीच्या स्थापनेविषयींचा अद्भुत इतिहास, रौलेट-रिपोर्टांत सांगण्यांत आला आहे. पुढें लौकरच, लोकांच्या तोंडून ( इंग्रजांच्या गुप्त हेरांच्याच तोंडून ) असें समजलें कीं, तें पुस्तक लंडनहून प्रकाशित झालेलें आहे असें पाहून, त्याच्या छापखान्याचा शोध लावण्यासाठीं इंग्रजांच्या पोलीसांनीं अनेक **' अश्वडिंबर शोध '** केले ! युरोपांतील प्रचाराच्या कार्यालाही विरोध करण्याकरितां इंग्रजांकडून अनेक अडथळे आणण्यांत आले. याच सुमारास Sir Bownagree यांनीं लिहिलेलें "Verdict of India" हें पुस्तक प्रकाशित झालें. त्यांत असें लिहिण्यांत आलें होतें कीं, " **हिंदी लोक अत्यंत राजनिष्ठ;**

**परंतु, इंग्रजांच्या शत्रूनें म्हणजे जर्मनीनें, हिंदी लोकांचें नांव पुढें करून, इंग्रजांच्या द्वेषानें भरलेलीं भरमसाट पुस्तकें प्रसिद्ध केलीं; दुष्ट जर्मनांचेच ते खोडसाळ प्रयत्न आहेत !"** त्याचें तें पुस्तक अनेक भाषांतून छापण्यांत आलें. त्या पुस्तकास प्रत्युतर म्हणूनच तिसरें पुस्तक "True Verdict of India" हें कमिटीनें प्रकाशित केलें. कमिटीचें तें पुस्तकही, अनेक भाषांतून लिहिण्यांत आलेलें आहे.

**१९१८ सालीं**, कमिटीनें, बिनतारी तारायंत्रानें आपला हिंदुस्थानविषयक अभिप्राय चारी दिशांस पाठवून दिला; लॉइड जॉर्ज यांच्या हिंदुस्थानविषयक भाषणावरील आपला अभिप्राय, मॅँटेग्यू रिफॉर्म्सबद्दलचें आपलें मत ताबडतोब चारी दिशांस कळविलें. कमिटीचा तो अभिप्राय, युरोपांतील अनेक देशांच्या वर्तमानपत्रांतून त्या काळीं प्रसिद्ध झालेला आहे. त्याच वेळीं, नवीन सुलतानच्या राज्याभिषेकप्रसंगीं, आणि मिसरच्या खेदिवाच्या जर्मनींतील आगमनाचे वेळीं, कमिटीनें त्यांना अभिनंदनपर टेलिग्राम पाठविले होते; **खेदिवानें** हिंदुस्थान-विषयीं आपली सहानुभूति प्रकट करून, त्या तारेचें कमिटीस प्रत्युत्तरहि दिलें होतें. अशा प्रकारें टेलिग्राम आणि रेडिओद्वारां, चहूंकडे वातम्या पोंचविण्यांत येत. आणि याच रीतीनें सर्व युरोपभर प्रचारकार्याचे कमिटीकडून अनेक प्रयत्न करण्यांत आले. त्याशिवाय १९१८ सालीं, श्री. **चम्पकराम पिले** हे हिंदुस्थानविषयक व्याख्यानें देत, जर्मनींत, चहूंकडे फिरत होते.

---

# एकादश परिच्छेद

## स्वित्झर्लंडमध्यें गुप्तहेरांचें आगमन.

**१९१५-१६**च्या शीतकालीं, **महेंद्रप्रतापचे प्रायव्हेट सेक्रेटरी 'क्ष'** अकस्मात् जिनेव्हा शहरीं प्रगट होऊन, जर्मन-वकिलातींत हजर झाले! तेथून त्यांनीं कमिटीस एक गुप्तपत्र लिहिलें;—कीं, "**राजा-महेंद्रप्रतापनीं** ज्या...देशी राजास पत्र लिहिलेलें होतें, त्या पत्राप्रमाणें, त्याच हिंदुस्थानांतील राजानीं आपले बंधू '**अमुक...राजेसाहेब**' यांना युरोपांत

पाठवून दिलेलें आहे; आणि ते, हल्लीं पॅरिसमध्यें येऊन राहिले आहेत. मी त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी होऊन राहिलों आहे; कारण, प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून असल्या-वर, माझ्याविषयीं इंग्रजांना कसलाच संशय येणार नाहीं; व मला, चहूंकडे वाटेल तसें फिरतां येईल."

प्रायव्हेट सेक्रेटरींनीं आणखी असेंहि कळविलें कीं, "**महाराजांनीं पत्रांत आणखी असेंहि लिहिलेलें आहे,कीं** 'देशांतील अमुक अमुक राजे विप्लवारंभ करण्यास **तयार आहेत; परंतु, त्यांना असें आश्वासन पाहिजे, कीं जर्मनीला हिंदुस्थानविषयीं कोणताच अभिलाष नाहीं.'शिवाय,जर्मनीकडून त्यांना अर्थसहाय्यहि पाहिजे आहे.**"असें पत्र मिळतांच,कमिटीनें, **डॉक्टर प्रभाकर** यांस तत्क्षणीं **जिनेव्हास** पाठवून दिलें. तसेंच एक उच्च दर्जाचा जर्मनऑफीसरही त्यांच्याबरोबर तिकडे गेला. जिनेव्हास जाऊन 'राजेसाहेबां'ची भेट घेतांच, त्या दोघांना अत्यानंद झाला; व तें आनंदाचें वृत्त, दोघांनींही तावडतोब बर्लिनला कमिटीस कळविलें. त्या दोघांनीं राजेसाहेबांचें आपल्या पत्रांतून फारच थाटामाटानें वर्णन केलें होतें. कमिटीस तर, तो त्यांचा रिपोर्ट पाहून असें वाटलें, कीं जणुं कांहीं आतां 'आकाशांतला चंद्र'च हातीं आला! कारण, आजपर्यंत, '**किताबवाले**' येऊन मिळालेले नव्हते. आतां, प्रत्यक्ष राजेरजवाडेच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-कार्यांत भाग घेऊं लागले! हिंदुस्थानांतील एकेक राजेमहाराजे इंग्रजांविरुद्ध उठूं लागले आहेत!! परंतु, कमिटीच्या त्यावेळीं ध्यानांत आलें नाहीं, कीं हे **हिंदुस्थानचे राजे, इंग्रजांबरोबर लढण्यास तयार झाले असतांना, त्या राजांच्याजवळ पैसाच तेवढा नाहीं! पैशासाठीं हिंदुस्थानचे राजे, जर्मनीच्या दारांत हजर;** काय ही लज्जेची गोष्ट! परंतु, काय असेल तें असो, त्या 'राजेसाहेबांच्या'जवळ, हिंदुस्थानांतील त्यांच्या 'महाराजां'कडे पोहोचते करण्यासाठीं, ३००० पौंड तावडतोब देण्यांत आले. जर्मन-गव्हर्मेंटनें त्या वेळीं कमिटीस मुद्दाम एक पत्र पाठवून असें कळविलें कीं, "राजेसाहेबांना असें सांगा, कीं अमुक अमुक महाराजांना म्हणावें, जर ते सर्वजण मिळून एक 'राष्ट्रीय सरकार'–National Government–स्थापन करूं शकतील, तर त्या त्यांच्या गव्हर्मेंटला '**हिंदुस्थानचें नवीन (स्वतंत्र) सरकार म्हणून**' मान्य करण्यास या क्षणीं जर्मनगव्हर्मेंट तयार आहे." जर्मनीची प्रथमपासूनचीच अशी

इच्छा होती, कीं " क्रांतिकारक जर हिंदुस्थानांत 'स्वतंत्र' गव्हर्मेंट स्थापन करूं शकत असतील, तर त्या त्यांच्या गव्हर्मेंटला 'स्वतंत्र गव्हर्मेंट' म्हणून मान्यता देण्यास, जर्मनीची केव्हांच हरकत नाहीं. आणि त्याशीं, मित्रत्वाचे संबंध जोडण्यास पण, जर्मनी केव्हांच तयार आहे."

तीन हजार पौंडांच्या देणगीबरोबरच जर्मनीच्या मुख्य मंत्र्यानें, पूर्वी महेंद्रप्रतापजवळ राजेरजवाड्यांना देण्यासाठीं म्हणून जीं पत्रें दिलीं होतीं, त्यांच्या फोटोग्राफच्या नकला काढून, त्याही सदरहू 'राजेसाहेबां'च्याजवळ दिल्या. कारण, हिंदुस्थानांतील राजांना, महेंद्रप्रतापजवळ दिलेलीं पत्रें मिळालेलीं नव्हतीं; सबब, पुनः तींच पत्रें, आणखी एकदां त्यांना वाचावयास पाहिजे होतीं ! स्वातंत्र्य-युद्ध कसें करावयाचें, तात्पुरतें ( अस्थायी ) गव्हर्मेंट कसें उभारावयाचें, Provisional Government कसें संगठित करावयाचें, त्यासंबंधीं तयार केलेल्या योजनेचा एक कच्चा खर्डाही पण, कमिटीकडून राजेसाहेबांना देण्यांत आला. कमिटीनें 'राजेसाहेबां'ना गुप्त गुप्त म्हणून असें सांगितलें कीं, " अस्थायी गव्हर्मेंट जें स्थापित करावयाचें त्यांत हिंदु आणि मुसलमान प्रतिनिधि, तुल्यभाग असावे; तसेंच तें, राजेरजवाडे आणि लोकप्रिय पुढारी, यांचेच प्रतिनिधि घेऊन संगठित करण्यांत यावें." तीन हजार पौंड घेऊन, आणि कमिटीचा तो उपदेश श्रवण करून, 'राजेसाहेब,' ताबडतोब हिंदुस्थानांत जाण्यास निघाले ! कांहीं महिन्यांनंतर, पुनः पूर्वोक्त ठिकाणीं परत येऊन ते बोलले, " **हिंदुस्थानांत आम्ही जाऊन आलों ! कमिटीच्या आज्ञेनुसार, एक अस्थायी गव्हर्मेंट हिंदुस्थानांतील सर्व राजेरजवाड्यांनीं मिळून स्थापन केलें आहे.** जर्मन गव्हर्मेंटचीं पत्रें पाहून, जनतेच्या पुढाऱ्यांना फारच आनंद झाला; सर्वजण युद्धास उत्सुक आहेत; **वसंतऋतूंत 'हिंदुस्थानच्या युद्धास आरंभ होईल !** "

तदनंतर, निर्दिष्ट काल निघून गेला तरी, हिंदुस्थानांतून युद्धाची किंवा नुसत्या धामधुमीचीही पण, कांहींच हकीकत येईना. आणि त्या राजेसाहेबांचाही पण कुठेंच पत्ता लागेनासा झाला. दुसऱ्या खेपेस जेव्हां, राजेसाहेब स्वित्झर्लंडला आले, त्या वेळीं त्यांनीं कमिटीस असें सांगितलें होतें कीं, " आपण, पॅरिसमध्यें आणि इंग्लंडमध्यें हिंदी शिपायांत कार्य करण्यासाठीं, दोन कमिट्या स्थापित केल्या आहेत; आणि, त्यांचे 'अमुक अमुक लोक' सदस्य आहेत;" परंतु पुढें, राजे-

साहेबांनीं ज्यांचें ज्यांचें ' सदस्य ' म्हणून वर्णन केलें होतें, ते ते ' सदस्यगण ', स्वित्झर्लंडमध्यें गुप्त हेराचें काम करीत असल्याचें समजलें ! त्यावरोबर कमिटीच्या हृदयांत धस्स झालें. ' अमक्या ठिकाणचे अमुक राजेसाहेब,' म्हणजे ती एक गप्प असली पाहिजे, अशी तत्काळ कमिटीची खात्री होऊन चुकली. विशेष खेदाची गोष्ट अशी कीं, ती व्यक्ति उत्तर हिंदुस्थानांतील कोणा धार्मिक पुढाऱ्याचे पुत्र ! तो इंग्रजांचा गुप्त हेर असेल, आणि प्रवंचक असेल, असा संशयहि कोणास येणें शक्य नव्हतें. पण कमिटीस जो राग आला, तो अमुक राजेसाहेबांनीं जी एक मोठी थोरली रक्कम घशांत घातली, त्याचा होय. 'अमुक महात्म्यां'चे पुत्र—ज्यांच्या नांवापाठीमागें गुरुकुलाचा बारा वर्षांचा ब्रह्मचर्याचा शिक्का,–ते इंग्रजांचे गुप्त हेर असूं शकतील, ही गोष्टच कोणाही जर्मनास आणि हिंदी माणसाला शक्य वाटली नाहीं. नंतर, न्यूयार्कहून अशी एक बातमी आली कीं, " 'अमुक राजेसाहेब' त्या ठिकाणीं येऊन पोचले असून, तेथील कार्याध्यक्षानें त्यास आश्रयही दिला आहे." तेव्हां, संशयाचा एकदां निरास करून घ्यावा म्हणून, कमिटीनें तावडतोब एक टेलिग्राम दिला;–'जे अमुक राजेसाहेब' आपला उल्लेख ' स्वतंत्र ' अथवा 'बंडखोर' राजे म्हणून करीत आहेत, ते पॅरिसमध्यें कोणत्या हॉटेलांत रहात आहेत ? तसेंच, पॅरीसमध्यें आणि लंडनमध्यें, हिंदी शिपायांत कार्य करण्यासाठीं त्यांच्याकडून ज्या दोघांची योजना करण्यांत आलेली आहे, त्यांचाहि ठावठिकाणा कमिटीस तावडतोव कळवावा; कारण, कमिटीस युरोपांतील आणि हिंदुस्थानांतील एकूणएक वर्तमानपत्रें बारकाईनें चाळूनहि, जे कोणी अमुक...'सिंग राजे'––जे 'लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे मेंबर, ' आणि जे इंग्रजसरकारचे एक स्तुतिपाठक, त्यांचें नांव, युरोपच्या प्रवास करणाऱ्या कोणत्याही लोकांच्या यादींत, मुळींच मिळत नाहीं.' विशेष गोष्ट, स्वराज्यासाठीं तहानलेले ते राजेसाहेब पॅरिसमध्यें जाऊन राहिले होते ! तो तर युद्धाचा समय ! त्यामुळें, पुढें त्यांचा कांहींच पत्ता लागूं शकला नाहीं. दुसरे दोघेजण, जे शिपायांमध्यें कार्य करीत असल्याचा उल्लेख, एकवेळ राजेसाहेबांनीं कमिटीजवळ केलेला होता, तेहि हळू हळू पुढें, स्वित्झर्लंडमध्यें प्रकट होऊं लागले. त्यांतील पहिल्या तरुण सद्गृहस्थानीं, " आपण डॉक्टर आहोंत, आणि महात्माजींच्या चिरंजिवांचे सख्खे भाऊ होत, " असा जर्मन अधिकाऱ्यांना मागाहून आपला परिचय करून दिला होता. त्यानें असें सांगितलें होतें कीं, ' आपण दक्षिण फ्रान्समध्यें जाऊन शिपायांमध्यें विप्लवकार्य करूं. ' परंतु, त्याचें

मुख्य कार्य, आपल्या दुसऱ्या साथीदारास शिव्या देत बसण्याचेंच होतें! धाकट्या महाराजांचें म्हणणें असें होतें कीं, "त्या आपल्या दुसऱ्या साथीदारास अजून आपला स्वतांचा अर्थ काय, तें नीट समजतच नाहीं! स्वित्झर्लंडमध्यें राहून बेटा काय करतो आहे? नबाबी थाटानें नुसता राहिला आहे! खातो पितो आहे, आणि रिकामी चैन मात्र करीत बसला आहे! आश्चर्याची गोष्ट, तुम्ही जर्मन लोक त्याला खुशाल चैन करूं देत आहां." दुसऱ्या 'महात्म्याचें म्हणणें, "आपणास शिव्या देणारे ते पाहिले सद्गृहस्थ हे कुठल्याही 'महात्म्यां'चे पुत्र नसून 'ते कोण आहेत, याचाच आपण शोध करीत आहों!' व तो शोध करण्यासाठींच केवळ आपण त्याच्या पाठीमागें फिरत आहों!! त्याजविषयीं अलीकडे आपणास फारच संशय येत चालला असून 'तो कोण आहे' याचाच आपण छडा लावीत आहों!"

सामान्य लोकांना ही गोष्ट समजून येत नाहीं, कीं गुप्त हेर हे परस्परांना भररस्त्यावर शिव्या देऊं शकतात! आणि लोकांचा विश्वास संपादन करण्याकरितां, स्वतांच्या जिवलग दोस्तास 'तो शत्रूचाच हेर' म्हणून नेहमींच नांवें ठेवीत असतात. अशा प्रकारच्या लोकांना Agent Provocator असें म्हणण्यांत येतें. त्या दोन्ही व्यक्तींनीं स्वित्झर्लंडमध्यें राहून तेच खेळ चालविले होते. दुसरी व्यक्ती म्हणजे, खरोखरीच एक महापुरुष! **सूर्यवंशीय कुलोत्पन्न!—ज्यांचें नांव, ठाकूर यशोराजसिंहजी सिसोदिया सरदार!!** त्याच नांवानें ते स्वित्झर्लंडमध्यें राहून सगळीकडे आपली ओळख देत होते! १९२६ सालीं ऑगस्ट महिन्यांत सरदारसाहेब 'युवराज' म्हणून स्वित्झर्लंडमध्यें प्रकट झाले! त्या ठिकाणीं त्यांनीं एका उक्रेनियन गृहस्थाबरोबर जर्मन वकिलातींत आपला प्रवेश करून घेतला. पहिल्याच मुलाखतींत त्यांनीं असें सांगितलें कीं, "रजपूत राजे सर्वच इंग्रजांविरुद्ध बिघडून गेलेले असून, ते स्वातंत्र्ययुद्धास अगदीं उत्सुक आहेत; मात्र, जर्मनीचें त्यांना सहाय्य पाहिजे. आणि म्हणूनच, अमुक अमुक महाराजांनीं, अमुक ठाकूर—अमुक राजे-महाराजे यांनीं आपणांस त्या बाबतींत जर्मनीशीं वाटाघाट करण्याकरतां, जर्मनीस पाठवून दिलें आहे." 'राजेसाहेबां'नीं हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांनीं तयार केलेली स्वातंत्र्ययुद्धाची एक लांबलचक योजना कमिटीपुढें ठेवून, कमिटीस अगदीं चकित करून सोडलें. पुढें, राजेसाहेबांनीं मोठें आवेशपूर्ण भाषण करून कमिटीस म्हटलें,—"रजपुतांसारखे, हिंदु-

स्थानांत दुसरे कोण आहेत? रजपुतांसारखे दुसरे कोणते सर्वश्रेष्ठ योद्धे आहेत? रजपुतांसारखे, हिंदुस्थानांत लढवय्ये लोक कोण आहेत? **हिंदुस्थानच्या बादशाही तक्तावर, पहिल्यापासून एका 'सिसोदिया-वंशाचा 'च खरा खरा अधिकार !** " आपल्या कुलाचा श्रेष्ठपणा सिद्ध करण्यासाठीं सिसोदिया कुलांतील ते राजेसाहेब, आपल्याजवळची एक मोडकीतोडकी गंजलेली तरवार आणि आपला एक जुनापुराणा अंगरखा, लोकांना दाखवीत असत ! त्या तरवारीबद्दल मोठ्या अभिमानानें राजेसाहेब म्हणत, "**ही तरवार, सिसोदिया कुळांतील शेवटचे पुरुष शक्तसिंह यांनीं हळदीघाटच्या युद्धांत वापरलेली होती ! !** "

अनेक दिवसपर्यंत, प्रथमतः, राजेसाहेब कमिटीस फारच लोणकढ्या थापा मारीत होते. हिंदुस्थानांतून जो सर्व ' वॉररिलीफ-फंड ' गोळा करण्यांत आला, तो लंडनला, अमीर अली आणि आगाखान यांच्याच ताब्यांत देण्याचें गव्हर्मेंटनें ठरविल्यामुळें, सगळे रजपूत राजे, इंग्रजांवर नाखुष होऊन गेलेले आहेत, असेंहि त्यांनीं सांगितलें होतें. ' **इंडिया ऑफिस** ' मधील अनेक गुप्त व्यापार त्या वेळीं राजेसाहेबांनीं कमिटीस निवेदन केले होते. राजेसाहेबांनीं असेंहि सांगितलें कीं, " हिंदी राजे-रजवाड्यांनीं युद्धांत सहाय्य केल्याबद्दल प्रतिपादन म्हणून, इंग्रजसरकार राजेलोकांचें एक स्वतंत्र कौन्सिल लौकरच संघटित करण्याच्या विचारांत आहे. " ' इंडिया-ऑफीस ' मधील ती अगदीं गुप्त बातमी म्हणून, कमिटीस, त्यानें १९१५च्या सप्टेंबर महिन्यामध्यें सांगितली. काय असेल तें असो, कमिटीच्या प्रतिनिधीनें त्याच्या डोक्यांतील त्या मोठमोठ्या योजना स्वहस्तानें एक मेमोरॅन्डम लिहून जर्मन गव्हर्मेंटला पाठवून देण्यास सांगितलें. राजेसाहेबांनीं, तत्क्षणीं असें लिहिलें कीं, " गेल्या दहा वर्षांपासून, हिंदुस्थानांत रा ्यि चळवळ चालू आहे; आज अखिल हिंदुस्थानाला स्वातंत्र्य पाहिजे आहे; स्वराज्य पाहिजे आहे; स्वांतंत्र्यासाठीं, 'स्वराज्या ' साठीं तनमनधन सर्वस्व अर्पण करण्याला, हिंदुस्थान आज तयार आहे. इतकी प्रचंड तयारी करण्यासाठीं आपणास तहानभूक विसरून जाऊन राजपुतान्यांत फिरावें लागलें; राजेरजवाड्यांनीं त्या ' पवित्र महान् कार्या ' साठीं मोहिमा काढल्या; आणि त्यामुळें त्यांच्याजवळचा होता नव्हता तेवढा सगळा पैसा संपून गेला ! जे हजारों रुपये स्वातंत्र्य-युद्धाच्या पूर्व-तयारीसाठीं राजेरजवाड्यांकडून उधळण्यांत आले त्यामुळें

' पुढील तयारी ' स त्यांच्याजवळ आतां पैसाच उरला नाहीं; तेव्हां, केवळ स्वातंत्र्ययुद्धास म्हणून, जर्मनीनें त्यांना अर्थ-सहाय्य करावें. जर्मनी जर कांहीं थोडें ऋण त्यांना देईल, तर त्याची $\frac{1}{4}$ फेड, ' हिंदुस्थानचें स्वातंत्र्ययुद्ध ' संपतांच, त्यांच्याकडून तावडतोब करण्यांत येईल. तरी, याचें ' **लेखी उत्तर** ' आपणास तावडतोब मिळावें. " परंतु, कमिटीस त्याच्याविषयीं पूर्ण विश्वास न पटल्यामुळें कमिटीनें त्यांच्या हातीं लेखी असें कांहींच दिलें नाहीं; त्यास केवळ तोंडींच उत्तर देण्यांत आलें. कामिटीनें असें म्हटलें, कीं, जर्मनीचें आणि हिंदुस्थानचें आज बंधुत्वाचें नातें जोडलें गेलेलें आहे; व रजपूत राजे, हिंदुस्थानांत इंग्रजां-विरुद्ध लढावयास तयार झाल्यास, त्या सर्वांना, जर्मनीचें सहाय्य तावडतोब अवश्यमेव मिळेल. तदनंतर राजेसाहेबांनीं, ' आतां आपण स्वातंत्र्य-युद्धाच्या तयारी-करतां हिंदुस्थानांत जातों, तरी, कांहीं विशिष्ट कार्यासाठीं आपणास २०००० स्विस फ्रँक द्यावे ' म्हणून कमिटीजवळ विनंती केली. आणि कामिटीकडून ती रक्कम घेऊन, रक्कम पोंचल्याबद्दल आपल्या सहीची पावतीही तावडतोब कमिटीस दिली ! आणि राजेसाहेब, हिंदुस्थानच्या ' स्वातंत्र्य-युद्धा ' ची तयारी करण्याकरितां, घाइघाईनें तेथून निघून गेले ! !

**राजेसाहेब पसार होण्यापूर्वी**, कमिटीनें, त्यांच्याजवळ कांहीं गोष्टींचा खुलासा मागितला. कमिटीनें म्हटलें, " अमुक राजेसाहेब पूर्वी पॅरिसला आले आहेत असें कमिटीस समजलें आहे. " राजेसाहेबांनीं खुलासा करून म्हटलें, " अमुक **सिंह** हे आपले अगदीं जवळचे संबंधीजन असून, ते युरोपांत तर कधींच येणें शक्य नाहींत ! **आमचे सिंहराजे, म्हणजे इंग्रजांचे जिवलग दोस्त. हाय हाय ! कुणी गुप्त हेरानें त्यांचा सर्वनाश करण्यासाठींच कमिटीस त्यांचें नांव सांगितलें असलें पाहिजे.** " नंतर, पुनः प्रश्न करण्यांत आला, कीं " आपण ' अमुक महात्म्या ' च्या चिरंजीवांना जाणतां काय ? " तेव्हां राजेसाहेब उद्गारले, " ते ना ? ते तर मुळींच संशयास पात्र नाहींत !! " पुनः कमिटीनें म्हटलें, " त्यांची हकिगत त्यांनीं स्वतांच होऊन कामिटीस सांगितली आहे !! " राजेसाहेब उडवाउडवी करून बोलले, " अमुक राजे युरोपांत आले असतील, या बातमीवर आधीं माझा मुळीं विश्वासच बसत नाहीं; कांहीं तरी ही ठकबाजी असली पाहिजे. " कमिटीच्या प्रतिनिधीनें त्याच्याशीं संभाषण करून, आपली अशी पूर्ण खात्री करून घेतली, कीं हे सिसो-

दियावंशी राजेसाहेब, खरे राजेच नव्हत. हे ' राजेसाहेब ', म्हणजे कोणी तरी गुप्त हेरच असला पाहिजे. राजेसाहेबांनीं पुनः असेंहि सांगितलें कीं, " ज्यानें कमिटीशीं अशी ठकबाजी केली, तो गुप्त हेर, अगदींच कच्च्या दिलाचा असला पाहिजे ! जो गुप्त हेर एकवार पैसे खाऊन गेला, तो पुनः, निःसंदेह कमिटीकडे परत आल्यावांचून रहाणार नाहीं. " आणि पुढें, खरोखरीच तसें घडून आलें; तीन महिन्यानंतर अकस्मात्, एके दिवशीं वरील प्रतिनिधीच्या नांवें, कमिटीकडे जर्मन वकिलातीकडून पत्र आलें; त्या पत्रांत, पुढील अर्थाचा मजकूर होता;-- " **बंधुवर मातृभूमीचें दर्शन करून या स्थळीं पुनः परत आले आहेत; अनुग्रह करून, बंधुवरानां दर्शन द्यावें;** " या खेपेस, त्या व्यक्ती-वर वारकाईनें नजर ठेवण्यांत आली; त्याचें कार्य, सूक्ष्मदृष्टीनें पाहण्यांत येऊं लागलें; त्या व्यक्तीजवळील टाइम्स ऑफ इंडियाच्या एका अंकावरून असें दिसून आलें कीं स्वारी, निःसंशय स्वदेशांत जाऊन आलेली होती. त्या अंकांत असें होतें.— **अमुक राजेसाहेब, फार दिवस झाले, पुनः स्वदेशांत परत आले असून उदेपूरच्या महाराजांकडून त्यांचा फारच मोठा सन्मान करण्यांत आला ! इतकेंच नव्हे तर, खास दरबार भरवून, राजेसाहेबांना मानाची एक पुरातन तरवार, आणि एक वस्त्र, अर्पण करण्यांत आलें !** " परंतु, त्या व्यक्तीचें तें पूर्वींचेंच भांडवल होतें. या वेळीं त्यानें विश्वास संपादन करण्यासाठीं, पूर्वींपेक्षां अनेक अद्‌भुत गोष्टी सांगितल्या. त्या ' अद्‌भुत ' गोष्टी म्हणजे, ' राजेसाहेब, लखनौ-कॉंग्रेसलाही जाऊन आले होते ! **सुरेंद्रनाथ बसु, सरोजनि नायडू,** यांच्याशीं त्यांचें पुष्कळच बोलणें झालें होतें; ' राष्ट्रीय सैन्य ' उभारण्याविषयीं, स्वतः राजेसाहेबांनीं, एक ठरावही पण तयार केला होता ! ईदरच्या प्रतापसिंह राजांनीं त्यास असेंहि सांगितलें होतें कीं, ' आपण वृद्ध झालेलों असल्यामुळें, आपणांस इंग्रजांशीं आतां ' डिस् लॉयल ' होणें शक्य नाहीं; परंतु स्वित्झर्लंडला, जर्मनीबरोबर वाटाघाट करण्याकरतां आपण आपल्या प्रायव्हेट सेक्रेटरीस मात्र, अवश्य पाठवून देत आहों. ' सालरजंग आणि दुसरे ...महाराज यांनीं आपले प्रायव्हेट सेक्रेटरी पाठविले आहेत; ते पाठीमागून येत असून, आपण तेवढें पुढें आलों आहों ! **हिंदुस्थानांतील राजे, 'जर्मनीच्या मिसरमधील योजनेविषयीं पुढें काय, तें जाणण्याविषयीं फारच उत्कंठित झाले आहेत.**

अनुक्रम ...२५४९८... क्रमांक ....८२२... ग्रं० क्रि० ३८६८८

त्या असंभाव्य आणि असंलग्न गोष्टी ऐकून, तो मनुष्य निःसंदेह इंग्रजांचा गुप्त हेर असल्याबद्दल कमिटीचा संशय अधिकच दृढ झाला. जर्मन ऑफिसरांनीं त्याची पूर्ण परीक्षा करून सांगितलें कीं, " हा मनुष्य इंग्रजांचा चर आहे; यांत कांहींच शंका नाहीं. " परंतु, पुनः, त्यांच्या कांहीं मनांत येऊन त्यांनीं म्हटलें, " हे राजेसाहेब ' आपण उदेपूरच्या महाराजांचे नातलग ' म्हणून जिकडे तिकडे सांगत सुटले आहेत; आणि त्यामुळें, उदेपूरच्या महाराजांच्या नांवाला मात्र बट्टा लागत आहे. हा मनुष्य, अगदीं पहिल्या नंबरचा बदमाष ! क्रांतिकारकांशीं महाराजांच्या नांवाचा संबंध जोडल्यामुळें, खऱ्या महाराजांचा, यदाकदाचित् हे इंग्लिशलोक नाश करून टाकण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत. "

राजेसाहेबांनीं, फिरून ८०००० फ्रँक, खर्चासाठीं घेतले ! शिवाय, राजेसाहेबांचा हिंदुस्थानभर फिरण्यांत अथवा संचार करण्यांत जो पैसा खर्च झाला होता, त्यांचीही जर्मनीनेंच भरपाई करून द्यावी, अशी राजेसाहेबांची फार फार इच्छा होती ! परंतु, पुढें त्या मनुष्यास जर्मनीनें कांहीं दिवस आपल्या नजरेखालीं ठेविलें. हिंदुस्थानांतून येणाऱ्या प्रायव्हेट सेक्रेटरींपैकीं, एकही प्रायव्हेट सेक्रेटरी, स्वित्झर्लंडला हजर झाला नाहीं ! अखेरीस, १९१७ सालीं अशी एक बातमी कळली कीं, जर्मनहेरांनीं, त्या इंग्लिशांच्या हेरास अगदीं बरोबर ओळखून काढल्यामुळें, त्यानें स्वमुखानें सर्व गोष्टींची कबूली दिली. त्या इंग्लिश हेराचा हेतू असा होता, कीं " साधल्यास, दोन्हीकडूनहि पैसे मिळवावे ! "

युद्धाच्या वेळीं कमिटीच्या विरुद्ध इंग्लिश गव्हर्मेंटनें जितके जितके म्हणून गुप्त चर नियुक्त केले होते, ते ते सर्व, निरनिराळ्या प्रकारें पकडले गेले; व कित्येकांना शिक्षाही पण देण्यांत आल्या.

खरी गोष्ट अशी होती कीं, जितक्या दीर्घकाल युद्ध लांबत जाईल, तितक्या दीर्घकालांत क्रांतिकारकांच्या गुप्त योजना, आपणास अधिकाधिक समजून येतील, अशी इंग्लिश गव्हर्मेंटची समजूत होती. परंतु, अनपेक्षित रीतींनीं त्यांच हेर कमिटीच्या जाळ्यांत आपण होऊनच येऊन सांपडूं लागल्यानें, कमिटीचा त्यांच्यापुढें नाइलाजच झाला ! हेरांपैकीं बहुतेकजण स्वार्थलोलुप, मूर्ख, आणि अकर्मण्य असे होते. लंडनमधील उडाणटप्पू, अर्थसाधनाच्या हेतूनें त्या कार्याशीं लिप्त झालेले होते. महत्त्वाचा असा एकच प्रश्न होता, कीं ते ' महात्मा-पुत्र ' कोण ? आणि ते इंग्रजांकडूनच नियुक्त झाले होते किंवा कसें ? उपरोक्त सिसोदिया

महाराजांनीं सांगितलें कीं, १९१५ सालीं, ते तरुण 'युवराज' ज्या वेळीं लंडनला गेले, तेव्हां तेथील पोलीसांनीं त्यास पकडलें होतें. त्या वेळीं पोलीसांनीं त्यास विचारिलें, "युवराजसाहेब, आपल्या जवळ इतका पैसा कोठून आला ? जर्मनीनेंच निःसंदेह ही रक्कम आपल्याला दिलेली असली पाहिजे !" तदनंतर, ते अमेरिकेस गेले. आणि तेथून स्वित्झर्लंडला परत येऊन, काँग्रेसविषयींच्या आणि अन्यान्य गुप्त गोष्टी त्यांनीं सांगितल्या ! त्यावेळीं, कामिटीच्या कित्येक मुसल्मान सभासदांना शंका येऊन त्यांनीं म्हटलें, कीं "या तरुण मनुष्याच्या युरोपभर निःसंकोच रीतीनें भ्रमण करण्यांत, कांहीं तरी गुप्तरहस्य खास असलें पाहिजे. अतएव त्याच्यापासून कामिटीनें सावध असणें, उचित. कारण, महेंद्रप्रताप हे स्वित्झर्लंडहून अकस्मात् नाहींसे झालेले आहेत ! इंग्रज गव्हर्मेंटला त्यांची बित्तंबातमी असली पाहिजे. इंग्रज-गव्हर्मेंट पूर्णपणें जाणत आहे, कीं महेंद्रप्रताप इकडे कुठें नसून तो अफगाणिस्थानांतच गेलेला आहे. कारण, त्याचे लोक चारी दिशांस भ्रमण करीत असतां त्यांस इंग्रज कां धरीत नाहींत ? त्यांना न धरण्यांत, कांहीं तरी गूढ रहस्य हें असलेंच पाहिजे; आणि तें, महेंद्रप्रतापच्या गैरहजेरींत कामिटीशीं संबंध जोडण्याचेंच असलें पाहिजे." परंतु, त्या तरुण 'महात्मा पुत्रा' नां पुढें करून, इंग्रज कांहीं कार्य साधीत असतील, यावर कोणाचाच विश्वास बसेना.

युद्धानंतर असें समजलें कीं, दुसऱ्या खेपेस ते 'तरुण युवराज' जेव्हां अमेरिकेस गेले, तेव्हां, तेथेंहि त्यांनीं गदरपार्टींत पुष्कळच गोंधळ उडवून दिला; कामिटीला फसविण्याचें त्यांचें कारस्थान पहिल्यापासूनच होतें. प्रथमतः, अनेकांनीं असा तर्क केला, कीं तो एक जुवेगार असून गुप्तहेरांनीं कामिटीजवळून पैसा काढण्यासाठींच, त्यास 'युवराज' बनवून 'राजाचें नाटक' केलें असावें! आणि तेवढ्यासाठींच त्यास स्वित्झर्लंडमध्यें पाठवून दिलेलें असावें. पण शेवटीं, असेंच दिसून आलें, कीं त्या सर्व गोष्टी खोट्या; आणि त्यानें ज्या ज्या व्यक्तींचीं नांवें सांगितलीं, ते ते सर्व गुप्त हेर ! व तेच, चारी दिशांस निरधास्तपणें फिरत आहेत ! ! १९१९ सालीं, इंग्रजांनीं आपल्या पत्रांतून असें प्रसिद्ध केलें, कीं "बर्लिन-कामिटीच्या सर्व गुप्त गोष्टी, आमच्या हेरांकडून आम्हांला पूर्णपणें कळलेल्या आहेत !" ("Grandiloquent plans were drawn on paper, but our agents kept us well informed on every-

thing " ). अनेकांना असें वाटलें, कीं एवढें हें कारस्थान त्या एकट्या तरुण मनुष्याच्याच हातून झालेलें असेल काय ? त्याच्या पाठीशीं आणखी कोणीच नसेल काय ? हिंदुस्थानचें हें दुर्भाग्य, कीं जे इतके धर्मनीतीचे पुतळे, सुविद्या-संपन्न, त्यांच्यामध्येंही अशा कांहीं कांहीं व्यक्ति, दुसऱ्याच्या द्वारां केवळ स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठींच निर्माण होतात; स्वदेशबांधवांच्या गळ्याला तात लावतात; आणि त्यांचा, असा सर्वस्वीं विश्वासघात करतात. त्याचें त्यांना कांहींही वाटत नाहीं. १९१७ सालापासून तो तरुण युवक, भारतवासीयांच्या दृष्टिआड झालेला आहे !

---

# द्वादश परिच्छेद

## शिपायांमधील कार्य.

हिंदी शिपाई म्हणत, कीं त्यांना न कळवितां न सांगतां त्यांना फ्रान्सच्या रणक्षेत्रावर, घेऊन जाण्यांत आलें. त्यांची अशी समजूत होती, कीं आपणास आफ्रिकेस घेऊन जाण्यांत येईल. परंतु त्यांना उतरविलें, मार्सेल्सि ( Marsailles ) बंदरावर ! युद्धक्षेत्रांत कडाक्याच्या थंडीमुळें, आणि अन्य नानाप्रकारें, त्यांस अत्यंत कष्ट भोगावे लागले. तसे हाल, त्यांचे कधींच झालेले नव्हते. शिवाय, तशा प्रकारचें युद्ध, पूर्वीं त्यांनीं कधींही पाहिलेलें नव्हतें; किंबहुना, तसल्या युद्धाची त्यांना नुसती कल्पनाही येणें शक्य नव्हतें. ते असेंहि सांगत, कीं जर्मनीच्या खंदकावर हल्ला चढवितेवेळीं,काळ्या सैन्यांसच आधीं पुढें घालण्यांत येई; आणि त्यांत, हजारों काळे शिपाई, पटापट मरून जात. मृत्युभूमीवरही ' काळा व गोरा ' असा फरक करण्यांत येत असे. "कोणा गोऱ्या माणसाबरोबर अथवा गौरांगीबरोबर बोलल्यास, कडक शासन करण्यांत येईल " असा हुकूम, सैन्यांत, जारी करण्यांत आलेला होता. एक जमादार धोबिणीस कपडे धुण्याबद्दल सांगत असतां, तेवढ्या अपराधावरूनच, त्याचा दर्जा ताबडतोब कमी करण्यांत आला. शिपाई सांगत, कीं, जेव्हां जर्मनीच्या बाजूकडे एकादा काळा मनुष्य दिसे, आणि जर्मन लोक त्यांच्या संरक्षणाची हमी घेत, तेव्हां इंग्लिश सैन्यांतील अनेक शिपाई, जर्मनीकडे पलायन करीत. परंतु, जर्मन लोक तशा

प्रकारच्या desertion च्या अगदीं विरुद्ध होते. असें असतांहि अनेक हिंदी शिपायांचा तो क्रमच होऊन बसला होता. पुढें पुढें, कमिटी, एरोप्लेनमधून पत्रकें आणि जाहिरनामे, शिपायांमध्यें फैलाव करूं लागली; त्या पत्रकांतून व जाहीर-नाम्यांतून, मुसलमानांना जेहादच्या घोषणेविषयीं, आणि हिंदूंना स्वदेशाच्या 'स्वातंत्र्या' करतां, इंग्रजांविरुद्ध तरवार उपसण्यास, आणि त्यांनीं फितुरी करावी म्हणून सांगण्यांत आलेलें असे. इंग्रेजी सैन्यांतून अनेक पठाण शिपाई, त्यावेळीं त्या कारणानें पलायन करून तुर्कांच्याकडे गेले.

खंदकांतील हिंदी शिपाई, आणि जर्मन-खंदकांतील जर्मन शिपाई, यांच्या पर-स्परांशीं अत्यंत रसभरित गप्पा-गोष्टी चालत. रात्रीच्या शांत वेळीं, अकस्मात्, जर्मनच्या दिशेनें शब्द येई; "Do you speak English" (**तूं इंग्रेजींत बोलूं शकतोस काय?**) आणि जेव्हां त्यास उत्तर दिलें जाई, कीं "हां!" तेव्हां पुनः त्याच दिशेनें आवाज येई "**एक! जेहादची घोषणा होत आहे.**"

एका आफ्रिडी सुभेदारानें असें सांगितलें, कीं " ज्या वेळीं आपण तुर्कस्थान जर्मनीस जाऊन मिळाल्याचें ऐकिलें, तेव्हां, आपलें डोकेंच फिरून गेलें.! आणि आपण एकदम जर्मनीकडे चालते झालों!" तोच आफ्रिडी, पुढें महेंद्रप्रतापबरो-बर काबूलला गेलेला होता.

हिंदी शिपाई जर्मनीकडून कैद झाल्यावर त्यांतील ऑफीसरांना इंग्रज ऑफी-सरांप्रमाणें प्रथम अधिकार देण्यांत आले. आणि इंग्रज व हिंदी लोकांना एकत्र ठेवण्यांत आलें. गोरे अधिकारी जर्मन ऑफीसरांना रागानें म्हणत, "हे काळे लोक आमचे ऑफीसर नव्हत! हे काळे लोक आमचे ऑफीसर होऊं शकणार नाहींत!" ("These blackmen are not officers"). जर्मन लोक प्रत्युत्तर देत, "हिंदी अधिकाऱ्यांचा दर्जा आम्हाला कमी करतां येत नाहीं; गोऱ्या लोकांशीं, काळे लोक कसा काय पदोचित व्यवहार करतात, आणि तो त्यांना नीटपणें करतां येतो कीं नाहीं, त्यासाठींच आम्हीं त्यांस ऑफीसर केलें आहे!" परंतु, शेवटीं जर्मनांनींच असें पाहिलें, कीं ते सगळे 'सुभेदार'–'हवालदार'–जमादार' नुसते नांवाचेच!! त्यांच्यांत कार्यकारी शक्तीच नाहीं; किंवा, त्यांना गोऱ्या अधिकाऱ्यांप्रमाणें, कामही पण करितां येत नाहीं. इंग्रज लोकांनीं, त्यांना केवळ खूष करण्याकरतांच, 'हवालदार' 'सुभेदार' आणि 'जमादार' केलेलें आहे!

शिपायांना जर्मन भाषा समजत नसल्यामुळें, प्रथम, त्यांना भाषेचे फारच कष्ट झाले. अखेरीस, कमिटीनें त्यांच्या दुभाषीपणाचें काम पत्करलें. त्यामुळें शिपायांची बरीचशी अडचण दूर झाली.

शेवटीं प्रचाराच्या सोयीसाठीं, त्या लोकांना गोऱ्या लोकांतून बाजूस काढण्यांत आलें, पण, युरोपांतील इंग्रजी पत्रांतून असें प्रसिद्ध करण्यांत आलें, कीं, "केवळ रंग-भेदामुळेंच तसा फरक करण्यांत आला!" *

हिंदी सैन्यांस Zossen जवळ Wuensdorf नामक एका ठिकाणीं ठेवण्यांत आलें होतें. त्यांची योग्य व्यवस्था व्हावी म्हणून अनेक क्रांतिकारक रोजच्या रोज त्यांना भेटून त्यांचा समाचार कमिटीस कळवीत असत. मुसल्मानी शिपायांच्यासाठीं जर्मन गव्हर्मेंटनें एक मशीदही बांधून दिलेली होती; त्या ठिकाणीं सर्व मुसल्मान शिपाई, प्रार्थना करीत. रजपुतांनीं एक मारुतीचें देऊळ बांधून त्याची पूजा-अर्चा चालविली होती; शीख शिपायांनीं, त्या स्थळीं आपलें एक ल्हानसें गुरुद्वारही स्थापन केलें होतें.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं, आणि एकराष्ट्रीयत्वासाठीं, क्रांतिकारक त्या सैन्यांतून प्रचार करीत. त्यांनीं शिपायांना लिहावाचावयास शिकविण्यासाठीं सैन्यांत पाठशाला स्थापन केल्या. शीख आणि रजपूत शिपाई क्रांतिकारकांच्या **'वंदेमातरम्'** शब्दानें एकमेकांशीं संभाषण करीत. हिंदूंच्या होळीच्या सणाच्या वेळीं मुसल्मान लोक हिंदूंशीं मिसळून, गाणेंबजावणें करीत; आनंदानें खात पीत; तसेंच मुसलमानांच्या सणाच्या वेळींही, रजपूत, शीख, गुरखे सर्वजण एका टेबलावर फलाहार घेत.

सहाशें शिपाई सुमारें या वेळीं कैद झालेले होते. त्यांच्यापैकीं ५०।६० जण क्षयानें मृत्युमुखीं पडले. तेव्हां जर्मन गव्हर्मेंटनें, त्यांना उष्ण देशांतून पाठवून देण्यासाठीं Roumania स रवाना करून दिलें. युद्धसमाप्तीनंतर अनेकजण स्वदेशांत परत गेले. कित्येकांना आफ्रिकेंत पाठविण्यांत आलें, असेंहि मागाहून समजलें. जर्मनींत हिंदी कैदी शिपायांना जि सुख मिळालें, तसें सुख अन्य कैदी-शिपायांपैकीं कुणालाही मिळालें नाहीं.

हिंदी सैन्यांतील अनेक हिंदू शिपायांनीं स्वातंत्र्यमंत्राची दीक्षा घेतली होती; स्वातंत्र्याची शपथ घेतली होती. त्यांच्या देशबांधवांनीं त्यांच्या मातृभूमीच्या कार्या-

---

*( 'Distinction of Colour.' )

साठीं जेव्हां त्यांना आवाहन केलें,तेव्हां अनेक हिंदूंनींच,'ओ' दिली;अनेक गुरख्या शिपायांनींही ओ दिली. परंतु पंजावच्या मुसलमान शिपायांनीं, त्या आवाहनास उत्तर दिलें नाहीं. प्रायः शंभर पठाण शिपाई तरी तुर्कस्थानांत गेले असतील; पण, पंजाबी-मुसल्मान शिपायांपैकीं, एकजणानेंही क्रांतिकारकांच्या हांकेला ओ दिली नाहीं.

---

# त्रयोदश परिच्छेद

## उपसंहार

अशा प्रकारें, हिंदुस्थानच्या इतिहासांतील 'स्वातंत्र्य-संपादना'च्या प्रयत्नांचा दुसरा अध्याय समाप्त झाला.

परंतु,

**निशाण धावो वाजोनि जाये ॥ परी ध्वनी शेष उरला राहे ॥ अर्क तपोनि अस्ता जाये ॥ तरी उबारा उरे ॥ ॥ मेघ वोळोनि वोसरे ॥ जळ अवघेचि जिरे ॥ परी भूमीं वोल थावरे ॥ तेणें पिकतीं शेतें ॥** ॥ त्याप्रमाणें, हिंदुस्थानच्या क्रांतिसमराचे प्रयत्न, १९१६ सालींच जरी हिंदुस्थानांतून विलुप्त झाले होते, तरी त्यांचा परिणाम, १९१८ सालापर्यंत बाहेर कायमच होता. बर्लिन कमिटीचें कार्य बंद होतांच, बाहेरील कार्याचीही समाप्ति झाली. परंतु स्वातंत्र्य-प्राप्तीचे प्रयत्न काय एकवेळच नष्ट होऊन गेले आहेत? स्वातंत्र्य-प्राप्तीचे प्रयत्न, एकदांच नष्ट करण्यांत येत असतात? कर्म लोप पावलें असेल,परंतु स्वातंत्र्याचे प्रयत्न काय सर्वस्वीं निष्फळच जात असतात? ते स्वातंत्र्याचे प्रयत्न काय समाजांत प्रतिफलित झालेले नाहींत? समाजानें काय आत्मत्यागाचा फल-भोग घेतलेला नाहीं? कां समाज कधीं काळीं पुढें तो घेणारच नाहीं? हें काय ऐतिहासिक सत्य नव्हे,कीं हिंदुस्थानानें ज्या तिळ तिळ राजकीय सुधारणा ( Reforms)प्राप्त करून घेतल्या, त्या क्रांतिकारकांच्या आत्मत्यागाचेंच फळ नसेल? परंतु, हें आम्ही कशास सांगावयास पाहिजे! भावीकाळचे इतिहासकारच, त्या सत्यासत्यतेचा निरपेक्षपणें विचार करतील.

१९१५-१६ सालचे राज्यक्रांतीचे प्रयत्न, हे हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक विशेष दिशा निदर्शित करात आहेत. १८५७ आणि १९१५ या दोन्ही सनांतील ऐतिहासिक घटना, हिंदुस्थानच्या क्रमविकासाच्या गतीचा निर्देश करून देतील. १८५७ मध्ये, राजे-रजवाड्यांनी आपलें आसन पुनः स्थिर करून घेण्यासाठीं, स्वातंत्र्याचे निशाण उभारून युद्ध-घोषणा केली: १९१५ सालीं, क्रांतिकारकांनीं जन्मभूमीच्या स्वातंत्र्याच्या नांवानें क्रांतियुद्धाचे प्रयत्न केले; आणि तेही पण, पूर्वीच्याप्रमाणेंच विनष्ट झाले.

१८५७ सालच्या अपयशाच्या अंतींहि भरतभूमीच्या निरनिराळ्या भागांतून, निरनिराळ्या स्वरूपांत, 'विप्लववादा' चें आंदोलन हें चालूच होतें; पर्जन्यकाल संपला असला, तरी, ठिकठिकाणीं स्वातंत्र्याचे प्रवाह वहातच होते; कुठे ल्हानशा निर्झराच्या रूपानें, कुठें जलौघाच्या स्वरूपानं, कुठें जल-प्रपातानं, तर कुठे महा-नदीच्या रूपांत; त्या प्रवाहांचें वहाणें अव्याहत चालूच होतें. कुठें ते प्रयत्न संघशः, कुठें वैयक्तिक स्वरूपांत-क्षुद्र समष्टिभावांत वा व्यष्टिभावांत-एवढाच काय तो फरक; आपल्या स्वातंत्र्याचें स्वप्न, हिंदुस्थान केव्हांच विसरून गेलेला नाहीं. गेल्या वीस वर्षांपासून अखिल हिंदुस्थानाला, एका एकीच्या मंत्रानें सूत्रबद्ध करण्याचे प्रयत्न चालू आहेत. पर्यायानें, विप्लव-मतवादाचेंच प्रतिपादन चालू आहे. स्थान आणि पात्रभेदेंकरून, स्थलविशेषानें विशेष स्वरूपांत, त्याचाच विकास होत आहे; आणि, योग्य काल येतांच ते सर्व लहानमोठे प्रवाह एकत्र होऊन जातील यांत आम्हांला कांहीं शंका वाटत नाहीं. हिंदुस्थानच्या क्रांतिकारकांच्या पुढ '**रचनात्मक कार्यक्रम**' या दिशेने तरी आणखी कोणता आदर्श होता? बर्लिनकमिटीनें, युद्धसमयीं, हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांना 'Provisional Government' संगठित करण्यासंबंधी जी एक योजना पाठविलेली होती, त्यांत तरी आणखी दुसरें काय होतें? त्या वेळीं, सर्वांचें मत असेंच होतें, कीं हिंदुस्थान हें एक Federated States म्हणजे युक्त देश होईल; अर्थात् जर्मनी-अमेरिकेप्रमाणेंच, एक राज्यघटना या देशांतहि अमलांत येईल. आणि देशांतील गव्हर्मेंट कशा प्रकारचें असावें, तसेंच तें कशा कायद्यानुसार चालावें, हें सर्वसामान्य लोकांच्या मतानेंच निर्धारित होईल असेंच त्या वेळींही पण, वाटत होतें. आणि त्यामुळेंच हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांना, आपल्या डोळ्यांपुढें अन्य आदर्श ठेवतां येणें शक्य नव्हतें.

पण ज्यांना असें वाटत होतें, ते क्रांतिकारक आज कोठें आहेत? आज अनेक-जण, आपापला गौरव करून सांगत आहेत, कीं "त्या वेळचे पुढारी आम्हींच;" "आम्हीच त्या वेळचे पुढारी!" "ते सारथि आम्हींच;" "आम्हीच अद्वितीय पुरुष ( superman )!" पण, इतके क्रांतिकारकांचे प्रयत्न होऊन, कोणता 'महापुरुष' निर्माण झाला? आणि असा कोणी महापुरुष असेल, तर तो कुठें आहे? **हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा रथ, स्वराज्याच्या राउळाच्या दिशेनें चालला आहे; हा पांडुरंगाचा रथ आहे: त्याचे भक्त स्वराज्याचे वारकरी-भक्तिभावानें तो ओढीत आहेत: त्याच्या रज्जूला जे जे हात लावितात, ते ते पुण्यवान् होत; त्यांत क्षुद्र नाहीं, बृहत् नाहीं; लहान नाहीं, मोठा नाहीं; कोणतीही एक व्यक्ति, सारथि होऊं शकत नाहीं. भक्तांची मुक्तेच्छा त्या रथास ओढीत नेते: भक्तांची पांडुरंगावरील उत्कट भक्ति, त्या रथास धुमाळीस लावते; मोक्षाचा अभिलाष-स्वातंत्र्याची स्पृहा, त्या रथास चलित करतात.**

आज हिंदुस्थानांत क्रांतीच्या ज्वाला निर्वापित झाल्या आहेत; समाजानें **'निरुपद्रव-व्रता'**चा अंगीकार केलेला आहे; **'मागील हिशेब' पडताळून पहाण्याचा हा काळ आहे.** समाज-तत्त्वासंबंधानें विचार करतांना प्रयोग होत नाहीं; प्रयोग हा नंतर होतो. किंवा, आधीं प्रयोग घडतो, आणि मग त्या संबंधींचा विचार होतो. आज, तसा विचार करणें, प्रत्येक स्वातंत्र्यमार्गी माणसाचें अवश्य कर्तव्य आहे. स्वातंत्र्यमार्गी लोकांनीं समाजाच्या या क्रमविकासाच्या गतीचें; निश्चल दृष्टि करून निरीक्षण केलें पाहिजे, १८५७ सालचे प्रयत्न कसे निष्फळ झाले; तसेंच, १९१५ सालचे प्रयत्न अंकुरावस्थेंतच कसे विनिष्ट पावले; या दोन्ही प्रश्नांचें उत्तरच भविष्यकाळच्या गतीचा निर्णय करून देणारें आहे. १८५७ सालीं, सिंहासनावरून च्युत झालेल्या राजांनीं, आपलें गेलेलें राज्य, आपले हवेंत उडवून लावलेलें सिंहासन, आपली नष्ट झालेली सत्ता, शत्रूच्या हातांतून पुनः हिसकून घेण्यासाठीं बंड केलें. इतिहासकारांचें म्हणणें, "या राजेरजवाड्यांच्या स्वातंत्र्य-युद्धाला **काडतुसांचा गोंधळ** हें एक गौण कारण होतें. आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्यासाठींच, शिपायांची धर्मांधता प्रज्वलित करून, त्याचें एक 'विशेष अस्त्र' म्हणून राजे-रजवाड्यांनीं उपयोग करून घेतला.

**१८५७ सालचे स्वातंत्र्याचे प्रयत्न** म्हणजे **अभिजात्यवर्गाचे-राजे-रजवाड्यांचे प्रयत्न.** त्यांत ' प्रतिष्ठित ' वर्गानें, किंवा सामान्य वर्गानें भाग घेतला नाहीं. फक्त अयोध्येच्या युद्धासच 'राष्ट्रीय युद्ध'म्हणून म्हणतां येईल. कारण, त्यांत सर्व जाती, सर्व धर्म, सामील झालेले होते; प्रत्येक जातीनें, त्यांत आपला भाग उचललेला होता. परंतु, तेवढ्या एका उदाहरणाखेरीज हिंदुस्थानांतील त्या वेळचा प्रतिष्ठित-शिक्षित वर्ग,त्या कार्यापासून अलिप्तच होता. खालच्या सामान्य-वर्गाचें पुढारीपण सर्वस्वीं ज्यांच्या हातांत होतें, त्या प्रतिष्ठित वर्गानें अभिजात्य वर्गाच्या कार्यास नुसती सहानुभूतीही दाखविली नाहीं. त्या वर्गांतील लोकांच्या मनांत, तेव्हां असेंच वाटत होतें, कीं" आपण या कार्यांत काय म्हणून भाग घ्यावा ? सामील कशाकरतां व्हावें ? बुद्धिबलाच्या अभावीं, हे यांचे प्रयत्न निष्फळच होणार. शिक्षित वर्ग यांत सर्वस्व अर्पण करील, तरच हें कार्य सिद्धीस जाणारें आहे. " परंतु, पुनः त्यांनीं आणखीहि असा विचार केला कीं "हें बंड कोणासाठीं ? हे प्रयत्न म्हणजे केवळ स्वतांचें राज्य, स्वतांची सत्ता, परत मिळविण्यासाठींच होत. स्वतांची सत्ता पुनः अधिकृत करण्यासाठीं, 'स्वेच्छाचारी राज्यपद्धति' पुनः अंमलांत आणण्यासाठींच, अभिजात्य-वर्गाचे हे प्रयत्न आहेत. त्या प्रयत्नांत, सामान्यवर्गाचें हित नाहीं; सामान्यवर्गाचें 'मंगल' नाहीं, " आणि म्हणूनच, अभिजात्य-वर्गाच्या स्वार्थी हेतूला, प्रतिष्ठित वर्गानें तेव्हां सहानुभूति दर्शविली नाहीं.

१८५७ सालीं, युद्धाचा वणवा शांत होतांच एक नवीनच सृष्टि दिसूं लागली. हिंदुस्थानच्या इतिहासांत, या बंडाच्या समाप्तिबरोबरच एका नवीन अध्यायाला सुरवात झाली. त्या कालांत पुरातन भारत आणि नूतन भारत यांची अंतिम आणि पहिली भेट झाली; तो एक संधिकाल ठरला. **अतीत समाजांत अभिजात्य-वर्गाचें** प्राधान्य; आणि आज, '**प्रतिष्ठित-वर्गा**'चें प्राधान्य.

५७ सालीं सिंहासनावरून जें रक्त वाहिलें, तें नदीच्या रूपानें नदीला जाऊन मिळालें. आणि त्याच रिकाम्या सिंहासनावर, आजच्या वर्तमानकाळाला अभिषिक्त करण्यांत आलें. एका युगाच्या समाप्तिकालाबरोबरच दुसऱ्या युगाची प्राणप्रतिष्ठा झाली. १८८४ सालीं "राष्ट्रीय सभा" संगठित करण्यांत आली. त्या वेळेपासून तोच वर्ग राजकारण चालवीत आहे. अनेक आर्थिक कारणांनीं रुष्ट

होऊन जाऊन तो वर्ग नोकरशाहीविरुद्ध,अनेक प्रकारच्या 'युद्ध-घोषणा'करीत आहे. सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या अतीत कालच्या अभिजात्य वर्गानें, तत्कालीन मध्यमवर्गाच्या नाना अवडंवरांस भिऊन जाऊन विजातीय शासनकर्त्यांशीं आपलें मित्रत्वाचें नातें जोडून घेतलें; आणि आपली 'बादशाही' यावत्चंद्रदिवाकरौ चालेल, अशी व्यवस्था करून घेतली. परंतु, त्याही अभिजात्यवर्गाचें, आज काय झालें? **आजचा अभिजात्यवर्ग, म्हणजे विदेशी-शासनकर्त्यांच्या हातांतलीं बाहुलीं! आज उभयवर्गाचेही स्वार्थ, एकच होऊन बसलेले आहेत.**

१८८४ पासून आजपर्यंत सामाजिक आणि राजकीय पुढारीपण प्रतिष्ठित वर्गाच्याच हातीं आहे. त्या वर्गाची धारणा अशी कीं, इंग्लंडमधील मध्यमवर्ग आणि आपण, यांत कांहींही फरक नाहीं. त्यांच्याप्रमाणेंच आपणही लढा करूं शकूं. अशा रीतीनें तिकडील मध्यम किंवा प्रतिष्ठित वर्ग, व हिंदुस्थानांतील 'प्रतिष्ठित वर्ग' या उभयतांचा आज ४० वर्षें सतत झगडा चालू आहे.या लढ्यास **'नोकरशाही विरुद्ध झगडा' 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' 'एकराष्ट्रीयत्वासाठीं प्रयत्न'** अशीं बडीं बडीं नांवें देण्यांत आलीं आहेत. कारण, **जगांत, 'राष्ट्रीयत्व' हें एक सामान्यवर्गाच्या हातांतील 'राजकीय शस्त्र' आहे.**आणि त्यासच; इकडील व्यवसायी लोकांनीं 'स्वदेश-भक्ति' असें नांव दिलें! एका दृष्टीनें पाहतां आज हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रांत गोऱ्या भांडवलवाल्याबरोबर किंवा "monied man Esqr"बरोबर हिंदुस्थानांतील **'बटवट-दला'**चें-कायदे-पंडितांचें-अथवा "Jaberjee Esqr Bar-at-law",यांचें द्वंद्व चालू आहे. कॉंग्रेसच्या आरंभापासून आजपर्यंत, ज्या ज्या जाती कॉंग्रेसच्या बाहेर आहेत, त्या त्या हेंच सांगतील; त्या जाती याच गोष्टीची साक्ष देतील. ज्यानें या समाज-तत्त्वाच्या व्यापाराचें विश्लेषण केलेलें नाहीं, व त्यांतून जो कांहींच मिळवूं शकला नाहीं, त्याची 'देशदृष्टि' हिंदुस्थानच्या राजनीतीच्या मुळाशीं अजून खोल जाऊन भिडलेलीच नाहीं, असेंच म्हणावें लागतें.

इंग्लंडमध्यें प्युरिटिन लोकांच्या बंडाच्या वेळेपासून तेथील मध्यम वर्गानें आपल्या अभिजात्यवर्गाच्या हातांतील 'शासन-यंत्र' हळू हळू आपल्या स्वतांच्या हातांत घेतलें. त्या बंडानें, इंग्लंडमधील लॉर्डांच्या आधिपत्याला 'निर्वाणप्राप्ति' करून दिली! आज ब्रिटिश-साम्राज्य हें ब्रिटिश-मध्यमवर्गाकडूनच स्वतांच्या स्वार्थानुरोधानें चालविलें जात आहे. त्या

वर्गानें हिंदुस्थानाला आपली ‘ कामधेनु ’ केलें आहे. आणि स्वतांच्या स्वार्था-साठींच, तो वर्ग तिच्या दुधाबरोबर तिच्या रक्ताचेंही पण शोषण करीत आहे; त्या शोषण-नीतीला नांवेंही पण किती सुंदर देण्यांत आलीं आहेत! “ Control of the tropics ” “White-man's Burden ” Mission of civilisation ” “ Imperial federation ” वगैरें वगैरें. परंतु, हिंदुस्थानांत नवीन शिक्षणाच्या प्रभावानें मध्यवित्तश्रेणीपासून एका नवीनच दलाची निर्मिति झाली. तें दल स्वतांस ब्रिटिश मध्यमवर्गाबरोबर समजून असें विचारूं लागलें, कीं “ परकीय लोकांनीं, काय म्हणून आमच्या देशाचें शोषण करावें ? आमच्या देशाचें शोषण करणारे, हे परकीय कोण? यांचा, आमच्याशीं काय संबंध ? **आमच्या देशांत आम्हीच राजे कां असूं नये? आमच्या देशांत आम्हीच राजे !!**” याउलट वादासच ‘ **राष्ट्रीयत्व** ’ ( nationalism ) हें नांव. अशा प्रकारें जो वाद सुरू झाला, त्या वादासच, ‘ नोकरशाहीविरुद्ध झगडा, ’ ‘ नोकरशाहीबरोबर लढा ’ असें नामाभिधान प्राप्त झालें. लिबरलपार्टी असो, असहयोगी असोत, स्वराज्यपार्टी असो, किंवा क्रांतिकारक दल असो, सर्व-जण, त्याच ऐतिहासिक अर्थनीतीच्या सिद्धान्तावर, आपापला ‘ व्यापार ’ चालवीत आहेत.

हिंदुस्थानच्या इतिहासांतच काय, पण जगाच्या इतिहासांतही जरी शोधून पाहिलें, तरी या राष्ट्रीयवादांत आणि सामाजिक नीतीमध्यें, सामान्य गरीब जातीला,-अर्थात् अर्थहीन जातीला-स्थानच नाहीं. ‘ व्यवसायी लोकांची स्वदेशभक्ति ’ म्हणजेच त्यांच्या दृष्टानें ‘ राष्ट्रीयता ’ अशी त्यांची समजूत. त्यांनीं एकीकडून ज्या प्रकारें अतीतकालच्या अभिजात्यवर्गाच्या हातांतून समाजाच्या ‘ शासना ’ चा भार काढून घेतला, त्याचप्रकारें दुसरी-कडे, अर्थविहीन गरीब जातीला निष्पीडन करून सोडलें. यासच पाश्चात्य देशांतून ‘ Class-rule ’असें म्हणण्यांत येतें. परंतु, जेव्हां निष्पीडित गरीब जाती जागी झाली, आणि स्वतांचा स्वार्थ समजूं लागली, तेव्हां, तीस **श्रेणी-ज्ञान** ‘Class-consciousness ’ आलें, असें समजण्यांत येऊं लागलें. हें श्रेणीज्ञान होतांच, गरीबवर्ग आपणास अधिकार मिळविण्यासाठीं धडपड करूं लागला. अशाप्रकारें, ‘ पीडक आणि पीडित, ’ ‘ शोषक आणि शोषित ’ असा वाद उपस्थित होऊन, त्यास ‘ Class-struggle’ चें स्वरूप प्राप्त झालें.

हा वाद जगांत नाना प्रकारांनीं चालू आहे. 'श्रेणिवादा' चा उद्देश असा कीं, समाजांतून आर्थिक असाम्यता प्रथमतः दूर करावयाची. कारण, **जोंपर्यंत समाजांत आर्थिक साम्यता प्रतिष्ठित होत नाहीं, तोंपर्यंत समाजांत अत्याचार, शोषण आणि असाम्यता, कायमच राहणार.** आधींच तो गरीबवर्ग संपत्तिविहीन; त्या अर्थी, परिवर्तन करण्यांतच त्यास अधिक लाभ. म्हणूनच, समाजाची उभारणी अर्थनीतीच्या साम्यतेवर केल्याशिवाय गरीब जातीची मुक्तता करतां येणें शक्य नाहीं. समाज जेव्हां तशी आपली उभारणी करून घेत नाहीं, किंवा, कोणी ती करीत असतां त्याच्या तो आड येतो, तेव्हां, तो वर्ग साहजिकच बंडखोर बनतो. आजपर्यंत असेच लोक बंडखोर झालेले आहेत. ज्यांना प्राचीन प्रथा, रीति, स्वार्थ, इत्यादिकांचें कसलेंच बंधन नाहीं, तेच नव्या दृष्टीनें क्रांतिकारक होऊं शकतात; जुनीं यंत्रें वितळवूं शकतात; जुनीं खोडें तोडूं शकतात; आणि मनोगताप्रमाणें नवीन सृष्टीची ते निर्मिति करूं शकतात. त्यांना क्षणांत, जग उलटें पालटें करतां येतें. आणि तेच, स्वातंत्र्याचे 'प्रेषित' होतात; क्रांतितत्वाचें बीज त्याच समाजांत रुजूं शकतें. श्रमजीविवर्ग म्हणजे त्या गुणाचें अधिष्ठान. समाज जोंपर्यंत, त्या नवीन तत्वांवर आपली उभारणी करून घेत नाहीं, तोंपर्यंत, खरी **कार्यकारी राष्ट्रशक्ति** केव्हांही त्याच वर्गाच्या हातांत रहाणार; आणि आतांही पण, ती राहिलेलीच आहे. क्रांतिकारक कार्यसंपन्न तेव्हांच होतात, कीं जेव्हां समाजांतून 'शोषक' आणि 'शोषित', 'शासक आणि 'शासित' हे नष्ट होतात.

हें झालें सामान्य मजूरवर्गाच्या राजनीतीचें दर्शनशास्त्र. परंतु, हिंदुस्थानांत आज काय स्थिति आहे? हिंदुस्थानांत, आज काय होत आहे? हिंदुस्थानचा 'प्रतिष्ठित वर्ग', राजकीय सत्ता आपल्या हातांत घेऊं इच्छितो; पण, प्रत्येक पाऊल कायद्याच्या मर्यादेंत टाकून! **सिंहाच्या दाढेंत बसून, आंतून त्याचे दांत पद्धतशीर रीतीनें मोजून पाडण्याची, त्या वर्गास उत्कट इच्छा!** परंतु, तो मार्ग फलदायक नाहीं असें वाटून, ज्यांनीं शस्त्राचा आश्रय घेतला ते 'बंडखोर' ठरले. 'प्रतिष्ठित वर्गा' च्या सामाजिक वा आर्थनीतिक आदर्शाशीं, हिंदी क्रांतिकारकांचा कसलाच केव्हांही विरोध नाहीं. क्रांतिकारकांनीं शस्त्राचा आश्रय घेऊन 'राज्ययंत्र' ताब्यांत मिळविण्याचे प्रयत्न केले. आणि ते त्यांचे प्रयत्न, अंकुर-स्थितींतच नष्ट करण्यांत आले.

हिंदुस्थानांतील क्रांतिवाद, त्याची उत्पत्ति, त्या कार्याची प्रणालि यांवरून असेंच दिसून येतें, कीं सामान्यवर्गापासून क्रांतिकारक हे अगदींच दूर होते. सामान्यवर्गाला-अर्थात् श्रमाजीविवर्गाला-त्यांनीं आपल्यांत घेतलें नाहीं. सदस्यांशिवाय सामान्यवर्गाच्या हृदयांत, क्रांतिकारकांना ठावच मिळाला नाहीं. क्रांतिकारकांची सर्वांची अशीच एक समजूत, कीं एकदां साहस करून क्रांतियुद्धाचें —'विप्लवा'चें निशाण उभारलें, तर अनेकजण त्या निशाणाखालीं जमा होतील. आणि अशा रीतीनें, आपलें सैन्य वाढतच जाईल.कारण, प्राच्य भूखंडांत, बंड, हल्ले, व राजकीय ध्वंस तशाच प्रकारें सिद्धीस नेलेले आहेत. क्रांतियुगाच्या पूर्वारंभीं, पुढाऱ्यांकडून असें सांगण्यांत येत असे,कीं "अमुक अमुक महाराज , अमुक अमुक संस्थानिक, अमुक राजेरजवाडे," योग्य संधी येतांच आपणांस सामील होणार आहेत; आपणांस येऊन मिळणार आहेत. आणि एकदां धामधूम सुरू झाली कीं, सामान्य लोक 'हर हर महादेव' म्हणून शत्रूवर तुटून पडतील; हीच विप्लव-मतवाद्यांची मूळ कल्पना. परंतु, जगद्व्यापी महायुद्धाच्या वेळीं क्रांतिकारकांना जी सुविधा प्राप्त झालेली होती, जी संधी अनायासें आलेली होती, तशी सुवर्णसंधी काय वारंवार पुनः येत असते? तशी संधी, केव्हांतरी शंभर वर्षांनीं एकदांच येते. तसा पर्वकाल येण्यास, तसेच योगायोग असावे लागतात. जर्मनी आपलीं शस्त्रास्त्रें जरूर तर अर्थसहाय्य, आणि सैनिकहि देण्यास पुढें आला; तुर्कस्थानचा सुल्तान—जो सर्व **मुसलमानी जगाचा खलिफा**,—त्यानें इंग्रजांच्या विरुद्ध जेहादची घोषणा केली; तसेंच, हिंदु-मुसलमानांनीं एक होऊन यावेळीं '**राष्ट्रीय समर**' करावें म्हणून, तुर्कांच्या शेख-उल्-इस्लामनें, सर्व तुर्की जगाला आज्ञा दिली; चारी दिशांकडून अन्यान्य देशांतील क्रांतिकारक सहानुभूति दाखवूं लागले; अशा प्रकारचा योगायोग काय, पुनःपुनः येत असतो? तसा तो महा 'क्षण' एकदांच येतो. आणि त्याचवेळीं, साधन करावें लागतें. तरच, मोक्ष मिळवितां येतो; अथवा, पृथ्वीचें राज्यहि पण भोगतां येतें. त्या वेळच्या सर्व स्थितीचा विचार करून, मनाला असेंच वाटतें, कीं तशीं साधनें प्राप्त होणें कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. अन्य देशांतून ज्या ज्या राज्यक्रांत्या झाल्या, त्या त्या राज्यक्रांतींच्या वेळींही, अशीं साधनें कोणाला मिळवितां आलीं नाहींत. एवढें करून कांहींच झालें नाहीं, असें कसें होईल? कांहींना कांहीं तरी झालेंच.

महायुद्धाच्या वेळीं, हिंदुस्थानांत क्रांति-कार्यास हवें तितकें क्षेत्र होतें; इंग्रेजी

आणि देशी सैन्यें, बहुतेक सर्व बाहेर निघून गेलेलीं होतीं. त्या समयीं, क्रांतिकारकांना अस्त्र धारण करून देशांत धामधूम करतां आली असती. बाहेरून एक हत्यारें आलीं नाहींत, - पोंचलीं नाहींत, - तरी, देशांत त्यावेळीं हत्यारें नव्हतींच काय? परंतु, नुसतीं हत्यारें असून काय उपयोग! तीं स्वतः उठून थोडींच युद्ध करूं शकणार आहेत? लोकांचे हात, त्या वेळीं दुसऱ्या कोणत्या उद्योगांत गुंतले होते बरें?

क्रांतिकारकांना असें दृढपणें वाटत होतें, कीं झेंडा उभारतांच त्याच्या तळीं, मातृभूमीच्या मुक्ततेसाठीं तिचे हजारो पुत्र धावून येतील! जें जें त्यांच्या हातांत असेल, तें तें, ते घेऊन येतील; स्त्रिया, रणांत जाऊं म्हणतील; मुलें हातांतला खाऊं टाकून देतील; आणि तीं आपल्या आईला विचारूं लागतील, कीं "आई, तूं **का अबला**?" पण, १५ सालीं, त्या आशेचा भंग झाला. क्रांतिकारकांची ती समजूत चिरकालिक खोटी ठरली. भूतकाळ त्यांना एकवेळ विश्वास देऊन गेला होता, पण भविष्यत्काल, भूतकालाचें कार्य करण्यास थोडाच बांधला गेलेला आहे? शिवाय, त्यांना असेंही वाटत होतें, कीं जेहादची घोषणा होण्यानें पृथ्वीवरील सर्व मुसलमान, क्रोधानें खवळून जाऊन काफरचा विनाश करतील; परंतु, तीही त्यांची आशा, या जगांतून एकदम निघून गेली. वनवासांतील त्या नवीन धर्माच्या बालकोच ते दोन्ही हात, कापले गेले! ज्यांच्या सहाय्यानें आकाशांत भराऱ्या मारावयाच्या, ते त्यांचे देहिकडचे दोनहि पंख, जमिनीवर गळून पडले! नावाड्याचा ज्याच्यावर सर्वस्वीभर, तीं त्यांच्या हातांतलीं दोन्हीं वल्हीं, कोणी महाकालानें काढून घेतलीं! युद्धाच्या समयीं असें दिसून आलें, कीं राजेरजवाड्यांचें दळ, साम्राज्य वांचविण्यासाठीं इंग्रजांस जाऊन मिळालें! आणि 'प्रतिष्ठित वर्ग' अथवा मध्यमवर्ग, जो इतके दिवस सरकारबरोबर 'ख्यां ख्यां' करीत होता, आणि 'हां हूं करीत होता, त्यानें, एका नवीनच मार्गाचें-अवलंबन केलें. ज्यांनीं इतके दिवस हिंदुस्थानच्या उद्धाराची तोंडानें वटवट चालविली होती, त्यांनीं स्वार्थत्यागाची आणि आत्मत्यागाची वेळ येतांच, चटकन आपलें पाऊल मागें घेतलें. आणि, इंग्रजांस तन-मन-धन-सहाय्य केलें. इतकी सोन्याची संधी कालानें त्यांच्या पुढ्यांत आणून देऊनही, त्या संधीचा त्यांना उपयोग करतां आला नाहीं; इंग्रेज-विद्वेषाचें निशाण त्यांना उभारतां आलें नाहीं; उलट, आपली इंग्रजावरील राजनिष्ठा प्रकट करून, गव्हर्मेंटला त्यांनीं मदतच केली. राष्ट्रीय पक्षाचे त्या वेळचे जे प्रमुख पुढारी लोकमान्य टिळक, त्यांनींही,

गव्हर्मेंटबरोबर चालविलेला आपला लढा मिटता घेतला. इतकेंच नव्हे तर, बाहेरच्या इंग्रजांच्या शत्रूंस असें दाखवून दिलें, कीं इंग्रजांबरोबर, आम्हां हिंदी लोकांचा कसलाच लढा नाहीं; कसलाच झगडा नाहीं; कसलेंच भांडण नाहीं. इंग्रजांचें ' साम्राज्य ' वांचविण्यासाठीं, हें पहा आम्ही हिंदी लोक, इंग्रजांना मनोभावें साह्य करीत आहोंत! आणि अशा रीतीनें, त्या वेळीं देशांतील " **आत्मकलह** " तसाच चालू ठेवला. रावसाहेब, रावबहादूरदलाला असें वाटलें, कीं इंग्रजांच्या पायांला या वेळीं आपण खूप लोणी चोळून, रगडून ते कोमल पाय मऊ केले, तर आपणास कांहींतरी " खुषी " ही खास मिळणारच; आणि ती ' खुशाली ' म्हणजे, खास खास आपलें होमरूलच असणार! तो राजभक्तीचा उमाळा येतांच, दोघांनींही खालच्या वर्गाकडे पाहिलें; आणि त्यांना, हायसें वाटलें! नाना मार्गांनीं, त्यांनीं त्या हातभाग्य, दरिद्री, मुक्या, गरीब जातीला इंग्रजाचें साम्राज्य वांचविण्यासाठीं ' **रिक्रूट** भरती ' करून खुशाल मृत्युमुखांत पाठवून दिलें, आणि स्वतःस, इंग्रजांकडून मोठमोठे किताब, मोठमोठ्या पदव्या मिळवून घेतल्या; प्रसाद मिळवून घेतला ! मृत्यूच्या त्या अज्ञात प्रदेशांत गेल्यावर, त्या गरीब बिचाऱ्या शिपायांनीं काय पाहिलें? मृत्यू, त्यांची वाट पहातच बसला होता! त्या गरीब शिपायांची, त्या वेळीं तिकडे काय अवस्था झाली होती त्याची आजपर्यंत कोणी चौकशी तरी केली आहे काय? जर्मन-सैन्य म्हणे, " अरे, **हें पहा आपल्या तोफांचें खाद्य** ' Canonen Futter , **आलें** ! " ज्यांनीं युरोपांत व तुर्कस्थानांत त्या हतभागी लोकांचें दर्शन घेतलें असेल, ज्यांनीं ज्यांनीं त्यांची ती करुण स्थिति त्या वेळीं आपल्या डोळ्यांनीं समक्ष अवलोकन केली असेल, तेच एक जाणूं शकतील, कीं ते हिंदी शिपाई आपापल्या राजांना, आपापल्या संस्थानिकांना किती शिव्याशाप देत होते! स्वजातीचा स्वार्थ म्हणजे काय असतो, हें तेच एक जाणूं शकतील. त्या हतभाग्य जातीची, इंग्रज आणि हिंदी लोकांच्या स्वार्थाच्या होमकुंडांत आहुति पडली. इंग्रजांनीं आणि हिंदी शिपायांच्या हिंदी बांधवांनीं, जर्मनच्या युद्धांत त्या गरीब जातीचें बलिदान करून, स्वतःस मोठेपणा व प्रतिष्ठितपणा प्राप्त करून घेतला. परक्यांचें साम्राज्य वांचविण्यासाठीं, गरीब देशबांधवांना मृत्यूच्या पुढें करून प्रतिष्ठित वर्गानें स्वार्थ साधला. आज इंग्रजांच्या नावानें ओरडणाऱ्या प्रतिष्ठितांनीं, त्या वेळीं ' इंग्रजांचा जय होवो' म्हणून प्रचंड सभा भरविल्या; दरबार

भरविले; महादेवाला अभिषेक केले; आपल्या मुलांना खाऊ मिळाला नाहीं, पदकें मिळालीं नाहींत, म्हणून दुःख मानलें. त्या वेळीं त्यांचे देशबांधव, मातृभूमीच्या शृंखला तोडून टाकण्यासाठीं किती प्रयास करीत होते, याची त्यांना कल्पना देखील आली नाहीं.; मग सहानुभूति दाखविण्याची गोष्ट तर दूरच ! त्या वेळीं, आजच्या कोणत्या पुढाऱ्यानें आपल्या आईच्या दीन दशेकडे पाहिलें ? कोणत्या पुत्रानें आपल्या आईचें मंगल इच्छिलें ? पण, त्यांत काय नवल. ज्या गुलामांच्या टोळक्यांनीं, आपल्या देहाबरोबर आपला आत्माही परकियांना विकून टाकला, त्यांना ‘स्वातंत्र्या’ चें अस्तित्वच आधीं कोठून मान्य असणार !

ही झाली युद्धाच्या वेळची राष्ट्राची क्रांतियुद्धाची स्वयंस्फूर्ति; आणि स्वातंत्र्याची तळमळ ! तेव्हां, “बंड” करण्यास राहतां राहिले बंगाली तरुण; आणि अमेरिकेहून परत आलेले पंजाबमधील शीख मजुरांचें दळ. बाकी ‘काकस्य परिवेदना !’ तशा सुयोगाच्या त्या महा क्षणीं, देशानें स्वातंत्र्याची इच्छा केली नाहीं; स्वातंत्र्यप्राप्तीचा संकल्प केला नाहीं; केवळ, देशांतील कांहीं व्यक्ति, देशांतील आणि विदेशांतील क्रांतिकारक, आणि गुप्त समितींचे सदस्य, हेच उठले. परंतु त्यांच्या स्वदेशांतून त्यांना कांहींही साहाय्य झालें नाहीं. हिंदी क्रांतिवाद्यांची महत्त्वाची समस्या येथेंच आहे; येथेंच त्यांचा खटका उडतो, कीं, देशानें काय म्हणून त्यांना साहाय्य केलें नाहीं ? या प्रश्नाचीं दोन उत्तरें देतां येण्यासारखीं आहेत.

पूर्वींच सांगितलें आहे,की ‘क्रांतिवादा’नें सर्वसामान्य जनतेच्या हृदयांत आपलें मूळ धरलें नाहीं. देशांतील सर्वसामान्य जनतेला स्वातंत्रवादाचें मर्मही समजूं शकलें नाहीं: आणि म्हणूनच, क्रांतिकारकांशीं त्यांनीं सहानुभूतिही दाखविली नाहीं. श्री. **सचींद्रनाथ संन्याल** एके ठिकाणीं लिहितात;–“**हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांची हिंदवासियांच्या कडून सदोदित उपेक्षाच झाली.** क्रांतिकारकांच्या कपाळावर-त्यांच्याच देशबांधवांनीं-दगडावर दगड हाणून त्यांच्या अदृष्टाचें चूर्ण चूर्ण करून टाकिलें. इतकी त्यांची अवज्ञा, त्यांनीं कोणाजवळूनही आजपर्यंत करून घेतलेली नाहीं. इतका त्यांचा अवमान, आणखी अन्य कोणाकडूनही कधीं झालेला नाहीं.” नविन **किशोरगुह** यांनींही एके ठिकाणीं असेंच म्हटलें आहे, कीं “आम्हांस, कोठूनही फारशी सहानुभूति मिळाली नाहीं.” या दोन्ही उक्ती ऐतिहासिक सत्याची साक्ष देतील. पृथ्वीवर गुलामगिरींत खिचपत

पडलेल्या, आणि त्यांतून मुक्ततेचे प्रयास करणाऱ्या कोणत्याही राष्ट्रांना, त्यांच्या स्वदेशांतून सर्वसामान्यांकडून सहाय्य आणि सहानुभूतिच जेव्हां तेव्हां मिळत गेलेली आहे. ज्या देशांत सर्वसामान्य लोक, त्या महाप्रयासांत सहाय्य करीत नाहींत, त्या देशांत मुक्तिचाही पण उपाय नसतो. **ज्या देशांत अग्नीच नाहीं, त्या देशांत सर्पण नेऊन देऊन तरी काय उपयोग होणार होता? हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें कांहीं कांहीं जातिविशिष्ट कर्में ठरून गेलेलीं आहेत, त्याचप्रमाणें राजकारणही एका विशिष्टवर्गाचें-विशिष्ट जातीचेंच कर्तव्य ठरून गेलेलें आहे.** आणि त्यामध्यें क्रांतिकारक आणि क्रांतिकारकांचा मार्ग, म्हणजे 'अस्पृश्य' आणि 'अस्पृश्यतेचा व्यापार'!! सोवळ्या राजकारणांत त्यांचा विटाळ कसा चालेल! आणि यामुळेंच, सामान्य जनसमाजाकडून त्यांस कधींही सहानुभूति दाखविली गेली नाहीं.

खरी गोष्ट हीच; **आमच्या देशांत "मनुष्यत्वा" च्या हिशेबानें मनुष्यजात जितकी अधःपतित, तितकी ती पृथ्वीच्या पाठीवर अन्यत्र कोणत्याही देशांत अधःपतित नाहीं.** जगांतील अनेक देशांतून परिभ्रमण करून आम्हाला हेंच मिळालें आहे, कीं **हिंदुस्थानचे लोक जितके मनुष्यत्वविहीन झाले आहेत; अन्यान्य देशांतून तो प्रकारच नाहीं.** हिंदुस्थानांतील सर्वसामान्य जनतेनें तर केव्हांच स्वातंत्र्यभोग घेतलेला नाहीं. अर्थात्, क्रांतिकारकांनीं स्वातंत्र्याचा उच्चार करतांच, ती मुकी जनता अकस्मात् आपली चेतनाशक्ति कोठून प्रदर्शित करील! **हिंदी मनुष्य, जन्मापासून मृत्यूपर्यंत, गुलाम!** त्याचें जीवन, सगळीकडून पराधीनतेच्या शृंखलांनीं आबद्ध. कोठून कशाप्रकारें, तो स्वातंत्र्याचा आस्वाद घेऊं शकेल! नदनंतर हिंदू जीवित, कर्मविभाग-जन्म-जातिभेद यांच्या द्वारां जिकडून तिकडून बंद! Water tight compartment मध्यें तें विभक्त! एका वर्गाचे वा विभागाचे, वा जातीचे लोक, आपल्या वर्तुळाच्या बाहेरील लोकांशीं आत्मभावानें पहात नाहींत; आपलेपणानें पहात नाहींत. त्यांच्यांत, जणुं कांहीं कसलेंच नातें नाहीं, बंधन नाहीं. एकाचें दुसऱ्यांशीं, कांहींच कर्तव्य नाहीं! जणुं कांहीं, कोटी जन्मांचें जातीजातींशीं वैर-वैमनस्य! कोटी जन्मांचा सूड घेण्याची त्यांची प्रवृत्ति! त्या लोकांचा विचार असा, कीं "**तें बंड, आणि ती क्रांति, ते तरुण जाणोत आणि पोलीस जाणोत! ज्याचें कर्म, त्यानें आपलें**

**पाहून घ्यावें**! " जणुं कांहीं, केवळ त्यांचा स्वतःचाच त्यांत नाश ! ! ते लोक, ओठांतल्या ओठांत बोलत,—" **पोरांनीं सगळें करून टाकलें आहे; आतां कांहीं आम्हांला करावयाचें असें त्यांनीं बाकीच ठेवलेलें नाहीं ! ! पोरें करताहेत, तें बेश करिताहेत ! !** " परंतु त्या 'Passive sympathy' नें देशाचा स्वातंत्र्यमार्ग मोकळा झाला नाहीं, समाजाचें नेतृत्व पत्करलेल्या व्यक्ति, नाना कारणांमुळें स्वातंत्र्य–मार्गास येऊन मिळूं शकल्या नाहींत. किंवा, त्या येतां येणेंहि पण शक्य नव्हतें. त्यामुळेंहि समाजास स्फूर्तिलाभ होऊं शकला नाहीं.

**दुसरें उत्तर**—क्रांतिकार्य हें गुप्तसमितींतूनच आबद्ध झालेलें होतें. सामान्य लोकांना, अथवा सामान्य जनसमूहाला, केव्हांहीं, कोणिही ती स्वातंत्र्याची वार्ता पोचविली नाहीं. कोणीहि, केव्हांही, त्यांचे डोळे उन्मीलित केले नाहींत. आणि याचमुळें, तेही पण स्वदेशाच्या स्वाधीनतेच्या प्रयत्नांत निर्गुण–निराकार राहिले.

**मनुष्यसमाज, नाना श्रेणींतून विभक्त. त्याचा स्वार्थही पण विभिन्न विभिन्न. आणि त्याच विभिन्न स्वार्थाच्या दृष्टीनें, तो जगाकडे पहात असतो.** आम्ही पूर्वीपासूनच हें पहात आलो आहोंत, **कीं राजेरजवाड्यांचा स्वार्थ, आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें नाहीं; कारण, ते आतां पूर्णपणें जाणून आहेत, कीं 'स्वतंत्र हिंदुस्थानांत' त्यांना यापुढें स्थानच नाहीं.** हिंदुस्थान स्वतंत्र होण्यांत, प्रतिष्ठित वर्गाचाच आतां स्वार्थ. तेव्हां, त्या वर्गाचे लोकहि शिपाई होऊन लढाई करणार नव्हते. किंवा आत्मत्यागही पण ते करूं शकणार नव्हते. स्वतांचा स्वार्थ गमावून बसण्यास त्यांच्यापैकीं कोणीच राजी होणारें नव्हते. जर क्रांतिकारक कृतकार्य झाले असते, आपल्या कार्यांत यश मिळवितें, तर सर्वांनीं त्याचा फलभोग मात्र अवश्य घेतला असता, यांत शंकाच नाहीं. **परंतु, हिंदुस्थानांतील प्रतिष्ठित वर्गाला विनाक्लेशें आणि विनात्यागें, कोणी स्वातंत्र्य देत असेल तर तें त्यांना जरूर पाहिजे आहे** ! व त्याचमुळें, त्या महा क्षणाच्या वेळीं त्यांनीं **राजनिष्ठेचें एक नवीनच 'राजकारण'** लढविलें ! राजनिष्ठा दाखवून, आपल्या मुत्सद्देगिरीचें आणि देशाभिमान-शून्यतेचें, इंग्रजांस त्यांनीं प्रदर्शन

केलें ! आशा कीं, युद्धावसानानंतर स्वराज्य मिळेल ! बाकी राहतां राहिला, गरीबवर्ग, त्यानेंही क्रांतिकारकांच्या कार्यांत सहाय्य केलें नाहीं. आणि त्या गरीब वर्गानें तरी, त्या वेळीं क्रांतिकारकांना काय म्हणून सहाय्य करावें ? क्रांतिकारकांनीं, त्या गरीब मुक्या वर्गाला, कधीं आपल्याजवळ घेतलेलें होतें काय ? क्रांतिकारक हे प्रतिष्ठित वर्गाला–**रावसाहेब रावबहादुर** दलालाच सदैव भजत राहिले. गरीब जातीला अर्थात कूली–मजूर–शेतकरीवर्गाला. त्या ' रावसाहेब-राव बहादूर क्रांतिकारकांनीं' कधींहि हांक मारली नाहीं. कधींहि, त्यांची त्यांनीं आपणांशीं ओळख करून घेतली नाहीं. अर्थात, तेहि पण क्रांतिकारकांना येऊन मिळाले नसतील तर त्यांत काय आश्चर्य ? आणि ज्यावेळीं, ते प्रतिष्ठित बडे क्रांतिकारक पडद्याआड गुप्त झाले, तेव्हां जिकडे तिकडे सर्व शून्य होऊन गेले. पंजाबच्या गदर पार्टीचे लोक--हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-कार्यांत पडलेला जो मजूरवर्ग, तोही अमेरिकेंतून परत आल्यानंतर, हळू हळू पडद्याआड होऊं लागला. तो गरीबवर्ग बाहेर असतां, तर त्यानें ' काका मामा 'स तरी बोलावले असतें. पण त्याही कामीं क्रांतिकारकांना विधि विमुख झाला. पंजाबच्या गदरपार्टींतलि त्या गरीब मजूरदलानें एक वेळ इंग्लिश गव्हर्मेंटला जें सळो कीं पळो करून सोडलें होतें, तें इंग्लिश गव्हर्मेंट कधींहि विसरूं शकणार नाहीं.

हें झालें १९१५-१६ च्या विप्लव-प्रयत्नांच्या मनस्तत्वाचें विश्लेषण. "बाहेरून शस्त्रें येऊं शकलीं नाहींत, म्हणून वैप्लविक प्रयत्न निष्फळ झाले" हें ऐतिहासिक कारण कदाचित् खरें असेल. परंतु, ते कांहीं समाजाच्या मनाचें पृथक्करण नव्हे. खरें कारण, देशांतील सर्वसामान्य जनता, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याविषयीं उदासीन–निरपेक्षच राहिली; क्रांतिकारकांचे प्रयत्न, त्यांच्याकडून उपेक्षिले गेले. देशांतील जे जे पुढारी त्या वेळपर्यंत तरुणांच्या पाठीशीं होते–त्यांच्या पाठीवर थाप मारून कार्य करण्यास त्यांना उत्तेजन देत होते–त्यांनीं, प्रत्यक्ष शिर खालीं उतरून ठेवण्याचा प्रसंग येतांच, आपलें तोंड लपवून घेतल. त्या वेळीं, ते लोक एक नवीनच राग गाऊन दाखवूं लागले ! दृष्टान्त म्हणूनच सांगावयाचें झाल्यास, लोकमान्य टिळकच. जनतेवर त्यांचें असाधारण वजन होतें. परंतु युद्ध सुरू होतांच त्यांनींहि गव्हर्मेंटच्या सुराबरोबर आपला सूर मिळवून दिला. बर्लिनकमिटीनें त्यांच्याकडे आपले लोकही पाठवून दिलेले होते. पण त्यांनीं कांहींही केलें नाहीं. १९१९ सालीं जेव्हां ते लंडनमध्यें होते, तेव्हां कमिटीच्या कित्येक लोकांनीं

त्यांची समक्ष भेट घेतली. आणि ते स्वतः होऊनच लोकमान्यांना बोलले, "**तिलक महाराज**, कमिटी म्हणते आहे कीं, ' या क्षणीं, आपण खूपच जोरानें काम चालवावें; " त्यांनीं उत्तर दिलें " हे पहा कमिटीनें प्रेरीत केलेले लोक मजकडे येऊन गेलेले आहेत; बर्लिनला तो कोण आहे ना ? त्याला म्हणावें ' हाच एक समय आहे. '—तापलें आहे तोंपर्यंतच घण घाल !" (" Strike the iron, while it is hot ! " )

परंतु वर्षानंतरच, कोणी एक महाराष्ट्रीय क्रांतिकारक, छद्मवेषानें हिंदुस्थानांत जाऊन त्यानें आपल्या स्नेह्यामार्फत त्यांच्याजवळ पुनः चौकशी केली. तेव्हां टिळक व्यंग्योक्तीनें बोलले.–" **आतां तूं रशियांत जाऊन शस्त्रसहाय्य मिळतें आहे का पहा** ! आतां तूं एकदा रशियाची प्रार्थना करून ये ! "

तदनंतर, पुनः काँग्रेसच्या एका मोठ्या पुढाऱ्याकडून आम्हाला असें समजलें, कीं "विलायतेहून परत येऊन, लोकमान्य टिळक वारंवार असे उद्गार काढीत होते, कीं ' युद्धाच्या वेळीं इंग्रजसरकार इतकें लुलेपांगळें होऊन पडेल असें जर मला आधीं कळतें, तर तसें वर्तन, मीं कधींच केलें नसतें ! " परंतु, यालाच म्हणतात " चोर पळून गेल्यावर बुद्धि सचणें ! " चोर निघून गेल्यावर, बुद्धि सुचून काय करावयाचें होतें ! " लोखंड जेव्हां तापलें होतें ", तेव्हां तुमच्या हातून घणही उचलणें झालें नाहीं. प्रत्यक्ष प्रसंगाच्या वेळीं, ' नेते लोक बाजूला सरले; आणि बिचारे मारले गेले गरीब क्रांतिकारक-दळ; आणि उत्साही तरुण विद्यार्थी आणि युद्धानंतर ' होमरूल मिळत नाहीं असें पाहतांच, मोठ्या रागानें आणि अभिमानानें ' प्रतिष्ठित ' असहयोगाचें आंदोलन करूं लागले ! कारण, अकस्मात् त्यांनीं शोध लावला; कीं " इंग्रजांचें गव्हर्मेंट, म्हणजे सैतानाचें गव्हर्मेंट ! " ( " Satanic Government ! " )

**यासाठींच आम्ही म्हटलें, कीं स्वातंत्र्याच्या प्रयत्नाच्या वेळीं प्रतिष्ठितवर्ग ' प्रतिकारा ' साठीं आला नाहीं; किंवा, पुढेंहि पण तो येणारहि नाहीं. ते लोक, ' अध्यात्मिक स्वराज्या ' साठीं–' होमरूल 'साठीं पुढें होऊन आपला हक्क, सांगतील; पण, 'स्वातंत्र्या' साठीं, ते कधींही आपला हक्क सांगणार नाहींत ! कारण, स्वातंत्र्य हें कांहीं फुका मिळत नसतें त्याला त्याच्या मोलानेंच किंमत द्यावी लागते ; त्याच्यासाठीं फारच मोठी तयारी करावी**

**लागत असते.** आणि अजूनही, त्यांना असेंच वाटत आहे, कीं इंग्रजांबरोबरचा झगडा आतां लौकरच मिटून जाणार. कारण, त्या लोकांच्या राजनीतीचा आदर्श, म्हणजे " राऊंड टेबल कॉन्फरन्स ( Round table Conference ) ! " एका गोल वाटोळ्या टेबलाच्या भोंवतीं बसून, ब्रिटिशांच्या प्रतिष्ठित वर्गाच्या प्रतिनिधींशीं, आपलें प्राणमन खुलें करून त्यांच्या कानांत गुजगोष्टी करावयाच्या ! " **हिंदुस्थानच्या संपत्तीचा वांटा** ( " Sources and instruments of production ") **तुम्ही आम्ही समसमान वांटून घेऊं** " म्हणून एकमेकांनीं कायमचा बंदोबस्त करून घ्यावयाचा ! समसमान संपत्तीचा वांटा, हेंच **आमच्या देशाच्या राजकीय मुत्सद्यांचें ध्येय.** समसमान नाहीं दिलें, तरी, ' **काय देतां तें द्या, तेवढेंच सई !"** असेंहि म्हणण्याची खिसे झाडून त्या वर्गाची पूर्ण तयारी ! हिंदुस्थानच्या क्रमविकासाच्या इतिहासांत, आजपर्यंत प्रतिष्ठितवर्गच सामान्यवर्गाच्या मुखस्थानीं आहे. पण, त्या लोकांनाहि ' क्रांतिकारक ' म्हणून म्हणतां येत नाहीं. त्यांच्यापैकीं जे एकेकाळीं क्रांतिकारक चळवळीचा पुरस्कार करीत होते-व्याख्यानांची एकवेळ झोड उठवून देत होते,-त्यांनीं आज आपला रंग बदलला आहे. त्यांनीं आज **' प्रागतिक पक्ष '**, **'असहयोगाची चळवळ '**, **'रक्तहीन क्रांतिकारक चळवळ'**, **'प्रतियोगी सहकारिता'** असे ' राजकारण ' म्हणून **निरनिराळे बुरखे** घेतलेले आहेत. तरुण क्रांतिकारकांनीं जेव्हां त्यांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत आवाहन केलें, तेव्हां त्यांनीं आपलें मत बदललें असल्याचें सांगितलें ! त्यांचा दिल बदलला, पोषाक बदलला; त्यांचें तें ' हिंदी मन ' सुद्धां बदलून गेलें. कारण, तरुणांना ते त्यापुढें तसेंच किती दिवस ठकवत राहाणार ? त्यांना तसें बदलणेंच भाग होतें. **' खुर्चीवरचें राजकारण ' हेंच त्यांचें मूलतः जेथें खरोखरी ध्येय,** तेथें खुर्चीवरून उठून गरिबांच्या दारांशीं कोण जाणार ! मग विप्लवाच्या, आणि हातीं शस्त्र धरण्याच्या गोष्टी, तर दूरच ! **खुर्चीवरचें राजकारण, हेंच त्यांचें आदि आणि अंतीं, खरें खरें ध्येय** !

हिंदुस्थानच्या पूर्वीच्या राजकारणांत, कधींकाळीं मजुरांनीं-श्रमजीविवर्गानें भागच घेतलेला नाहीं. असहयोगाच्या चळवळीच्या वेळीं त्यानें जी ' ओ ' दिली, ती केवळ गरीबवर्गांत थोडीबहुत जागृति झाली म्हणूनच. पण त्या

गरीब वर्गाला, धर्माच्या नांवावर हाक मारण्यांत आलें. त्या गरीब जातीला, **माणुसकीचे हक्क-माणुसकीचे अधिकार** देण्यासाठीं आवाहन करण्यांत आलें नाहीं. धर्मभोळ्या हिंदी गरीब जाति-समूहांची केवळ धर्मांधताच उत्तेजित करण्यांत आली. त्यांना ठराविक दिवशीं ठराविक घटकेस, 'स्वराज्यप्राप्ती' च आश्वासन देण्यांत आलें. सर्वांना असें वाटलें, कीं "आतां काय, आपल्या हातांत आकाशाचें फळच आलें!" त्या लोकांना मनुष्याच्या अधिकारांची ('Rights of man') जाणीव दिली गेली नाहीं. स्वराज्यांत त्यांची काय उन्नति होईल, आणि ते, कोणतें स्थान प्राप्त करून घेऊं शकतील, हें त्यांना सांगितलें गेलें नाहीं. समाजांतील त्यांचे हक्क, त्यांना पूर्णपणें मिळवून देण्याचें न सांगतां, केवळ धर्मांधता चेतवून, इंग्रजांच्या राज्ययंत्राचा '**चक्काचूर**' उडवून देण्याचा त्यांनीं बेत केला! अज्ञ लोकांना क्षोभवून विदेशी राज्यकर्त्यांच्या हातांतील '**शासनयंत्र**' आपल्या हातांत घेण्याची, त्यांनीं तेव्हां उत्कट इच्छा प्रदर्शित केली! हिंदुस्थानांतील निरक्षर-अज्ञ जनतेंत, कार्यकारीशक्ति तेव्हां कांहीं काळ उत्पन्न झालेली होती आणि ती क्षणभर टिकलीहि, ही गोष्ट खरी. परंतु त्यांत मूलतःच स्थिरत्व नव्हतें. त्यांच्यांत माणुसकीच्या हक्कांचें बीजारोपणच केलें गेलें नाहीं. जेहादच्या आवाहनास मुसल्मान जातीनें-सर्वांनीं ओ दिली नाहीं आणि हिंदुस्थानांतील धर्माच्या नांवावर वाजविलें जाणारें हिंदी राजकारणाचें ढोलें, अखेरीस फूटून गेलें! **धर्माच्या नांवावर राजकारण साधूं पाहणें शक्य नाहीं. राजकारणाला धर्म नाहीं. आणि जेव्हां जेव्हां धर्माच्या नांवावर-धर्मांधता चेतवून, राजकीय उद्देश साधण्याचे प्रयत्न होत असतात, तेव्हां तेव्हां त्याचें अत्यंत कटु फल कित्येक काळपर्यंत समाजास भोगावें लागतें.**

'स्वातंत्र्य' हें कधीं नुसत्या आरडाओरडीनें मिळणारें नाहीं. नाहींतर पिंजऱ्यांतल्या पशूंनीं त केव्हांच मिळवून घेतलें असतें. नाना प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक कारणसमूहांनीं जी शक्ति निर्माण होते, तिलाच योग्य दिशेनें परिचालना दिल्यानें, स्वातंत्र्याचा खरा मार्ग सांपडत असतो. आमची अशी पूर्ण समजूत होऊन चुकली आहे, कीं **हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीचा पाया, सामाजिक आणि अर्थनीतीच्या तत्त्वांवरच उभारला गेला पाहिजे. 'स्वातंत्र्य' 'स्वातंत्र्य' म्हणून ओरडल्यानें, तें येत**

अनुक्रम २४४९९ ३८२.६८१.२१ ८२२ ३०१९४९



नाहीं. 'क्रांति ' क्रांति म्हणून ढोलके पिटीत राहिल्यानें, क्रांति होत नाहीं. क्रांति, ही आपोआपच व्हावी लागते . बंड हें करूं म्हटल्यानें होत नसतें; तें आपोआपच व्हावें लागतें. वीस वर्षांपूर्वी, क्रांतिकारकांच्या पुढें जो बिकट प्रश्न उभा होता, तोच आजहि पण जशाचा तसाच आहे !

हिंदुस्थानांतील क्रांतिवादाचें एक रोमॅन्टिक युग, आतां नाहींसें झालेलें आहे. " देवी चौधुराणी ' आणि ' आनंदमठ ' वाचून, छत्रीच्या तालावर नाचत जाणारे तरुण, पुनः दृष्टीस पडणारे नाहींत. तो एक काल निघून गेला आहे ! रस्त्यांतून लटके किल्ले करून, त्यांतून लढाया करण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. बॉम्ब, गुप्तमंडळ्या, गुप्तसमित्या, यांच्या द्वारां राज्यक्रांति करण्याचा काळ आतां उरलेला नाहीं; तें युग केव्हांच समाप्त होऊन गेलें ! हिंदुस्थानांतील राजनीतीच्या क्रमविकासाचें पहिलें रूपान्तर, गुप्तमंडळ्यांचा उदय होण्यांत झालें. त्याची प्रयोजनीयता तत्कालीन स्थितींत होती. कारण, त्या कालीं ' गुलामा 'ला कोणतीही गोष्ट उघडपणें करणें शक्यच नव्हतें. त्याच्या मार्गांत, त्या वेळीं हजारों अडचणी होत्या. म्हणूनच त्या वेळीं तसें झालें. आज, गुप्तसमित्यांच्या बाहेर—स्वदेशांतून आणि विदेशांतून—हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यध्येयावर नजर ठेवून बसलेले-विश्वास ठेवणारे-हजारो हजारांनीं मोजतां येतील असे लोक अद्यूनहि पण आहेत. आज तरुणांचें एकच कर्तव्य, कीं सर्वांना स्वातंत्र्यमंत्राची दीक्षा द्यावी; त्या महामंत्रानें सर्वांना दीक्षित करावें. आणि म्हणूनच, पूर्वीच्या वर्तुळांतून आतां बाहेर पडून उघड उघडपणें सामान्य लोकांतून कार्य करावयास हवें; त्यांना संघबद्ध करून ज़ातीयज्ञान द्यावयास हवें.

१८५७ आणि १९१५ सालच्या परिणामीं पाहतां असेंच दिसून येईल, कीं हिंदी राजकारणाचा बिंदु, अभिजात्यवर्गापासून सरून, बॉम्बच्या दिशेस झुकत आहे; अर्थात्, निर्धन जातींकडेच तो जात आहे. हिंदुस्थानच्या तत्कालीन इतिहासाशीं, रशियाच्या सोशालिस्टांच्या इतिहासाचें बरेंच सादृश्य दिसून येतें. १८१४ च्या फ्रान्सच्या युद्धाच्या वेळीं रशियन सैन्य फ्रान्समध्यें गेलें; आणि त्यांतील कित्येक आफिसर स्वदेशांत परत येतांना ' साम्यवादी ' होऊन आले. आणि त्यांनींच रशियांतः प्रथमतः चळवळ सुरू केली. हळू हळू त्या चळवळीचें

रूपांतर गुप्तसमितींत झालें. १८२२ सालीं ती गुप्तसमिती पकडली गेली. त्यांतच Dostoinesty हे एक प्रमुख होते. त्या क्रांतीस " December revolution " असें म्हणण्यांत येतें. त्याच वेळेपासून रशियांतील तरुण छात्रवर्ग, गुप्तसमित्यांची स्थापना करूं लागला. आणि पोलिसांनींही पण, त्या नामशेष करून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न सुरु केला. अनेक गुप्त मंडळ्या पकडल्या गेल्या; व अनेकांस भयंकर शिक्षाही देण्यांत आल्या. शेवटीं त्या तरुणांना असें समजून आलें, कीं केवळ रावसाहेब-रावबहादुरांना—अर्थात् प्रतिष्ठित वर्गाला भजून विप्लवकार्य होणारें नाहीं. रशिया हा कृषि-प्रधान देश; शेतकरी-वर्ग प्रमुख. त्या वर्गाला हातीं घेतलें पाहिजे; असें त्यांना वाटूं लागलें. ज्या वेळीं त्यांना तें दिव्यज्ञान प्राप्त झालें, तेव्हां तो तरुण छात्रवर्ग, शेतकऱ्याच्यांत प्रचार-कार्य करूं लागला. परंतु त्या गरीब लोकांनीं, तेव्हांही त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें नाहीं. कारण, ते तरुण त्यांच्याकडे गरिबांचें मन घेऊन-मजुराचें मन-शेतकऱ्याचें मन घेऊन गेलेलें नव्हतें. शेवटीं जेव्हां अनेक धंडे शिकून ते तरुण तयार झाले, तेव्हां हजार हजार विद्यार्थी, पुनः शेतकऱ्यांमध्यें काम करूं लागले; त्यांचा त्यांनीं विश्वास संपादन केला. आणि लेनिननें पुढाकार घेऊन त्यांच्या त्या कार्यास mass Partyचें स्वरूप दिलें. व रशियाचें शासन-यंत्र आपल्या हस्तगत करून घेतलें.

तें कांहींही असलें तरी, १९१५ च्या इतिहासापासून आपणास अनेक नवीन गोष्टी शिकून घ्यावयास पाहिजेत, यांत कांहींच शंका नाहीं. १९१५ च्या इतिहासापासून, आपणास कांहींच बोध घेतां येणार नाहीं काय ? हिंदुस्थानच्या राजकारणाचें अंतिम ध्येय स्वातंत्र्य हेंच आहे. त्याशिवाय हिंदुस्थानच्या राजकारणाला अन्य आदर्श नाहीं. तें ध्येय हिंदुस्थान जाणत नाहीं काय ? तें स्वातंत्र्याचें ध्येयच हिंदुस्थानला मान्य नाहीं काय ? हिंदुस्थानला स्वातंत्र्याची स्पृहाच नाहीं काय? ती अभिलषित वस्तु कशी प्राप्त करून घ्यावी, ती अभिलषित वस्तु आम्हास कशी मिळेल, हाच आज आमचा मुख्य प्रश्न आहे. ती आकांक्षा पूर्ण होण्यास आपणास नूतन आदर्श डोळ्यांपुढें ठेवणें जरूर आहे. आणि त्याच्याच अनुरोधानें, यापुढें कार्य करावयास पाहिजे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-प्रयत्नास, आतां कोणाचें खरोखरी खरें सहाय्य होणारें असेल, तर तें एक सामान्य गरीब वर्गापासूनच. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यमार्गी लोकांनीं, त्याच वर्गाचा आतां आश्रय

ग्रं. क्र. ३६५६



घेणें अवश्य आहे. त्या गरीब वर्गावांचून सहाय्य करणारा, हिंदुस्थानांत आतां अन्य वर्ग नाहीं. आज आमचें पहिलें कर्तव्य, त्यांना संघबद्ध करणें. हिंदुस्थानच्या त्या मुक्या, निरक्षर, शोषित, पीडित, दलित जातीला जागृत केलें पाहिजे; तिला तिच्या सामर्थ्याची–तिच्या अधिकारांची—आपण जाणीव करून दिली पाहिजे; सामान्य वर्गाच्या सामाजिक आणि आर्थिक गरजा, राजकारणी लोकांनीं आणि सुशिक्षितांनीं पुऱ्या पाडल्या पाहिजेत; त्यांना असें समजावून दिलें पाहिजे, कीं **स्वराज्य हें तुमच्यासाठींच आहे.**

रावसाहेब–रावबहादूर दलासाठीं किंवा 'प्रतिष्ठित वर्गासाठीं' आपले प्राण देण्यास, यापुढें सामान्यवर्ग कधींही तयार होणार नाहीं. धार्मिक भावना चेतवून खरें कार्य साधावयाचें नाहीं. धार्मिक क्षोभ हा चिरकालिक रहात नसतो. सामान्य वर्गास आपलेसें करून घ्यावयाचें असेल, त्याच्या सहनुभूतीची आपणास इच्छा असेल, तर त्या जातीला तिचा स्वतांचा असा कांहीं अर्थ दाखवून दिला पाहिजे. ती जाति जेव्हां स्वतांचा अर्थ आपल्या डोळ्यांनीं पाहूं लागेल, तेव्हांच तिचें लक्ष्य–तिचें तन, आणि मन आपल्याकडे लागेल. आज कित्येक कालापासून माणसुकीच्या साध्या हक्कांसहि, ती गरीब जात वंचित झालेली आहे. पायापासून डोक्यापर्यंत,–तिच्या सावलीलासुद्धां–गुलामगिरीच्या बंधनानीं जखडून टाकलेलें आहे. अर्थात्, ती जात आपल्यावरच जुलूम करणाऱ्यांसच, कसें सहाय्य करण्यास तयार होईल? त्या वर्गाची मनःस्थिति आज "**तो मेला तरी हरकत नाहीं, आपण वांचलों ना? बस्!**" "काका मेला आपण वांचलों!" अशीच होऊन बसलेली आहे. "**बारा हिंदु तेरा चुली**" **हाच आमचा मुख्य मंत्र**! अशा हिंदुजातींमध्यें, तिला तिचा स्वार्थ दाखवून न देतां, देशाला सहाय्य कसें करून घेतां येईल? ज्या समाजांत दोन माणसें एकत्र बसून बोलूंसुद्धां शकत नाहींत, त्या ठिकाणीं एकराष्ट्रीयत्वाची भावना कोठून यावी!

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा अर्थ, "हिंदी लोकांचा इंग्रजांच्याबरोबर निरंतरचा झगडा, आणि त्याबद्दल इंग्रजांना प्रायश्चित्त देणें म्हणजे त्यांना एका जहाजांत भरून त्यांची सुखरूप रवानगी करणें," हा अर्थ आपण आतां विसरून गेलें पाहिजे. **शोषित आणि शोषक** या वादाची मीमांसा करण्यांत, आज आमचीं वीस वर्षे कमीत कमी गेलेलीं आहेत! आणि अजून आपण परस्परांशीं भांडतच आहों. हिंदुस्थानांतील बहुसंख्यांक वर्ग exploited (**शोषित**). इंग्रजांचा

प्रतिष्ठित वर्ग, त्याचें शोषण करीत आहे. या शोषणांत आपल्या देशांतील अभिजात्यवर्ग आणि प्रतिष्ठित वर्गही पण, इंग्रजांच्या बरोबरच सामील झालेला आहे. एकीकडून या गरीब जातीचें इंग्रजजातीनें शोषण चालविलेलें आहे, तर दुसरीकडे आपल्याच देशांतील प्रतिष्ठितवर्गानें दुसरीकडून शोषण चालविलें आहे. आज त्या दोघांचाही स्वार्थ भिन्न नाहीं. हें exploitation चें जाळें कसें छिन्नभिन्न करून टाकतां येईल आणि त्यांतून आमचा देश कसा मुक्त होईल हाच आमचा प्रश्न आहे.

सर्व प्रकारच्या गुलामगिरीचें मूळ एकच. तिचें स्वरूप निरनिराळें, एवढेंच. आम्हांला एकाच गुलामगिरीच्या विरुद्ध पण घेऊन उभे रहावयाचें नाहीं;–राहून चालणारें नाहीं. विदेशी नोकरशाहीबरोबर झगडा करून स्वदेशीय नोकरशाही आल्यानें, हिंदुस्थानच्या प्रश्नाचें निराकरण होणारें नाहीं. तसेंच धर्मद्वारा समाजांत साम्यता प्रस्थापित करूं पाहणेंहि, अत्यंत अदूरदृष्टीचें आहे. बौद्धधर्मानें व इस्लामधर्मानें समाजांत साम्यता स्थापित केलेली होती. परंतु, अर्थनीतिक साम्यतेच्या अभावीं ती फार दिवस टिकून राहूं शकली नाहीं. म्हणूनच आज जगांत जिकडे तिकडे ऐकूं येत आहे, कीं " Economic democracy द्वारांच समाजांत साम्यता आणली पाहिजे " इंग्लंडच्या Fabin Sydney webb पासून बोल्शेव्हिक **लेनिन**पर्यंत,–सर्वजण त्या एकाच महामंत्राचा उच्चार करीत आहेत.

आमच्यामध्यें सामुदयीक शक्तिचा पूर्ण अभाव. Collective Spirit अर्थात् समष्टिभाव, आमच्यामध्यें नाहींच. आणि हिंदूंमध्यें कोणत्याच काळीं तो नव्हताही पण. मुसल्मानसमाजांत साम्यतावाद आढळून आला, तरी, अर्थनीतिक कारणांनीं साम्यताभावापेक्षां असांम्यता आणि असामंजस्य हींच अधिकतर आढळून येतात. मुसल्मानीं गरीबसमाजहि त्यांच्यांतील धनिकवर्गाकडून पददलितच झालेला आहे.

हिंदू अपापसांत झगडून मरत आहेत. त्यांस आतां अन्य कांहींच उपाय दिसून येत नाहीं. अशा सर्व कारणांमुळें, **हिंदुस्थान म्हणजे " हिंदूंचा देश "** असें म्हणण्यास आतां आपणांस जागाच उरलेली नाहीं. या रोगावर औषधयोजना करणें फार कठीण आहे. **जन्मापासून स्मशानांत जाईपर्यंत, आम्हा हिंदूच्यांतील भांडणें** संपलेलीं नाहींत; आणि तीं संपण्याचेंहि पण अजून

कांहींएक चिन्ह दिसून येत नाहीं. सामुदायिक शक्ति समाजांत उत्पन्न करतां आल्याशिवाय, कोणतेंहीं कार्य करणें दुष्कर आहे. समाजांतून गेलेली ती शक्ति परत मिळविणें, हेंच आजचें आपलें प्रथम कर्तव्य आहे.

धर्माचें नांव पुढें करून लोकांना चेतवीत राहिल्यानें स्वातंत्र्य-लाभ होणें नाहीं, हें आम्ही पुनः पुनः येथें सांगत आहों. त्या अवसादाचा परिणाम भयंकर असाच होईल. व आजहि, त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतच आहे.

१९१९ सालीं, महेंद्रप्रतापला महाभाग लेनीननें असें स्पष्टपणें बोलून दाखविलें कीं "**महेंद्र! आमच्या देशांत टॉलस्टायप्रभृति लोकांनीं धर्मप्रचार करून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला; परंतु, त्यांत त्यांना कांहींही यश आलें नाहीं. व तें येणारहि पण नाहीं. हिंदुस्थानांत परत जाऊन जातीय वाद मिटवून, सामुदायिक शक्ति निर्माण करण्याचे तूं प्रयत्न कर; 'स्वातंत्र्याचा मार्ग' मोकळा होऊन जाईल.**" हिंदुस्थानांतील स्वातंत्र्यमार्गी लोकांनीं, ही गोष्ट पावलोपावलीं आपल्या ध्यानांत ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. जनतेंत जेव्हां सामुदायिक शक्ति संचित होईल, तेव्हांच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा होणारा आहे.

'बंड आणि राज्यक्रांति' म्हणून ओरडत राहिल्यानें स्वातंत्र्याचा मार्ग सांपडणारा नाहीं. **क्रांति ही आधीं आपल्या मनांतच झाली पाहिजे. आपलें स्वतांचें मनच, पहिल्यानें बंडखोर बनलें पाहिजे. आपल्या विचारांत आधीं विप्लवकार्य घडून आलें पाहिजे; तेव्हांच समाजांत आणि आर्थिक क्षेत्रांत, बंड पुकारतां येईल. लोकांचीं मनें बंडखोर बनलीं नाहींत, त्यांचे विचार बंडखोर बनले नाहींत, तर क्रांति कशी होणार आहे? क्रांति कशाची करावयाची? अन्यथा ती कशी घडवून आणतां येईल बरें?** स्वातंत्र्यसंपादनाचा जुना आदर्श बाजूला ठेवून, आतां नवीन दृष्टीनें समाजाच्या क्रमविकासाच्या मुळाकडे आपण पहावयास पाहिजे. **देशाचें कल्याण इच्छिणाऱ्या प्रत्येकानें 'स्वातंत्र्य तत्त्वा'ला हिंदु-मुसलमानांच्या गुंडगिरींतून आणि पुंडगिरींतून बाहेर काढलें पाहिजे.** त्या वर्तुळांतून स्वातंत्र्यवाद बाहेर आल्यावांचून त्याचा

विकास होणें नाहीं; विस्तार होणें नाहीं. आज स्वदेशाला चिंताशील व्यक्तींची अत्यंत जरूरी आहे. गुलामगिरींत शतकेंच्या शतकें खिचपत पडलेल्या जातींत तशीच भयंकर जागृति झाली पाहिजे. परंतु ती धार्मिक हेतूनें किंवा धर्माच्या बुरख्याआड राजकारण ठेवून होणारी नाहीं. गुलामगिरींत खिचपत पडलेल्या लोकांच्या मनांत, आधीं विचारांची क्रांति झाल्यास आचारांतील आणि उच्चारांतील क्रांति आपोआप घडून येईल; ती क्रांति होण्यास अवधि लागणार नाहीं. आमच्या स्वातंत्र्यमार्गाचें कांहीं एक शास्त्र ठरलेलें नाहीं; त्याचा निश्चित विचार असा केव्हांच झालेला नाहीं. जर कांहीं आम्हाला ठाऊक असल, तर तें एकच, कीं '**धर आणि मार!**' आमचें एकच कर्तव्य ठरतें. कीं जर 'नूतन भारत' घडवावयाचें असेल, तर नवीन दृष्टीनेंच जगाकडे आपण आतां पाहिलें पाहिजे. आपल्या भोंवतीं भिंत घालून घेण्याचे दिवस आतां केव्हांच निघून गेलेले आहेत. नवीन प्रवाह समाजांत उत्पन्न केला पाहिजे. सामान्य जनतेला जागृत करण्याखेरीज, आतां हिंदुस्थानच्या उद्धाराची आशाच नाहीं. राजकारणी लोकांनीं ही गोष्ट आतां कबूल करण्याखेरीज गत्यंतरच उरलेलें नाहीं. सामान्य जनतेला सत्य गोष्टी आपण निवेदन केल्या पाहिजेत. पुढाऱ्यांनीं आपलें अंतःकरण, त्या गरीब मुक्या जनतेपुढें उघडें केलें पाहिजे; हिंदुस्थानच्या तरुणांनीं त्या कार्याचे अग्रदूत झालें पाहिजे. त्यांच्यापुढें त्याच्याइतकें आतां अन्य महत्त्वाचें कार्यच नाहीं. केवळ पंतोजीसारखी पाठ थोपटल्यानें आणि वंचना केल्यानें, सामान्यजनता यानंतर आपल्याला कधींच सहाय्य करावयास तयार होणारी नाहीं. तिच्याशीं मिळूनमिसळूनच काम केलें पाहिज.—एकजीव होऊन काम केलें पाहिजे. त्यांचें मन घेऊन काम करूं पाहिजे. मी 'पुढारी' होईन, 'मी अमुक होईन', 'मी तमुक होईन', या कल्पनाजालांत गुरफटून न राहतां आपण आधीं कामास सुरवात केली पाहिजे.

**हिंदुस्थानचा उद्धार हिंदुस्थाननेंच केला पाहिजे. त्यानें आपल्या कार्याचा पाया, आपल्या स्वतांच्या भरंवशावर घातला पाहिजे. कोणतेही परकीय लोक, आपणास स्वातंत्र्य मिळवून देऊं शकणार नाहींत. आपल्यासाठीं परकीय लोक, प्रत्यक्ष असें कांहींच करूं शकणार नाहींत. काबूलपासून युरोप अमेरिका, तें झुलूलाईनपासून**

**टोकिओपर्यंत–सर्व देशांतून,-हिंदुस्थानच्या कार्याला सहाय्य व्हावें म्हणून क्रांतिकारक प्रत्येकाच्या दाराशीं याचना करून आलेले आहेत; परंतु ते कृतकार्य झाले नाहींत. दुसरे येऊन आपणाला उठविण्यासाठीं मदत करतील, ही आशा यापुढें व्यर्थ आहे. तो भ्रम आपण सोडून दिला पाहिजे. आपलें आपणांसच आतां उठलें पाहिजे. परक्यांच्या साहाय्यावर अवलंबून राहण्यांत आपल्या सामर्थ्याचा आपण अभावच प्रकट करण्यासारखें आहे. मग, स्वातंत्र्येच्छा करण्याचा आपल्याला काय अधिकार? आत्मशक्तीवरच विश्वसून यापुढें आपणास कार्य करायास पाहिजे, तरच तें सिद्धीला जाईल. आत्मशक्तीवर निर्भर होण्याखेरीज, आपल्या देशाला आतां अन्य उपाय नाहीं.**

देशांतील पददलित लोकांच्या उन्नतिप्रीत्यर्थ, त्यांना संघबद्ध करणें अत्यंत जरूर आहे. विविध प्रकारच्या समवायसमिती ( Co-operative Societies ) चारी दिशांस स्थापन करून, त्या जातीची आर्थिक उन्नति केली पाहिजे. शेतकऱ्यांचा जमिनीचा प्रश्न (Land Problem) प्रामुख्यानें मिटविला पाहिजे. गरीब जातीचा स्वार्थ साधून देण्यासाठीं, आणि तिच्या योग्य हक्कांकरितां झगडण्यासाठीं, त्या जातीला सुशिक्षितांनीं व राजकारणी लोकांनीं प्रथमतः सामील करून घेतलें पाहिजे. त्यांची अशी खात्री पटवून दिली पाहिजे, कीं स्वराज्य हें त्यांच्याचकरितां आहे. आणि असें झालें, तर ती जातीही जागृत होईल, उठेल, आणि म्हणेल, “ कीं हें सत्य आहे; महासत्य आहे ! ” व आत्मार्पण करण्यास ती गरीबजात तयार होईल, त्याचवेळीं, स्वातंत्र्याहि पण आपल्या निकट आहे.

# परिशिष्ट

## राजा महेंद्रप्रताप.

**[ महेंद्रप्रताप आणि कैसर; महेंद्रप्रतापचे " इंडो-जर्मन मिशन; " इंग्रजांच्या विरुद्ध अफगाणिस्थानाच्या आमिरास जर्मनीस सामील करून घेण्याचे महेंद्रप्रतापचे प्रयत्न; इंग्रजांनीं ' मिशन ' चा केलेला छळ; महेंद्रप्रतापचा अज्ञातवास. ]**

( महेंद्रप्रताप यांची हकीगत )

महायुद्ध उपस्थित झालें, तेव्हां मी २८ वर्षांच्या उमरींत होतों. रशियाला केलेल्या जर्मनीच्या आव्हानाची बातमी, इंग्लिश पत्रांतून छापलेली, मला ट्रेनमध्यें वाचावयास मिळाली. तो ऑगस्टच्या आरंभीचा काळ आहे. **डेहराडूनच्या** ' मसुरी-हिल स्टेशन ' वरून मी खालीं येत होतों. पांच वर्षांपूर्वीं मी स्थापन केलेल्या वृंदावन येथलि, मुलामुलींच्या औद्योगिक आणि शैक्षणिक विद्यालयाच्या वार्षिक समारंभाकरतां मला वृंदावनास जावयाचें होतें.

तें विद्यालय मी हाथ्रसचा जमीनदार--राजा **घनशामसिंहाचा** कनिष्ठ पुत्र, आणि राजा **हरनरेन** सिंहाचा दत्तकपुत्र, या नात्यानें प्रथम उघडलेलें होतें. माझे पूर्वज ब्रिटिश- अंमलापूर्वीं ' स्वतंत्र राजे ' म्हणूनच राज्य करीत होतें. जें विद्यालय मी स्थापन केलें होतें, आणि ज्यास मी " **प्रेम महा विद्यालय** " ( " Great School of Love ".) असें म्हणत होतें, त्या विद्यालयासाठीं, मी माझ्या पांच गांवांचें उत्पन्न--जवळ जवळ ५२,५०० रु. आणि माझ्या खासगी संपत्तीपैकीं अर्धी अधिक संपत्ति मी देऊन टाकलेली होती. वृंदावन येथलि माझ्या पूर्वजांचा राजवाडाही, त्या विद्यालयासाठीं मी देऊन टाकलेला होता. राजवाड्याचें दान केल्यानंतर, मी माझ्या पत्नीसह आणि लहान मुलांच्यासह डेहराच्या गिरिशृंगावर रहात असे. हिंदुस्थानांत थंड हवेसाठीं म्हणून जीं सुंदर ठिकाणें आहेत, त्यांत डेहरा, अत्यंत रमणीय स्थळ आहे.

त्या ग्रीष्मकालीं, आगगाडींत, जेव्हां ती महायुद्धाची बातमी मी अकस्मात् वाचली, तेव्हां मला अत्यंत आश्चर्य वाटलें. माझ्याबरोबर जो एक हिंदी मित्र प्रवासी होता, त्याच्याशीं माझा मोठाच कडाक्याचा वाद झाला. आम्ही दोघांनीं मिळून त्या वेळीं त्याविषयीं पुष्कळच चर्चा केली. माझ्या मित्राला त्या बातमीचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. परंतु त्या आकस्मिक बातमीनें माझ्या अंतःकरणांत खळबळ उडवून सोडली. माझें मन अत्यंत अस्वस्थ करून टाकलें. माझ्या मनांत त्या वेळीं असें आलें, कीं कदाचित् या युद्धानें सर्व जगांत मोठेंच स्थित्यंतर घडून येईल; जगाच्या नकाशांत फारच फेरबदल होऊन जातील. माझ्या मनांत तेच विचार पुनःपुनः एकसारखे घोळूं लागले. 'जर्मनीनें युद्ध पुकारलें' या वार्तेनें माझ्या मनावर विलक्षण परिणाम केला. माझ्या मनश्चक्षूंपुढें, त्या वार्तेनें घडून येणाऱ्या अनेक भावी गोष्टी, अगदीं स्पष्ट दिसूं लागल्या; माझ्या मनांत, त्या क्षणीं कांहीं निराळाच विचार आला; आणि मी एकदम निश्चयानें म्हटलें, "कदाचित् मीहि युद्धक्षेत्रावर जाईन." त्या आकस्मिक बातमीनें मी एकाकी भावनावश न व्हावें म्हणून, माझ्या मित्रानें त्या वेळीं मला पुष्कळच उपदेश केला. परंतु त्याचें बोलणें मला पटलें नाहीं. माझें मन, मला पुनः पुनः असेंच सांगत होतें, कीं "या युद्धानें, जगांत मोठी क्रांति घडून येणार." आणि, अम्हीं वृंदावनाला जाऊन पोंचतो न पोंचतों तोंच, आग्र्याहून आम्हाला एक गुप्त बातमी समजली; कीं "इंग्लंडहि या युद्धांत पडणार; अगदी निश्चित झालेलें आहे." व दुसऱ्याच दिवशीं, ती गुप्त बातमी वृत्तपत्रांतूनहि प्रसिद्ध झाली. वृत्तपत्रांतून ती बातमी प्रसिद्ध होतांच, माझें मन अधिकच उत्तेजित झालें. प्रत्येक गोष्ट आतां मला शक्य वाटूं लागली. हिंदुस्थानचें गतस्वातंत्र्य देखील परत मिळणार," असेंहि माझ्या मनांत त्या वेळी आल्यावांचून राहिलें नाहीं. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर जाण्याविषयीं माझा दृढनिश्चय झाला. मी माझ्या जिवलग मित्रांना आणि आप्तेष्टांना तत्काळ तसें सांगूनहि टाकलें.

त्या दीर्घ प्रवासाची मी सर्व सिद्धता केली. माझें वर्तमानपत्र पुढें चालण्याची आणि नुकत्याच स्थापन केलेल्या "दि सर्व्हंटस् ऑफ पावरलेस्" या संस्थेची व्यवस्था करून टाकली. माझ्या गैरहजेरींत, माझ्या इस्टेटीचीही जी कांहीं व्यवस्था करावयाची होती, तीही मी केली. इतकें सर्व होण्याला बराच अवधि लागला. त्यामुळें १९१४ च्या थोडेसें आधीं, मी गृहत्याग करूं-

शकलों. त्या अंधाऱ्या रात्रीं, माझ्या पत्नीला आणि त्या माझ्या दोन मुलांना डेराडूनला सोडून, दूर युरोपांत येतांना माझ्या अंतःकरणास असह्य दुःख होत- होतें. पण अखेरीस, मीं निघण्याचेंच ठरविलें. त्या वेळीं तेथून येणें, माझें कर्तव्य- होतें. माझें मन पुनः पुनः सांगूं लागलें, कीं ह्याचकरितां, तूं जन्माला आला आहेस ! ''

मुंबईला जाऊन, आमचा बराच खोळंबा झाला; कारण माझ्याजवळ ब्रिटिश पासपोर्ट नव्हता. प्रथमतः इटालियन बोटीनें प्रवास करण्याचा माझा उद्देश होता. परंतु पासपोर्टशिवाय बोटीवर पाय ठेवतां येणेंच अशक्य होतें. शेवटीं पासपोर्टशिवायच दुसऱ्या एका बोटीनें युरोपला यावयाचें मीं निश्चित केलें. त्या वेळीं माझे मित्र हरिश्चंद्र हेहि प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून माझ्याबरोबरच पासपो- र्टवांचून होते. मी आपल्याबरोबर ६ हजार रुपयांच्या नोटा घेतल्या होत्या. खेरीज कमीअधिक पैसे लागल्यास ते युरोपांत मिळतील, अशी आधींच मी व्यवस्था केलेली होती.

सुवेज कॅनॉलमधून आम्हीं येत असतां, भावी युद्धाच्या पूर्वतयारीचीं चिन्हें जागोजाग आम्हाला दिसून येऊं लागलीं. प्रत्येक ठिकाणीं खंदक दृश्यमान होत होते. शंभर शंभर यार्डाच्या अंतरावर तोफखाना उभा होता. कॅनॉलच्या दोन्ही किनाऱ्यांवर दूरपर्यंत सैन्याचे तळ पडलेले होते. सैन्यांत विशेषतः काळ्या सैन्याचाच भरणा अधिक दिसून येत होता. आम्ही **इस्मालियास** पोंच- ल्यावर आमची व अनेक जखमी शिपायांची गांठ पडली. त्यांतील कित्येक दाक्षिण हिंदुस्थानचे रहिवासी होते. व फ्रान्सच्या रणक्षेत्रावर निकामी झाल्यामुळें स्वदेशीं परत जात होते.

माल्टाला एक रात्र राहून आम्ही भूमध्य-समुद्र ओलांडिला. नंतर आम्हाला मार्सेल्सि बंदर लागलें. मी माझ्या पूर्वीच्या प्रवासांत तीन वेळां मार्सेल्सि पाहिलेलें होतें. बंदरावर व शहरांतून जिकडतिकडे हिंदी शिपायाच दृष्टीस पडत होते. त्यांपैकीं पुष्कळांना युद्ध म्हणजे एक माजच वाटत होती. परंतु अनेकजण, यूरोपच्या भयंकर थंडीमुळें, आणि तिकडील हिंवाळ्यामुळें अगदीं त्रस्त होऊन गेलेले दिसत हो.

फ्रान्समधून स्विझर्लंडला जाण्याची आम्हांला परवानगी मिळतांच आम्ही जिनेव्हाचा मार्ग सुधारला. त्या ठिकाणीं गेल्यावर 'हॉटेल दि अँग्लेर' (Ho-

teld' Angleterre ) मध्यें उतरण्याची व राहाण्याची आम्ही सोय करून घेतली. हॉटेलसमीप एक सुंदर सरोवर होतें; त्यामुळें निवासस्थानास फारच रमणीयता प्राप्त झालेली होती. वाचनालयांत युरोपांतील सर्वदेशीय वृत्तपत्रें येत असत. त्यांतील युद्धविषयक बातम्यांची जवळजवळ तत्त्वतः एकवाक्यताच पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. कारण, हिंदुस्थानांत असतांना मला असें वाटत होतें कीं युध्यमान राष्ट्रांतील विशेष बातम्या गव्हर्मेंटच्या नियंत्रणामुळें हिंदुस्थानांत प्रसिद्ध केल्या जात नसाव्या. आणि त्या तटस्थ राष्ट्रांच्या वृत्तपत्रांतून आपणांस अधिक कळून येतील. परंतु दोन्ही बाजूंचीहि वर्तमानपत्रें वाचून युद्धविषयक वार्तांतून मला कांहींच फरक दिसून आला नाहीं.

तदनंतर कांहीं दिवसांनीं अकस्मात् जर्मनीहून एक हिंदी गृहस्थ माझ्याकडे येऊन मला भेटला. त्यानें असें सांगितलें कीं, " जर्मनींत येण्याची आपली इच्छा पूर्ण होईल. तशी व्यवस्था मला करतांहि येईल. परंतु, तेथें हिंदुस्थानविषयक कांहीं कार्य करावयाचें, असा उद्देश धरूनच आलें पाहिजे. आपल्या येण्यानें हिंदुस्थानच्या कार्याला तेथें कांहीं मदत झाली पाहिजे. "

मीं म्हटलें, " तें मला मान्य आहे. परंतु, जर्मनींत येऊन मला खुद्द कैसर बादशाहांचें दर्शन झालें पाहिजे, तरच मी येण्यास तयार आहें. " कारण ती गोष्ट जिनेव्हा येथलि जर्मन कौन्सलच्याहि आटोक्यांत नव्हती. कैसरची भेट करून देणें, कोणासहि शक्य नव्हतें. त्या हिंदी मनुष्यानें ताबडतोब मजविषयीं बर्लिनला तारा करून आपल्या लोकांशीं वाटाघाट सुरू केली. मध्यंतरीं मी रोमला गेलों. आणि तथेंच " तुमच्या येण्याची सर्व व्यवस्था केली गेली आहे " अशा आशयाचा टेलिग्राम मिळाला. आणि बर्लिनहून, त्याचवेळीं एक हिंदी देशभक्तहि मला घेऊन जाण्यासाठीं मुद्दाम जिनेव्हास आला.

फेब्रुवारीच्या एका सुप्रभातीं, त्या नवीन हिंदी मित्रासह मी जर्मनीची सरहद्द ओलांडून जर्मनींत प्रवेश केला. माझा सेक्रेटरी हरिश्चंद्र हा जिनेव्हासच राहिला. कारण, तेथें त्याची व एका विदेशीय संस्कृत पंडिताची गांठ पडून उभयतांचें इतकें सख्य जमलें कीं मला सोडून बर्लिनला येण्यांत विशेष कांहीं नाहीं. असें, त्यास वाटलें ! आम्ही जेव्हां जर्मनसरहद्दीवर आलों, तेव्हां एक जर्मन अधिकारी पास

पोर्ट तपासण्यासाठीं आमच्या डब्यांत शिरला. माझ्या मित्रानें त्याच्या कानांत कांहीं कुजबुज करतांच त्यानें आम्हां दोघांनाही मोठ्या नम्रतेनें एक लांबलचक नमस्कार ठोकला आणि तेथून तो अदृश्य झाला. जर्मनमधील आमच्या प्रवासांत, युद्धाची प्रत्यक्ष अशी तयारी कोठेंच दिसून आली नाहीं. मात्र, प्रत्येक स्टेशनवर लष्करी शिपाई दृष्टीस पडत होते. माझ्या प्रकृतीला तो प्रवास फारच सुखाचा झाला. प्रकृतीविषयीं जरी मला कांहींच चिंता वाटली नाहीं, तरी माझ्या मनांत दुसऱ्या एका विचारानें मोठी खळबळ उडून गेली होती. त्या विचारानें माझें मन अत्यंत अस्वस्थ होऊन गेलें होतें. 'आतां पुढें काय घडणार' याचाच मी एकसारखा विचार करीत होतों. हिंदुस्थानच्या हितासाठीं जर्मन सरकार कांहीं प्रत्यक्ष कार्य हातीं घेत असेल तरच, जर्मनींत राहण्यांत अर्थ, असें मला वाटूं लागलं. आणि तोंच माझा निश्चयहि पण होता. जर्मन गव्हर्मेंटची तशी कांहीं इच्छा दिसून न आल्यास तावडतोब आपण जर्मनी सोडवायाची, असेंहि मी मनाशीं ठरविलें होतें. पुढें पनामा कॅनलकडे आणि सॅन्फ्रान्सिस्कोस कूच करून जाण्याचा माझा इरादा होता.

माझ्या मित्रानें बर्लिनमधील 'कॉन्टिनेन्टल हॉटेल'मध्यें माझ्या उतरण्याची व्यवस्था केली होती. त्या ठिकाणीं जातांच, **बॅरन वेसन डॉक** आणि जनरलस्टाफमधील दुसरे एक मोठे अधिकारी, यांनीं माझी गांठ घेतली. त्या वेळीं कैसरबादशाहा युद्धक्षेत्रांत आघाडीवर होते. त्याच हॉटेलमध्यें **सर रॉजर केसमेंट** हे आयरिश हेर माझ्याबरोबर पाहुणे आणि मित्र म्हणून होते. त्यांना पुढें ब्रिटिश गव्हर्मेंटनें लंडन येथें फासावर दिलें.

दोन आठवड्यानंतर, कैसर बर्लिनला परत आले. आणि त्यांनीं Tiergerten येथील बेलिव्हा (Bellevue) नामक राजवाड्यांत खासगी रीतीनें माझी भेट घेतली. हॉटेलमधून राजवाड्यांत नेण्यासाठीं पूर्वेकडील राजकारणांतील एक मुत्सद्दी व फॉरेन ऑफिसमधील एक अधिकारी मजकडे पाठवून दिलेले होते. त्यांनीं मला खास सरकारी मोटारींतून राजवाड्यांत नेलें. राजवाड्यांत मी प्रवेश करीत असतां, तो सरकारी अधिकारी तेथील एका मोठ्या आरशापुढें एक मिनिटभर थांबला, आणि त्यानें आपल्या मिशाच्या टोकांना दोन्ही हातांनीं पीळ दिला! जणूं कांहीं तो कैसरचेंच अनुकरण करीत होता! तें पाहून मला हसूं आल्यावांचून राहिलें नाहीं.

आम्ही एका भव्य आणि सुंदर अशा दालनांत, नंतर प्रवेश केला. त्या ठिकाणीं खुद्द कैसर बादशहा आपल्या लष्करी पोषाखांत खडे उभे होते. त्यांच्या मुद्रेवर अभिमान पूर्णपणें दृग्गोचर होत होता. त्यांचे ते निळसर डोळ फारच पाणीदार दिसत होते. दुसऱ्याचें हृदय तात्काळ भेदून टाकण्याचें त्या डोळ्यांतून अद्‌भुत सामर्थ्य होतें. आम्ही आंत जातांच ते थोडेसे पुढें आले; आणि त्यांनीं हंसत हंसत माझ्याशीं हस्तांदोलन केलें. इंग्लिशमधून माझी त्यांना ओळख करून देण्यांत आली. व तेहि पण तत्क्षणीं इंग्लिशमध्येंच बोलूं लागले. इंग्लिशमधून कैसर जरी बोलत होते, तरी तें त्यांचें बोलणें एकाद्या विदेशीय माणसारखें वाटत होतें. परंतु ते तस मुद्दामच बोलत असावें, असें मला तात्काळ स्पष्टपणें दिसून आलें. कारण ती त्यांच्या शत्रूची-इंग्लिशांची भाषा! ती गोष्ट, प्रत्येक शब्दाशब्दांतून ते मला जणुं कांही ध्वनित करून दाखवीत होते. माझें व त्यांचें सर्व बोलणें उभें राहूनच झालें. हिंदुस्थानच्या परिस्थितीविषयींच त्या वेळीं आम्ही बोललों. हिंदुस्थानविषयींचें त्यांचें अपूर्व ज्ञान पाहून मी तर थक्कच होऊन गेलों, त्यांनीं हिंदुस्थानविषयीं फारच सूक्ष्म ज्ञान मिळविलेलें होतें. कैसरनीं म्हटलें, " या वर्षाच्या शेवटीं हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य बुडणार, असें हिंदुस्थानचे लोक म्हणतात, तें खरोखरीच खरें आहे महेंद्र? हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य, या वर्षीं बुडणार? तसें भविष्य कोणीसें वर्तविल्याचें मला सांगण्यांत आलें आहे."

" शंभर वर्षानंतर हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य बुडणार " असें भविष्य वर्तविलेलें खरें असल्याचें मी सांगितलें. इंग्लिशांचें राज्य हिंदुस्थानांत सुरू होऊन याच वेळीं शंभर वर्षें होत आलीं होतीं. मी म्हटलें, " इंग्रजाचीं शंभर वर्षें पूर्ण झालीं कीं इंग्रजांच्या राज्याची इतिश्री होणार " अशी समजूत हिंदुस्थानांत फार दिवसांपासून आहे. कैसर बादशाहांचा भविष्यावर आणि शकुनांवर तो विश्वास पाहून, मला अतिशय आश्चर्य वाटलें. जॉर्ज बादशाहांना एका झाडूवाल्यानें एक झाडू कसा अर्पण केला आणि त्याला त्यांनीं कसा स्पर्श केला, व तसा स्पर्श करणें हिंदुस्थानांत कसें अशुभ-अमंगल समजतात, त्याविषयींहि मी त्यांना बोललों, आमच्या त्या वीस मिनिटांच्या मुलाखतींत, युद्धाचा परिणाम हिंदुस्थानच्या भवितव्यतेवर काय होणार, याच एका विषयासंबंधीं कैसरचें व माझें बोलणें झालें. कैसरनी हिंदी-विशेषतः पंजाबी संस्थानाविषयीं, फारच बारकाईनें चौकशी केली.

मी म्हटलें, " अफगाणिस्थान जर या युद्धांत जर्मनीस सामील होईल, तर इंग्रजांच्याविरुद्ध हिंदुस्थानाला उठणें कांहींच अशक्य नाहीं. त्या कार्याकरतां अफगाणिस्थानाकडे जाण्यास मी आनंदानें तयार आहें. हिंदुस्थानच्या कार्यासाठीं शक्य तेवढे प्रयत्न तेथें मी करीन." ती योजना कैसरपुढें ठेवतांच कैसर फारच खूष झालेले दिसल. त्या वीस मिनिटांच्या मुलाखतीनंतर, मी निघतांना कैसरनीं मला हाक मारून, मोठ्यानें म्हटलें, " **जेव्हां तुम्ही अफगणिस्थानाला जाल, तेव्हां कृपा करून हिज मॅजेस्टि अमीर साहेबांना माझा खास खास सलाम सांगा** !" ( " when you go to Afghanistan, please give my personal greetings to His Majesty the Amir ! ")

तदनंतर " जर्मन–फॉरेनऑफीस " मधील बरेच अधिकारी मला भेटवायास येऊं जाऊं लागले. त्यांतच परराष्ट्रीय खात्याचे अंडर सेक्रेटरी **डॉ० झिमरमन** ( Zimmermann ) हेहि एक होते. शेवटीं, असें निश्चित करण्यांत आलें कीं, मी कैसर बादशहा आणि इंपीरिअल चॅन्सेलर **डॉक्टर व्हान बेथमन् हॉलवेग** ( Dr. Von Bethman Holleveg ) यांचीं स्वदस्तुरचीं पत्रें घेऊन शक्य तितक्या लौकर अफगणिस्थानास जावें. माझ्यासमवेत एक जर्मन अधिकारीहि यावयाचा होता. त्याचप्रमाणें हिंदी-मुसल्मानांपैकीं, **मुल्ला बरकतुल्ला** हेहि यावयाचे होते. बरकतुल्ला यांचीं व माझी चांगली ओळख होती. व त्यांचें माझें पुष्कळच बोलणेंचालणें झालेलें होतें. त्याशिवाय एक जर्मन डॉक्टर, जर्मनीनें कैद केलेल्या इंग्रजांच्या हिंदी सैन्यामधील सहा हिंदी गृहस्थ, यांचीही मजबरोबरच योजना करण्यांत आली. वाटेंत, पर्शियांत व तुर्कस्थानांत पर्शियन आणि तुर्की प्रतिनिधीही पण आम्हांस येऊन मिळावयाचे होते. जेव्हां असें सर्व निश्चित झालें, तेव्हां माझ्या मनास, फारच समाधान झालें. कारण, मानवजातीच्या कल्याणाकरितां आणि तिच्या बंधमुक्तेकरितां, आजवर मी तळमळत होतों. मानवजातीचें कल्याण, हेंच माझें ध्येय होतें; व त्या पवित्र कार्यासाठींच मी साधु झालों होतों. मीं हातीं घेतलेलें कार्य अत्यंत पवित्र होतें; व त्यासाठीं जरूर तर आत्मार्पणहि करण्याचें मीं निश्चित केलें होतें. त्या भावी आशेन माझें मन अत्यंत उल्हासित होऊन गेलें. आशेनें फुललेला माझ्या देशाचा भविष्यत्काल माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला. ती माझी कित्येक दिवसांची मनीषा होती. तावडतोब मी अफगाणिस्थानाकडे जाण्याची तयारी केली.

अमिराकडे जाण्याची आमची सिद्धता होत असतां, मध्यंतरीं मी रशियाच्या आघाडीवर जाऊन आलों. बर्लिनला परत येईपर्यंत, सर्व सिद्धता झालेली होती. निघतेवेळीं "जर्मन-गव्हर्मेंट, हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य करील आणि 'स्वतंत्र हिंदुस्थाना'ला आपल्या बरोबरीच्या नात्यानें-मित्रत्वाच्या भावानें तें वागवील" असें लेखी अभिवचन मला लिहून देण्यांत आलें. बादशाहा वुइल्यम यांनीं "Order of the Red Eagle" हें बहुमानाचें चिन्ह मीं धारण कर-ण्याविषयीं त्यावेळीं अत्यंत आग्रह धरला. तसा सन्मान करून घेण्यास, मी अत्यंत नाखूष होतों. कारण, जें महत्कार्य मी माझ्या हातीं धरलें होतें, तें अद्यापि सिद्धीस गेलेलें नव्हतें. त्या गोष्टीस मी अनेकप्रकारें नकार दर्शविला. परंतु, तें माझें म्हणणें मान्य केलें गेलें नाहीं. तें शुभचिन्ह "जर्मनांच्या व हिंदुस्थानच्या निरंतरच्या सख्यत्वाची खूण म्हणून" मीं धारण करावें असें सांगण्यांत आलें. आणि तदनंतर मींहि फारसें आढेवेढे न घेतां त्या मानाचा स्वीकार केला. जर्मनी व स्वतंत्र हिंदुस्थान यांच्या राष्ट्रीय कराराची ती एक दृश्य खूण होती. स्वातंत्र्य, कार्यार्थ जणुं कांहीं त्यावेळीं मी एक 'स्वयंसेवक च झालों होतों! इतका त्यावेळीं मला आनंद होऊन गेला होता. परमेश्वरानें ज्या कार्याकरितां मला जगांत पाठविलें होतें, तें परमेश्वराचेंच कार्य मी करीत आहें, असें माझें मन मला सांगत होतें.

त्या वेळीं जर्मन गव्हर्मेंटनें, अवश्य असे कागदपत्र माझ्या हवालीं केले. त्यांत-जर्मन-चॅन्सलरनें हिंदुस्थानांतील २६ राजांना जीं पत्रें लिहिलीं होतीं, तीं अत्यंत महत्त्वाचीं होतीं. तीं पत्रें जर्मन, उर्दू व हिंदी भाषांतून मुद्रित करण्यांत आलीं होती. व तीं सुंदर तांबड्या रंगाच्या चर्मवेष्टनां न बंद करण्यांत आलीं होतीं. अफगाणिस्थानच्या अमिरास खुद्द कैसर बादशाहांनीं लिहिलेलें पत्र असल अफ-गाणि आणि जर्मनभाषेत होतें. अमिराच्या त्या पत्रांत कैसरबादशाहानीं अमिराचा गौरव केला असून 'कुशलवृत्ता' खेरीज अन्य कांहींच विचारलेलें नव्हतें. युद्धा-संबंधीं, वा राजकीय परिस्थितीसंबंधीं, त्या पत्रांत कैसरनीं एक अक्षरहि लिहिलें नव्हतें.

तदनंतर, आमच्याबरोबर आणखीही एका तरुण जर्मन अधिकाऱ्याची जर्मन गव्हर्मेंटकडून नेमणूक करण्यांत आली. त्याचें नांव लेफ्टनंट डॉक्टर वरनर ओटो व्हान हेंटिग (Dr. Werner otto von Hentig)

असें होतें. त्यांनीं तेहरान येथें ' लिगेशन ' च्या सेक्रेटरीचें काम केलेलें होतें. आमच्या बरोबर अफगाणिस्थानांत पाठवून देण्याकरितां, त्यांना मुद्दाम आघाडी-वरून बोलावून घेण्यांत आलें होतें. हेंटिंगजवळ अमिरास देण्यासाठीं एक स्वतंत्र पत्र देण्यांत आलें तें पत्र चॅन्सेलर व्हान बेथमन् यांनीं लिहिलेलें होतें. त्या पत्रांतील सारांश, येणेप्रमाणें होता;--

"*Legation Secretary Dr. von Hentig will introduce the high-born Raja and Kumar: Mahendra Pratap, who is working for India's freedom. Any help extended by the Afghan government will be highly appreciated by the imperial government of Germany. The Kumar and Raja can fully describe the condition of Germany as he himself has seen it here. Herr von Hentig is authorized to speak on political and economical relatiens between Germany and Afghanistan.*'

"लिगेशन' चे सेक्रेटरी डॉ. व्हान हेंटिग हे **राजा कुमार महेंद्र प्रताप** यांची आपणांस ओळख करून देतील. कुमार महेंद्र प्रताप, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करीत आहेत. अफगाण-गव्हर्मेंटकडून त्यांना जी कांहीं मदत होईल, त्या मदतीचा जर्मनसरकार अत्यंत आनंदानें स्वीकारच करील. अफगाणसरकारची हिंदुस्थानला झालेली मदत, जर्मन-गव्हर्मेंट विसरणार नाहीं. राजा महेंद्र प्रतापनीं जर्मनींत राहून जर्मनीची परिस्थिति समक्ष अवलोकन केलेली आहे. ते ती तेथें आपणांस नीट समजावून देतील. जर्मनी आणि अफगाणिस्थान यांच्यामधील राजकीय व आर्थिक संबंध कसे राहतील यासंबंधाचें बोलणें करण्याचे सर्व अधिकार, जर्मनगव्हर्मेंटनें डॉ. व्हान हेंटिग यांना दिलेले आहेत."

बर्लिन सोडण्यापूर्वी झोसेन येथील लष्करी तुरुंगांत, मी कैदी हिंदी शिपायांची भेट घेतली. पुष्कळ हिंदी कैद्यांना नेहमींच्या कामाची माफी दिली गेली होती. हिंदु मुसल्मान कैद्यांच्या धार्मिक भावना दुखविल्या न जातील अशाविषयीं, फारच काळजी घेण्यांत येत होती. मुसलमानांच्याकरितां एक मशीद आणि एक मिनारतहि उभारलेली होती. उत्तर हिंदुस्थानांतील स्वतंत्र जातींत जन्माला आलेले

झोसेन येथील अनेक हिंदी शूर शिपाई, इस्लामकरतां आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं, इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यास अत्यंत उत्सुक होते. त्या कैदी हिंदी शिपायांतून सहा जण आफ्रिडी आणि कांहीं पठाण मी माझ्याबरोबर निवडून घेतले. त्यांनीं अफगाणिस्थानापर्यंत यावें व तेथून स्वदेशांत जावें, असें ठरविण्यांत आलें होतें. कैद्यांना पाहिल्यानंतर मी तेथील कमांडटला प्रत्येक हिंदी शिपायास कांहीं परिमाणापर्यंत लोणी देण्याविषयीं विनंती केली. व ती जर्मन अधिकाऱ्यांनींही मान्य केली.

आम्ही तेथून पूर्वेकडे जाण्यास निघालों. ते एकदम सर्व न निघतां टोळ्या टोळ्यांनींच निघालों. प्रत्येक तुकडीनें निरनिराळ्या दिवशीं बर्लिन सोडलें. कॉन्स्टान्टिनोपल येथें आम्हीं सर्वांनीं एकत्र जमावें असें ठरलें. हर व्हान हेंटिग, एक हिंदु आचारी, एक जर्मन परिचारक, आणि मी, असे सर्वजण व्हिएन्नाच्या मार्गानें गेलों.

व्हिएन्नास पोंचल्यावर इजिप्तचे माजी **खेदीव अब्बास हिल्मी**—ज्यांना सिंहासनावरून पदच्युत करून स्वदेशांतून हद्दपार करण्यांत आलें होतें, त्यांची व आमची गांठ पडली. जवळजवळ सहा तासपर्यंत त्यांचें व माझें बोलणें झालें. भोजनापूर्वी आणि नंतर, खेदिवांनीं तेवीस वर्षांचा आपला इतिहास सांगितला. त्यांनीं आम्हांला असें सांगितलें कीं "इंग्लिशांच्या बरोबर, आपण तत्पूर्वी फारच सहकारितेनें वागत होतों. त्या वेळपर्यंत इंग्लिशांच्यावर आपला विश्वास होता. परंतु इंग्रजांनीं माझ्याविषयीं नेहमीं संशयदृष्टिच ठेवली. शेवटीं शेवटीं, मला तें अगदीं असह्य होऊन गेलें. व हळु हळु माझ्या मनाचा कल इजिप्तच्या स्वातंत्र्याकडे होऊं लागला. इंग्रजांना ती इष्ट आपत्तीच होती. त्यांनीं मला अधिकच त्रास देण्यास सुरवात केली; भरभराटीस आलेली माझी रेल्वे-लाइनहि त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतली." खेदिवांनीं पुढें म्हटलें, कीं "फाऊद हा आज काल इंग्लिशांच्या हातांतील एक बाहुलें होऊन बसला आहे. आणि त्याचा तें आपल्या इच्छेप्रमाणें उपयोग करून घेत आहेत. **फाऊद** फारच मूर्ख मनुष्य आहे!" परंतु तदनंतर खेदिवांच्या अंतःकरणास कसल्या तरी असह्य यातना होत असाव्या. कारण ते पुनः अधिकच उदास होऊन बोलले. "अशा राजकुलांत जन्मास येण्यापेक्षां, आणि 'इजिप्तचा युवराज' म्हणून म्हणवून घेण्यापेक्षां, मी एखाद्या गरीब कुलांत जन्मास आलों असतों तर फार बरें होतें! गरीब होऊन, माझें आयुष्य अत्यंत सुखानें गेलें असतें." त्या शेवटच्या वाक्यांतील प्रत्येक शब्दा-

बरोबर खेदिवाच्या अंतःकरणाची तळमळ स्पष्टपणें त्यांच्या चर्येवर दिसून येत होती. त्या नैराश्यस्थितींतहि त्यांच्या आशेची ज्योत मधून मधून प्रज्वलित होत होती. खेदिवांनीं पुनः म्हटलें, " **अजूनहि माझ्या देशाचें स्वातंत्र्य माझ्या डोळ्यांना दिसत आहे. माझ्या देशाचा भविष्यत्काल उज्वलच राहील. इजिप्तच्या स्वातंत्र्याला अडथळा करूं शकेल अशी एकहि शक्ति या सगळ्या जगांत नाहीं.** " इंग्रजांच्या द्वेषानें खेदिवाचें अंतःकरण क्षणाक्षणाला जळत होतें. सहा तासांच्या सहवासांत खेदिवाच्या तोंडून आम्ही अनेक गोष्टी श्रवण केल्या. त्यांचे डोळे, कोणाच्या तरी अज्ञात संशयानें आणि सूडानें, गरगर फिरत होते.

व्हिएन्नाहून आम्ही बुडापेस्ट, बुखारेस्ट, सोफिया ॲड्रिआनोपल् या मार्गानें **कॉन्स्टान्टिनोपल** येथें येऊन पोहोंचलों. त्या ठिकाणीं "Pera Palace Hotel" मध्यें आम्ही जवळजवळ पंधरा दिवस काढले. तेथें अधिक दिवस राहण्याचा एक हेतु असा होता कीं, तुर्कस्थानकडून अफगाणिस्थानच्या अमिरास व हिंदुस्थानांतील संस्थानिकांना मिशनला पत्रें मिळवावयाचीं होतीं. आणि दुसरा हेतु व्हान हेंटिग यांना मिशनच्या पुढील प्रवासाची व्यवस्था करावयास अवधि पाहिजे होता. कॉन्स्टांटिनोपल येथें राहून त्या मुदतींत मी व व्हॉन हेंटिग यांनीं अनेकांच्या मुलाखती घेतल्या. तुर्की-सेनाध्यक्ष **एनव्हर पाशा** यांचीही आम्ही उभयतांनीं मिळूनच गांठ घेतली. सुप्रसिद्ध मुत्सद्दी **तालात् बे, ग्रँड वाझिर** आणि इजिप्तचे **राजपुत्र सय्यद हालिम**, तसेच साधू शेख उल् इस्लाम यांच्याही मी भेटी घेतल्या.*

सेनाध्यक्ष एनव्हर पाशा यांच्याशीं जी आमची मुलाखत झाली, ती स्तंबूलच्या राजवाड्यांत झाली. ' मिशन ' विषयींची माहिती एनव्हरपाशाला आधींपासूनच होती असें आम्हांला मुलाखतींत दिसून आलें. आमच्या मार्गांत ज्या पर्वतप्राय अडचणी उभ्या होत्या त्याची जाणीव एनव्हर पाशांना होती. त्या अडचणी कशा दूर करतां येतील याविषयींच त्यांनीं आमच्याशीं अधिक चर्चा केली. मुलाखत चालू असतां, दुसरीकडे त्याचवेळीं गॅलिपोलींतील तुर्कांच्या मोक्याच्या जागांवर इंग्रजांनीं हल्ला चढविला होता. परंतु, एनव्हर पाशांच्या मनावर त्या

* महायुद्धाच्या समाप्तीनंतर यांच्यापैकीं बहुतेकांचे खून झाले.

इजिप्तचे माजी पदच्युत खेदीव.



" अजूनही माझ्या देशाचें स्वातंत्र्य माझ्या डोळ्यांना दिसत आहे. " [ पृ. ११६ ]

एनव्हर पाशा.



" मी धर्म आणि राजकारण नेहमीं निरनिराळ्या खिशांत ठेवीत असतों !" [ पृ. २९,११६ ]

गोष्टीचा थोडाहि परिणाम घडून आल्याचें आम्हांस दिसून आलें नाहीं. शत्रू चालून आल्यावरहि मिशनच्या कार्याविषयींच एनव्हरपाशाचें बोलणें चालू होतें. मुलाखत संपण्याच्या पूर्वी, एक तुर्की अधिकारी मिशनच्या कार्यासाठीं आणि मिशनला मदत व्हावी म्हणून अफगाणिस्थानांत मिशनबरोबर पाठवून देण्याचें तुर्की गव्हर्मेंटनें ठरविलें असल्याबद्दल एनव्हरपाशांकडून आम्हांस कळून आलें. शेख उल् इस्लाम यांच्या भेटीचा योगहीं एनव्हर पाशांनींच तात्काळ जमवून आणला.

तुर्कस्थानचे खलिफा सुलतान पांचवे महमद गाझी यांनीं आमची भेट खाजगी रीतीनें घेतली. सुल्तानांची ती भेट बास्परसवरील डोल्मा बागशाह नामक मोठ्या राजवाड्यांत झाली. राजवाड्याच्या प्रवेशद्वारांत आम्ही जातांच सुलतानच्या ए. डी. कॅम्पनें आमचें सुस्वागत केलें. तेथून आम्हांला एका सुंदर दिवाणखान्यांत नेण्यांत आलें. त्या दिवाणखान्याचें ऐश्वर्य अपूर्व होतें. अंतर्गृहांतील मुख्याधिकाऱ्यानें प्रथम आम्हांस आंत नेऊन कॉफी दिली. व नंतर सिगार अर्पण करण्यांत आल्या. आमचा उपहार चालू असतां ए. डी. कँप हे हर व्हान हेंटिग यांना औपचारिक कुशल प्रश्न विचारीत होते. तदनंतर, आम्हांला आणखी एका दिवाणखान्यांत नेण्यांत आलें. तो दिवाणखाना आमच्या स्वागतार्थ मुद्दाम शृंगारण्यांत आला होता. दिवाणखान्यांत आम्ही प्रवेश करतांच, अंतर्गृहाधिकाऱ्यानें मोठ्या अदबीनें आम्हांला दरबारी सलाम केला. व तेथून तो निघून गेला.

वृद्ध सुलतान, समोरच एका उच्चासनावर अधिष्ठित होते. त्यांच्या अंगावर लोकरीचा काळा कोट असून डोक्यास तांबडी फेज टोपी होती. आम्हांला पाहतांच सुलतान आपल्या उच्चासनावरून उठून थोडेसे पुढें आले. व स्वागतार्थ, प्रेमळपणें त्यांनीं आपले दोन्ही हात आमच्या पुढें केले. हस्तांदोलन झाल्यावर त्यांनीं आम्हांस मूल्यवान् खुर्च्यांवर बसावयास सांगितलें. आम्ही सुल्तानांच्या समोरच बसलेलों होतों. अंतर्गृहाधिकारी मोठ्या अदबीनें आमच्या जवळच पुनः येऊन बसला. त्यानेंच आमचें दुभाषाचें काम केलें. सुल्तानानें माझ्या स्वागतार्थ जे शब्द उच्चारले त्यांचें फ्रेंच भाषेंतून भाषांतर व्हान हेंटिग यांना सांगण्यांत आलें. व तें त्यांनीं मला इंग्लिशमधून निवेदन केलें. प्रथमतः सुल्तानानें आमच्या सर्वांच्या प्रकृतिविषयीं चौकशी केली. तुर्कस्थान व इराण यांच्या पलीकडे आमच्या दीर्घ प्रवासांत किती संकटें येणार आहेत याची त्यानें आम्हांला पूर्ण जाणीव

दिली. व आमच्याबद्दल फारच काळजी व्यक्त केली. अल्लाच्या कृपेनें मिशनच्या कार्यांत यश येवो, व 'तुमचा प्रवास सुखाचा होवो' असा शुभाशीर्वादहि त्यांनीं दिला. मुलाखत संपतांच नम्रतापूर्वक सुलतानास आम्ही वंदन केलें आणि सुलतानानेंहि पण पुनः पुढें येऊन, व पुनः एकदां हस्तांदोलन करून 'मिशन'ला यश चिंतिलें.

सुलतानांची भेट घेऊन आम्ही बाहेर पडतों न पडतों तोंच, सुलतानांचे पुतणे प्रिन्स युसफ॰ यांचेकडून अल्प उपहारार्थ आम्हांस आग्रहाची विनंति करण्यांत आली. यावेळीं बर्लिनहून नुकतेच कॉन्स्टांटिनोपलला येऊन पोंचलेले मुल्ला बरकतुल्ला हेहि मजबरोबरच होते. युवराजांचा बंगला एका रमणीय उद्यानाच्या पार्श्वभागीं असून अगदीं एकीकडे असा होता. तेथील साधेपणा पाहून आम्हांस फारच अचंबा वाटला. तेथील उपहाराची तयारी तुर्की-युरोपियन पद्धतिनुसार ठेवण्यांत आली होती. आरंभापासून मुलाखत संपेपर्यंत, युवराज सुंदर अरेबिक भाषेंतच बोलत होते.

अखेरीस, बर्लिनहून हिंदी राजेरजवाड्यांना लिहिलेलीं पत्रे कॉन्स्टांटिनोपलला येऊन पोंचलीं. तुर्की गव्हर्मेंटकडून मिळालेलीं पत्रें सुंदर पर्शियन भाषेंत लिहिलेलीं होतीं. व तींहि बहुमोल वेष्टनांनीं वेष्टित केलीं गेलीं होतीं. तुर्की सरकारनें तीं पत्रें आमच्या स्वाधीन करतांच आम्हीं पुढील प्रवासाच्या तयारीस लागलों.

आम्ही कॉन्स्टांटिनोपल सोडणार तोंच, डॉक्टर बेकर नांवाचे एक जर्मन मिलिटरी सर्जन आम्हांस येऊन मिळाले. त्यांनीं कित्येक वर्षें पर्शियांतच नोकरी केलेली होती. तसेंच, दुसरे एक तरुण जर्मन गृहस्थ Walter Roehr हेहि शिष्टमंडळांत सामील झाले. Walter Roehr नीं उत्तर पर्शियांत बरेच दिवस काढले होते. व त्या भागांतील त्यांना चांगलेंच ज्ञान होतें. मेसापोटेमिया आणि पर्शिया यांमध्यें डॉक्टर बेकर यांची फारच ख्याति होती. मलेरिया व अन्य दूषित ताप बरे करण्यांत, त्यांचा हातखंडा होता. त्या दोघांहि जर्मन अधिकाऱ्यांना पर्शियन भाषा उत्तम रीतीनें अवगत होती. आमच्या बरोबर असलेले तुर्की अधिकारी काझिम बे हेहि पर्शियन भाषेंत तरबेज होते.

॰ पुढें दोनच वर्षांनीं प्रिन्सनें आत्महत्या केली.

# तुर्कीच्या सुलतानाचें पत्र



मुल्ला बरकत्‌उल्ला आणि महेन्द्रप्रताप यांच्याबरोबर अफगाणिस्थानच्या अमीरांस पाठविलेलें टर्कीच्या सुल्तानांचें पत्र. (पृ. ११८)

१९१५ च्या मे महिन्याच्या आरंभीं एका सुप्रभातीं, आम्ही कॉन्स्टान्टिनोपल सोडलें. बास्परसची सामुद्रधुनी ओलांडून आम्ही आमच्या सामानसुमानासह आशियाचा किनारा गांठला. हैदरपाशा या रेल्वेस्टेशनवर आम्ही सर्वजण एकत्र झालों. आम्हांला निरोप देण्यासाठीं आमचे अनेक मित्र तेथपर्यंत आलेले होते. त्यामुळें गाडी सुटण्यास जरा उशीरच लागला. नंतर मार्मोराच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें वळणावळणानें पुनः आमच्या प्रवासास आरंभ झाला. समुद्राच्या पाण्यावर नीलवर्णाची लकेर मारत होती. व दूर अंतरावर नीलसमुद्रांत काळसर अशीं ठिपक्यांसारखीं बेटें दिसत होतीं. वसंताच्या आगमनानें वनश्री फारच खुलून दिसत होती, बागबगीचे, शेतें, टेकड्या या सर्वांनीं जणुं कांहीं हिरवी शालच आपल्या अंगावर घेतलेली होती! डोक्यावर नीलांबर आणि खालीं विस्तीर्ण हारीत पट पसरलेला, असा रमणिय देखावा आमच्या डोळ्यासमोर मैलचे मैल होता. निसर्गाचें तें दृश्य पहात असतां, माझी तर अगदीं समाधिच लागून गेली. कांहीं वेळानें सावध होऊन पाहतों तों मार्मोराचा किनारा संपून एशियामायनरच्या विस्तीर्ण सखल प्रदेशांतून आमची गाडी चालली होती. गाडीच्या दोहों बाजूंस टेकड्यांच्या रांगा दिसत होत्या. त्यांना पाहून जणूं कांहीं पर्वताच्या बाहुपाशांतच आम्ही आहोंत असा क्षणैक भास झाल्या-वांचून राहिला नाहीं.

त्या पहिल्या रात्रीं आम्हीं इस्किशेर (Eskishehr) येथील एका तुर्की भोजनगृहांत मुक्काम केला. दुसरे दिवशीं पुनः आगगाडीनेंच आम्ही निघालों. संबंध दिवसभर आमचा प्रवास चालू होता. शेवटीं आम्ही कोनिया शहरीं येऊन दाखल झालों. कोनिया हें ottoman साम्राज्याची जुनी राजधानी असून ऐतिहासिक दृष्टीनें तें स्थळ फारच प्रेक्षणीय आहे. त्या साम्राज्याची जिवंतपणाची साक्ष येथील इतिहास आजहि देत आहे. तेथेंच मेवलेवी वंशाचा संस्थापक जलालउद्दीन याची कबर आहे. पर्शियन काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्या भोक्त्यांचें तें एक यात्रेचें ठिकाण आहे. आम्हीहि त्या महान् पुण्य पुरुषाच्या कबरस्थानाचें दर्शन घेतलें.

तेथून आम्ही पुढें चालूं लागल्यावर आम्हांला, पुष्कळच लहान लहान खोरीं दिसूं लागलीं. त्या खोऱ्यांतून वस्ती अगर लोक क्वचितच दृष्टीस पडत. मात्र, सुंदर सुंदर घोडे आणि अश्वशावक यांचेंच तेथें राज्य होतें. एकहि अन्य प्राणी

आमच्या नजरेस दिसून आला नाहीं. ते अश्वशावक नदीच्या तीरावर आणि लहान लहान टेकड्यांवर वायुगतीनें धांवत असतां, आम्हांला मोठी मौज वाटत होती. नंतर आम्ही अर्धवट राहिलेल्या बगदाद रेल्वेच्या बोझान्टी नामक स्टेशनावर घेऊन पोंचलों. या ठिकाणची वस्ती दाट असून टॉरस पर्वतावरील मोकळी हवा प्रथमच या ठिकाणीं आम्हास खावयास मिळाली. त्या रात्रीं मी एका उघड्या जागेवरच झोंपी गेलों. पर्वतावरून इतका गार वारा येत होता, कीं जगांत उष्णता आणण्यासाठीं तशा त्या मध्यरात्रीच्या वेळीं उठून मला इकडून तिकडे येरझारा घालाव्या लागल्या. झान्टीहून आम्ही चार घोड्यांच्या गाडींतून ( अराबसमधून ) टॉरस पर्वताची खिंड ओलांडिली. नंतर आम्ही भूमध्यसमुद्राच्या अगदीं समीप असलेल्या मासिना नांवाच्या एका लहानशा स्टेशनावर आलों तेथून ट्रेननें प्रवास करून अदाना व उस्मानिआस मागें टाकलें. आम्ही थोडेसें पुढें गेल्यावर हर व्हॉन हेंटिंग व काझिम बे यांनीं घोड्यांच्या गाड्या व भाड्याचीं खेचरें ठरविलीं. अशा तऱ्हेनें आम्ही आमानस खिंड ओलांडून मास्लेमिया गांठलें. हें ठिकाण म्हणजे बगदाद-लाइन व सिरीयन-रेल्वे यांचें जंक्शनच होय. येथून अलेपो, दमास्कस व जेरुसलेमकडे जाण्यास फाटे फुटतात. मास्लेमियाहून आम्ही अलेप्पोस गेलों. अलेप्पोस, नानाविध खावें व हरतऱ्हेच्या चैनीच्या वस्तु यांनीं तेथील बाजार खचून गेला होता. एका अरेबियन Cafe मध्यें मी व मुल्ला बरकतुल्ला यांनीं पौर्वात्य पद्धतीचें जेवण घेतलें. या Cafe गृहांत एक चित्रविचित्र पोषाखाचा मुलगा आपल्या हातांत हुक्का घेऊन तो प्रत्येक पाहुण्याच्या पुढें नेई व त्यास, ओढण्याचा आतिशय आग्रह करी. मुल्ला बरकतुल्ला यांनीं जरी कुराण उत्तम रीतीनें पढलेलें होतें, तरी त्यांनाहि त्या देशची भाषा नीटशी समजून येत नव्हती. परंतु, बरकतुल्लांनीं मला असें सांगितलें कीं, आपल्या या धाडसाच्या प्रवासाबद्दल त्या सर्वांना राहून राहून अचंबा वाटत आहे.

मोस्लेमियास पुनः परत येऊन, आम्ही पूर्वेस जेराब्लसचा मार्ग धरला. त्या ठिकाणीं बगदाद-रेल्वेकरतां युफ्रातीस नदीवर एक लोखंडी पूल नुकतांच तयार करण्यांत आला होता. Earphemish येथें कांहीं जर्मन पुराणवस्तु-संशोधक एका प्राचीन शहराचा अवशेष भाग उकरून काढीत होते. त्यांनीं आम्हांला आपल्या-निवासस्थानीं नेऊन आमचें अत्यंत आतिथ्य केलें.

त्यांचेबरोबर आम्ही त्या पुरातन नाश पावलेल्या स्थळाचे कांहीं अवशेष पाहिले. तेथील रुंद भिंती आणि शहराची प्रचंड वेस पाहून आम्ही स्तंभित होऊन गेलों.

त्या ठिकाणीं, आम्ही दोन दिवस मुक्काम केला. कारण हर व्हॉन हेंटिग व काझिम बे हे बोटींची तयारी करीत होते. युफ्राटिसचें पात्र वंद असून त्या वेळीं तिला महापूर आलेला होता. बोटी तयार होतांच तिच्या अनिरुद्ध गतीच्या प्रवाहाबरोबर आमचाहि पण प्रवास मोठ्या झपाट्यानें सुरू झाला. दिवस जसजसा वर येऊं लागला. तसतशी आमच्या अंगाची नुसती काहिलीकाहिली होऊं लागली. आम्ही इतके तापत होतों, कीं अखेरीस आमच्या बोटींच्या सावलीचाच आमच्यापैकीं कित्येकांनीं आश्रय घेतला. घटकोघटकीं अंगावरील कपडे काढून आम्ही फेकून देत होतों. कांहीं जर्मन लोक तर, दोन बोटींमधून चालणाऱ्या प्रवाहांत पडून मधून मधून वुड्या मारीत असत. आणि बोटीबरोबर पोहत असत. दुपार झाल्यावर, दूध, खवा, ताजीं अंडीं वगैरे किनाऱ्यावरून विकत घेण्याकरितां, आमची चिमकुली होडी मधून मधून थांवत असे. सलाहिया येथेंही पुरातन वस्तु पाहाण्याच्या निमित्तानें कांहीं वेळ आम्ही मुक्काम केला. सलाहियास एक प्रचंड पण सुंदर संगमरवरी राजवाडा आणि एक किल्ला आहे. हीं जागा हल्लीं अगदीं ओसाड अशी आहे. तेथें एके काळीं असलेलें भव्य सभागृह, पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या देवळांचे अवशेष, आणि तटाच्या भरभक्कम भिंती, पाहून गतकालच्या औद्योगिक जीवनाचें मूर्तिमंत चित्र आमच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. पूर्वेकडील औद्योगिक कलेच्या परमावधीची, ते अवशेष आजही प्रवाशांना साक्ष देत आहेत. असा आमचा प्रवास अनेक दिवस चालला होता. त्या प्रवासांत आम्ही एकमेकांना आपली भाषा शिकविली. बगदादला इंग्लिशांचे नेटिव गुप्त हेर होते. त्यांना आमची वार्ता समजूं नये म्हणून पुनः आम्ही निरनिराळ्या टोळ्यांनीं निरनिराळ्या दिशांना जाण्याचें ठरविलें. व्हॉन हेंटिग हे पुढील प्रवासाची व्यवस्था करण्याकरतां एकटेच पुढें निघून गेले. व आम्ही त्यांच्या मागाहून गेलों. बगदादपासून आमची टोळी आठ मैलांवर आल्यावर फेलुझ गांवीं आमच्यासाठीं दोन गाड्या तयार करून ठेवण्यांत आल्या होत्या. व आमच्या बाकीच्या लोकांसाठीं आणखीहि कांहीं गाड्या व्हान हेंटिगनीं फेलुझला रवाना केल्या होत्या.

मी आल्याचा जर्मन–कॉन्स्युलेटमध्यें बभ्रा होऊं नये म्हणून मला गांवाबाहेरील एका खाजगी बंगल्यांत उतरविण्यांत आलें. कांहीं वेळानें आमच्या पार्टीतील लोक आम्हांस येऊन मिळाले. बाकीच्यांची व्यवस्था अन्यत्र ठिकाणीं करण्यांत आली. त्या ठिकाणीं आठ दिवसपर्यंत जवळ जवळ कैदेंतल्याप्रमाणेंच, मला रहावें लागलें. कारण, इंग्रजांचे हेर आमच्या शोधार्थ रवाना झाले होते. संध्याकाळीं नदीकिनाऱ्यावरील बागेंत फिरावयास, किंवा तैग्रीस नदींत नांव चालविण्यास कधीं कधीं मी बाहेर पडत असे. त्या वेळीं युफ्रातीस व तैग्रीस या नद्यांना महा-पूर येऊन बगदादजवळील सर्व प्रदेश जलमय होऊन गेला होता. तारीख १ जून रोजीं दुपारीं, आम्ही बगदाद सोडलें. परंतु पुरामुळें, पुनः आम्हांला लहान लहान होड्यांतून नदीपार होणें भाग पडलें. त्यांत जवळ जवळ आमचा अर्धा तास गेला. पलीकडे गाड्या तयार ठेवण्यांत आल्या होत्या. या वेळचीं आमचीं साधनें म्हणजे, चार घोड्यांनीं ओढल्या जाणाऱ्या जुन्या पद्धतीच्या खटार-गाड्या होत्या. आम्ही महत्त्वाचें सामानसुमान त्यांतून खालीं घालून त्यावर निजण्यासाठीं आम्ही आपापले रग पसरून दिले. व बाकीचें जड जड असें सामान खेचरांवरून लादण्यांत आलें. अशाप्रकारें त्या एकेक खटारगाडींत आम्ही तिघे तिघेजण बसलों होतों. आमच्या प्रवासास सुरवात झाली. प्रत्येकानें लांब होण्यास त्या गाडींत जागाच नव्हती. झोंप आली म्हणजे आम्ही एका कुशी-वरच झोपत असूं. इकडचे इकडे व्हावयाचें म्हटलें कीं, एकमेकांचा एकमेकांना आज्ञा घ्यावी लागत असे. आमच्या त्या '**बगदादी रथांत**' त्या वेळीं आम्ही तीन लोक होतों. एक प्रेम–धर्माचा पुरस्कर्ता; एक मुसलमानी धर्माचा कट्टा अभिमानी; आणि एक क्षात्रवृत्तीचा ख्रिश्चन;–असे राजकारणामुळें, आम्ही तिघेहि जणूं कांहीं एकाच घरांत भाऊ म्हणून रहात होतों. माझ्या देशांत तसें दृश्य मला कधीं दिसेल, असें माझ्या मनांत त्या वेळीं हजार वेळां तरी येऊन गेलें. खरोखर तसा एकहि दिवस, माझ्या देशांत उगवणार नाहीं काय ?

दिवसा सूर्याचा प्रखर ताप, आणि मार्ग सर्व धुळीनें भरलेला, यामुळें आम्हांस आमचा प्रवास रात्रीचाच करावा लागे. त्याशिवाय शत्रूचीहि भीति होती. तो आमचा खडतर प्रवास चालू असतांना गाडीचे धक्के खाऊन खाऊन आमचें सर्वांग चांगलेंच सडकून निघालें. त्या डोंगराळ मुलखांतून असा आमचा प्रवास

बरेच दिवस एकसारखा चालू होता. शेवटीं आम्ही बगदादपासून बरेच दूर पूर्वेस एका गांवाजवळ आलों. तें गांव एका नदीच्या कांठीं वसलेलें असून इराणच्याच सरहद्दीवर होतें. तेथून आम्ही गुलगुलजवळ सरहद्द ओलांडिली. त्या ठिकाणीं कसलाच पाहरा नव्हता. त्या ठिकाणाहून तुर्की–सरहद्दजवळच होती. काझिम बे व व्हॅन हेंटिंग यांनीं तेथें तुर्की अंमलदारापासून उत्तम घोडे घेतले व आम्ही सर्वजण घोडेस्वार झालों. नंतर आम्ही क्रिंदला पोंचलों. त्या ठिकाणीं रूफ बे या सेनापतीचा तळ पडलेला होता. रूफ बे पुढें केमल-पाशाच्या अमदानीत केमलपाशांचे मुख्य प्रधान झाले. रूफबेनीं आपल्या लष्करी-तंबूंत आम्हांला मोठी थाटाची मेजवानी दिली. रूफबेनें एका ब्रिटिश जहाजावर शिक्षण घेतलें होतें. व ते नाविक युद्धांतहि मोठे निपुण होते. इंग्रेजीहि त्यांना चांगलें बोलतां येत असे. " अनातोलियाच्या गरीब प्रजेच्या पैशानें दोन जहाजें बांधण्यांत आलीं व तीं इंग्लिशांनीं जप्त केल्यामुळेंच तुर्कांना इंग्लंडाविरुद्ध शस्त्र उपसावें लागलें " असें रूफबेच्या सांगण्यांत आलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रूफबेनें, आपल्या सरदारांनिशीं आणि सैन्यानिशीं आम्हाला निरोप दिला. त्यावेळीं रूफबेच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं आपले लष्करी पोषाख केलेले होते; आणि सैनिकांच्या हातांतील हत्यारें सूर्यकिरणांत तळपत होतीं.

त्यानंतर आमच्यावर एक दैविक आपत्ति आली. आम्ही हरुनाबाद सोडतों न सोडतों तोंच आम्हांला मलेरियानें पछाडलें. मी तर अंथरुणच धरलें. माझा जीव मला अगदीं नकोसा झाला आमच्या सर्वांच्याकरितां पुनः आणखी गाड्या कराव्या लागल्या. त्यावेळीं आम्ही आमचा मार्ग कसा तरी काढीत होतों. पश्चिम पर्शियाची राजधानी केरमानशहा जवळ आल्यामुळें तेथेंच आम्ही मुक्काम करण्याचें ठरविल. केरमानला आठ दिवसपर्यंत मी तापानें अंथरुणाला खिळून होतों. केरमानपासून पूर्वेकडे, इस्पाहान आठच दिवसांच्या अंतरावर होतें. आम्हीं केरमानहून इस्पाहानला पोहोंचेपर्यंत व्हान हेंटिगनीं तेहरानहून इस्पाहा-नला यावें असें ठरविण्यांत आलें. व त्याप्रमाणें हेंटिग तेहरानच्या मार्गासहि लागले. तेहरान हें राजधानीचें शहर असून त्या ठिकाणीं शहाच्या दरबारीं Prince Henry Reuss हे परराष्ट्रीय जर्मन वकील होते. त्यांच्या मदतीनें व्हान हेंटिगनीं पुढील प्रवासाची तयारी करावी अशी योजना करण्यांत आली.

जून २८ रोजीं दुपारीं, इस्पाहान आम्हांला दिसूं लागलें. "इस्पाहानला आम्ही दोन तासांत पोहोंचूं" असें आम्ही म्हणत आहों तोंच, आमची गाडी उलटली आणि दोन्ही चाकांचा चक्काचूर उडून गेला. आम्ही तिघेहि दूर अंतरावर रस्त्यावर फेकले गेलों. मोकळे झालेले घोडे हातीं धरण्याशिवाय आतां गत्यंतरच नव्हतें. गाडीवर पहारा करण्यासाठीं गाडीवानास मागें ठेवून आम्ही त्या घोड्यांवर बसून बिन खोगिरानें तसेंच इस्पाहानकडे गेलों. इस्पाहान जरी दुरून जवळ दिसत होतें, तरी आमचा मार्ग एकसारखा चुकत चालला होता. वांकड्या तिकड्या रस्त्यांनीं अंधारांतून ठेंचकळत आम्ही वाट काढीत होतों. इस्पाहानमध्यें प्रवेश केला तेव्हां कांहीं थोडींच उपाहारगृहें उघडीं होतीं. जर्मन-वकिलातींत गेल्यावर व्हान हेंटिग आमचीच वाट पहात उभे असलेले दिसले. जर्मन वकील डॉ. व्हान कारडार्फ यांनीं आम्हांस त्या रात्रीं लहानशी मेजवानी देऊन आमचें फारच आतिथ्य केलें. डॉ. व्हान कारडार्फ यांजकडे त्याच वेळीं बव्हेरियाहून आलेले कॅप्टन निदरमिअर हे जर्मन गृहस्थाहि होते. पूर्वी एक वेळ पाशयांतून अफगाणिस्थानाकडे पाठविलें गेलेलें राजकीय मिशन कॅप्टन निदरमिअर यांच्याच पुढारीपणाखालीं गेलें होतें. शेवटीं असें ठरविण्यांत आलें कीं, मिशननें कॅप्टन निदरमिअरचेंहि सहाय्य घ्यावें ! आणि त्यांनींहि पण मिशनबरोबरच अफगाणिस्थानांत यावें. निदरमिअर हे राजकारणपटु आणि थोर मुत्सद्दी होते. निदरमिअरनीं पुढें मिशनला अनेक प्रकारें सहाय्य करून ती गोष्ट 'मिशन'च्या पूर्णपणें निदर्शनास आणून दिली. अफगाणिस्थानच्या कार्याचे वेळीं 'मिशन'ला त्यांनीं जें महत्त्वाचें सहाय्य केलें तें खरोखरीच अमोल होतें.

जर्मन-वकिलानें आम्हाला उतरण्यासाठीं शहराबाहेर एक मोठा बंगला दिलेला होता. तेथें मी तीन दिवसपर्यंत होतों. परंतु त्या तीन दिवसांत मला घराबाहेर पडतां आलें नाहीं. इस्पाहानमध्यें प्रवेश करण्याच्या वेळीं जें कांहीं माझ्या दृष्टीस पडलें, आणि आमच्या त्या बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावरून जें कांहीं दिसत असें तेव्हढेंच 'इस्पाहान' मी पाहिलें. दूर अंतरावर कांहीं टेकड्या दिसत. त्या टेकड्या फारच सुंदर होत्या. तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं, दिवेलागणी झाल्यानंतर आम्ही आमचें सामान गाड्यांतून भरून शहराबाहेर पडलों. तेथून आम्ही आपल्या गाड्या पूर्वेकडेच चालविल्या.

नैन ( Nain ) नामक एका जुनाट शहरीं, त्या रात्रीं आम्ही मुक्काम केला. कारण,त्यापुढें आमचा मार्ग अत्यंत बिकट होता. पूर्व-पर्शियाचें 'Dasht-I-Kavir'

नामक ओसाड वाळवंट आम्हांस तुडवून जावयाचें होतें. काझिम बे यांनीं त्या ठिकाणीं कांहीं उंट व कांहीं उमदे घोडे खरेदी केले. नैन सोडलें तेव्हां आमची टोळी शत्रूला अजिंक्य अशीच होती. त्याशिवाय आमचें सामानसुमान घेऊन उंटाचा एक तांडाही आमच्या पाठोपाठच येत होता. तशा स्थितींत मोठ्या कष्टानें आम्ही त्या क्षारयुक्त 'Dasht-l-kayir' डेझर्टमध्यें पहिलें पाऊल टाकिलें.

तो आडमार्ग आम्हांला मुद्दाम होऊनच स्वीकारावा लागला होता. कारण, दुसरे सर्व मार्ग शत्रूंनीं रोखून धरले होते. आमच्या बरोबर जे वाटाडे आणि कारवान होते, त्यांच्याशिवाय आमच्यांपैकीं कोणालाच भावी आपत्तींची कल्पना नव्हती. त्या प्रदेशांत, पाण्याचीं ठिकाणें फारच थोडीं होतीं; आणि जीं होतीं तींहि अतिशय दूर दूर टप्प्यावर. त्यामुळें आम्हांला कातड्याच्या पिशव्यांतून दूरपर्यंत पाणी भरून घ्यावें लागे. प्रखर सूर्यतापानें एक तर पाणी अतिशय गरम होऊन जाई; आणि दुसरें, बरेचसें पाणी हिसळून नाहींसें होत असे. आमच्या बरोबरचें अन्न म्हणजे वाळलेला भात, खजूर आणि बदाम यांचें एक मिश्रण होतें. जनावरांना चारा म्हणून तो कसला त्या वालुकारण्यांत नव्हताच. त्यामुळें, जें कांहीं मधून मधून थोडेसें मिळे त्यावरच ते मुके प्राणी आपलें समाधान मानून घेत.

आम्ही सबंध एक रात्र त्या ओसाड आणि रुक्ष प्रदेशांत प्रवास केल्यावर, एका तळ्याजवळ येऊन पोचलों. तहानेनें आम्ही अगदीं वेडे होऊन गेलों होतों. परंतु त्या तळ्यावर जाऊन आमची सर्वांची निराशाच झाली. तेथील पाण्याची एक चूळही आम्हांला भरवली नाहीं. त्या मुक्या जनावरांनीं पाण्याला स्पर्श न करतांच निराशेनें आपलें तोंड फिरविलें. वाऱ्याच्या ऊन ऊन ज्वाळा आम्हाला एकसारख्या भाजून काढीत होत्या. त्याही आपत्तीला तोंड देऊन आम्ही मार्ग चालूं लागलों. परंतु, संध्याकाळ होतांच, अनाराकच्या रस्त्याला म्हणून आम्ही भलत्याच मार्गास लागलों. पाण्याचीं सर्व ठिकाणें चुकून बसलों. पिशव्यांतील पाण्याचा सांठा केव्हांच संपून गेला होता. एक दोन ठिकाणीं आम्हाला जें पाणी भेटलें तें तर तोंडांतच घालवत नव्हतें. त्या वालुकामय प्रदेशांतून रात्रभर आम्ही तो मार्ग आक्रमण करीत होतों. सकाळीं सूर्य जसजसा वर येऊं लागला, तसतशी उष्णता आम्हाला अगदीं असह्य होत चालली. आमच्यापैकीं कांहीं जण तर त्या उष्णतेनें बेशुद्धच पडले. आमच्या बरोबर असलेल्या वाटाड्यांनीं

त्यांना उपचार करून बऱ्याच वेळानें मग शुद्धीवर आणलें. प्रतिक्षणीं तो त्रास असह्य होत चालला होता. इतक्यांत अनाराकचा रस्ता पुनः आम्हाला सांपडला, आणि आम्ही एकदांचे रस्त्याला लागलों !

रस्त्याला लागल्यावर जो पहिलाच जलाशय आम्हांला दिसला, त्यांत त्या तहानेनें वेड्या झालेल्या जनावरांनीं एकदम आपलीं तोंडें खुपसलीं; आणि किती वेळ तरी पाणी पी पिऊन घेतलें. आम्हीही पण तसेंच केलें ! त्या वालुकामय प्रदेशांत–एका लहानशा हिरव्यागार टेकडीच्या जवळून झुळझुळ वहात जाणाऱ्या त्या पर्वतबालकाला–त्या माझ्या निरंतर उपकारक निर्झराला–मी जन्मभर विसरणार नाहीं. त्या टेकडीजवळ अंजीर, अनार, बदाम यांच्या राया होत्या. जवळच एक मिनारत असून भव्य आणि गगनस्पर्शी मशिदीमध्यें कारंजाचे उंच उंच फवारे उडत होते. त्या ठिकाणीं कित्येक हजार लोक विश्रामार्थ उतरले होते. आम्हांला एका थंडगार आणि सोईस्कर अशा कारवान–सराईंत जागा दिली गेली. कित्येक मैल रुक्ष तप्त अशा वाळवंटांतून प्रवास करून आल्यावर तें रम्य स्थळ आम्हांला नंदनवनाप्रमाणें वाटलें असेल तर त्यांत काय नवल ! त्या शीतल ठिकाणीं, जनावरांना विश्रांति देऊन एकदोन रात्रीं मुक्काम करावा असेंहि सर्वांच्या मनांत आलें. इतकें लांब चालून आल्यावर ती जागा मुक्कामास बरीच सोईची होती. परंतु तेथें अधिक काळ राहतां येणें शक्यच नव्हतें. पुनः त्या अरण्यांत आम्हीं पाऊल टाकलें आणि पुढें चालूं लागलों.

त्या वाळवंटांतून आणि प्रखर उन्हांतून प्रवास करून आम्ही एका उंचवट्यावर चढलों. त्या ठिकाणीं आम्हांस रात्र झाली. दुपारीं उन्हाचा ताप जितका असह्य होता, तितकाच आतां थंडीचा कडाकाही पण असह्यच होत होता. कांहीं काळ तसेंच चालून गेल्यावर आम्हांला Chardeh नांवाची ' कारवान सराई ' लागली. तेथेंच आम्ही त्या रात्रीं मुक्काम करण्याचें ठरविलें. आम्ही सामान उतरतों न उतरतों तोंच आम्हाला बातमी समजली, कीं " रशियन आणि इंग्रज–घोडदळ ' मिशन 'चा पाठलाग करीत येत आहे. " शत्रूला हुलकावणी देण्याखेरीज आम्हांला आतां मार्गच नव्हता. निरनिराळ्या तुकड्या कराव्या आणि शत्रूला हुलकावणी देण्यासाठीं भिन्न भिन्न मार्गांनीं प्रत्येक तुकडीनें निघून जावें, असें तावडतोब ठरविण्यांत आलें.

भूक, तहान, आणि तो कष्टद प्रवास यांनीं आम्हांला अगदीं व्याकूल करून सोडलें होतें. शेवटीं आमच्या कारवानांनीं जुलैच्या अखेरीस Deh Muha-

mmad येथें मुक्काम ठोकला. तें गांव अत्यंत दरिद्री असून तेथील सराईही मोडकीतोडकीच होती. आमचा तळ तेथें पडतांच त्या ल्हानशा गांवांत गडबड उडून गेली. लुटीच्या भीतीनें तें लोक भयभीत झाले. कोणीही आम्हांला वस्तु विकत देईना. अखेरीस त्यांची ती वृथा भीति दूर केल्यावर एक रिकामी पण हवी तशी प्रशस्त जागा आम्हांला दाखविण्यांत आली. थोडासा आश्रय मिळतांच, आमच्या बरोबर असलेल्या कारवानांनीं आणि इराणी मार्गदर्शकांनीं पुढें येण्याचें साफ नाकारलें. सांडणीस्वारांनीं तर " आतां आपण सोडून जाणार " अशीहि भीति घातली. त्यांचें म्हणणें आम्ही अतिशय हाल काढले आहेत, आणि आतां आपणास परत गेलेंच पाहिजे. परंतु त्या ल्हानशा गांवीं दुसरीं जनावरेंहि दुष्प्राप्य होतीं. शेवटीं त्या लोकांना, काझिम बे व कांहीं जर्मन अधिकाऱ्यांनीं शस्त्राचा धाक घातला; आणि प्रवास संपतांच, त्यांना दुसरीं जनावरें व सामान पुनः विकत घेऊन देण्याचें मान्य केल्यावर ते लोक आमच्याबरोबर येण्यास पुनः राजी झाले.

त्यानंतर, सुमारें एक आठवडाभर आम्ही एका ल्हानशा वस्तीच्या गांवीं मुक्काम केला. कॅप्टन निदरमिअर यांची त्या ठिकाणीं आम्हांस वाट पहावयाची होती. शिवाय रशियनांची बातमी काढण्यासाठीं जे गुप्त हेर आम्ही रवाना केले होते, तेही त्याच संकेतस्थळीं यावयाचे होते. त्याप्रमाणें कांहीं दिवस वाट पाहिल्यावर, एक दिवस आकाशांत एक प्रचंड धुळीचा लोट दिसूं लागला व तो आमच्याकडेच येत होता. त्यामुळें त्या ल्हानशा वस्तींत मोठी गडबड उडून गेली. परंतु सुदैवानें ते निदरमिअरचेच कारवान लोक होते. निदरमिअर यांच्याबरोबर त्या वेळीं Wilhelm Paschen या नांवाचा एक African Explorer हि होता. त्याशिवाय, रशियन छावणींतून तुर्कस्थानांत पळून आलेले कांहीं बंदी आस्ट्रियन व हंगेरियन लोकहि होते. ते दहा बारा जण सशस्त्र होते. अर्थात्, त्यांचेंहि मोठ्या आनंदानें आम्ही स्वागत केलें. त्यानंतर थोड्या दिवसांनीं आमच्या हेरांनींहि शत्रूकडसी नक्की बातमी आणली. हेरांनीं असें सांगितलें कीं, " मिशन इराणकडे जाईल म्हणून पूर्व-इराणकडील सर्व पर्वत-मार्ग शत्रूपक्षानें रोखून धरले आहेत. मिशनच्या पाठलागाकरितां दोन तुकड्याहि रवाना झाल्या आहेत. मेशीद ( Meshed ) हून उत्तरेच्या रोखानें कांहीं रशियन घोडेस्वार आमच्या शोधार्थ येत आहेत. उत्तरेच्या बाजूनें बिरजान्द-कडून इंग्लिश येत आहेत. " त्याशिवाय, हेरांनीं आणखी असेंहि सांगितलें कीं,

" ठिकठिकाणीं पाण्याचीं स्थळें बघून त्या त्या स्थळीं शत्रूपक्षानें आपले हेरहि ठेविले आहेत. मेशीदपासून कैन ( Kain ) आणि बिरजांद मार्गानें नसतावाद ( Nasratabad ) ला जाणारी ' पार्शियन-टेलिग्राफ-लाईन ' ही त्यांनीं उत्तम रीतीनें संरक्षिली आहे. "

शेवटीं, आम्ही एक " कौन्सिल ऑफ वॉर " भरविलें. आणि त्यांत जें सामानसुमान आम्हांला बरोबर नेतां येणें अतःपर अशक्य आणि अवजड होतें तें सामान व उंट घेऊन डॉ० बेकर यांनीं पुढें जावें आणि राहिलेल्यांनीं आपल्या दोन टोळ्या करून भिन्न भिन्न मार्गानें पूर्वदिशेस Bushruieh रोखानें कूच करावें असें ठरविण्यांत आलें. तसें करण्याचा आमचा हेतू शत्रूस ओकॉसिसकडे फसवून लावण्याचा होता शत्रूसैन्य तिकडून थकून भागून येईपर्यंत, पुनः आम्हांला अरण्यांत पलायन करणें अशक्य नव्हतें.

Bushruieh येथें आमच्या पांच रात्रीं मोठ्या चिंतेंत गेल्या. रात्रीं दूर अंतरावर खुणेचे जाळ दिसत; परंतु, शत्रू, जवळ आला नाहीं. तारीख ७ ऑगष्ट रोजीं, आम्ही एका आडमार्गानें गेलों.

नंतरचा सर्व आठवडा, आम्हांला अतिशय त्रासदायक गेला. त्या आठवड्यांत शत्रूकडून आमचा अनेक मार्गांनीं एकसारखा पाठलाग करण्यांत येत होता. एका पाण्याच्या ठिकाणाहून दुसऱ्या पाण्याच्या ठिकाणीं जाऊन आम्ही आपलीं जनावरें उभीं करतों न करतों तोंच आम्हांला दौड करावी लागत होती. तहानेनें तर आमचा जीव वेडावून गेला होता. याप्रमाणें आम्ही पंधरा पंधरा तासपर्यंत प्रवास करीत होतों. शेवटीं तीं गरीब जनावरें इतकीं थकून गेली कीं तदनंतर त्यांना अधिक श्रम देणें निर्दयपणाचें होतें. मेशीद आणि बिरजांद या मार्गानें आम्ही जात असतां एकदोन ठिकाणींच काय तो शत्रुपक्षाला आमचा सुगावा लागूं शकला. नंतर आम्ही उत्तरेच्या दिशेनें पुन्हां डेझर्टमध्यें शिरलों. आमच्या आघाडीच्या लोकांवर व आमच्या प्राणरक्षक स्वारांवर तद्देशीय लुटारू मधून मधून चाल करून येत. परंतु आमचे स्वार बार काढून त्यांना चोख उत्तर देत. लुटारूंनीं अनेक प्रयत्न करूनहि, त्यांचें आमच्या स्वारांच्यापुढें कांहीं चालूं शकलें नाहीं.

शेवटीं आम्हीं एका पाण्याच्या ठिकाणीं येऊन पोंचलों. तें पाणी इतकें कडु-क्षार होतें कीं आम्ही किंवा आमच्या जनावरांनीं त्याला स्पर्शहि केला नाहीं.

त्या पाण्याच्या ठिकाणास " Bitter water hole " असें म्हणण्यांत येत होतें. त्या ठिकाणीं आम्हांस दोन जंगली इसम भेटले. त्यांच्या सांगण्यांत असें आलें कीं, " कांहीं रशियन घोडेस्वार थोड्याच दिवसांपूर्वी त्या ठिकाणीं येऊन आमची चौकशी करून गेले. " आम्ही आमच्याबरोबर असलेल्या सामानांपैकीं आणखीहि कांहीं सामान—पाण्याच्या रिकाम्या पिशव्या, -दारूगोळ्याच्या रिकाम्या पेटया, वगैरें तेथेंच टाकून दिलें. इतकेंच नव्हें तर, तग धरणारीं तेवढींच जनावरें पसंत करून घेऊन बाकीचीं सर्व तेथेंच आम्ही सोडून दिलीं त्या दिवशीं सर्व रात्रीच्या रात्र तांतडीनें प्रवास करून आम्ही " अँग्लो-रशियन-मिल्टरि-टेलिग्राफ लाईन " ओलांडिली. त्या विस्तीर्ण अरण्यांतून प्रवास करून, तदनंतर एका सुप्रभातीं आम्ही एका पाण्याच्या ठिकाणीं आलों. आमच्या आकस्मिक आगमनानें तेथील लोक अगदीं भिऊन गेले. तेथील लोकांनीं असें सांगितलें कीं, शत्रुपक्षाच्या मुख्यानें आमच्या मिशनला आश्रय न देण्याविषयीं सर्व लोकांस सक्त ताकीद दिली होती.

तेथून, पुढें आमच्या लहानशा तुकडीची आणि शत्रूची जणूं कांहीं शर्यतच लागली होती. घोड्यावरून खोगीर उतरतों न उतरतों तोंच लगेच स्वार होऊन मैलचे मैल आम्हाला दौड करावी लागत होती. त्याप्रमाणें आम्ही ३६ तास-पर्यंत एकसारखा प्रवास केला. शेवटीं शेवटीं जनावरांना चालतांहि येईनासें झालें. दुसरीकडे, बेकरचें काय झालें याची आम्हांस काळजी लागून राहिली होती. हेरांनीं अशी बातमी आणली कीं, शत्रूनें आम्ही त्या सोडून दिलेल्या जनाव-रांवर व रिकाम्या सामानावर हल्ला केला. एका रशियन तुकडीनें डॉ. बेकर यांच्या टोळीस मार्गांत गांठून त्यांच्यावरही हल्ला केला. उभयतांमध्यें बरीच चकमकहि झाली. डॉ. बेकरनी मूल्यवान वस्तु जमिनींत पुरून टाकिल्या; आणि आपल्या-भोंवतीं खंदक करून घेऊन ते राहिले. तशा रीतीनें, ते एक दिवस आणि एक रात्र खंदकांत होते. शेवटीं दारूगोळा संपल्यामुळें, त्यांचा नाइलाज झाला. डॉ. बेकरचे लोक शत्रूच्या हातीं सांपडले. डॉ. बेकर स्वतः जखमी झाले. परंतु त्यांनीं शत्रूची फळी फोडून मोठ्या शौर्यानें आपली सुटका करून घेतली. अनेक युक्त्या लढवून ते अखेरीस जर्मनीस सुखरूप जाऊन पोंचले.

आमच्या स्वतांच्या तुकडीविषयीं सांगावयाचें म्हणजे, आमचा मार्ग आतां बराच सुकर झालेला होता. वालुकारण्य संपून आम्हीं एका डोंगरकठाडीच्या

मार्गानें हळु हळु प्रवास करीत होतों. पाण्याचीं ठिकाणेंहि मुबलक होतीं. इराणी पर्वतांच्या पायथ्यांच्या टेकड्यांवरून त्या वेळीं आम्ही प्रवास करीत होतों. पुढें पुढें आम्हांला खुरटलेली झाडें व थोडासा रमणीय वनप्रदेशहि लागला. आणि नंतर तर, आम्ही अगदीं भगनगश्रेणींच्या हृदयांतच जाऊन पोंचलों. जसजसें आम्ही पूर्वेकडे जात होतों, तसतसे पर्वत उंच उंच चालले होते! अखेर यझदानच्या 'ओसीस' स मार्गे टाकून अफगाणिस्थानच्या हद्दींत आम्ही प्रवेश केला. आमच्या आगमनाबद्दल हिरातच्या गव्हर्नर जनरलला कळविण्या-करतां मौ० बरकतउल्ला यांना आम्ही वकील म्हणून पुढें पाठवून दिलें.

पराहूला तेथील लोकांनीं आमचें फारच थाटानें स्वागत केलें. अफगाणि नागरिकांचें एक स्वागतमंडळ हिरातच्या गव्हर्नर जनरलनें आधींच पुढें पाठवून दिलें होतें. नागरिकांनीं शुभ्र कापसाचीं आणि लोकरीचीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. स्वागतमंडळाच्या मुख्याच्या अंगांत एक लांब हिरवा कोट असून त्यानें डोक्यास उंच करड्या रंगाची सुंदर टोपी घातली होती. त्याच्या जवळच्या हत्यारांवरून जडावाचें काम केलेलें होतें. त्याच्याबरोबर त्याचे रक्षक व मोठमोठे अधिकारीहि आपापल्या लवाजम्यानिशीं हजर होते. 'अमीर हबिबुल्ला व गव्हर्नरजनरल यांचे आम्ही खास पाहुणे' अशा थाटानें आमचें स्वागत कर-ण्यांत आलें. गरीब नागरिकापासून प्रतिष्ठित अफगाणिपर्यंत प्रत्येकांत आम्हांला अत्यंत स्वाभिमान दिसून आला. प्रत्येक लहानमोठ्या नागरिकांत स्वतंत्रवृत्तीची आवड पूर्णपणें दिसून येत होती. त्या वेळीं आमच्या बरोबर असलेल्या जर्मन-अधिकाऱ्यांनीं आणि काझिम बे यांनीं, आपल्या अंगावर लष्करी पोशाख चढविले आणि आम्ही सर्वजण त्या अफगाणि सरदाराच्या बरोबर चालूं लागलों.

अफगाणिस्थानच्या हिरव्यागार टेकड्यांतून आणि सुंदर दऱ्याखोऱ्यांतून आम्हांला मोठ्या थाटानें हिरातला नेण्यांत आलें. त्या वेळीं आमची तुकडी जवळ जवळ पन्नास स्वाराची होती. सामानसुमानानें लादलेले उंटहि आमच्या मागून येतच होते.

हिरात शहरीं अमीरसाहेबांच्या खास राजवाड्यांत आम्हांला जागा देण्यांत आली. उंचीं उंचीं पक्वान्नें सकाळदुपार आमच्या भोजनासाठीं होतीं. आमच्या सामानसुमानाची, घोड्यांची व अन्य वाहनांची व्यवस्था लावण्याकरतां निरनि-राळे लोक नेमण्यांत आले होते. मिशनला कोणत्याही प्रकारें द्रव्य खर्चावें

लागलें नाहीं. गव्हर्नर जनरलनें स्वतःच्या खर्चानें ती आमची व्यवस्था ठेवलेली पाहून आम्ही अगदीं खूष होऊन गेलों. आमच्या सेवेसाठीं नौकरांचें व हुजऱ्यांचें सैन्यच रवाना करण्यांत आलें होतें ! आदरातिथ्यांत आम्हांला अगदीं डुंबवून सोडण्यांत आलें. गव्हर्नर जनरलनें, नंतर, आपल्या अधिकाऱ्यांसह 'मिशन' ला दरबारीं भेट दिली व मिशननेंहि गव्हर्नरजनरलला त्याच थाटानें परत भेट दिली.

ता. ७ सप्टेंबर रोजीं आम्ही हिरात सोडलें. त्या वेळीं आमच्या बरोबर एका अफगाणि अधिकाऱ्याच्या हुकमतीखालीं शंभर घोडेस्वारांचें एक पथक चाललें होतें. त्या प्रदेशांत प्रवेश केल्यावर आम्हांला तर नवजीवनच प्राप्त झाल्यासारखें वाटलें. आमचा पूर्वीचा थकवा पार कोठच्या कोठें निघून गेला. तीं थकलीभागलेलीं मुकीं जनावरेंहि ताजींतवानीं आणि हुशार झालीं. आम्ही तेव्हां डोंगराळ प्रदेशांतून चाललों होतों. परंतु त्यावेळीं, आम्हांला थोडेसुद्धां कष्ट वाटले नाहींत. कांहीं कांहीं डोंगर इतके उंच होतें, कीं वर दृष्टिच जात नव्हती. डोंगरांच्या कड्यावरून मोठ्या मौजेनें हिम-खंड लोंबकळत होते. अशा रीतीनें त्या रमणीय वनप्रदेशांतून आम्ही थाटामाटांत कूच करीत होतों. इतक्यांत आमच्या पुढील अफगाण सरदारानें दुरून दिसणारें काबूल शहर आम्हांला दाखविलें. हिरव्यागार वृक्षराजींतून चक चक करीत असलेला राजप्रासादाचा उत्तुंग भाग दुरून आम्हांला दाखविण्यांत आला. अंमलदारानें असें सांगितलें कीं तो प्रासाद हिंदुस्थान जिंकणारा पहिला मोगल बादशाहा बाबर यानें बांधला. त्याच ठिकाणीं मिशनची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली होती.

त्या दिवशीं सकाळीं,-बालार्काच्या वेळीं-आम्हीं हळू हळू काबूलजवळ जाऊन पोहोंचलों. आमच्या स्वागतार्थ पायदळ, घोडेस्वार, तोफखाना वगैरे प्रचंड लष्कर एका तरुण तुर्काच्या नेतृत्वाखालीं आम्हांला सामोरें येत होतें. त्या तरुण लष्करी अधिकाऱ्याचें नांव खैरी बे ( 'Khairi Bay' ) असें होतें. खुद्द अमिरानींच त्यास आमच्या स्वागतार्थ पुढें पाठवून दिलें होतें. आम्ही बाबर बादशहाच्या 'राजवाड्या'कडे जात असतां, रस्त्याच्या दोन्ही बाजूंस अफगाणि सैनिकांनीं युरोपियन लष्करीपद्धतीप्रमाणें सलामी देऊन आमचें स्वागत केलें; त्यावेळीं त्या स्वागतांत, हजारों अफगाणांनींहि मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता.

राजवाड्यांत अमीराचे शेकडों नौकर आणि हुजरे आमचीच प्रतीक्षा करीत उभे होते. स्नानासाठीं, आम्हांला उष्णोदक देण्यांत आलें. भोजनाची

व्यवस्था फारच उत्कृष्ठ ठेवण्यांत आली होती. बागेंत मला दोन पुरातन चिनार वृक्ष दाखविण्यांत आले. ते वृक्ष खुद्द बाबर बादशहानें लाविले असें मोठ्या अभिमानानें मला सांगण्यांत आलें. बाबरच्या कबरस्थानाजवळ एक जुनी मशिद असून ती ताजमहाल बांधणारा—बाबरचाच वंशज—शहाजहान यानेंच बांधली असें मला सांगण्यांत आलें.

त्यानंतर, परस्परांच्या भेटी परतभेटी झाल्या. जर्मनी व तुर्कस्थानहून आणलेली पत्रें, अमीरांना अर्पण करण्याचा समारंभ झाला; प्रार्थना झाल्या. त्यानंतर अमीर हबिबुल्ला यांनीं, आम्हांला, आपल्या उंच डोंगरांवर असलेल्या राजवाडयांत नेऊन आमचा आणखीही सत्कार केला. आमिरानें आपल्या त्या नव्या राजवाड्यांत तदनंतर माझी पुष्कळच वेळां भेट घेतली. तो राजवाडा खैबरघाटांतून मोठ्या प्रयासानें आणिलेल्या युरोपियन शृंगारसाहित्यानें उत्तमप्रकारें सजविलेला होता. अफगाणिस्थानांत एकच मोटार होती व ती अमीर साहेबांचीच होती. तिचा त्यांना फारच अभिमान वाटत असे. त्या मोटारकरितां त्यांनीं ॲशफाल्टचे सुंदर रस्ते मुद्दाम तयार केलेले होते. **अमिर हबिबुल्ला** हे अत्यंत विनयशील, पाहुण्याचें आदरातिथ्य करण्यांत अतिशय तत्पर होते. त्यांनीं आमच्या कार्याविषयीं अत्यंत उत्साह दाखविला. परंतु त्यांना ऐषआरामाची इतकी आवड होती कीं, आपलें राष्ट्र युद्धाच्या वणव्यांत सांपडूं नये म्हणून ते तटस्थ राहण्याचाच एकसारखा प्रयत्न करीत होते. आणि त्यामुळें आपल्या रशियन किंवा इंग्लिश शेजाऱ्यांच्या विरुद्ध राजकारण करण्यांत त्यांच्याकडून धैर्य दाखविण्यांत आलें नाहीं. अफगाणिस्थानानें युद्धांत 'पडावें' असें त्यांच्या दरबारांतील बऱ्याच सरदारांचें मत होतें. पण आपल्या जबरदस्त शेजाऱ्यांच्या विरुद्ध उठण्याची आणि त्यामुळें येऊन पडणाऱ्या जबाबदारीची जोखीम आपल्या अंगावर घेण्याची अमीरसाहेबांची मुळींच तयारी नव्हती. अमीरसाहेबांच्या त्या वर्तनामुळें माझा कार्यभाग सिद्धीस गेला नाहीं.

हिंदी राजे-रजवाड्यांना दिलेलीं पत्रें मात्र पर्वतांच्या पलीकडे—हिंदुस्थानांत पोचविण्यांत मला यश आलें. हें लिहिण्यास मला आनंद वाटतो. तें काम ज्यांनीं आपल्या शिरावर घेतलें होतें त्यांच्यांत कल्पकता, चिकाटी आणि धिमेपणा एवढ्याच गोष्टी नव्हत्या, तर प्रसंगीं आत्मसमर्पण करण्याचीही त्यांची तयारी होती. त्यांच्यापैकीं एक जण तर त्या कामीं इंग्रजांच्या हातीं सांपडून

प्राणासहि मुकला. मला अजूनहि सांगण्यास अभिमान वाटतो कीं, हिंदुस्थानांत पाठविलेल्या अनेक पत्रांपैकीं, फक्त दोनच पत्रें कायतीं आमच्या जुलमी इंग्रज सरकारच्या हातीं लागलीं.

काबूलमध्यें असतांना त्या वेळीं व्हाइसराय असलेले अमीरसाहेबांचे धाकटे बंधु नसरुल्ला यांचा माझ्याशीं चांगलाच परिचय झाला. त्याशिवाय, आमरीच तिसरे चिरंजीव अमानुल्ला यांचीहि माझ्याशीं मैत्री जमून आली. अन्यहि कित्येक अफगाण सरदारांशींहि कायमचे स्नेहसंबंध जोडण्यांत मला यश आलें. त्यानंतर कित्येक महिन्यांनीं आपलें काम राजकीयदृष्ट्या परिपूर्ण झालेलें पाहून व्हान हेंटिग हे चावाक खिंडींतून तुर्कस्थान, मंगोलिया, चीन, होनोलुलू आणि अमेरिका या मार्गानें युरोपला गेले. कॅप्टन निदरमिअर हे दुसऱ्या मार्गानें गेले. माझें आफ्रिडी मित्रहि आपापल्या घरीं-पर्वतांत निघून गेलें. काझिम बे हे अमीरसाहेबांच्या तुर्की सल्लागाराबरोबर गेले. हिंदुस्थानला हितकर होईल अशा प्रकारचें कोणतेहि राजकीय कार्य करण्यास अमीर संमत न झाल्यामुळें अखेरीस मीहि अफगाणिस्थान सोडण्याचें निश्चित केलें. पूर्वीच मी काबूलहून रशियाच्या झारला इंग्रजी भाषेंत लिहिलेलें व सोन्याच्या तुकड्यावर कोरलेलें असें एक पत्र पाठविलें होतें. त्यांत "रशियानें इंग्लिशांची मैत्री सोडून अफगाणिस्थानशीं सख्य करावें" असें लिहिलें होतें. योग्य काळ उत्तराची वाट पाहिली-आणि तें उत्तर, पुढें कधींच आलें नाहीं. तदनंतर अमिरानें तुर्की सरकारला आणि कैसर बादशहाला दिलेलीं पत्रें घेऊन मी हिंदुकुश पर्वतांतून युरोपमध्यें गेलों. त्या वेळीं रशियांत नुकतीच राज्यक्रांति घडून आलेली असल्यामुळें आशियाच्या त्या भागांत मला फारसा त्रास झाला नाहीं.

जर्मनीस परत गेल्यावर कैसर बादशाहांना मी एक योजना सुचविली. एक अंतरराष्ट्रीय सोशालिस्ट-सैन्य उभारावें व त्यांत असंतुष्ट तरुण तुर्क, आस्ट्रियन, आणि रशियन क्रांतिकारक यांचा समावेश करावा. व त्या सैन्यानें हिंदुस्थानच्या सरहद्दीवर जाऊन तेथून हिंदुस्थानांत प्रवेश करून घ्यावा. या योजनेनें, 'आशियांत प्रवेश करून हिंदुस्थान घशाखालीं घालण्याचा जर्मनीचा बेत आहे,' या कल्पनेस कांहीं आधार उरणार नाहीं. हिंदवासियांचा तो ग्रह नष्ट होऊन जाईल. सोशालिस्टांचेंच सैन्य उभारण्याचा हेतू-रशियाच्या हद्दींतून त्या सैन्यास प्रवेश

मिळावा. कारण, दुसऱ्या सैन्यांस रशिया आपल्या हद्दींतून जाऊं देणार नाहीं हें मला पक्कें ठाऊक होतें. परंतु, जर्मनीच्या मंत्रिमंडळास ती माझी योजना पसंत पडली नाहीं. व तरवारीच्या जोरावर उक्रेनमधूनच मार्ग काढण्याचें शेवटीं निश्चित करण्यांत आलें.

माझी पूर्ण निराशा झाली. अमीर हबिबुल्लाखानांचें पत्र तुर्कस्थानच्या सुलतानांस नेऊन देण्याचें राहिलेलें कार्य पुरें करण्याकरितां मी कॉन्स्टान्टिनोपलला गेलों. त्यानंतर मी राजकारणांतून अंग काढून घेतलें. व हंगेरींत **बुडापेस्ट** येथें राहून माझ्या प्रेमधर्माचा प्रसार करण्याचें ठरविलें.

तद्नंतर, जर्मन आणि रशियनांनीं मला विमानांतून पोलंडवरून मास्कोस नेलें. तेथें गेल्यावर अनेक क्रांतिकारकांच्या भेटी झाल्या; त्या सर्वांत लेनिन हा प्रमुख होय. राजकीयदृष्ट्या त्याची समजूत मला घालतां आली नाहीं. माझ्या धार्मिक भावनांचाहि लेनिननें इनकार केला. लेनिननें तेव्हां माझें उत्तम स्वागत केलें व माझ्याबद्दल फारच आदर दाखविला.

१९१९ मध्यें, अमीर हबिबुल्लाखानांचा खून झाल्यावर पुनः मी अफगाणिस्थानांत गेलों. हल्लींच्या अमिरांनीं, त्या वेळीं माझें प्रेमानें स्वागत केलें. आणि पूर्वीचा आम्हां उभयतांचा स्नेहसंबंध अधिकच दृढ केला. त्यांनीं कृपाळुपणें मला अफगाणिस्थानच्या नागरिकाचे हक्क दिले. तेव्हांपासून मी माझ्या प्रेमधर्माचा किंवा अफगाणसरकारच्या कार्यांत सदैव गढून गेलेला असतो.

---

# परिशिष्ट. २

## श्रीशैलेन्द्रनाथ घोष. *

**[ वंगभंग; क्रांतिकारकांचे व्यापक प्रयत्न; जर्मनीशीं क्रांतिकारकांचे संबंध; शैलेंद्राचें प्रत्यक्ष कार्य; शैलेंद्रास पकडण्यासाठीं गव्हर्मेंट ऑफ इंडियानें लाविलेलें २५ हजाराचें बक्षीस; श्रीयतिनबाबूंचें धाडस; शैलेंद्राचें अमेरिकेस पलायन ]**

१९०५ सालीं बंगालच्या फाळणी विरुद्ध जी जोराची चळवळ सुरू झाली ती बंगालचें पुनः एकीकरण होईपर्यंत कायमच होती. वंगभंगानें

* पृष्ठ ५२ षष्ठ परिच्छेद पहा.

अमीर अमानुल्ला



हाबिबुल्लाखानांच्या मृत्यूनंतर हल्लींचे अमीर **अमानुल्ला** यांनीं **महेन्द्रप्रताप** यांना अफगाणिस्थानच्या नागरिकाचे संपूर्ण हक्क दिले. ( पृ. १३४ )

लोकांमध्यें जो असंतोष पसरला होता, तो तीव्रतर होता. व अखेरीस, बंगालचें एकीकरण करणें गव्हर्मेंटला भाग पडलें. त्याच सालीं, हिंदुस्थानची राजधानी कलकत्ता ही बदलून दिल्ली हिंदुस्थानची राजधानी करण्यांत आली. शहरांतील हिंदी लोकमत असें होतें कीं, हिंदुस्थान सरकारला ऊष्णमस्तिष्क संघबद्ध हिंदी लोकांकडून एकमारखा त्रास होऊं लागल्यामुळें, तो बदल करण्यांत आला. कांहीं असलें तरी, १९१२ सालीं, कल्कत्त्याहून सरकारी कचेऱ्या उठविण्यांत आल्या व त्या दिल्लीस नेण्यांत आल्या. २२ डिसेंबर रोजीं गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांनीं दिल्ली शहरांत सरकारीरीत्या प्रवेश केला व त्याच दिवशीं त्यांच्यावर एक बॉंब फेकण्यांत आला. व त्यास दुखापत करण्यांत आली. त्या गोष्टीनें, सर्व हिंदुस्थानभर मोठी खळबळ उडाली. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या आम्हा विद्यार्थ्यांमध्येंहि खळबळ उडून गेली.

त्या गोष्टीनंतर पुढें लौकरच, क्रांतिकारकांच्या क्रांतितत्त्वांनीं आमच्या कॉलेजचाही आश्रय घेतला. क्रांतितत्त्वांचा आमच्या कॉलेजमध्यें अधिकाधिक फैलाव होत चालला. त्या वेळपर्यंत क्रांतिकारकांचे प्रयत्न केवळ व्यक्तीवर बॉंब फेकणें, आणि सरकारी गाडया उलथून पाडणें, यांतच समाविष्ट झालेले होते. १९०८ मे मध्यें, मुझफरपूर येथें पहिला बॉम्ब फेकण्यांत आला. आणि त्या चळवळीची मजल १९१२ सालीं, लॉर्ड हॉर्डिंजवर बॉम फेकण्यापर्यंत गेली. त्या वेळेपासून विस्कळित असलेल्या वेगवेगळ्या गुप्त समित्यांना एका मध्यवर्ति संघामार्फत सूत्रबद्ध करण्याचे प्रयत्न जोरानें सुरू झाले. सर्वांचा उद्देश एकच, आणि तो, हिंदुस्थानांत राजकीय क्रांति घडवून आणण्याचाच होता. १९१४ सालीं, त्यांच्या त्या प्रयत्नानें मूर्त स्वरूप धारण केलें. १४ सालीं, महायुद्ध सुरू होतांच, क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं प्रत्यक्ष जर्मनीशीं आणि मध्यवर्ति युरोपीय राष्ट्रांशीं आपले दृढ संबंध जोडले. व हिंदुस्थानांत क्रांतियुद्ध सुरू करण्यापर्यंत आपल्या कार्याची मजल नेली. १९१४ सालीं, क्रांतिकारक व जर्मन गव्हर्मेंट यांचा निकट संबंध घडून आला.

तत्पूर्वी, युनिव्हर्सिटीच्या क्षेत्रांत राज्यक्रांतीच्या कोणत्याच शक्याशक्य कल्पनांचा यत्किंचितहि प्रवेश झालेला नव्हता, असें म्हणणें म्हणजे दिशाभूल करणें आहे. विद्यार्थ्यांच्या मनोभूमिकेंत क्रांतितत्त्वांचें हळू हळू बीजारोपण होत चाललें होतें. तरुण मंडळी फांशीं जाऊं लागल्यामुळें, त्यांचीं डोकीं

फिरून गेलीं होतीं. कॉलेजमध्यें, दोन दोन तीन तीन विद्यार्थी एकत्र जमत आणि क्रांतिकारकांविषयीं व त्यांच्या चळवळीविषयीं आपली सहानुभूति दाखवीत. त्यावेळीं त्या तरुणांनीं आपलें मन–आपलें प्राणसर्वस्व क्रांतिकारकांना समर्पण केलें होतें. आपल्या मनाच्या वारूचा लगाम त्यांनीं क्रांतिकारकांच्या हवालीं केला होता. त्यावेळीं असेंहि कळून आलें, कीं, विद्यार्थ्यांमध्यें गुप्त हेरांची पद्धति पोलीसांनीं सुरू केली आहे. आणि ती गोष्ट खरी असल्याचें जेव्हां उघडकीस आलें, तेव्हां आजपर्यंत ज्यांच्या मनाचा क्रांतिकार्याकडे केवळ कल होता ते पूर्णपणेंच वळले. क्रांतितत्त्वाचा त्यांनीं देशाला आणि धर्माला स्मरून पूर्णपणें अंगिकार केला. क्रांतिकारकांविषयीं ते अधिकाधिक सहानुभूति दाखवूं लागले. कलकत्त्यांतील अन्य लहान लहान कॉलेजांतूनहि आमच्याप्रमाणेंच विद्यार्थ्यांचे संघ स्थापन करण्यांत आलेले होते. व ती गोष्ट मला समजून येतांच त्या त्या ठिकाणीं जाऊन क्रांतिकारकांच्या तत्त्वांचा मी प्रसार करूं लागलों. तदनंतर पुढें थोड्याच दिवसांत इंग्लंडच्या विरुद्ध युद्ध पुकारलें गेलें. त्यावेळीं नाइट स्कूल्सचा डायरेक्टर असलेला माझा एक जुना स्नेही मला बोलला, " या युद्धाबद्दल आपण हिंदी लोकांनीं फारच दूरदृष्टीनें विचार केला पाहिजे. या युद्धानें हिंदुस्थानपुढें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उभा राहिलेला आहे. इंग्लंड या युद्धांत पडलें आहे. आणि जोंपर्यंत या युद्धांत इंग्लंड सामील आहे, तोंपर्यंत हिंदुस्थाननेंहि पण युद्धांत पडावयास पाहिजे. शेवटपर्यंत, हिंदुस्थानानें त्यांत असावयास पाहिजे. या युद्धांत इंग्लंड विजयी होईल, अथवा इंग्लंडचा पराजयहि होईल. परंतु, इंग्लंडचा जय होवो किंवा पराजय होवो, हिंदुस्थानचें भवितव्य क्रांतिकारक जें ठरवितील तेंच घडून येणार आहे. क्रांतिकारकांच्या सर्वस्वी कृतींवरच तें अवलंबून आहे. जर इंग्लंडनें या युद्धांत जर्मनीस जिंकलें, तर आपली स्थिति अधिकच शोचनीय होणार आहे. त्यामुळें इंग्लंडचें बळ वाढेल, आणि हिंदुस्थानाला इंग्लंड ' गुलाम राष्ट्र ' म्हणून निरंतर वागवील. मग हिंदुस्थानाला पारतंत्र्याच्या शृंखलांतून बाहेरील कोणतीही शक्ति सोडवूं शकणार नाहीं. इंग्लंड करील ती पूर्व दिशा होईल. इंग्लंडपुढें कोणाचेच चालणार नाहीं. मग इंग्लंडला ज्यामुळें रात्रंदिवस एका गोष्टीची मनांतून भीति वाटत राहील अशी भीति–दहशत–आपण आजपर्यंतच्या मधल्या कालांत निर्माण केलेली आहे. आणि त्यामुळेंच आपल्या आशेस अद्यापि जागा आहे. इंग्लंड या युद्धांत पराभूत झालें, तर आहे याहूनहि

आपली स्थिति दुर्धर होणार आहे.कारण,इंग्लंडचें जें कांहीं नुकसान होईल,तें इंग्लंड हिंदुस्थानकडून भरून घेतल्यावांचून राहणार नाहीं. तें नुकसान हिंदुस्थानपासून भरून घेण्यांत इंग्लंड यत्किंचितहि तेव्हां दयामाया दाखवणार नाहीं. जें पाहिजे तें त्यावेळीं हिंदुस्थानापासून इंग्लंड करून घेईल. आपण कोणत्यांहि रीतीनें पण इंग्लंडची अशी खात्री करून दिली पाहिजे, कीं, इंग्लंडला तसें करणें फारसें सुरक्षितपणाचें नाहीं. इंग्लिश लोकांची अशी समजूत आहे, कीं आमच्यामध्यें कांहीं पाणी नाहीं. आणि कदाचित्, तसें आपणांत फारसें पाणी नसेलहि–आहे कीं नाहीं कुणास ठाऊक! परंतु, हा त्यांचा समज दूर करणें आणि त्या बाबतींत त्याना वेगळा विचार करावयास लावणें, हिंदुस्थानच्या हिताचें आहे. आपण त्यांना त्या गोष्टीविषयीं निराळ्या तऱ्हेनें विचार करावयास लाविलें पाहिजे. त्याकरतां मी, तूं, तसेंच बाकीच्या सर्वांनीं, या गोष्टींत आपलें मन घालून काय तें तावडतोब निश्चित केलें पाहिजे. याबद्दल तूं काय ठरवीत आहेस ? ”

मी म्हटलें, “ या बाबतींत माझ्या मित्राचा विचार घेऊन मी काय तें निश्चित करीन. या गोष्टीचा मला फारच विचार करावयास पाहिजे. ” आणि त्या रात्रीं आम्हां दोघांचा सर्व वेळ त्या एकाच गोष्टीबद्दल खल करण्यांत गेला. माझा मित्र अत्यंत सात्विक वृत्तीचा होता. त्याचा अभ्यासाचा व्यासंग फार दांडगा होता. कोणत्याही गोष्टीचा खोलवर विचार केल्यावांचून ती गोष्ट कधीं तो करीत नसे. आपल्या चळवळीस अत्याचाराचें स्वरूप न येईल, याविषयीं तो नेहमीं खबरदारी घेत असे. परंतु यावेळीं केवळ हिंदुस्थानचें कल्याण व्हावें याच एका सदिच्छेनें तो प्रेरित झालेला होता.–हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं कोणत्याही बऱ्यावाईट गोष्टीचा अवलंब करावा लागला तरी तो करण्यास तो तयार होता. कारण, त्यानें पुष्कळ विचार करून पाहिलें कीं, “इंग्रजांचें जूं, हिंदुस्थाननें झुगारून दिल्यावांचून हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं. त्या कल्याणासाठीं हिंदुस्थाननें यावेळीं कोणत्याही बऱ्यावाईट मार्गाचा अवलंब केलाच पाहिजे. ”

त्या वेळेपासून देशकार्य हें माझें नित्यनैमित्यिक कार्य होऊन बसलें. ‘ देशकल्याण ’ हाच माझ्या चिंतनाचा विषय झाला. स्वदेशाभिमानावांचून अन्य धर्म तेव्हां मी जाणत नव्हतों. रात्रंदिवस त्याच एका गोष्टीची मला चिंता लागून राहिली. माझें व माझ्या मित्राचें बोलणें संपण्याच्या वेळीं मी उद्गारलों–“ जर

या कार्यांत मला भाग घेण्यास मिळेल, तर मी माघार घेणार नाहीं;–कच खाणार नाहीं;–मग कोणताहि स्वार्थत्याग करण्याची वेळ येवो;–प्रत्यक्ष प्राण देखील !"

आमच्या भेटीनंतर पुढें लौकरच, क्रांतिकारक चळवळीचे प्रमुख पुढारी **श्रीयतिन मुकर्जी** (Jatin Mukerjee) यांच्याशीं माझा संबंध आला. यतिन मुकर्जी हे सुमारे चाळीस वर्षे वयाचे होते. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत होता. तसेंच त्यांचें बोलणें मोठें गोड होतें. त्यांची वाणी सुसंस्कृत असून त्यांनीं राजनीतीचा फार मनन-निदिध्यासपूर्वक अभ्यास केलेला होता. हिंदुस्थानच्या कल्याणाविषयीं त्यांची तळमळ त्यांच्या प्रतिशब्दाबरोबर मला दिसून येत होती. हिंदुस्थानच्या चिंतनेनें त्यांना वेडें केलें होतें. त्यांच्या कार्यांत त्यांच्या धर्मपत्नीचेंहि त्यांना सहाय्य होत असे. क्रांतिकारकांचे निरनिराळे संघ एकत्रित करून त्यांना सूत्रबद्ध करण्याचे आणि त्यांच्यांत एकवाक्यता आणण्याचे ती साध्वी अहर्निश प्रयत्न करीत होती. यतिन बाबू बरेच श्रीमंत होते. परंतु ऐन तारुण्यांतच त्यांना समजून आलें कीं, आपण आपल्या पैशाचा उपयोग, आपल्या चैनीकरतां करतां कामा नये. आपल्या गरजा आपण कमी केल्या पाहिजेत. आपला सर्व पैसा हिंदुस्थानाच्या कल्याणासाठींच खर्च झाला पाहिजे. यतिन बाबूनीं सार्वजनिक हिताच्या संस्थांचे पाये घालण्यांत आपल्या बहुतेक संपत्तीचा विनियोग केला.

यतिन बाबूंची कर्तृत्वशक्ति अतुलनीय होती. ते मोठे कार्यकुशल होते. त्यांची घडाडी विलक्षण असे. जेव्हां जेव्हां त्यांना त्यांच्या सद्धेतूसिद्ध्यर्थ्य पैशाची वाण पडे, तेव्हां तेव्हां, ते उद्योगधंदा करून जरूर तो पैसा मिळवीत. ते आपल्या गरजा फारच थोड्या पैशांत भागवीत. क्रांतिकारक चळवळींत त्यांच्या सहवासांत जे जे आले, त्यांच्यात्यांच्यांत, त्यांनीं एका दिव्य शक्तीचा संचार केला. यतिन बाबूंची कार्यनिष्ठा सर्वांना आपल्याकडे ओढून घेत असे. त्यांनीं अतिशय शांतपणें इंग्लिश राजकर्त्यांच्या मनस्तत्वाचा अभ्यास केलेला होता. त्यांनीं आपलें निश्चित मत बनविलें होतें, कीं, " इंग्लिश लोक हे सदिच्छेपासून परावृत्त झाले आहेत.–पराङ्मुख झाले आहेत. परहित त्यांना ठाऊक नाहीं. इंग्रजांना हिंदुस्थानचे हित नको असून त्यांना स्वतःचें हित आधीं पहावयाचें आहे. आपल्याविषयीं त्यांच्या मनांत आदर नाहीं. आणि पुढेंहि तो उत्पन्न होणें अशक्य आहे. आपल्याविषयी त्यांच्या मनांत आपणास आदर उत्पन्न करावयाचा असेल, तर, आपण त्यांना भिवविण्याजोगे–त्यांच्या विरुद्ध—कांहीं तरी केलें पाहिजे. आपण

असें कांहीं तरी करून दाखविलें पाहिजे, कीं त्यामुळें त्यांना भीति वाटेल-इंग्लिश लोक जोंपर्यंत हिंदुस्थानांत राहतील, तोंपर्यंत त्यांनींच हिंदुस्थानास भिऊन असावयास पाहिजे. हिंदुस्थानविषयीं त्यांना सतत भीति वाटली पाहिजे. हिंदुस्थाननें त्यांच्याविषयी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. इंग्रजांनीं आम्हांस भ्यावें कीं, आम्ही इंग्रजांना भ्यावें ! ''

" मनगटाच्या जोरावर जगांत इंग्रजलोक राज्य करीत आहेत.—म्हणूनच तें मनगटाच्या सामर्थ्याला मान देतात. जगांतल्या इतर लोकांशीं वागत असतांना त्या तत्त्वाखेरीज अन्य तत्त्वांकडे ते आपली दृष्टि पोहचवीत असतील असें मला वाटत नाहीं. आपल्यापुरतेंच पहावयाचें झाल्यास त्यांच्याविरुद्ध आपण नुसत्या तक्रारी करून कांहीं उपयोग नाहीं. आपण तक्रारी करीत राहिल्यानें, ते आपला अधिकच तिरस्कार करतात.—त्यांच्या विरुद्ध गाइल्या जाणाऱ्या तक्रारींनी आम्ही आपला दुबळेपणा अधिक सिद्ध करून देत आहों. आमच्याविषयीं ते दिवसेंदिवस जो अधिक तिरस्कार दाखवीत आहेत त्याचें कारण आमची दुर्बलता त्यांना अधिकाधिक दिसून येत आहे. दुर्बलतेला इंग्रज लोक मान देत नसतात. आमच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांच्याकडे दाद मागण्यांत कांहीं अर्थ नाहीं.—त्यांत, कांहीं हंशील नाहीं. आम्हांला योग्य न्याय देण्याच्या आधीं त्यांची दृष्टि त्यांच्या स्वतांच्या साम्राज्याकडे-साम्राज्याच्या हिताकडे, अधिक लागून राहिलेली असते. स्वहिताविरुद्ध आणि स्वतांच्या साम्राज्याविरुद्ध ते आम्हांला न्याय कसा देऊं शकतील ? आपणाला वाटणाऱ्या त्यांच्याविषयींच्या तिरस्काराबद्दल त्यांना आपण कांहीं सांगून उपयोगी नाहीं. त्यांच्या ध्यानांत आमच्या सर्व गोष्टी आहेत. आणि आधींपासून त्या गोष्टी त्यांनीं जमेस धरूनच आपल्या राज्य—कारभाराच्या त्यांनीं योजना केलेल्या आहेत. आपणास जें कांहीं करावयाचे आहें तें एकच कीं, त्यांना कटुतर वाटणाऱ्या-त्यांना अप्रिय-अशा गोष्टी नित्य आपण त्यांच्या डोळ्यापुढें उभ्या केल्या पाहिजेत; त्यांना जे अप्रिय—तेंच आपणांस हितकर. त्यांना असुखदायी होईल, अशी परिस्थिति आपण निर्माण केली पाहिजे. ते आपणांवर रागावतील—संतापतील;-आपणांपैकीं कित्येकांना त्याचे कटु परिणामहि भोगावे लागतील. परंतु, त्यांना, आज असलेल्या कल्पनेहून, हिंदुस्थानविषयीं एक वेगळी कल्पना येईल.

" आपणांस करावयाच्या, अशा आतां दोन गोष्टी आहेत; एक,-त्यांच्या सैन्यांत आपण आपला प्रवेश करून घेतला पाहिजे. आपलें शौर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिलें पाहिजे. आणि या वेळीं हिंदी सैन्याचा केवढा उपयोग होणार आहे, हें त्यांना समजावून दिलें पाहिजे. त्या गोष्टीकडे त्यांचें आपण विशेष लक्ष्य वेधून घेतलें पाहिजे. तसेंच आपणांस स्वतःसाठीं, शस्त्रास्त्रें आणि दारुगोळा यांचा भरपूर पुरवठा करून घ्यावयास हवा. त्यास दोन मार्ग आहेत; एक हिंदुस्थानांतूनच. आणि दुसरा, -हिंदुस्थानच्या बाहेरून. जीं शस्त्रास्त्रें हिंदुस्थानांत मिळतील तीं आपण सुरक्षित स्थळीं ठेवूं शकूं. परंतु, जीं बाहेरून येतील त्यांविषयीं अधिक संशय उपस्थित होण्याचा संभव आहे. त्याविषयीं आपणास फारच खबरदारी घ्यावयास हवी. बाहेरून प्राप्त होणारीं शस्त्रास्त्रें उतरून घेण्यास, सुरक्षित स्थळेंहि पाहिजेत. तशीं पुष्कळशीं नसलीं तरी तीं थोडीं तरी पाहिजेतच. तदनंतर, तीं तात्पुरती गुप्त ठेवावयास गुप्त जागांचीहि आवश्यकता आहे. आपणावर फार नजर ठेवली जाईल, परंतु, त्यांतूनहि आपण निसटलें पाहिजे. तितकी शक्ति आपणांस असावयास पाहिजे. आतांपुरता जो कांहीं महत्त्वाचा प्रश्न आहे, तो एवढाच आहे. शस्त्रास्त्रें घेऊन पुढें काय करावयाचें, हा प्रश्न, तीं हातीं आल्यानंतरचा आहे. "

मी जें उत्तर दिलें, तें एवढेंच कीं, " मी त्या गोष्टीस तयार आहें. मला जेव्हां बोलावलें जाईल, तेव्हां माझी सिद्धता आहे. शक्य त्या रीतींनीं सेवा करण्यास माझी तयारी आहे. "

आमचें भाषण चालू असतां, त्यांची माझ्यावर फारच सूक्ष्म नजर होती प्रत्येक शब्द ते फारच जपून बोलत होते. तसेंच त्याचा माझ्यावर काय परिणाम होतो, हेंहि ते न्याहाळून पहात होते. परंतु शेवटीं माझा विश्वास त्याना पटला असावा असें त्यांच्या चर्येवरून मला आढळून आलें.

जसजसा काल गेला तसतशीं कॉलेजें क्रांतिकारकांच्या क्षेत्रांत ओढलीं गेलीं. प्रेसिडेन्सि कॉलेजच्या प्रिन्सिपॉलला विद्यार्थ्यांचा हा कारभार फारसा पसंत नव्हता. त्याची अशी ठाम समजूत होती, कीं, विद्यार्थ्यांना चेतवून फारसें कांहीं चांगलें निष्पन्न होणार नाहीं. परंतु, तोही विद्यार्थ्यांचे ते लाड पुरवीत असे. कांहीं मर्यादेपर्यंत तो विद्यार्थ्यांना पूर्ण अनुकूलच होता. त्यावेळीं त्यानें विद्यार्थ्यांची बाजू फारच जोरानें उचलून धरली होती. ती इतकी कीं, कॉलेजच्या प्रिन्सि

पालला आगाऊ सूचना दिल्याशिवाय पोलीस इन्स्पेक्टर्सना कॉलेजमध्यें प्रवेश करण्याचा पूर्ण मज्जाव असे. अर्थात्, त्या गोष्टीचा अनुभव असा येत असे कीं, प्रिन्सिपालला सूचना देईपर्यंत तो कांहीं चार पांच मिनिटांचा अवधि मिळे, तेवढ्याच अवधींत विद्यार्थ्यांना सावध राहतां येऊन योग्य तो बंदोबस्त करतां येत असे. पोलीस इन्स्पेक्टर मोठ्या हर्षानें झडती घेण्यासाठीं गडबडीनें धांवून येत, आणि कांहीं सांपडलें नाहीं, म्हणजे निराश होऊन परत जात; त्यांना कांहींच सांपडून येत नसे. मागाहून असें कळलें कीं, पोलीसांना या ज्या गोष्टी समजून येत आहेत, त्यास कोणी एक विद्यार्थीच कारण आहे. त्याच्याच अजागळपणाच्या बोलण्याचा हा परिणाम आहे. परंतु एके दिवशीं पुढें तो अंथरुणांत मृत स्थितींत आढळला. त्यानें विष घेऊन आत्महत्या केली असल्याचें समजलें.

त्यानंतर मात्र, प्रिन्सिपालनें अधिक कडक हुकूम सोडले. कोणत्याही विद्यार्थ्याच्या खोलींत, प्रिन्सिपालच्या परवानगीवांचून आणि प्रिन्सिपाल समक्ष हजर असल्यावांचून, कोणाहि अधिकाऱ्यानें प्रवेश करतां कामा नये, अशी सक्त ताकीद देण्यांत आली. विद्यार्थ्यांच्या खोलीची झडती घ्यावयाची झाली तरी, आधीं प्रिन्सिपालला कळविलें पाहिजे; आणि प्रिन्सिपाल स्वतः तेथें हजर असावयास पाहिजे. एके दिवशीं पोलीस आले. प्रिन्सिपालची त्यांनीं बराच वेळ वाट पाहिली. आणि प्रत्येक खोलीची त्याच्या समक्ष तपासणी केली; परंतु कांहींही सांपडलें नाहीं. एके दिवशीं दुपारीं तीन वाजून पांच मिनिटांनीं, मेडिकल कॉलेजच्या समोर–प्रेसिडेन्सि कॉलेजजवळ,–एका हिंदी अधिकाऱ्याचा खून झाला. रिव्हॉल्व्हरनें त्यास गोळी घालण्यांत आली होती. कॉलेज संपेपर्यंत त्या गोष्टीची आम्हांस वार्ताहि नव्हती. कॉलेज, तत्काळ त्या दिवसापुरतें बंद करण्यांत आलें. आम्ही मोठ्या घोळक्यानें तिकडे धांवलों. पण, काय झालें तें आम्हांला कांहींच समजलें नाहीं. एक अधिकारी मेला असल्याचें मात्र कळून आलें. दुसऱ्या दिवशीं फिजिक्स–क्लासमध्यें माझ्या मित्रांपैकीं एका मित्रास पकडण्यासाठीं पोलीस वारंट घेऊन आले. प्रोफेसरसाहेब नुसते रागानें लाल होऊन गेले! त्यांनीं रेकार्ड आणून पोलिसांच्या पुढें आदळलें. आणि त्या दिवशीं तो विद्यार्थी ३ वाजतां क्लास सुरू झाला तेव्हां हजर होता, आणि त्यानें 'प्रेझेंट' म्हणून उत्तर दिलें होतें, असें सिद्ध करून दिलें! सगळ्या विद्यार्थ्यांनींहि पण तो ते ५ च्या दरम्यान वर्गांत हजर होता अशाबद्दल आपल्या साक्षी दिल्या.

पोलिस अधिकाऱ्यांची ती गोष्ट प्रिन्सिपालच्या कानांवर जातांच प्रिन्सिपालहि संतापानें लाल होऊन गेला ! आणि त्यानें अधिकाऱ्यांच्या त्या बेअकलीपणाबद्दल आणि मूर्खपणाबद्दल त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. नंतर मला असें दिसून आलें कीं, अजूनहि पोलीस त्या विद्यार्थ्यांचा पिच्छा सोडीत नाहींत. ती गोष्ट तावडतोब मी प्रिन्सिपालला जाऊन कळविली. प्रिन्सिपालनें बाहेर येऊन पोलीसांस सक्त ताकीद दिली. व पोलिसांच्या पुढच्या सर्व क्रिया तावडतोब थांबविण्यांत आल्या. इतकेंच नव्हे तर, पुनः तसें झाल्यास त्यांच्यासंबंधीं वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यांत येईल, असेंहि सक्त रीतीनें बजावण्यांत आलें !

प्रिन्सिपालच्या त्या बाणेदार वागणुकीमुळें आजवरच्या त्याच्या सत्कीर्तीत अधिकच भर पडली. परंतु खेदाची गोष्ट, तीच कीर्ति त्यास पुढें बडतर्फीस कारण झाली. त्याच्या त्या वर्तनामुळें लौकरच त्यास आपल्या जागेस मुकावें लागलें. तेव्हांपासून अनेक विद्यार्थ्यांना तुरुंगांत घालण्यांत येऊं लागलें. व शेवटीं पुरेसे तुरुंग नसल्यामुळें त्यांच्यावर नुसती नजर ठेवण्यांत येऊं लागली.

१९१५ च्या उन्हाळ्यांत कॉलेजमध्यें मी जेव्हां एकटाच काम करीत होतों, तेव्हां आज्ञा आली, कीं,—"अमुक हत्यारें पाठविलीं आहेत; ताब्यांत घ्यावीं." तीं हत्यारें मीं घेतलीं; आणि एका न सांपडणाऱ्या जागीं ठेवून दिलीं. व माझ्या अभ्यासास लागलों. सुमारें दहा दिवसांच्या मुदतींत, तीं नेण्यांत आलीं.

क्रांतिकारक तरुणांचें साहस असीम होतें. त्यांची धडाडी, त्यांचा त्याग, त्यांची बुद्धिमत्ता, अन्य देशांतील कोणाही क्रांतिकारकांहून यत्किंचितहि कमी नव्हती. एके वेळीं क्रांतिकारकांपैकीं चौघांना पकडण्यांत आलें. व त्यांना तुरुंगांत ठेवण्यांत आलें. त्यांची चौकशी व्हावयाची होती. इतक्यांत असें समजलें कीं, त्या चौघांपैकीं एकजण, अधिकाऱ्यांपुढें कबुलीजबाब देण्यास तयार झाला आहे. ती बातमी पतंगाच्या साह्यानें दुसऱ्या दोघांस कळविण्यांत आली. ज्या ठिकाणीं त्यांना ठेवलें होतें, त्या खिडकीपाशीं पतंग उडविण्यांत आला. ते दोघेहि आजारी पडले. दोघांनाही हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. त्या ठिकाणीं, केलेल्या कृत्याबद्दल त्यांनीं फार पश्चात्ताप प्रकट केला ! आणि त्या स्नेह्यास भेटावयास बोलाविलें. तो येतांच, त्या दोघांनीं त्याच्यावर गोळ्या झाडल्या. व त्यास ठार केलें. एकामागून एक वीस गोळ्या घालण्यांत आल्या.–कीं, त्याच्या मृत्यूची खात्री असावी. त्यांच्या दृष्टीनें ' मृत्यु ' हाच त्यास योग्य न्याय होता; इत

यांच्या दृष्टीनें तें फार वाईट कर्म होतें. दोघेहि पुढें फांशीं गेले. एके दिवशीं रस्त्यांत एका गाडीभोंवतीं मोठी गर्दी झाली. गाडींतून एका फर्मच्या नौकरांचा पगार जात होता. जेव्हां गर्दी मोडण्यांत आली, तेव्हां गाडी पुढें सरळ निघून गेली. परंतु त्यांतील रक्कम काढून घेण्यांत आली होती. कशी लांबवली गेली तें कोणालाच समजलें नाहीं. ज्यांनीं ती काढून घेतली ते त्या गर्दींत मिसळून गेले. त्यांचा कोणासच पत्ता लागला नाहीं.

एका हिंदी अधिकाऱ्यास क्रांतिकारकांना फार भ्यावें लागत असे. त्याची त्यांना फार भीति वाटत होती. Spy--system फार विलक्षण होती. त्यांत तो नेहमीं यशस्वी होई. तो आपलें ऑफिस सोडून कुठें फारसा दूर जात नसे. आणि जेव्हां जेव्हां बाहेर पडे, तेव्हां तेव्हां, त्याच्याबरोबर त्याचे रक्षक असत. पुढें पांचजण व पाठीमागें पांचजण व आजूबाजूस एक एक मोटर-सायकलवरून त्याचे रक्षणास असत. एके दिवशीं तशा थाटानें एका वाकड्या रस्त्यानें तो वळत असतां, चौघेजण सायकलस्वार तेथें आले; व त्यांनीं त्यास 'शॉट' केलें. बॉडि-गार्ड हत्यारें सरसावत आहेत तोंपर्यंत ते अदृश्यहि झाले.

जे क्रांतिकारकांच्यावर नजर ठेवीत असत, त्यांच्यावर क्रांतिकारकांची नजर असे. एका अधिकाऱ्याची क्रांतिकारकांना फार भीति वाटत होती. त्या अधिका-ऱ्यास ऑफिसच्या समोर एका तळ्याभोंवतीं फिरण्याचा आणि येरझारा घालण्याचा मोठा शोक होता. एके दिवशीं, त्याच्या येरझारा कायमच्या थांबविण्यांत आल्या ! त्याच ठिकाणीं त्यास शॉट करण्यांत आलें.

त्यानंतर लौकरच यतिन मुकर्जींना कलकत्त्यांतच एका घरांत छपून राहाण्याचा प्रसंग आला. एक भिकारी अंगावर फाटक्यातुटक्या चिंध्या घालून शहरांत भिक्षा मागूं लागला. ज्या ठिकाणीं मुकर्जी होते, त्या ठिकाणीं तो भिक्षेसाठीं गेला. त्यानें रीतीप्रमाणें भिक्षा मागितली. मुकर्जी बाहेर आले. भिक्षा घेण्यासाठीं तो पुढें येतांच मुकर्जींनीं त्यास रिव्हॉल्व्हरनें गोळी घातली. तो एक पोलीस इन्स्पेक्टर होता. यतिन मुकर्जी व त्यांचे आणखी तिघे स्नेही यांना मदत करण्याची मला एकदां आज्ञा देण्यांत आली. ते माझ्या क्वांत आले; तीन दिवस माझे पाहुणे ( Guests ) म्हणून होते. सर्व कांहीं अगदीं नित्याप्रमाणें चाललें होतें. कोणासहि त्यांचा सुगावा लागूं शकला नाहीं. किंवा, कोणीही त्यांची बातमी पोंचविली नाहीं.

क्रांतिकारक समूहांपैकीं अनेक समूह, जर्मनांशीं दळणवळण सुरु करण्याकरितां आणि शस्त्रास्त्रें ताब्यांत घेण्यासाठीं, जावास गेलेले होते. परंतु, ते तेथेंच पकडले गेले. त्या अवधींत इकडे **यतिन मुकर्जींनीं** एक गुप्त जागा शोधून काढलेली होती. ती जागा ओरिसाच्या किनाऱ्यांत, एका दाट जंगलांत असून, त्या ठिकाणीं जाण्यास बालेसराहून काय तो एक मार्ग होता. त्यांनीं ती जागा ' जंगल तोडून साफ करून कालव्याच्या पाण्याच्या साहाय्यानें शेतकऱ्यांकडून लागवडीस आणावयाची ' या सबबीवर मिळविलेली होती. परंतु, मुकर्जींचा खरा हेतु फार दिवस गुप्त राहूं शकला नाहीं. मुकर्जींच्या योजनेचा हेतु, पोलीस अधिकाऱ्यांच्या लौकरच ध्यानीं आला. आणि मुकर्जींचें जीवित संकटांत असल्याचें क्रांतिकारकांना समजून चुकलें. मला तावडतोब कटकला जाण्याची आज्ञा देण्यांत आली. त्या ठिकाणीं मुकर्जी आणि त्यांचे साथीदार यांना गुप्तपणें राहतां येईल असें एकादें सुरक्षित ठिकाण पाहावयाचें होतें. आज्ञा होतांच मी कटकला गेलों. परंतु, तेथें असतांच तिकडे बालेसराहून मुकर्जींना संकेत मिळाला, कीं, पोलीस त्यांस गिरफदार करण्याच्या विचारांत आहेत. ते आणि त्यांचे चौघे साथीदार तत्क्षणीं तेथून बाहेर पडले. परंतु, जंगलांतून निघून ते सुरक्षित ठिकाणीं जाऊन पोंचण्याच्या आधींच, पोलिसांनीं जंगलास वेढा दिला. यतिन मुकर्जी व त्यांचे चौघे साथीदार यांनीं आपल्या भोंवतीं खंदक करून घेतला. जवळचा दारुगोळा संपेपर्यंत, ते लढले. त्यांच्यापैकीं तिघेजण ठार झाले. मुकर्जीहि स्वतः जखमी होऊन जमिनीवर पडले. व थोड्याच तासांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. इंग्लिशांना मुकर्जी फारच महाग पडले. त्यांच्यापैकीं अनेकजण तेथल्या तेथें ठार झाले. व अनेकजण घायाळ झाले. काय वाटेल तें करून मुकर्जींना धरण्याचें निश्चित झालेलें असल्यामुळें त्यांना तेवढी जबर किंमत देणें भागच होतें. परंतु एकदा मुकर्जींचा मृत्यु होतांच, त्यांच्याशीं लढणाऱ्यावर अभिनंदनांचा वर्षाव करण्यांत आला. यतिन मुकर्जींशीं जेव्हां जेव्हां माझा संभाषणाचा प्रसंग आला, तेव्हां तेव्हां, त्यांचा दृढनिश्चय आणि त्यांचें धोरण, त्यांच्या शब्दांतून प्रतीत होत असे. मुकर्जींच्या मृत्यूनंतर, त्यांच्या शत्रूंनींही त्यांच्या आंगच्या अतुल धैर्याची आणि त्यांच्या युद्धकलेची फारच वाखाणणी केली. हिंदुस्थानच्या गव्हर्मेंटला, यतिन मुकर्जींच्या प्राणासाठीं फार दिवस परिश्रम करावे लागले होते. त्यांचे प्राण इतरांप्रमाणें सहजप्राप्त नव्हते. अखेरीस कृतकृत्य झाल्यावर इंग्रजांनींहि

मुकर्जींची तारीफ करण्याची बाकी ठेवली नाहीं. त्यांच्या युद्ध-नैपुण्याची गव्हर्मेंटकडून कित्येक कालपर्यंत प्रशंसा होत होती. या महान् क्रांतिकारकाचा मृत्यु **९ नोव्हेंबर १९१५** रोजीं घडून आला.

१९१५च्या हिवाळ्यापासून सबंध एक वर्षभर, म्हणजे १९१६ च्या उन्हाळ्यापर्यंत, मी एका योजनेच्या विचारांत गढून गेलों होतों. त्या योजनेस **सर तारकनाथ पलित** हे उदार हिंदु गृहस्थ मूर्तस्वरूप देणार होते. आपल्या संपत्तीचा विनियोग देशकार्यार्थ करण्याची त्यांची फार दिवसांपासूनची मनीषा होती व त्याविषयीं ते विचार करीत होते. देशाला आपण उपयोगीं पडावें अशी त्यांची उत्कट इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या इस्टेटींतून, ३० लक्ष रुपये बाजूस काढून ठेवले होते.

कलकत्त्यास एक सायन्स-कॉलेज स्थापन करावें अशी त्यांची मनीषा होती. ती देणगी त्यांनीं एकाच अटीवर देण्याचें निश्चित केलेलें होतें; कीं, कॉलेजमध्यें, हिंदू इसमांशिवाय दुसऱ्या कोणाहि ' फॉरेनर'ला प्रवेश मिळतां कामा नये. विद्यार्थी व प्रोफेसर, कामकरीवर्ग सर्व हिंदीच असला पाहिजे. तसेंच, त्या कॉलेजाचा परक्यांना कोणत्याहि रीतीनें फायदा मिळून देतां कामा नये. कलकत्ता युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर् अशुतोष मुकर्जी यांच्या शिफारशीनें कॉलेजसाठीं विद्यार्थी आणि सायन्सचे पदवीधर मिळविण्याकरतां माझी योजना करण्यांत आली. तें कार्य फारच जबाबदारीचें होतें. त्या कामाच्या व्याप्तीमुळें मला राजकीय चळवळीकडे लक्ष देण्यास वेळच मिळेनासा झाला.

१९१६ मे मध्यें संपणाऱ्या टर्मचे वेळीं, सर अशुतोष मुकर्जींनीं मला सर तारकनाथ पलित यांनीं फिजिक्समध्यें फेलोशिप देण्यासाठीं निवडलें असल्याचें कळविलें. अमेरिकेंत त्या शास्त्राच्या अध्ययनासाठीं कोणास तरी ३ वर्षें पाठविण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यासाठीं माझीच निवडणूक करण्यांत आली. अमेरिकेस मला " Harvard " युनिव्हर्सिटींत तें शिक्षण संपादन करावयाचें होतें. परदेशांत असेपर्यंत मी, लग्न करतां कामा नये, एवढीच एक अट घालण्यांत आलेली होती. मला लागणाऱ्या पैशाची सर्व व्यवस्था करण्यांत आली. पासपोर्टसाठीं अर्जहि करण्यांत आला. एक महिनाभर पुष्कळ खटपट केल्यावर व सरकारला पूर्ण माहिती मिळाल्यावर मला पासपोर्ट देण्यांत आला. पासपोर्ट मिळतांच, मी सर्व तयारी केली. बोटीवर जागाहि रिझर्व करण्यांत आली. आप्तेष्टांचा निरोप

घेण्यासाठीं मी कृष्णनगरला गेलों. घरच्या मंडळींचा मी निरोपहि घेतला. बुधवार, जुलै १९१६ रोजीं, मला कलकत्ता सोडून शनिवारीं मुंबईहून निघणाऱ्या बोटीनें अमेरिकेस प्रयाण करावयाचें होतें.

माझी अशी सर्व सिद्धता होत आहे तों, सोमवारीं, एक पोलिस आधिकारी मजकडे आला, आणि त्यानें माझा पासपोर्ट काढून घेतला. व तुम्हांस हिंदुस्थान सोडण्याची परवानगी नाहीं असें त्यानें मला सांगितलें. मी आश्चर्यचकित झालों. मी तेथून तावडतोब सर अशुतोष मुकर्जींच्या घरीं गेलों. माझें बोलणें ऐकून त्यांनाही माझ्यासारखेंच आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. ते उद्गारले,—

" याचें कारण काय तुला कांहीं माहीत आहे ? "

" नाहीं. " मी खरेपणानें उत्तर दिलें. कारण, माझ्या क्रांतिकारक चळवळीचा सरकारला कसा सुगावा लागला याचा मला तर्कच होईना.

" ठीक; तूं आज जा; उद्यां सकाळपर्यंत, मला कांहीं माहिती मिळते आहे कां पाहतों. " मुकर्जींनीं उत्तर दिलें.

मी निघून गेल्यावर टेलिफोननें सर अशुतोष मुकर्जींनीं बंगालचे तेव्हांचे गव्हर्नर **लॉर्ड रोनाल्डशे** यांना बोलाविलें. परंतु, त्या दिशेनें कांहींच खुलासा झाला नाहीं. व्हाइसराय **लॉर्ड चेम्सफोर्ड** यांनीं उत्तर दिलें कीं, " काय घडलें आहे, त्याबद्दल आपणांस कांहींच माहिती नाहीं; त्याचा संबंध '**इंडिया ऑफीस**'शीं असला पाहिजे. "

त्या वेळीं, अमेरिकेस नाहीं तर इंग्लंडलाहि जाण्याची जरी परवानगी मिळती, तरीहि जाण्याची माझी सिद्धता होती. सर अशुतोष मुकर्जींनीं त्या गोष्टीची पूर्ण चौकशी लावण्याचें ठरविलें. आणि थोड्याच दिवसांत त्यांना अखेरचें उत्तर मिळालें.- कीं, " आज्ञेंत फरक होणार नाहीं; हिंदुस्थान सोडतां कामा नये. "

तेव्हढ्या अवधींत, मी माझी जागा सोडून दिलेली होती. आणि ती पुनः गुंतली गेल्यामुळें, शहराच्या दुसऱ्या एका भागांत, मी रहावयास गेलों. ज्या दिवशीं त्या नवीन जागेंत रहावयास गेलों, त्याच्या दुसऱ्याच दिवशीं, माझ्या एका मित्रानें येऊन मला कळविलें कीं, " काल रात्रीं ३॥ वाजतां, माझ्या पूर्वीच्या जुन्या जागेवर स्वारी करून पोलिसांनीं सर्व जागेची, आणि त्या घराचीहि, झडती घेतली. " आणखी थोडा वेळ गेला नाहीं तोंच, आणखी एक

बातमी लागली.– " पोलीस वारंट घेऊन माझाच शोध करण्याकरतां, युनिव्हर्सिटींतील माझ्या रूमकडे गेले आहेत. आणि मला समन्स लागू करून अंदमानला—ज्या ठिकाणीं राजबंदींना ठेवण्यांत आलेलें आहे त्या ठिकाणीं, पाठविण्याचा हूकूम झालेला आहे. त्या ठिकाणीं मी न सांपडल्यामुळें पोलीस कमिशनरनें खोलीची झडती घेऊन तेथें समन्स लागू केलें आहे. "

ती बातमी मला समजतांच, मजपुढें मोठा प्रश्न येऊन पडला. त्या रात्रीं, आतां यापुढें माझें कर्तव्य काय, याचा विचार करण्यांत सर्व रात्र निघून गेली. शेवटीं मी निश्चित केलें कीं, पोलीस कमिशनरची समक्ष गांठ घ्यावी; आणि शक्य तर, माझ्याविषयीं त्यास खुलासा विचारावा.

त्याप्रमाणें निश्चय करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं, ११ वाजतां, मी पोलिसकमिशनरकडे गेलों. ज्या कारकुनाकडे माझें समन्स होतें, तो, तें समन्स घेऊन आंतमध्यें गेला. आणि बऱ्याच वेळानें परत येऊन त्यानें म्हटलें, " या आफिसशीं, या गोष्टीचा कांहीं संबंध नाहीं. कीडस्ट्रीटवरील ऑफिसमध्यें जा; तेथें तुमची चौकशी लागेल. "

काय असेल तें असो, वाटेंत मला असें वाटलें, कीं, या कामीं दुसऱ्याची सल्ला घेणेंच इष्ट आहे. कदाचित्, मी कीडस्ट्रीटवर जातांच मला पकडण्यांत येईल. म्हणून तिकडे जाण्याचा माझा बेत मी बदलला, व कीडस्ट्रीटकडे न जातां कॉलेजकडेच जावयाचें ठरविलें. इतक्यांत वाटेंत एका मित्रानें मला बातमी दिली, कीं " कॉलेजमध्यें व्हरांड्यांत, पोलीस तुमचींच वाट पहात बसले आहेत ! " मी घराकडे परत फिरलों. आणि पुनः संध्याकाळीं मुकर्जींच्याकडे गेलों. त्यांनीं त्या दिवशीं माझें फारच आतिथ्य केलें. आणि यांतून मला सुटकेचा मार्ग काय, याविषयीं आम्ही दोघांनीं पुष्कळ वेळ विचार केला.

शेवटीं मी म्हटलें, " आपलेंच मत माझ्या मतापक्षां अधिक विचारार्ह आहे. आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहे. आपण जें मला सांगाल तें माझ्या हिताचेंच असेल."

मुकर्जी थोडा वेळ स्तब्ध राहिले; आणि नंतर ते म्हणाले, "मी त्याचा विचार करीत आहे; तुझ्या ठिकाणीं हा माझाच प्रश्न असता, तर, मी काय केलें असतें ? मला अशी खात्री वाटते, कीं, त्या प्रसंगीं मनुष्यानें जसें वागावयास पाहिजे,

तसेंच मी वागलों असतों. आणि म्हणूनच मला असें वाटतें, कीं जर तूं स्वतांला कांहीं किंमत देत असशील, तर, यावेळीं तूं ,शरण जातां कामा नये;माघार घेतां कामा नये. तुझ्या उज्वल चारित्र्याला जेणेंकरून कलंक लागेल. असें कांहीं तुझ्या हातून घडतां उपयोगाचें नाहीं. आजपर्यंत, तूं जसा वागत आला आहेस, तसेंच, या पुढेंहि तूं वर्तलें पाहिजेस. थांव; मी आंत जाऊन येतों. ”

असें म्हणून मुकर्जी आंत गेलें आणि हातांत एक ल्हानशी पिशवी घेऊन थोड्याच क्षणांत बाहेर आले. त्यांनीं ती पैशाची ल्हानशी थैली, मला अर्पण केली. पुढें मला त्यांत बरीच मोठी रक्कम आढळून आली. त्यांनीं मला शुभ आशीर्वाद दिला. ते ब्राह्मण होते ही गोष्ट जरी एका बाजूला ठेवली, तरी देखलि, संकटांत सांपडलेल्या तरुण मनुष्याला ज्यांच्यापासून आशीर्वाद मिळवितां येईल व त्यामुळें संकटांस सहज तोंड देतां येईल, अशाच प्रकारचे ते थोर मनुष्य होते.

मुकर्जींचा निरोप घेऊन, कलकत्त्यांतून मी थेट बाहेर पडलों. व सुमारें सात मैल चालून गेल्यावर, रात्रीं ११ च्या सुमारास एका घराच्या दारावर ठेठावलें. —मी, क्रांतिकारकांच्या हेड्क्वार्टर्समध्यें गेलों होतों.

या वेळीं ही माझी त्या खेडेगांवास दुसरी भेट होती. माझ्या पहिल्या प्रसंगाची थोडीशी हकीकत येथें निवेदन करणें अवश्य वाटतें. क्रांतितत्त्वांचा कॉलेजच्या क्षेत्रांत कसा प्रवेश झाला, तें मी पूर्वीं सांगितलें आहे. क्रांति-तत्त्वाकडे तेव्हां मी निरनिराळे दृष्टीनें पहात असतां, एक दिवस एक आकस्मिक गोष्ट घडून आली. त्या गोष्टीचा माझ्या पुढील हकीकतीशीं फार निकट संबंध होता.

एका रविवारीं सकाळीं मी आपल्यो मित्राच्या घरीं असतां, त्यास एका ठिकाणाहून बोलावणें आलें. माझा मित्र डॉक्टर होता. एक स्त्री अडली होती. व तिच्या सुटकेसाठीं, त्यास बोलावण्यांत आलें होतें. जातांना त्यानें मला आपल्या बरोबर घेतलें, आम्ही दोघे नावेनें निघालों. त्या आमच्या प्रवासास सुमारें चार तास लागले. तेव्हढ्या अवधींत त्या स्त्रीची सुखरूपपणें सुटका झालेली होती. माझ्या मित्रानें तीस औषधपाणी दिलें, व फी न घेतांच तो परत फिरला. ‘ माझ्या मित्रानें फी नाकारली ’ या गोष्टीचें त्या खेडेगांवच्या लोकांना फारच आश्चर्य वाटलें. त्यांना तो मोठा देव माणूस वाटला।

आम्ही तेथून निघतांना ते सर्व लोक गांवच्या शीवेपर्यंत आम्हांस पोंचविण्यास आले. एवढा मोठा डॉक्टर बोलावतांच आपल्या गांवीं येतों, आणि फी घेत नाहीं, ही गोष्ट त्यांना फारच चमत्कारिक वाटली. ते तो उपकार विसरले नाहींत. त्या लोकांचाच यावेळीं मला अत्यंत उपयोग झाला. दोन वर्षे निघून गेलीं, तरी ते मला विसरले नव्हते. मी त्या चमत्कारिक डॉक्टरबरोबर आलों होतों, याची प्रत्येकाला आठवण होती. परंतु, त्या दिवसांत आणि आज फारच अंतर होतें. आज, मला पकडून देण्यासाठीं २५ हजारांचें इनाम लाविलें गेलें होतें. व त्या गांवीं मी असल्याचें, गांवांतील प्रत्येक माणूस जाणत होता. त्यांच्यापैकीं एखाद्यानेंही जरी मनांत आणलें असतें, तर त्यावेळीं मला पकडून देणें मुळींच अशक्य नव्हतें. परंतु, ती गोष्ट त्या गरीब लोकांच्यापैकीं एकाच्याहि मनांत आली नाहीं.

रात्रीं येऊन ज्या घराचा मी आश्रय घेतला होता, तें ठिकाण सुरक्षित असें होतें. परंतु, माझें खरें कार्य तेथून थोड्याच अंतरावर असलेल्या एका क्रांतिकारक पुढाऱ्याशीं होतें. त्या रात्रीं, त्या घरीं अनेक व्यक्ती मला भेटावयास येऊन गेल्या. त्यांत एक अविवाहित तरुण स्त्री होती. तिनें आपणास क्रांतिकारकांच्या कार्याची पूर्ण माहिती असल्याचें सांगून क्रांतिकारकाच्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेण्याची इच्छा प्रगट केली. एका तरुण स्त्रीमध्यें तशा प्रकारची इच्छा आढळून येणें ही गोष्ट मला असाधारण, अलौकिक-अपूर्व-आश्चर्यानें स्तंभित करून सोडणारी वाटली. या गोष्टीचा, मी येथें एवढ्याच करतां उल्लेख करीत आहे कीं, भारतमातेच्या कार्याविषयींची ती भक्तीच भारतमातेस ज्या असह्य यातना आज सोसाव्या लागत आहेत, त्यापासून तिला मुक्त करणार आहे. भारतमातेवरील तिच्या कन्यांचें उत्कट प्रेमच तिच्या शृंखला तोडण्यास समर्थ होणार आहे. भारतमातेबद्दलचें कर्तव्यप्रेम तिच्या कन्या आज कितीशा जाणत असतील हें मला माहीत नाहीं. त्या तरुण स्त्रीबद्दल एकाएकी विश्वास वाटणें शक्यच नव्हतें. जेव्हां ती जाण्यास उद्युक्त झाली, तेव्हां ती पुनः मजकडे आली आणि म्हणाली "हे मी थोडेसे पैसे सांठविलेले आहेत; आपल्या कार्याला यश यावें, म्हणून ते आपणांस देण्याची माझी इच्छा आहे; हे घ्या."

ते पैसे मी नाकारले; मला जितक्या पैशाची गरज होती तेवढे ते मजजवळ असल्याचें मी सांगितलें.

ती फार निराश होऊन तेथून निघून गेली. परंतु, एका तासांतच ती पुनः मजकडे परत आली.

यावेळीं तिनें एक रिव्हॉल्व्हर माझ्यापुढें केला.

" त्या पैशानें हा मीं विकत आणला आहे; " ती उद्गारली.

परंतु, मी पूर्ण सशस्त्र होतों. व तो ' एखाद्या चांगल्या प्रसंगाकरतां ठेव' म्हणून तिला मी सांगितलें.

" मला जें कांहीं पाहिजे आहे, " मी म्हटलें, " तें एवढेंच कीं, या खेड्याच्या थेट पलीकडे–मी कुणाच्याही दृष्टीस न पडतां, मला जावयाचें आहे. ज्या मनुष्याला भेटण्याकरितां मी इतक्या दूरवर आलों आहे, त्याची अजून भेट झाली नाहीं. त्याची भट घ्यावयाची आहे. "

" त्यांत काय आहे; तें अगदीं सहज होईल. " तिनें उत्तर दिलें. आणि लगेच, एका स्त्रीस हाक मारून तिनें म्हटलें, " कुणाला तरी मुलाला पाठवून गाडी जोडून आणायला सांग. आणि तूं एका स्त्रीचीं वस्त्रप्रावर्णे घेऊन ये; आम्हांला हवा खायला, बाहेर जायचं आहे. "

आणि आम्ही तसेंच केलें. जेव्हां गाडी आली, तेव्हां, त्यांत दोन स्त्रिया दिसल्या. त्यांनीं आपल्या तोंडावर बुरखे घेतले होते. गाडी अगदीं नेहमींच्या रस्त्यानें जगामध्यें गेली. वीस मिनिटांत माझें उद्दिष्ट साध्य झालें.

त्या वेळीं क्रांतिकारक संघाचे सुमारें ५०० सदस्य होते. व ते सर्व बंगाल आणि पंजाब प्रांतभर पसरलेले होते. प्रत्येक खेड्यांत त्यांची संख्या दोहोंहून किंवा तीहून अधिक नव्हती. क्रांतिकारकांच्या त्या संघटनाची सरकारला पूर्ण जाणीव होती. आणि त्यामुळेंच, क्रांतिकारक काय करीत आहेत याकडे गव्हर्मेंटचें लक्ष्य लागून राहिलें होतें. इंडियन ऑफिसरांचा अनेक उद्योगापैकीं तो एक विशेष उद्योगाचा भाग होऊन बसला होता. व बातमी-खात्यालाहि आंतून अनेक बातम्या मिळणें तेव्हां कांहीं अशक्य नव्हतें. ज्या कांहीं गोष्टी त्यावेळीं आणि नंतर, माझ्या नजरेस आल्या, त्यांचा उलगडा चळवळीच्या हृदयांत सरकारच्या बातमीखात्याचे लोक सामील झालेले असले पाहिजेत, अशी कल्पना केल्याखेरीज ' होऊंच शकत नाहीं. क्रांतिकार्य म्हणजे सुळावरची पोळी होती. तो विस्तवाशीं खेळ होता.–ज्यांच्याबरोबर आम्ही तो खेळ खेळत होतों, त्यांचें सामर्थ्य किरकोळ नाहीं या गोष्टीची क्रांतिकारकांना पूर्ण जाणीव होती. क्रांतिकारक ती गोष्ट कधींच विसरले नाहींत.

बंगालमधील सर्व क्रांतिकारक पुढाऱ्यांची एक गुप्त सभा, १४ ऑगष्ट १९१६ रोजीं बोलावण्यांत आली. सभेचें कार्य अधिक सुरक्षितपणें चालावें म्हणून कलकत्त्याच्या पलीकडे एका घरांत ती भरविण्यांत आली होती. प्रमुख पुढाऱ्यांपैकीं १६ जण हजर होते. घराच्या सभोंवतीं उंच भिंतीचा तट होता. तटाच्या भिंतींतच एक लोखंडी दरवाजा होता.

दोनच्या सुमारास, जे दोघेजण छपरावर बसून टेहळणी करीत होते, ते खालीं उतरले. आणि त्यांनीं "वाडा घेरण्यास पोलिसांनीं सुरवात केली" असल्याचें सांगितलें. तत्क्षणीं, आम्ही पुढच्या दरवाजाजवळ गेलों. आणि रांगा करून उभे राहिलों. पांच, चार, चार, तीन. मी शेवटच्या रांगेत होतों. दरवाजा एकदम उघडला गेला! पुढील पांचजणांची रांग, आपली ऑटोमॅटिक पिस्तुलें झाडीत आणि गोळ्यांचा वर्षाव करीत, निघून गेली. दरवाजांत दहा किंवा बारा माणसें उभीं होतीं. प्रत्येकजण चीत झाला. आम्ही सर्वजण सुरक्षितपणें निसटून एका रस्त्याला लागलों. तो बोळ पुढें एका मोठ्या रस्त्याला जाऊन मिळत होता. माझ्यापेक्षां बाकीचे सर्वजण पळण्यांत अधिक हुषार होते. जेव्हां गोळीबार सुरू झाला, तेव्हां माझ्याखेरीज बाकीचे सर्व गोळीबाराच्या टप्प्याबाहेर निघून गेले होते. गोळींबाराला सुरवात झाली तेव्हां, मी कोपऱ्यावरून वळत होतों. तो अनुभव मला अगदीं नवीन होता. त्यावेळीं माझ्या मनांत वाटत होते तें एकच, कीं, "त्यांना तुला भेटावयाचें असेल,-तर तूं पळण्याचें काम असेंच चालू ठेविलें पाहिजेस!" लवकरच मीं घरें ओलांडली; बागा मागें टाकल्या;-तरी मी धांवतच होतों!

इतक्यांत, माझ्यापुढें एक संकट उभें राहिलें. गंगेनें मला उभें केलें. दम खाण्यासाठीं आणि पुढें काय करावयाचें तें ठरविण्यासाठींच जणूं कांहीं तिनें मला उभें केलें. मला थोडीही कल्पना नव्हती, कीं, 'मी कुठें चाललों, आहे' आणि आतां 'पुढें कसें पार व्हावयाचें?' इतक्यांत उजाडण्याचा समय आला. अदृश्य होण्याची तर मला अतिशय आवश्यकता भासूं लागली. मी दूरवर पाहिलें. उजेडांत सुमारें मैल दीड मैलावर माझ्या ओळखीचें गांव असलेलें दिसलें. त्यावेळीं मीं अगदीं दमलों होतों. परंतु, काय वाटेल तें करून शक्य तितक्या लौकर, त्या खेड्याकडे जाणेंच मला भाग होतें. अरुणोदयाच्या सुमारास, त्या खेड्यांत मी जाऊन पोंचलों. आणि एका दरवाजावर ठोठावलें. एका स्त्रीच्या आवाजानें 'कोण आहे'

म्हणून विचारलें. मी म्हटलें, " अमूल्य. ' ' अमूल्य ' हे लाडकें नांव माझ्या आजीनें मला दिलें होतें.

दरवाजा उघडला गेला. दरवाज्याच्या मार्गांतच एक स्त्री उभी होती. तिनें म्हटलें, " काय झालं अमूल्य ? तूं इतका रक्तानें कसा माखला आहेस ! ! "

मी खालीं पाहिलें. माझ्या उजव्या पिंढरींतून टप टप रक्त गळत होतें. त्याच क्षणीं मी जमिनीवर भयंकर मूर्च्छा येऊन पडलों. मला आंत नेण्यांत आलें. घरांतील एक पुरुष हातांत केरसुणी घेऊन दरवाजाकडे गेला. व जिथून ते रक्ताचे थेंब त्याच्या घरापर्यंत गळत आले होते ते सर्व त्यानें पुसून काढले; मागमूसही राहूं दिला नाहीं.

मला थोडेसें बरें वाटलें, तेव्हां, काय परिस्थिति आहे हें समजून घेण्याकरतां मी कलकत्त्यास जाण्यासाठीं परत निघालों. यावेळीं मी पहिल्या वर्गांतूनच प्रवास करण्याचें ठरविलें होतें. कारण मला असा विश्वास वाटत होता, कीं, तिसऱ्या वर्गांतील प्रवाशापेक्षां पहिल्या वर्गांतील प्रवाशांवर गुप्त हेरांची नजर फार कमी असेल. पहिल्या वर्गांतील प्रवाशाकडे तिसऱ्या वर्गांतील प्रवाशाप्रमाणें कोणाचें फारसें लक्ष्य जाणार नाहीं. मी जों एका कंपार्टमध्यें शिरतों,– तों, पहिला आणि एकच मनुष्य जो माझ्या दृष्टीस पडला तो एक युरोपियन होता. आणि माझ्या कर्मांची गति तरी किती गहन ! त्यानें मला पासपोर्ट दिला होता; तोच तो अधिकारी होता. मला पाहतांच तो ज्या विचारांत पडला त्याच विचारांत मीही होतों ! निःसंशय त्यानें मला ओळखलें होतें. परंतु धन्य असो त्या युरोपियन रीतिरिवाजांची ! तो आपणास फारच मोठा मनुष्य समजत होता. आणि माझ्याकडे–माझ्यासारख्या दुर्दैवी प्राण्याकडे पाहणें म्हणजे काय !–त्यानें आपली नजर दुसरीकडे फिरविली, एकाद्या खऱ्या युरोपियनला साजेल असें वर्तन त्यानें त्यावेळीं केलें ! हिंदी शिष्टाचारापेक्षां युरोपियन शिष्टाचाराला तो अधिक किंमत देत होता ! आणि, ते त्याचें करणें त्यावेळीं अयोग्य होतें. असें कोण म्हणेल ? आपल्या डब्यांत कोणी अन्य माणूस आलें आहे याची आपणास यत्किंचितही जाणीव नाहीं, अशा बेमुर्वतखोर वृत्तींत तोंडापुढें वर्तमानपत्र धरून तें वाचीत, आणि खिडकींतून बाहेरचा देखावा पहात त्यानें आपला सर्व प्रवास संपविला. आणि मीहि पण, कलकत्ता येईपर्यंत त्याच्याशीं एक अक्षरही बोललों नाहीं !– मला हिंदी मनुष्याला, कांहींच अभिमान नसेल काय !

मी कलकत्याला आलों तेव्हां चौकशी-अंतीं असें आढळून आलें कीं, त्या रात्रीं जे निसटून गेले होते, त्यांच्यापैकीं जखमी आणि घायाळ झालेला असा काय तो एकटा मीच,, साहाजिकपणेंच माझ्याविषयीं बाकीच्यांना काळजी लागून राहिलेली होती. कारण त्यांना माझ्या हालचालीसंबंधानें मी कलकत्याला येई-पर्यंत कांहींच समजलें नव्हतें. नंतर मला असेंहि सांगण्यांत आलें कीं, ज्या खोलींत, त्या रात्रीं, आपण पोलिसांच्या हातीं सांपडावयाचें नाहीं, पोलिसांच्या हातावर तुरी द्यावयाच्या म्हणून निश्चय केलेला होता, त्या माझ्या खोलीस मी तेथून गेल्यावर लागलीच पोलिसांनी भेट दिली! आणि खोलींतील झाडून सर्व बारीकसारीक वस्तूंची 'इन्स्पेक्शन्' करण्यांत आली! अजूनहि मला या गोष्टीची कल्पनाच नव्हती, की मजवर आरोप काय ठेविला आहे! मला मुळीं कल्पनाच येईना, कीं, मला पकडून देण्यासाठीं २५ हजारांचें बक्षिस लावण्या-सारखे [illegible]ल्यांत विशेष तें काय आहे? आणि पुढें, कित्येक दिवसपर्यंत, माझी उच्च [illegible]श्वविद्यालयांत 'दौड' मध्येंच कायमची कां थांवविण्यांत आली आणि माझ्या प्राणासाठीं इतकें मोठें बक्षीस कां ठेवण्यांत आलें, याचें गूढ कोडें मला उलगडलें नाहीं. परंतु पुढें मी अमेरिकेंत गेल्यावर, त्या कोड्याचा उलगडा झाला! अमेरिकेंत कॉन्सल **जनरल व्हान बॉप** (Consul General von Bopp [illegible] यांच्या ऑ[illegible]ची जे[illegible] [illegible]. झड[illegible] घेण्यांत आली, तेव्हां, ऑफि-समधून नेलेल्या कागदपत्रांत—"ज्याच्या मार्फत किंवा जोखमीवर हिंदुस्थानांत गुप्तरीत्या हत्यारें प्राप्त करून घेतलीं जात आहेत असा 'पुढारी' 'नेता' म्हणून माझें नांव होतें म्हणे!" माझें नांव कागदपत्रांत आढळून येतांच, जर्मनांनीं कांहीं योजना करून शस्त्रास्त्रें व युद्धसामुग्री अमेरिकेंत खरेदी केली; आणि ती जहाजांत भरून जावामार्गें तीन भिन्न भिन्न स्थळीं,—**बालेसर, सुंदरबन** आणि **कराची** या ठिकाणीं जाऊन पोहोचेल अशा रीतीनें रवाना केलीं. तीं शस्त्रास्त्रें त्या त्या ठिकाणीं लपवून ठेवण्यांत यावयाचीं होतीं.

पुनः मी कलकत्यांत प्रविष्ट झाल्यामुळें, सर अशुतोष मुकर्जींची भेट घेणें मला योग्य वाटलें. मी माझी कथा, त्यांना सांगितली. माझी कथा ऐकून घेऊन ते मज-वर सणसणीत टीका करून उद्गारले, "My boy, it is getting to be too hot for you. I advise you to see if you cannot leave India for a while." तत्क्षणींच मी हिंदुस्थान सोडण्याचा विचारास लागलों.

पहिल्यांदा मला असें वाटलें, कीं उत्तम मार्ग, म्हणजे, आपण तिबेटांतून जावें. असें मनांत येतांच मी चंबी (Chumbi) ला जाणारी ट्रेन पकडली यावेळींहि मी पाहिल्याच वर्गांतून प्रवास करण्याचें ठरविलें, त्या वेळीं, मी युरोपियन पोषाक केला होता. माझा चेहरा अगदीं युरोपियनसारखा नसला, तरी युरेशियनमध्यें मीं सहज मोडूं शकतों. युरेशियन हे जवळ जवळ युरोपियनच, [illegible] पोषाखानें तेव्हां मला फारच सहाय्य केलें. कालिमपॉगची सरहद्दही मी ओलांडून गेलों. परंतु, त्यावेळीं मीं तिबेट पहिल्यांदाच पहात होतों ! त्या पहाडी मार्गांतून मी धडपणें चीनपर्यंत तरी जीवंत जाईन कीं नाहीं, याची मला शंका वाटूं लागली. कांहीं मैल गेलों नाहीं तोंच, माझ्यापुढें अनेक अडचणी उभ्या राहिल्या. अनेक संकटांशीं टक्कर देणें मला भाग आहे असें वाटलें. संकटांनीं मला आव्हानच करण्यास सुरवात केली ! मला एक गोष्ट स्पष्टपणें दिसून आली, कीं, 'मी आतां पुढें जाईन तर बर्फांत गोठूनच मरणार'! तिबेटांतच मला आतां जिवंत समाधि घ्यावी लागणार ! त्यांत कांहीं मला मौज वाटली नाहीं; मी कलकत्त्यास परत आलों.

नंतर असें वाटलें, कीं आपण अप्पर बर्माच्या जंगल-मार्गानें भामो पार झालों, तर, ब्रिटिश-हद्द ओलांडल्यासारखें होईल. मी भामोस जाण्याची तयारी करीत आहें तों माझे वडील [illegible]कत्त्यास [illegible] भेट[illegible]र्थी आल्याचें [illegible] समजलें ! मी त्यांना भेटावयास गेलों. मला पाहतांच त्यांनीं अत्यंत आश्चर्य प्रकट केलें. ते उद्गारले, "—मग, मला काय त्या पोलिसांनीं गांवांत सांगितलें,—कीं तुमचा मुलगा हिंदुस्थान सोडून केव्हांच भामोच्या मार्गानें गेला म्हणून !"

खरोखर पोलिसांना काय बातमी लागली ! माझी वित्तंबातमी त्यांनीं कुठून काढली कोणास ठाऊक ? माझ्या योजना त्यांना कशा समजून आल्या, मला तर्कच होईना ! ठीक; त्यांचें तें कामच आहे ! अशा गोष्टी त्यांनीं शोधून काढून-कीं ज्यांची कधीं जगाला कल्पना नसेल, ज्या झाल्या नाहींत गेल्या नाहींत त्यांनीं,—जगाला एकदम थक्क करून सोडावयाचा प्रयत्न करावयाचा. केव्हां केव्हां, पोलिसांना असें अकल्पित यश येत असतें !

दुसरा एकच मार्ग उरलेला होता. तो म्हणजे समुद्रमार्गानें जाणें. माझ्या कांहीं मित्रांना बातमी लागली, कीं, "लौकरच एक डच-शिप जावाला जाण्यास निघणार आहे." कोणी त्या बोटींतून मला घेऊन जाण्यासहि कबूल

२५०१८ १९२-२ ३१७६१७ ३०९९५८

झाला होता. माझा तो बेत मी मुकर्जींना सांगितला. परंतु, त्या बोटीनें प्रवास न करण्याविषयीं मुकर्जींनीं मला सल्ला दिला. ते म्हणाले,—" तूं कदाचित् हिंदुस्थानच्या बाहेरहि जाशील; जावासहि जाऊन पोहचूं शकशील; परंतु ब्रिटिशांची समुद्रावर सत्ता आहे. समुद्रांतून कोण कुठें प्रवास करीत असतात यांजवर त्यांची सारखी नजर असते. त्यांच्या नजरेंतून सुटणें फार कठीण गोष्ट आहे. तूं थोडासा लांब जाशील न जाशील तोंच, तुला पुनः कलकत्त्यास यावें लागेल. " मला त्यांचें तें बोलणें सत्य वाटलें. त्या वेळीं माझी अशी दृढ समजूत होऊन चुकली, कीं हिंदुस्थान एवढा मोठा देश खरा;–परंतु, त्यांतून पळून जाणें सोपी गोष्ट नाहीं.

**सर अशुतोषनीं** आपल्या ओळखीच्या असलेल्या एका मनुष्याची मला गांठ घ्यावयास सांगितलें. त्या मनुष्यावर अशुतोषनीं फारच उपकार केलेले होते. त्या दिशेनें मला थोडी आशा उत्पन्न झाली. आक्टोबरचा शेवट आला होता; आणि जुलैपासून, मी पोलिसांची नजर चुकवीत होतों.

त्या मनुष्यानें ज्या एका स्थळीं मला जावयास सांगितलें होतें, त्या मार्गास मी लागलों नाहीं तोंच, मला असें आढळून आलें कीं, जेथें पैशाखेरीज एकही गोष्ट होऊं शकणार नाहीं त्या ठिकाणीं थोडाहि जरी पैसा असला तरी मनुष्याला पुष्कळच गोष्टी करतां येतात.

कांहीं थोड्या अवधींत माझ्या अनेक मित्रांनीं आपापसांत बाराशें रुपयांची रक्कम जमा केली. थोड्याच दिवसांत मी ' खां ' झालों ! मीं मुसलमानी पेहराव करूं लागलों; दाढी वाढविली; आणि बोटींतलि खलाशी ज्या ठिकाणीं राहत असत, त्या ठिकाणीं राहण्यास गेलों. मला काम कांहींच मिळण्यासारखें नव्हतें. परंतु, दिवसेंदिवस त्यांच्यांत मी मिसळूं लागलों. आणि शेवटीं तर त्यांच्यापैकींच मी एक होऊन बसलों ! त्या अवधींत जहाजाची सर्व माहिती मी मिळवून घेतली. शेवटीं एका मनुष्याशीं माझा दृढ स्नेहसंबंध स्थापित झाला. तो मनुष्य परदेशांत लागणारीं माणसें पुरवीत असे.

नोव्हेंबरच्या मध्यकाळीं, एके दिवशीं, मला समजलें कीं, एक जहाज लौकरच फिलाडेल्फियास जाण्यास निघणार आहे. तें जहाज मालाची वाहतुक करणाऱ्या एका सुप्रसिद्ध इंग्लिश कंपनीचें असून तें या वेळीं आरमारीखात्याच्या कामासाठीं वेठीस धरण्यांत आलेलें होतें ! जहाज सुटण्याची वेळ मध्यरात्रीची

होती. तिसऱ्या प्रहरीं सर्व खलाशांची नोंद करण्यांत येऊन जहाजास परवानगीचा दाखलाहि देण्यांत आला. परंतु रात्रीं, बऱ्याच उशिरा, असें आढळून आलें कीं जीं दोन माणसें एंजिनघरांत कोळसा घालण्यासाठीं कामावर लावण्यांत आलेलीं होतीं, तीं गैरहजर आहेत !-त्यांच्या जागा भरून काढणें अवश्य आहे !

" हे इथें दोघेजण बसले आहेत; हेंहि तें काम करूं शकतील ! " जवळच असलेल्या आम्हां खलाशांपैकीं कामास न लागलेल्या आमच्या दोघांकडे बोट दाखवीत खलाशांवरील मुख्य उद्गारला.

" मग ते येत असतील तर घ्या त्यांच्याकडून सह्या करून. आज रात्रीं आपणांस निघालेंच पाहिजे.-मध्यरात्रीं बंदर सोडून आपणास दूर गेलें पाहिजे. " आमच्या खलाशांवरील अधिकाऱ्यास त्याच्या वरिष्ठानें हुकूम सोडला.

लागलीच मीं सही केली. कोणाची-कोणत्या नांवावर मी सही केली, तें मला आज आठवत नाहीं. आणि मी मध्यरात्र होण्याच्या आधींच, जहाजावर चढलों. जहाजावर चढण्यापूर्वी मध्यरात्रीच्या कालांत, मार्गप्रतीक्षेप्रमाणें माझे वडीलहि येऊन मला भेटून गेले. त्यांनीं मला शुभ आशीर्वाद दिला. व अमेरिकेस सुखरूपपणें जाऊन पोहोंचो, आणि हिंदुस्थानची हवा मला मानवत नाहीं तर अमेरिकेच्या हवेंत तरी माझ्या मनाला पाहिजे तसें समाधान लाभो, अशी इच्छा प्रदर्शित केली, आणि मी हिंदुस्थान सोडलें !—*

---

* **श्रीशैलेंद्रबाबू** आज न्यूयॉर्कला आहेत. श्रीशैलेंद्रबाबूंना परमेश्वरानें दीर्घायुष्य द्यावें व लौकरच त्यांना मातृभूमीस परत आणावें अशी त्या दयाघन परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.

# परिशिष्ट ३.

## आणखी कांहीं क्रांतिकारक.

बंगाली तरुणांच्याप्रमाणेंच अन्यान्य प्रांतीय तरुणांनीं महायुद्धाच्या कालीं आपली तेजस्विता जगाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. ज्याप्रमाणें बंगाली तरुण अद्भुतकर्मी होऊन गेले त्याप्रमाणें तेहि होते. या ठिकाणीं दोन तीन नांवें उल्लेखयोग्य आहेत. अमेरिकेच्या " **गदर पार्टी** " चे **कर्तारसिंह सोहनसिंह**, आणि महाराष्ट्रीय युवक **पिंगळे.** प्रथमोक्त कर्तारसिंह यांस १९१५ सालीं लाहोरला फांशीं देण्यांत आलें. शेषोक्त उभयतांना बर्मास फांशीं देण्यांत आलें.

REFBK-0003676

REFBK-0003676

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........